# बालबोध.

# BALABODHA.

## पुस्तक तेत्तिसावें.



किंमत १२ आणे.

# बालबोधाच्या तेत्तिसाव्या वर्षाची
## अनुक्रमणिका.


पृष्ठ.

### चित्रें, चरित्रें.

एम्. प्वांकारे. ... १६९
क्याप्टन स्काट. ... ७३
गणेश जनार्दन आगाशे. १
चुनीलाल धरमदास सरय्या. २१७
जॉन पीयरपॉंट मार्गन. १२१
दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला. ... २६५
भिवाजी रामजी नरे. १९३
मोरो केशव दामले.... ४९
वुड्रो विल्सन. ... २५
श्रीनिवासराव कोन्नूर रोद्द. ९७
सर आदमजी पीरभाई. १४५
सर रावर्ट बॉल. ... २४१

### कविता.

एका सात्विक वृद्धाचा अनुभव. ... १७६
काल काय म्हणतो. ... २००
जगांतील नीतिसंपत्ति. १५१
तुझी व्याप्ति कितीशी. २५०
पर्वतस्तवन. ... २७२
प्रारब्धाचा महिमा. ... ११
बालपण हें देवपण आहे. ३२
भक्ति करणें हें मनाचें काम, देहाचें नव्हे. १२९

पृष्ठ.

मनुष्यपुष्पसंवाद. ... २२५
लार्ड हार्डिंज ह्यांची जयंति. ... ८१
वनस्पतींचें भाग्य. ... ५७
सृष्टव्यापारांत चूक नाहीं. १०३

### नीतिपर निबंध.

आमचीं कामें आम्हींच करावीं. ... १७७
तीन महोत्सवांचें राजकीय स्मारक. ... १५२
दमयंतीचें चातुर्य. ... १३०
देवसेवा आणि देशसेवा. २०१
दृष्ट आणि अदृष्ट. ... २५१
नाटक. ... ... १०४
न्यायशील मनुष्य. ... २२६
न्यायनिष्ठुरता. ... ५८
फलज्योतिष निरुपायाचें विश्वासस्थान. ३३
मनुष्याची पराधीनता ८२
वाङ्मयाध्ययनाचें उत्तम फळ. १२
हिंदुस्थानांतल्या आईबापांचीं कर्तव्यें. ... २७३

पृष्ठें.

**शास्त्रीय विषय.**

कृत्रिम रीतीनें पाऊस पाड-
ण्याची एक कल्पना. २५५
दगडी कोळसा. ... १६
पोलाद. ... ... १५६
समुद्रांतून तारा टाकणें. ६४
शास्त्रीज्ञानाभिवृद्धि. ... ३९, ८६, ११०, १३३, १८३, २०७, २३२, २७८.

**स्फुट.**

आनी बिझांटबाई. ११५
आनी बिझांटबाईची
एक नवी संस्था. २३६

पृष्ठें.

एक अत्यंत हृदयद्रावक गोष्ट. २८३
उत्कृष्ट स्पष्टोक्ति. ... ९०
उजवा हात. ... ... ४३
कंपनीच्या नौकरांची रहाणी. १८७
खाण्याचे पदार्थ आणि
प्रकृती. ... १४०
प्राण्यांचे चमत्कार ... १८७
समुद्रांतून तार टाकणें. ६४
स्फुट.... ... १६२, २५९

**लोक काय बोलतात.**

२१, ४५, ६९, ९३, ११७, १४१, १६५, १८९, २१३, २३७, २६१, २८५.

एप्रिल—१९१३.

# बालबोध.

## गणेश जनार्दन आगाशे.



ऐका ज्ञानाचें लक्षण ज्ञान म्हणजे आत्मज्ञान
पाहावें आपणास आपण या नांव ज्ञान.

रामदास.

आपल्या राष्ट्राच्या सांप्रतच्या लोकस्थितीमध्यें सुशिक्षित मंडळीवर "पाहावें आपणास आपण" ह्यानें अनेक कर्तव्यांचें

ओझें पडलें आहे, त्यांत दोन मुख्य आहेत. म्हणजे आपणास जें काय ज्ञान प्राप्त झालें आहे, तें होतकरू मंडळीस देणें हें एक; आणि त्या ज्ञानाचा उपयोग करून, कालदेशवर्तमानानुरूप, देशकल्याण साधण्यास वागावें कसें, हें स्वतःच्या उदाहरणानें आणि बोधानें त्यांचे अंतःकरणांत बिंबविणें, हें दुसरें. हीं दोन्ही कामें अनेक अडचणीनीं वेष्टिलेलीं आहेत. त्यामुळें तीं फार कष्टमय होतात. तरी, तीं उत्तम प्रकारें साधल्याचीं जीं थोडींशीं उदाहरणें दाक्षिणात्यांमध्यें प्रमुख दिसतात, त्यांतच आमचे सन्मान्य मित्र रा० रा० गणेश जनार्दन आगाशे ह्यांच्या चरित्राची गणना आम्ही करितों; आणि नित्याच्या परिपाठाप्रमाणें, त्यांच्या संबंधाच्या कांहीं ठोकळ गोष्टी येथें सांगतों.

आगाशे ह्यांचें मूळ गांव रत्नागिरीनजीक कोळंबें म्हणून एक खेडें आहे, तें होय. तेथें त्यांचा पुष्कळ जमीनजुमला होता. पण, कलिमाहात्म्यानुरूप, त्यांच्यांत भाईबंदी उत्पन्न होऊन तिला त्रासून, सखारामपंत आगाशे, म्हणजे आमच्या चरित्रनायकांचे पणजे, तेथून निघून, इ० स० १७९८ च्या सुमारास, गारवडें, तालुके पाटण, जिल्हा सातारा, येथें येऊन राहिले. नंतर त्यांनीं निर्वाहाकरितां तासगांवकर पटवर्धनांच्या घरीं शागिर्तीची नौकरी धरिली. तरी आपल्या आंगच्या कर्तबगारीनें, ते त्यांच्या येथें पागनिसाच्या जागेपर्यंत चढले. त्यांच्या मागें पागनिशीचें काम त्यांचे चिरंजीव राजारामपंत ह्यांनीं कितीएक वर्षें केलें, आणि त्या मुदतींत त्यांनीं आपल्या प्रामाणिकपणावरून त्या प्रांतांत चांगला लौकिक मिळविला. पुढें तासगांव संस्थान खालसात झालें. तरी राजारामपंत तासगांवींच राहिले, आणि त्यांचे धाकटे बंधु जनोबाभाऊ हे कांहीं उद्योग मिळविण्याकरितां पुण्याकडे आले, आणि

त्यांनीं श्रीक्षेत्र आळंदी येथील देवस्थानाकडे कमाविशीची नोकरी पत्करिली. हेच आपल्या चरित्रनायकांचे तीर्थरूप होत. ह्यांस लहानपणापासून संस्कृत शिकण्याची फार आवड होती. त्या भाषेचा त्यांचा अभ्यास विष्णुबुवा खाडिलकर ब्रह्मचारी ह्या प्रख्यात गुरूंच्या हाताखालीं झाला.

त्यांचे चिरंजीव गणपतराव होत. ह्यांचें जन्म पुणें येथें इ० स० १८५२ ह्या वर्षी झालें. ह्यांचें प्राथमिक मराठी शिक्षण आळंदीस झालें. तेथल्या शाळेंत त्यांची हुशारी पाहून, तेव्हांचे पुण्याचे डे. ए. इन्स्पेक्टर रावब० नारायणभाई दांडेकर ह्यांनीं इ० स० १८६३ त त्यांस लोकलफंड स्कालरशिप दिली. त्यानंतर दीड वर्षपर्यंत सासवडच्या शाळेंत अभ्यास् केल्यावर, नारायणभांईनीं त्यांची स्कालरशिप वाढवून पुढचा अभ्यास करण्यास त्यांस पुण्याच्या हैस्कुलांत आणिलें. नंतर इ०स०१८६६ पासून त्यांस त्या शाळेंतील संस्कृताची स्कालरशिप मिळूं लागली. शिवाय, तेव्हांपासून त्यांस शाळेंतली दुसरी एक चार रुपयांची स्कालरशिप मिळाली. अशा प्रकारें गणपतराव हे चांगले बुद्धिवान् विद्यार्थी आहेत, अशी त्यांची प्रसिद्धि झाली. पुढें इ० स० १८६९ त ते प्रवेशपरीक्षेंत पास झाले, आणि तींत संस्कृतामध्यें त्यांचा नंबर पहिला आल्याकारणानें त्यांस दरमहा पंचवीस रुपयांची जगन्नाथ शंकरशेट स्कालरशिप मिळाली. ह्या सगळ्या मुदतींत गणपतरावांस फार कठिण दिवस काढावे लागले. पुण्याच्या हैस्कुलांत असतांना ते कितीएक महिने आपला स्वैंपाक स्वहस्तें करीत असत.

इ० स० १८७१ ह्या वर्षी गणपतरावांची एफ्. ई. ए. ची परीक्षा उतरून, तींत त्यांस वीस रुपये दरमहाची स्कालरशिप मिळाली. शिवाय क्यांडी मराठी स्कालरशिपही त्याच वर्षी त्यांस मिळूं लागली. त्याच्या पुढच्या वर्षी "हिंदुस्थानाचें

दारिद्र्य" ह्या विषयावर पुण्याच्या वक्तृत्वसभेमध्यें साठ रुपयांचें पहिलें बक्षीस त्यांनीं मिळविलें. पुढें घरांतल्या अडचणींमुळें इ० स० १८७४ त पुण्याच्या हैस्कुलांत सत्तर रुपयांची असिस्टंट मास्तरची जागा त्यांनीं पतकरली. हाच त्यांच्या सरकारी नौकरीचा आरंभ होय. ह्याच वर्षीं ह्यांची बी. ए. ची परीक्षा उतरून ते पुण्याच्या हैस्कुलांत संस्कृत शिकवूं लागले, आणि १८७६ सालीं ह्यांच्या विद्यार्थ्यास जगन्नाथ शंकरशेट स्कालरशिप मिळाली. त्याच वर्षीं, भगवानदास पुरुषोत्तमदास संस्कृत स्कालरशिपकरितां निराळी परीक्षा होत असे, ती देऊन ती ह्यांनीं स्वतः मिळविली. ती चारशें रुपयांची होती.

ह्यानंतर गणपतरावांच्या बदल्या हैस्कूलच्या हेडमास्तरच्या जागेपर्यंत ठाणें, अहमदनगर, धुळें इत्यादि ठिकाणच्या शाळांत झाल्या. मध्यंतरीं ह्यांनीं एक वर्षाची फर्लो रजा घेऊन, पुत्रधर्मास जागून, आपल्या मातापितरांस बरोबर घेऊन काशीयात्रा केली. कांहीं दिवस ह्यांस एजुकेशनल इन्स्पेक्टर नेमिलें होतें. त्यांस, शेवटीं इ० स० १९०२ ह्या वर्षीं गव्हर्मेंट सेंट्रल बुक डेपोचे क्यूरेटरच्या ३५० रुपयांच्या जागेवर नेमिलें. पुढें सन १९०७ सालीं बुकडेपो बंद झाला तेव्हां गणपतरावजींनीं पेन्शन घेतलें. पेन्शन घेतल्यानंतर कांहीं महिने त्यांस, त्यांची इंग्लिशभाषापारंगतता जाणून, डेक्कन कालेजांत इंग्लिशभाषेच्या अध्यापकाच्या जागेवर नेमिलें होतें. हीं सगळीं कामें फार चांगल्या रीतीनें बजावून आपल्या वरिष्ठांकडून ह्यांनीं शाबास म्हणवून घेतल्याचे दाखले सरकारी दप्तरांत अनेक जागीं आढळतात. ह्यांच्या हाताखालून गेलेल्या विद्यार्थ्यांबद्दल डेक्कन कालेजचे माजी प्रिन्सिपाल सेल्बीसाहेब ह्यांनीं आपल्या एका रिपोर्टांत असें लिहिलें आहे कीं, मि. आगाशे ह्यांच्या धुळ्यांच्या शाळेंतून जे विद्यार्थी ह्या कालेजांत येतात, त्यांचे ठायीं शारीरिक

आणि मानसिक गुण विशेष वर्णनीय असतात; आणि ह्याविषयीं डैरेक्टरसाहेबांनीं आपल्या रिपोर्टांत असें म्हटलें आहे कीं, ही शिफारस फार मोठी आहे, आणि इतर हैस्कुलांच्या हेड-मास्तरांनीं हिजकडे लक्ष द्यावें असें मी इच्छितों. खात्याच्या मुख्याकडून एवढी मोठी शिफारस मिळण्याचा सुयोग फारच क्वचित् येतो. गणपतरावजींनीं आपलें नांव ठाणें आणि धुळें ह्या दोन ठिकाणीं अगदीं अजरामर करून ठेविलें आहे. ठाण्याच्या हैस्कुलच्या इमारतीला बैरामजी जीजीभाई हैस्कूल हें नांव आहे, आणि धुळयांच्या हैस्कुलाच्या नव्या इमारतीला गोविंद-राव रामचंद्र गरुड हायस्कूल हें नांव गाजत आहे. पण, त्या हैस्कुलांस सांप्रतचें स्वरूप प्राप्त होण्यास गणपतरावांचे उद्योग साधनीभूतच केवळ नव्हत, तर कारणीभूत झालेले आहेत, अशी साक्ष कागदपत्रांवरूनही चांगली पटण्यासारखी आहे.

गणपतराव इंग्लिश, संस्कृत आणि मराठी ह्या भाषांत चांगले प्रवीण असून, अत्युत्तम शिक्षक आहेत. विद्यार्थ्यांच्या मनांत विषय ठसविण्याची ह्यांची हातोटी फार चांगली आहे. आणखी ह्यांचे ठायीं विशेष गुण हा आहे कीं, आपलें कर्तव्य अगदीं मनापासून जीवेंभावें करावयाचें, त्यांत कांहीं कमी पडूं द्यावयाचें नाहीं. ही त्यांची वृत्ति त्यांच्या सगळया उद्योगांत मूर्तिमंत दिसत असल्याच्या योगानें, जुनीं माणसें, नवीं माणसें, लहानमोठे, समंजस असमंजस, इत्यादि सर्व लोकांत त्यांचें चांगलें वजन पडतें. त्यांचें म्हणणें त्यांच्या मनांत भरतें, आणि त्याप्रमाणें वागण्यास लोक तयार होतात. धुळयांत आम्हीं पाहिलें आहे कीं, कै. रावबहादुर गोविंदराव गरुड, एवढे वयोवृद्ध आणि लोकाग्रणी गृहस्थ, गणपतराव आगाशांस फार फार मान देत असत, आणि हरएक लहान मोठ्या सार्वजनिक कामांत त्यांची मसलत घेत असत.

शाळाखात्यांतल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून गणपतरावांनीं जशी धन्यता संपादिली आहे, तशी मानमान्यता, कितीएक संभावित आणि राजमान्य संस्थांमध्येंही आपल्या आंगच्या विद्वत्तेच्या आणि चतुरस्रपणाच्या बलावर त्यांनीं चांगली मिळविली आहे. ह्यांस मुंबईच्या विश्वविद्यालयाचे फेलो नेमिलें होतें. परंतु, प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें त्यांनीं त्या जागेचा राजीनामा दिला. हे डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीचे मेंबर आणि पुस्तकपरीक्षक आहेत, आणि डेक्कन एजुकेशन सोसायटीच्या कौन्सिलचे मेंबर आहेत. ते, मुंबई विश्वविद्यालयाच्या उच्च प्रतीच्या परीक्षांत, कितीएक वेळां, संस्कृतांत आणि मराठींत परीक्षक झाले होते. हे जे मान आहेत, ते, अंगीं तशी विद्वत्ता असल्यावांचून मिळत नसतात, हें सर्वांस ठाऊक आहे.

शिवाय गणपतराव हे उत्तम मराठी ग्रंथकार आहेत. तसे ते मराठी कविही सर्वमान्य झाले आहेत. मराठी भाषा त्यांची आज्ञांकित दासी आहे. मनांत आलेल्या विचारांचें चित्र, तिच्या हातून, ते गद्यांत तसें पद्यांतही, अगदीं हुबेहूब वठवितात. त्यास त्यांस उशीर लागत नाहीं. हे संस्कृत पंडित चांगले असल्याच्या योगानें मराठींत नवीन शब्द बनविण्यांत ह्यांचा अगदीं हातखंडा आहे. सुंदरेची संक्रांत, सद्गुणमंजरी, बालशिक्षण, अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें, राज्यारोहण, इत्यादि त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध असून त्यांची गणना उत्तम ग्रंथांत झालेली आहे. ह्यांखेरीज, विविधज्ञानविस्तारादि मासिक पुस्तकांत आणि इतरत्र त्यांचे कितीक गद्यात्मक आणि पद्यात्मक लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचें अवलोकन केलें म्हणजे त्यांच्या भाषेंत प्रसाद पुष्कळ असतो, आणि त्यांचें हृद्गत कळण्यास मुळींच प्रयास पडत नाहींत, ह्या दोन गोष्टी रसिकांच्या लक्षांत येऊन चुकतात. ह्याच मुख्य गुण ग्रंथकारामध्यें अत्यंत आव-

श्यक आहे, असें आम्ही समजतों. आणि हा गुण ईश्वरी कृपेवांचून आणि परिश्रमांवाचून कोणास प्राप्त होत नाहीं, असा सर्वत्र अनुभव आहे.

ह्या विषयींचे अनेक उतारे आमच्या वाचकांस अत्यंत प्रिय वाटण्यासारखे देतां येतील. परंतु, स्थलसंकोचास्तव तसें करवत नाहीं, ह्याचें फार वाईट वाटतें. तरी, उगाच त्याची थोडीशी लजत दाखविण्याकरितां, कै. न्या. रानडे ह्यांच्या निधनप्रसंगीं, बिरुदावलि म्हणून जें एक फार सुंदर काव्य ह्यांनीं रचून प्रसिद्ध केलें आहे, त्यांतले कांहीं वेंचे येथें देतों. गणपतरावजी हे न्यायमूर्तींचे निस्सीम एकनिष्ठ भक्त आहेत. तेव्हां, तादात्म्याच्या ओघानें, त्यांचे उद्गार अगदीं एकरूप असावे, हें अगदीं उघडच आहे. त्यांनीं न्यायमूर्तीस लक्षून म्हटलें आहे;—

### श्लोक.

किती हरिलिं संकटें स्मरति पुण्यवासी जन
किती श्रमहि सोशिले करुनि ते स्वदेशार्पण ।
किती जनिं कृतघ्नता, परि किती कृपासाउली
अशा मनुज-भूषणा विरल जन्म दे माउली ॥ १ ॥
पुणें नगर गाजलें भुवनिं पुण्य-भूमी असें
ततस्त्य-बुध-रानडे-मुख-विलोकन श्राद्धसें ।
असें मम सुहृज्जनीं गुणविचक्षणीं मानिलें
मदीय मतिलाहि तें उचित सत्यही वाटलें ॥ २ ॥
स्वराष्ट्र उदया चढो! प्रगतिमार्ग त्या सांपडो!
कलाभ्यसन आवडो! जन सदा सुविद्या पढो! ।
दुराग्रह तसा झडो! दुरभिमान सारा उडो!
विकाश मतिला घडो! मन विशुद्ध धर्मीं जडो! ॥ ३ ॥
तुह्मीं भरतखंड हें निजकुटुंबसें लेखिलें
हिताहित पित्यापरी सतत आमुचें देखिलें ।

शिरीं सतत वाहिलें स्वजन-कार्य-चिन्ता-भरा
प्रनष्ट जन-छत्र हें ह्मणुनि जीव हो घाबरा ॥ ४ ॥

अनेक विषयांवरी विविध तर्क फैलावले
अनेक-विध-कल्पना-गहनिं चित्त भांबावलें ।
विकाश घडला मना, जिरलि ते अहंता मनीं
प्रमोद बहु वाटला सुलभ या मनोमुंडनीं ॥ ५ ॥

अचाट करण्या कृती सगुणमूर्ति ही वांचली
तिच्याच गुणवर्णनीं सुकवि-भारती रंगली ।
उदाहरणरूप या सुचरितासि वाखाणितां
न शीण गमला मना उलट वाटली धन्यता ॥ ६ ॥

नृरत्न-बिरुदावली, घडविली तशी गांठिली
सुवर्णगुणिं ओंविली नयनवारिनें क्षाळिली ।
विदग्धपदिं अर्पिली, प्रिय असो तया धाकुली
गणेशकृति ही, जशी कवि-मयूर-केकावली ॥ ७ ॥

आणखी ह्या न्यायमूर्तींच्या चरित्रावरून गणपतरावजी महाराष्ट्रीयांस न्यायमूर्तींच्या एका पुण्यतिथीच्या वेळीं बोध करितातः—

### पद.

जन-हित-पंडित, सद्गुणमंडित, माधव तो आठवा ।
तयाचे गुण अंगीं बाणवा ॥ धृ० ॥
संग्रह त्यानें प्रतिदिनिं केला ज्ञानाचा जो नवा ।
बघुनि तो, ज्ञान तुह्मीं वाढवा ।
सतत उद्यमें आणि निश्चयें चढला तो वैभवा ।
तेहि गुण आचरणीं दाखवा ।
अगाध त्याचें ज्ञान पावलें विनयें बहु गौरवा ।
त्या गुणें निज-विद्या शोभवा ।
(चाल) स्वजनभक्तिची परमावधि दाविली ।
देशोन्नतिची वाट सुघड पाडिली ।
धर्मोन्नतिची सुलभ दिशा रोखिली ।

धडे तयाचे गिरवा, बरवा त्याचा क्रम चालवा ।
जनाचा हितार्थ तो मेळवा ॥ १ ॥

ह्यांतल्या पहिल्या उताऱ्यांत पंतांच्या केकेंतला ध्वनि ऐकूं येतो, आणि दुसऱ्या उताऱ्यांत जोशीबावांची थाप कानांत उभी राहाते! ह्या म्हणण्यांत तिळमात्रही अतिशयोक्ति नाहीं. ह्या पद्यरचनेची बरोबरी करणारी कविता—नवी कविता–आमच्या पाहाण्यांत दुसरी फारशी आली नाहीं. गणपतरावांस देवाची ही एक अमोलिक देणगी आहे.

शिमग्याच्या सणांत मुलांनीं आपल्या वाणीचा उपयोग चांगले रीतीनें करावा ह्याविषयीं ह्यांचे प्रयत्न धुळ्यांस गेल्यापासून चालू आहेत. त्या संबंधानें त्यांनीं तेथल्या विद्यार्थ्यांस बोध केला आहे—

## साक्या.

मंगलधामा हरिच्या नामा गाया क्षम जी दिधली
तीच अमंगल शब्दोच्चारीं रसना हरहर रमली
दुरुक्ति अघ तोडा, वाणीचें तें तप जोडा. १.
ब्रह्मनिरूपणपवित्रपुस्तककाव्यसुभाषितपठणा
विशुद्ध कर्मा आचरुनीयां धन्य करा ही रसना
अमूल्य ही वाणी, हो वचनामृतनिर्झरिणी. २.
वाणीचें हें पूर्व ऋषींनीं अमोघ तप आचरिलें
त्यांचेच तुम्ही वंशज असतां ब्रीद तयांचें त्यजिलें
आर्य तुम्ही असतां, कां हो अनार्यसें करितां. ३.

ह्या चरित्राचें समालोचन केलें म्हणजे अगदीं पहिली गोष्ट आमच्या होतकरू मंडळीस लक्षांत ठेवण्यासारखी अशी कळते कीं, सध्याची आपल्या उदार इंग्लिश प्रभूंची राजवट अशी आहे कीं, मुलानें मनावर घेतल्यास, त्याला अगदीं ओनामापासून पदवीधर होईपर्यंतचा श्रेष्ठ प्रतीचा विद्याभ्यास आईबापां-

वर भार न घालतां स्वतःच्या उद्योगानें करतां येतो. आणखी दुसरी गोष्ट ही कीं, ज्ञानसंपादनमार्गांत कितीही मोह पडले, तरी, सारासार विचार करून आणि आपल्यांतल्या शिष्टांच्या वळणानें वागून आपलीं कर्तव्यें करण्याविषयीं जागृति ठेविली, म्हणजे प्रपंचयात्रा सुखाची होते. आणखी खरोखर जन्मास येऊन करावयाचें काय तें हेंच असतें.

केवळ आपल्या पराक्रमानें एवढी मोठी योग्यता गणपतरावांनीं संपादिली असून, त्यांचा स्वभाव अगदीं साधा, सरळ आणि यथाशक्ति कोणासही साह्य करावयास सिद्ध असा आहे. पाश्चात्य वाङ्मयांत त्यांची गति फार मोठी आहे. आणि त्यांचें ग्रंथावलोकन अद्याप एकसारखें चाललें आहे, बंद पडलें नाहीं. त्यांशीं संभाषण चाललें असतां, वारंवार, कै. न्या. रा. रानड्यांशीं संभाषण करीत असल्याची आठवण होते. ही कांहीं अतिशयोक्ति नाहीं. आणखी ह्यांचे ठायीं सर्वांत विशेष वर्णनीय गुण हा आहे कीं, पाश्चात्य विद्येच्या संस्कारानें, सध्याच्या आपल्या स्थितीस अनिष्ट अशी जी एका वृत्तीची झुळूक आधुनिक सुशिक्षित मंडळींत कधीं कधीं दृष्टीस पडते, तिचें वारें देखील ह्यांस लागलेलें नसून, त्या पाश्चात्य ज्ञानाच्या योगानें आपल्यांतल्या मूळच्या संभावितपणास आणि सज्जनपणास चांगली भर पडली आहे. हें स्वतः गणपतरावांचें आणि आमच्या महाराष्ट्रमंडळीचें सुदैव होय. म्हणजे गणपतराव हे सत्पुत्र आहेत, सच्छिष्य आहेत, सत्शिक्षक आहेत, सत्कवि आहेत, आणि मोठे विचारवंत हिंदुस्थानचे एक खरे राजनिष्ठ, कित्ता घेण्यासारखे रहिवासी आहेत. ह्याच्या पलीकडे मिळवायाचें तें काय राहिलें? अशीच ह्यांची वृत्ति निरंतर राहावी, ह्यांचे हातून अशींच सत्कर्में नित्य घडत जावीं, त्यांचें अनुकरण आमच्या होतकरू मंडळीनें करवेल तितकें

करावें, आणि ह्या एकत्र श्रमांच्या योगानें, आमच्या महाराष्ट्राचें पाऊल उन्नतिमार्गांत दिवसेंदिवस पुढें पुढें पडत जावें, अशी परमेश्वराची प्रार्थना करून आम्ही हें अल्प चरित्र येथें समाप्त करितों.

---

## प्रारब्धाचा महिमा.

### श्लोक.

प्रारब्धा तुझिया समान दुसरा नाहीं त्रिलोकीं कुणी
तूं होसी अनुकूल नेत्र मिटुनी होतो गुणी दुर्गुणी
तेणें भक्त तुझे अनंत असती सर्वत्र पृथ्वीवरी
पुण्याई तव थोर ही न दुसऱ्या अन्या कुणाला वरी. १.
एकाच्या व्यसनें श्रमाविण कधीं अन्या मिळे संपदा
एकाच्या मरणें दुजा सहजची पावे नृपाच्या पदा
एकाच्या बहुमूर्खतेस्तव घडे कल्याण अन्यास तें
हे पाहोनि तुझे प्रताप कविला आश्चर्य कीं वाटतें. २.
थोथांडी व्यसनी सुमूर्ख शतशा लोकीं सुखें भोगिती
ज्ञानी शिष्ट पवित्र सज्जन तसे दुःखें सदा सोशिती
ते सारे विनयेंकरून भजती तूतें सदा वानिती
हें पाहोनि पदोपदीं चकित बा होते कवींची मती. ३.
शुद्धाचार करोनियां बहुपरी दुःखें सदा भोगणें
दुष्टाचारनिमग्न राहुनि सुखें सारीं सदा पाहणें
ही लीला तव होय कौतुक तिचें वाटे समस्तां जनां
नाहीं दूषित तूजला परि कुणी ही कोणती भावना. ४.
नाहीं भक्ति पवित्रता सुजनता थोथांड जे मांडिती
त्यांना साधु गणोनि पुष्कळ जनीं सप्रेम वाखाणिती
सत्यातें धरिती सदा विचरती सत्कर्म पंथीं अशा
शिष्टांतें न पुसे कुणी निशिदिनीं ते साहती दुर्दशा. ५.
हीं सारीं चरितें सदैव लपती मागें तुझ्या निश्चयें
कीं याहूनि दुजा उपाय जगतीं त्यांच्या न हातास ये

देवाची करणी विचित्र दिसते तूझ्या चरित्रामधीं
याचा अंत न लागणें गुरुसही वाटे कवीतें कधीं. ६.

## वाङ्मयाध्ययनाचें उत्तम फळ.

जगाची रचना अत्यंत चमत्कारिक आहे. त्यांत जसें सुख पुष्कळ आहे, तसें दुःखही पुष्कळ आहे. ह्यांपैकीं सुख संपादण्यास मनुष्यास सदुपदेशाची आवश्यकता असते, तसें दुःख टाळण्यास किंवा दुःखापासून आपली मुक्तता करून घेण्यास त्याच्या विरुद्ध प्रकारच्या व्यवहाराची माहिती अवश्यक असते. पण तिला केवळ असदुपदेश हें नांव देतां येत नाहीं. तिला युक्ति म्हणावें हें बरें. पंतांचें मत असेंच दिसतें सुभद्राहरणांत त्यांनीं म्हटलें आहेः—

पार्थ त्रिदंडिवेष स्वीकारी हलधरासि वंचाया
युक्तीनें स्वपरविहित हित करितां कपटदोष कंचा या.

ह्यांत त्यांनीं **वंचाया** तर म्हटलेंच आहे, तरी त्यांत कोणत्याही प्रकारची पापवासना नसल्याकारणानें, तेथें “नीतीनें” हा शब्द सहज बसण्यासारखा असून, त्याच्या ऐवजीं “युक्तीनें” हा शब्द घातला आहे.

कोणत्याही देशाचें प्राचीन किंवा अर्वाचीन वाङ्मय घ्या. त्यांत, कोणत्या ना कोणत्या तरी पर्यायानें, सदुपदेश आणि ह्या युक्ति ह्यांचा समावेश केलेला असतो. आपलें महाराष्ट्र वाङ्मय पहा. तो एक महासागर आहे. त्यांतला एक भारतग्रंथच केवढा तरी मोठा आहे? त्याचें स्थूलमान महाराष्ट्रीयांच्या लक्षांत येण्यास त्याविषयीं पंतांनीं आपल्या आर्याभारतांत म्हटलें आहेः—

इतिहास साठ लक्ष व्यासें स्वमनींच योजिला पहिला
मग विधिनें वर दिधला गणनाथें भक्तवत्सलें लिहिला. १.

त्यांतूनि तीस लक्ष त्रिदशांला पंधराचि पितरांला
गंधर्वांला चौदा एक सुमनुजां दिला न इतरांला. २.
सांगे मुनीश्वरांला एक शत सहस्र संहिता सौती
श्रुति गंगा सुरभीच्या त्या त्या सुगुणेंकरून ज्या सौती. ३.

ह्या विस्ताराचा विचार केला म्हणजे असें वाटतें कीं, साठ लक्षांतला एक लक्षच जरी आपल्या वांट्यास आला आहे, तरी, सगळ्या पृथ्वीवर आमच्या भारतग्रंथाएवढा मोठा दुसरा एकही ग्रंथ नाहीं. आणि ह्यांत वाङ्मयाच्या सहस्रावधि अंगांपैकीं अमकें एक अंग नाहीं, असें आढळावयाचें नाहीं. विचारवैचित्र्याच्या संबंधानें तर भारत हा कल्पवृक्ष आहे. त्यांतही, नीति आणि व्यवहार ह्यांविषयीं तर त्याची कमाल आहे. तें वाचूं लागलें म्हणजे असें वाटतें कीं, ह्या आदर्शामध्यें मनुष्याच्या वृत्तीचें कोणतेंही वाईटबरें अंग प्रदर्शित होण्याचें राहिलें नाहीं. त्यांतल्या एका लहानशा बाबीचें थोडें दिग्दर्शन येथें करूं.

मनुष्याच्या सगळ्या सुखास नीति हा पाया आहे. ती ह्या भारतग्रंथांत विपुल आहे. धर्मनीति आहे, व्यवहारनीति आहे, राजनीति आहे, स्वार्थनीति आहे, परमार्थनीति आहे. सर्व कांहीं आहे. त्यांत प्रसंगोपात्त नारदादिकांच्या तोंडचीं वचनें अमृततुल्य आहेत. धर्मराजास नारदानीं राजनीति सांगितली आहे. ती, धर्मराजाची पदवी राखून, प्रश्नरूपानें कथिली आहे. तींत आज्ञारूप नाहीं. तींतला एक लहानसा मासला पहाः—

**ओव्या.**

ऐश्वर्य लाधल्या संपूर्ण धर्मी वर्तत असे कीं मन
राज्यपदें दुरभिमान तुज संचरला नाहीं कीं. १.
वडील आचरले जो धर्म तोच चालविशी कीं नेम
विहितभंगाचा कर्दम तुज लेपला नाहीं कीं. २.

अहोरात्रीं साठ घडी लोटितां पापपुण्याची जोडी
किती झाली हें घडी घडी विचारीत अससी कीं. ३.
समता संतोष सद्विवेक चौथा साधुसंग देख
त्यांशीं करोनियां सख्य मित्रभावें अससी कीं. ४.
शुश्रूषा श्रवण ग्रहण धारण ऊहापोह अर्थविज्ञान
तत्त्वज्ञानेंसीं आठही गुण सेविसी कीं सुजाणा. ५.
निद्रा आलस्य भय क्रोधता असद्भाव आणि दीर्घसूत्रता
साही अनर्थांचिया माथां पाय देऊनी अससी कीं. ६.
बहुत लाधे स्वल्प यत्नीं तेथें आलस्य नसे कीं मनीं
स्वल्प लाभ बहुत हानी तेथें उद्योग नसे कीं. ७.
तुजसीं दावूनी आप्तता शत्रूशीं पावविती वार्ता
ऐसे कोण ते तत्त्वता वोळखोनी अससी कीं. ८.
अंतःकरण आणि शरीर नियमीं नपवे विकार
शब्द तो सजीव गिरीवर नचळे नढळे नुकले कीं. ९.

मुक्तेश्वर.

त्यांत किती नीति भरली आहे बरें? तसें विदुरानें धृतराष्ट्रास बोध करतांना म्हटलें आहेः—

जाणीव न धरावी कदा कोणाची न करावी निंदा
नुल्लंघावी वेदमर्यादा निष्ठुरवचन न बोलावें. १.
आपण न करावें पापाचरण दुसऱ्याचे दोष टाकावे आच्छादुन
हें सज्जनाचें लक्षण बहु भाषण कासया. २.
सत्कर्म दानाध्ययन येथें आळस न करावा क्षण
स्त्रीयोग निद्रा बहु भोजन येथें उदास असावें. ३.
आपण आचरे सत्कार्य राहटी दुसऱ्याचे गुणदोष नाणी चित्तीं
आत्मरूप पाहे सर्व सृष्टी तरी तो ईश्वर म्हणावा. ४.
दिवसा ऐसें वागावें पाहें जेणें रात्र सुखाची जाये
संसारीं ऐसें वर्तावें साधे एणें इहपरत्र सुख. ५.

श्रीधर.

अशी पुष्कळ भीष्मनीतिही आहे. तिचा मासला दाखवि

ण्यास येथें अवकाश नाहीं. पण, हें नीतीचें एक अंग झालें. हिच्या जोडीस दुसरें अंग युक्तीचें आहे. त्याचा उल्लेख आरंभीं केलाच आहे. त्या युक्तींत पुण्य जरी नसलें, तरी पाप नसतें हें खचीत. सुभद्राहरणप्रसंगीं कृष्णांनीं जी युक्ति योजिली, ती निष्पाप होती. कां कीं, तींत परपीडेचा लेशही नव्हता. परोपकार करणें हें पुण्य खरें, परंतु चोरास साह्य करणें हा परोपकार नव्हे. पाप आहे. कां कीं त्यांत परपीडा आहे. म्हणून नीतिबोधांत हें एक फार मोठें धोरण असतें. ह्या उक्तीच्या पलीकडचा एक प्रकार पुराणांतरीं आढळतो. त्यास काय म्हणावें, हें कळत नाहीं. तरी, त्याचाही थोडा मासला कळलेला असावा. तो दाखविण्यास, धृतराष्ट्राचा एक प्रधान कणिक ह्या नांवाचा होता, त्यानें आपल्या यजमानास जें काय सांगितलें आहे, त्याची उगाच थोडी झाक त्याच्याच शब्दांनीं सादर करितों. ती अशीः—

गोत्रज सर्पातुल्य भूपती नकळे कोणे काळीं डंखिती
सर्प क्वचित दृष्टी पडती गोत्रज पीडिती पदोपदीं. १.

कृत्रिम मैत्री करून घ्यावा वैरियाचा प्राण
आपुलें गुह्य न सांगोन वर्म लक्षावें शत्रूचें. २.

स्वर्गींहूनी आले पितृगण तरी त्यांसही शमीपत्र प्रमाण
पिंडदर्भ देऊन बोळवावे थोडक्यांत. ३.

माता पिता आणि बंधु आगळे वाढतां करावा वधु
धूर्त कुटिल कपटासिंधू राजगृहीं असावे. ४.

असो. सांगायाचें तात्पर्य एवढेंच कीं, ज्ञानेश्वर एकनाथ, मुक्तेश्वर, श्रीधर, मोरोपंत, इत्यादि महात्म्यांनीं हें संस्कृतांतलें सगळें ज्ञानभांडार मराठींत आणून सोडिलें आहे तें, मुद्रणकलेच्या प्रसादानें लहान थोरांच्या हस्तगत झालें आहे. त्यांत, आम्ही पूर्वीं म्हटल्याप्रमाणें सर्व कांहीं आहे. ज्याला


जें पाहिजे तें सांपडण्यासारखें आहे. स्वर्ग आहे, नरक आहे. अमृत आहे, विष आहे. त्यांतलें काय पाहिजे तें पारखून घेणें, एवढेंच कायतें आपणां माणसांकडे आहे. त्याचेही मार्ग संतचरित्रांत स्पष्ट दाखविले आहेत. हे सगळे पाहायास माणसाचें आयुष्य पुरायाचें नाहीं. ह्याकरितां, असत्या आयुष्यांत ह्यांतला तारणमार्ग पसंत करून, त्यानें जावें. हेंच वाङ्मयाच्या अध्ययनाचें अत्युत्तम फळ आहे.

---

## दगडी कोळसा.

दगडी कोळसा जरी खाणींतून काढितात आणि जरी तो दगडासारखा दिसतो, तरी तो वनस्पतिजन्यच पदार्थ आहे असें पूर्णपणें सिद्ध झालें आहे. आजमितीस पृथ्वीवर सर्व प्रकारचे प्राणी राहात असून मनुष्यजातीचा विस्तार सर्वत्र झालेला आहे. परंतु लक्षावधि वर्षांपूर्वींची स्थिति अशी होती कीं, मनुष्य किंवा इतर वरिष्ठ दर्जाचे प्राणी तिच्या पाठीवर जगणें शक्यच नव्हतें. कारण त्या वेळच्या वातावरणाची स्थिति हल्लींच्याहून फार निराळी होती. कार्बानिक आसिड हा प्राण्यांस घातक असणारा वायु हल्लींच्या वातावरणांत शंभर भागांत एकादा भाग असतो, तो त्या वेळीं कितीतरी पटींनीं जास्त होता. जिकडे तिकडे धुकें पसरलेलें असून सूर्यकिरण मोठ्या मुष्किलीनें वातावरणांतून आंत येत. बहुतेक बारामास पाऊस पडून जिकडे तिकडे पाणी सांचलेलें असे. ही स्थिति वरच्या दर्जाचे प्राणी जगण्यास जरी अनुकूल नव्हती, तरी वनस्पतींची—नीच जातींच्या वनस्पतींची—वाढ होण्यास फारच अनुकूल होती. सुंदर फुलें व रुचकर फळें ज्यांस येतात, त्या वनस्पति वरिष्ठ जातीच्या वनस्पति होत, आणि पाणथळ जाग्यांत वाढणारीं

शेवाळें, 'गौरीचे केंस,' इत्यादि वनस्पति कनिष्ठ जातीच्या होत. त्यांतील एक दोन जातीच्या झाडांचीं चित्रें येथें दिलीं



( दगडी कोळसा ज्यांपासून झाला आहे त्या वनस्पति. )

आहेत. अशा तऱ्हेच्या कनिष्ठ तऱ्हेच्या परंतु हल्लींहून अत्यंत विस्तीर्ण प्रमाणावर वाढणाऱ्या वनस्पति त्या कालीं उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत जेथें जेथें म्हणून जमीन होती तेथें तेथें माजून राहिल्या होत्या. कालानुरोधानें ह्या प्रचंड वनस्पति मरून जाऊन खालीं पडत आणि त्यांचे जागीं दुसऱ्या उगवून त्यांचेंही अरण्य माजे. अशा प्रकारें ह्या मृत वनस्पतींच्या खोडांचे व त्यांच्या पानांचे वगैरे जे थर बनले, ते पृथ्वीच्या पोटांत हजारों वर्षेंपर्यंत पुरले जाऊन त्यांचाच दगडी कोळसा झालेला आहे.

हें सगळें घडून येण्यास म्हणजे वनस्पतींचे थर बनून त्यांचा दगडी कोळसा होण्यास किती काल लागला असावा, ह्याचा अजमास विद्वान लोकांनीं केलेला आहे. त्यांच्या हिशोबाप्रमाणें, वनस्पतींच्या अवशेषांचा एक फूट जाडीचा दगडी

कोळशाचा थर बनण्यास ८००० पासून ९००० वर्षें पाहिजेत. आणि पुष्कळ खाणींतून हे थर १०० पासून २५० फूट जाडीचे आढळून येतात. एवढ्या जाडीचे दगडी कोळशाचे थर बनण्यास वरील हिशोबाप्रमाणें दाहापासून पंचवीस लाखांपर्यंत वर्षें पाहिजेत! ही कालावधि मनुष्याच्या आयुष्याच्या दृष्टीनें कल्पनेच्या पलीकडील दिसते. परंतु आपल्या पृथ्वीच्या वयाच्या मानानें ती फारशी मोठी नाहीं. अशीं युगांचीं युगें उलटून गेल्यानंतरच पृथ्वीला हल्लींचें स्वरूप प्राप्त झालें आहे. ह्या पृथ्वीच्या वयोमानांत खंडांचीं खंडें पहिल्यानें समुद्रसपाटीच्या वर होतीं, तीं समुद्रांत डुबून हजारों वर्षांनीं पुनः वर आलेलीं आहेत, आणि ह्याच्या खुणा पृथ्वीच्या पोटांतल्या निरनिराळ्या थरांतून स्पष्ट राहिलेल्या आहेत. लाखों वर्षें वनस्पतींचीं अरण्यें वाढून त्यांच्या अवशेषांचे थर बनावे, मग ती सर्व जमीन भूगर्भांतर्गत अग्नीमुळें समुद्राखालीं खचली जाऊन त्या थरांवर मातीचे व रेतीचे थर शेंकडो वर्षें बसल्यानंतर ती त्याच कारणानें पुनः वर उचलली जावी, तिजवर पुनः अरण्यें माजावीं, अशा घडामोडी त्या कालीं सतत चालून दगडी कोळशाचे थर बनले आहेत. दगडी कोळशामध्यें त्या काळच्या वनस्पतींचे जसे पुष्कळ अवशेष स्पष्टपणें दिसून येतात, तसे कांहीं प्राण्यांचेही सांपडतात. परंतु ते प्राणी स्थलचर नसून जलचर व खालच्या प्रतीचे होते असें दिसतें, आणि त्यांवरून पृथ्वीवर प्राण्यांच्या वस्तीस नुकताच आरंभ झाला होता अशी कल्पना होते.

दगडी कोळशाचा रंग अगदीं काळा किंवा भुरकट काळा असून कधीं कधीं त्याच्या अंगीं पुष्कळ चकाकी असते. त्याच्या मुख्य जाती दोन आहेत. धुराचा कोळसा आणि बिनधुराचा कोळसा. धुराचा कोळसा जळतो तेव्हां त्यापासून ज्योत व धूर

उत्पन्न होतात, आणि बिनधुराचा कोळसा ज्योतीशिवाय जळतो. ह्या दोन जातींस इंग्रजी नांवें 'बिटयुमिनस कोल' व 'अंथ्रासाईट' अशीं आहेत. ह्यांपैकीं दुसऱ्या म्हणजे बिनधुराच्या जातीचा कोळसा पहिल्या म्हणजे धुराच्या जातीच्या कोळशापासूनच उत्पन्न झालेला असतो यांत शंका नाहीं. धुराच्या कोळशास पृथ्वीच्या पोटांतल्या अग्नीची आंच विशेष लागून त्यांतलीं धूर उत्पन्न करणारीं द्रव्यें निघून जाऊन त्याचा बिनधुराचा कोळसा बनलेला असावा अशी कल्पना आहे. उत्तम प्रकारच्या बिनधुराच्या कोळशांत शेंकडा ९८ भाग कार्बन असतो, आणि तोच जाळण्यास उत्तम मानितात. लढाऊ आगबोटींस तोच कोळसा फार पसंत करितात. कारण त्यापासून धूर अगदींच थोडा निघत असल्याकारणानें लढाईच्या दिवसांत त्या आगबोटींस शत्रूस नकळत सफर करण्यास सोपें जातें. वेल्समध्यें असाच कोळसा पुष्कळ सांपडतो, आणि त्याला सर्व राष्ट्रांतून फार मागणी असते.

पृथ्वीच्या पोटांत असंख्य वर्षांपासून सांठवून ठेविलेला हा सर्पणाचा पुरवठा प्राचीन काळच्या लोकांच्या ध्यानींमनींही नव्हता असें दिसतें. त्याचा उपयोग करणारा अगदीं पहिला देश म्हणजे इंग्लंड होय असें म्हणतात. आणि त्या देशांत तरी ख्रिस्ती शकाच्या नवव्या शतकापूर्वीं दगडी कोळशाचा उपयोग करीत असल्याचा पुरावा नाहीं. तेराव्या शतकाच्या अखेरीस लंडन शहरांत कारखान्यांमध्यें तो पहिल्यानें वापरूं लागले, परंतु त्याच्या धुरापासून अपाय होतो अशी तक्रार झाल्यामुळें चौदाव्या शतकाच्या सुरवातीस राजानें जाहिरनामा काढून त्याचा उपयोग बंद केला. परंतु पुढें लांकडें फार महाग झाल्या-मुळें ही बंदी बाजूस राहून लोक दगडी कोळशाचा हळू हळू उपयोग करूं लागले.

दगडी कोळशाचे मुख्य उपयोग दोन आहेत. तो जाळून उष्णता उत्पन्न करणें हा एक उपयोग, आणि त्याला आंच लावून त्यांतून निघणाऱ्या धुराचे दिवे लावणें हा दुसरा उपयोग. पैकीं दुसऱ्या उपयोगास आनुषंगिक अशा कांहीं गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. दगडी कोळशास आंच लावून त्यांतले वायुरूप पदार्थ 'गॅस'च्या रूपानें काढून घेतल्यानंतर बाकी पदार्थ राहातो त्यास 'कोक' म्हणतात. हा जाळण्यास फार प्रखर असून त्यापासून धूर होत नाहीं. 'गॅस'चा दिवे लावण्यास उपयोग करण्यापूर्वीं तो स्वच्छ करतांना त्यापासून जे अनेक पदार्थ निघतात, त्यांत 'कोल टार' म्हणजे डांबर हा मुख्य आहे. हा काळा असतो आणि त्यास घाण येत असते. परंतु ह्या घाणेरड्या पदार्थापासून रासायनिक क्रियेच्या योगानें अत्यंत उपयुक्त असे जे पदार्थ काढिले आहेत, त्यांचा विचार केला म्हणजे ती एक अमोलिक परिसाच्या बरोबरीची वस्तु मनुष्यास मिळाली आहे असें वाटतें. त्यांतले कांहीं पदार्थ येथें सांगतों. नाफ्ता म्हणून एक तेल निघतें, त्यांत रबर विरवतां येऊन त्याचें वार्निश करतां येतें. आणि शिवाय त्यापासून उत्तम तऱ्हेची छापण्याची शाई तयार करतां येते. बेन्झोल म्हणून दुसरें एक तेल निघतें त्यापासून निरनिराळे झगझगीत रंग काढतां येतात, आणि शिवाय रेशमी कपडे साफ राखण्यास त्याचा फार उपयोग होतो. क्रेओसोट हें लांकूड जास्त टिकाऊ करण्यास वापरतात. दुसऱ्या एका द्रव्यापासून सॅकरीन म्हणून साखरेपेक्षां अत्यंत गोड असा पदार्थ काढितात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, डांबरापासून निघणाऱ्या द्रव्यांचें वर्णन करूं लागलें तर एक लहानसा ग्रंथच होईल. ह्याचें सगळें श्रेय अर्वाचीन रसायन-शास्त्राकडे आहे.

# लोक काय बोलतात.

होलिकासंमेलन कमिटीनें गेल्या सालाप्रमाणें यंदांही मुंबई शहरांत चांगलें काम केलें आहे.

---

श्रीमंत गायकवाड सरकार ह्यांची प्रकृति नादुरुस्त असल्याकारणानें ते लवकरच विलायतेस जाणार असें म्हणतात.

---

जस्टिस सर चंदावरकर ह्यांनीं पेन्शन घेतलें. त्यांचे जागीं माजी सरकारी वकील लल्लुभाई आशाराम शहा–ह्यांची नेमणूक झाली आहे.

---

हल्लीं विलायतेहून पास होऊन आलेले सिव्हिल सर्व्हिसचे लोक सगळ्या हिंदुस्थानांत मिळून १२९४ असून त्यांत हिंदी लोक फक्त ५६ आहेत.

---

युनैटेड स्टेट्स्चे नवे प्रेसिडेंट विल्सनसाहेब ह्यांनीं आपण कोणत्याही निमित्तानें चीन देशाच्या अंतर्व्यवस्थेंत हात घालणार नाहीं, असें जाहीर केलें आहे. उत्तम.

---

मंगोलिया पूर्वीं चीन सरकाराखालीं होता तो रशियन सरकाराच्या आश्रयानें स्वतंत्र झाला आहे. ह्यावरून चीन व रशिया ह्यांचें युद्ध जुंपण्याचीं लक्षणें दिसत आहेत.

---

पब्लिक सर्व्हिस कमिशन मुंबईचें काम संपवून लखनौस गेलें आहे. मुंबईस सर फेरोजशहा मेहता, नामदार आगाखान, मि. जिन्ना, प्रो. परांजपे वगैरे मंडळीच्या साक्षी फार चांगल्या झाल्या.

---

साधारण ड्राइंगच्या कागदाचा एक वर्तुलाकार तुकडा कापून तो आंसावर चढवावा, आणि दर मिनिटास सुमारें १६०० फेऱ्या होतील अशा वेगानें तो फिरवावा म्हणजे त्याच्या योगानें लांकूडही साफ कापतां येतें !

---

मुंबईचे नवे गव्हर्नर साहेब लार्ड विलिंग्डन आणि लेडी विलिंग्डन हीं मुंबईस येण्याकरितां गेल्या २० व्या तारखेस विलायतेहून निघालीं. तीं ह्या महिन्याच्या ४ थ्या तारखेस मुंबईस पोंचून पांचव्या तारखेस लॉर्ड सीडनहॅम् ह्यांचें प्रयाण होणार आहे.

---

तारखात्याच्या जनरल स्केलमध्यें आजपर्यंत युरोपियन नोकरलोक व हिंदी नोकरलोक ह्यांमध्यें भेद करीत असत. ह्यापुढें तसा भेद करावयाचा नाहीं असें सरकारानें ठरविलें आहे. इतर शाखांत तो भेद आहे व तो निघाला पाहिजे.

---

तुर्को-बाल्कन युद्ध अद्याप चालूच आहे. आड्रिआनोपलवर बल्गेरियन व सर्व्हियन सैन्यानें निकराचा हल्ला करून तें गेल्या २६ व्या तारखेस घेतलें. हल्ला करणारांचीं अतिशयित माणसें मेलीं. सुमारें ३५००० तुर्क लोक शरण आले.

---

हिंदुस्थान व सीलोन ह्यांच्या दरम्यान तयार होत असलेली आगगाडीची सडक येत्या जुलई महिन्यापासून सुरू होईल. ह्या सडकेवर मध्यंतरीं सुमारें ३० मैल रुंदीची एक खाडी आहे तिजमधून मात्र आगबोटीनें प्रवास करावा लागेल.

---

बादशहा पंचम जार्ज सन १९११ सालीं मुंबईबंदरांत ज्या जागेवर पहिल्यानें उतरले तेथें त्या गोष्टीच्या स्मरणार्थ एक मोठी संगमरवरी इमारत उभारण्याचें ठरवून तिच्या पायाचा दगड गेल्या ३१ व्या तारखेस लार्ड सीडनहॅम् ह्यांनीं बसविला.

---

श्रीमंत गायकवाड सरकार ह्यांच्या वयाचीं पन्नास वर्षें पुरीं झाल्याबद्दलचा मोठा उत्सव गेल्या महिन्यांत बडोदें येथें झाला. परमेश्वर त्यांस उदंड आयुरारोग्य देऊन आपल्या प्रजाजनांच्या हितासाठीं झटण्यास आणखी शक्ति देवो असें आम्ही इच्छितों.

---

सर चंदावरकर ह्यांनीं इंदूर संस्थानच्या दिवाणगिरीची जागा पत्करिली असून ते लवकरच तिजवर रुजू होणार आहेत. होळकर

महाराजांनीं केलेली निवड उत्तम आहे, आणि नामदार साहेबांची कारकीर्द संस्थानांतील प्रजाजनांस खात्रीनें सुखदायक होईल.

---

गेल्या वर्षाचे हिंदुस्थानसरकारचे हिशेब प्रसिद्ध झाले आहेत, त्यांत सुमारें साडेसात कोटींची शिल्लक राहिलेली आहे. तिजपैकीं हिंदुस्थान सरकारानें २½ कोटि शिक्षणासाठीं, दीड कोटि आरोग्यरक्षणासाठीं वगैरे जास्त देऊन सुमारें तीन कोटि तसेच राखून ठेविले आहेत.

---

नामदार गोखले ह्यांची प्रकृति बरीच नादुरुस्त असल्याकारणानें त्यांस कितीएक दिवस पब्लिक सर्विस कमिशनमध्यें आणि व्हाइसरायांच्या कायदेकौन्सिलाच्या बजेट संबंधाच्या बैठकींत मुळींच हजर राहतां आलें नाहीं. ईश्वर करो आणि त्यांस लवकर आराम पडो.

---

कुनार्ड कंपनी 'आक्विटेनिया' नांवाची एक ९०० फूट लांबीची आगबोट स्काटलंडांत बांधीत आहे. तिजवर २००० कामकरी लोक लावलेले असून तिजवर सुमारें चार हजार उतारूंची सोय केलेली आहे. प्रसंग पडल्यास तितक्या उतारूंस उपयोगी पडण्याइतक्या बोटी तिजवर ठेवणार आहेत.

---

युनैटेड स्टेट्स्च्या मध्यभागांतील कांहीं संस्थानांमध्यें गेल्या २६ व्या तारखेच्या सुमारास अतिशयित भयंकर वावटळ सुटून तलावांचे बांध फुटले, नद्यांस पूर आले, गांवांचीं गावें वाहून गेलीं, शेंकडों माणसें मेलीं आणि हजारों निराश्रित झालीं. त्यांस तेथील सरकार सर्व प्रकारची मदत करीत आहे.

---

इराण देशांतली अव्यवस्था मोडली नाहीं. भर दिवसा दरोडे पडत असून त्यांचा इराणी सरकाराच्या हातून बंदोबस्त होत नाहीं. ह्यास्तव उत्तर भाग रशियानें आणि दक्षिण भाग इंग्लंडनें आपल्याकडे घेऊन देशाची व्यवस्था लावावी असें कितीएक वर्तमानपत्रें सुचवीत आहेत. इंग्रज सरकारचें कांहीं सैन्य नुकतेंच तिकडे हिंदुस्थानांतून रवाना झालें आहे.

---

लार्ड सीडनहॅम् ह्यांचें मुंबईस एक मोठें स्मारक करण्याचा विचार ठरला आहे. एक पुतळा करावयाचा आणि एक व्यापारविषयक शिक्षण देण्याकरितां कालेज स्थापावयाचें असें बहुतेक नक्की झालें आहे. महाराज सयाजीराव गायकवाड ह्यांनीं ह्या कालेजाकरितां तीस हजार रुपये दिले आहेत.

---

पाण्याच्या योगानें पाणचक्क्या चालवून वीज उत्पन्न करण्याचा जो प्रचंड कारखाना लोणावळ्यानजीक टाटा कंपनी उभारीत आहे, त्याकरितां नामदार लार्ड सीडनहॅम् ह्यांनीं भांडवल ह्या देशांतल्यादेशांत उभारण्या वगैरे संबंधानें फार मदत केली. ह्यास्तव त्या कारखान्या-संबंधानें बांधीत असलेल्या एका मोठ्या सरोवरास 'सीडनहॅम् लेक' असें नांव देण्याचें कंपनीनें ठरविलें आहे.

---

ग्यास भरलेलीं साहासाहाशें फूट लांबीचीं प्रचंड विमानें बांधण्यांत हल्लीं जर्मन लोक अग्रगण्य आहेत. हीं विमानें पांच मिनिटांत ६००० फूट उंच जाऊं शकतात आणि दर तासास ५० मैल इतक्या वेगानें तीं चालवितां येतात. त्यांच्यावर तेलानें चालणारीं इंजिनें असून १५०० मैल जाण्यापुरतें त्यांवर तेल एकदम घेतां येतें आणि तीं एकदां वर गेलीं म्हणजे दोन अडीच दिवसही त्यांना खालीं उतरण्याचें कारण पडत नाहीं. त्यांवर लहान तोफाही ठेवतां येतात.

---

ग्रीस देशाचे राजे पहिले जार्ज हे तुर्कांपासून नुकत्याच घेतलेल्या सॅलोनिकाप्रांतांत फिरायास गेले असतांना गेल्या १८ व्या तारखेच्या तिसऱ्या प्रहराच्या सुमारास कोणा दुष्ट सोशालिस्टानें त्यांचा भर रस्त्यांत पिस्तूल झाडून खून केला. हे आमच्या बादशाहांच्या मातुश्रींचे बंधु असून ६८ वर्षांचे होते आणि आज पन्नास वर्षें ग्रीसच्या गादीवर होते. त्यांच्या पाठीमागें त्यांचे वरिष्ठ चिरंजीव पहिले कान्स्टनटाईन हें नांव धारण करून सिंहासनारूढ झाले आहेत.

मे—१९१३.

# बालबोध.

## डॉ. वुड्रो विल्सन.



सदा प्रीती चित्तीं विनय मधुरा वाणिहि सदा
स्वभावें कल्याणी मति परिचया भेद न कदा

पुढें किंवा मागें मनिं रसविपर्यास नसती
चरित्रें साधूंचीं अकपट विशुद्धेंचि असती.

उत्तररामचरित्र.

ज्ञान हें निरंतर अधिकारस्थान असावें, असें सगळ्या माणसांस वाटत असतें. पण तें त्यांच्या हातचें नसतें. तरी जगाची राहाटी अशी कांहीं चालली आहे कीं, ज्ञानाभिवृद्धीबरोबर जनांतला तो कल वाढत चालला आहे. त्याचें एक ठळक उदाहरण अगदी आलीकडे, उत्तर अमेरिकेमध्यें, स्वतंत्र संस्थानांत घडून आलें आहे. त्याचें कथन म्हणजे डॉ. वुड्रो विल्सन ह्यांचें चरित्र होय. त्याचें संक्षिप्त कथन येथें करितों.

त्यास आरंभ करण्याच्या अगोदर त्या स्वतंत्र संस्थानांचा थोडासा इतिहास आणि त्यांची सांप्रतची स्थिति, हीं थोडीशीं सांगणें आवश्यक वाटतें. अमेरिकाखंड कोलंबसानें इ० स० १४९२ ह्या वर्षीं शोधून काढिल्यावर, राजकीय, सामाजिक, व्यावहारिक आणि धार्मिक व्यवहारांतल्या मतभेदांमुळें युरोप खंडांतल्या अनेक देशांतले लोक, आपापल्या सवडीप्रमाणें, स्वातंत्र्याप्रीत्यर्थ, त्या खंडांत, जागोजाग वसाहाती करून राहिले. त्यांत इंग्लिश लोकही होते. त्यांतले पुष्कळ इंग्लंड सोडून उत्तर अमेरिकेंत जाऊन राहिले. त्यांस त्यांच्या मूळ देशांतल्या सरकाराचा पुष्कळ आधार होता, आणि ते आपणांस इंग्लंडच्या राजाची प्रजा म्हणवून घेऊन त्याच्या कायद्याप्रमाणें मोठ्या राजनिष्ठेनें त्याशीं वागत असत. त्यांच्या वेगळ्या वेगळ्या ठाण्यांस, हळू हळू न्यूयार्क, बोस्टन, इत्यादि वेगवेगळीं नांवें पडलीं. त्यांच्यांत ज्ञानवृद्धि झाली, व्यापार वाढला, आणि बहुतेक सर्व कांहीं सामर्थ्य इंग्लंडाइतकें आल्यावर, तीं संस्थानें युनैटेड स्टेट्स हें नांव धारण करून इंग्लंडापासून अगदीं वेगळीं झालीं, आणि सर्व प्रकारीं अगदीं स्वतंत्रपणें वागूं लागलीं. तीं आपला मुख्य

राज्यसूत्रधार आपणच निवडूं लागलीं, आणि एकजुटीनें त्याच्या आज्ञेंत वागूं लागलीं. आपला पुत्र आपल्याइतका पराक्रमी झाला हें पाहून पित्याला संतोष व्हावा तसा अमोलिक संतोष इंग्लंडास प्राप्त झाला. हें भाग्य अर्वाचीन कालीं दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राच्या वांट्यास आलेलें नाहीं. ह्या संस्थानांचें स्वातंत्र्य इंग्लंडच्या सरकारानें इ० स० १७८३ ह्या वर्षी मोठ्या संतोषानें कबूल केलें. त्यांतल्या सर्वांनुमतें निवडलेल्या राज्यसूत्रधारास प्रेसिडेंट म्हणण्याचा पाठ आहे. त्यांतला अगदीं पहिला प्रेसिडेंट म्हणजे अध्यक्ष, अत्यंत इतिहासप्रसिद्ध जार्ज वाशिंग्टन हा होता. तेव्हांपासून आजपर्यंत एकामागून एक अध्यक्षांची निवड लोकबहुमतानें होत आहे. त्या संस्थानांचे कारभार चांगले चालले आहेत. तेथलें राज्य हें सध्याच्या पृथ्वीवरच्या उत्तम राज्यांतलें एक राज्य आहे. त्याशीं इंग्लंडाचा फार उत्तम स्नेह आहे, आणि परस्परांचे ठायीं परस्परांविषयीं फार मोठी आदरबुद्धि आहे. मायलेंकरांचें प्रेम सर्व जगाच्या कौतुकास कारण झालें आहे. आज त्यांत एकंदर लहान मोठीं ४८ संस्थानें आहेत; क्षेत्रफळ ३६१७६७३ चौरस मैल आहे; उत्पन्न ६६७०००००० डॉलर आहे ( १ डॉलर=३ रुपये ); खर्च ६३७९२१००० डॉलर आहे; आयात व्यापार १६५३४२६१-७४ डॉलर आहे; निर्यात व्यापार २२०४२२२०८८ डॉलर आहे; आणि विद्याचारसंपन्न मार्गांत त्याचें पाऊल, इतर मोठ्या राष्ट्रांप्रमाणें, पुढें पुढें पडत चाललें आहे. अध्यक्षाची मुदत सात वर्षांची असते. ती भरली म्हणजे दुसऱ्या कोणाची निवड व्हावयाची. ह्या नियमाप्रमाणें गेल्या मार्च महिन्यांत मि. टाफ्ट ह्यांची मुदत संपून, त्यांच्या अध्यक्षाच्या जागीं, बहुमतानें निवड होऊन, डॉ. वुड्रो विल्सन हे विराजमान झाले आहेत. ही निवड पूर्वींच्या सगळ्या निवडींपेक्षां कांहीं

वेगळ्या प्रकारची अशी आहे कीं, पूर्वींचे बहुतेक सर्व प्रेसिडेंट राजकारणी पुरुष होते, आणि डॉ. विलसन ह्यांची बहुतेक हयात विद्याध्ययनांत आणि ज्ञानदानांत गेली आहे.

डॉ. विलसन ह्यांचें जन्म इ० स० १८५८ त, व्हर्जीनिया संस्थानांत स्टँटन येथें झालें. ते आपल्या वयाच्या २१ वर्षी ग्राज्वेट झाले. ह्यापुढचा त्यांचा विद्याभ्यास जॉन हॉप्किन्स आणि व्हर्जीनिया येथील विश्वविद्यालयांत झाला. नंतर ते कांहीं दिवस ब्यारिस्टर झाले होते. नंतर त्यांनीं कांहीं ठिकाणीं प्रोफेसराचें काम केलें. इ० स० १८९०त त्यांची प्रिन्स्टन युनिव्हर्सिटीमध्यें कायदा व राजकारण या विषयांच्या गुरूच्या जागीं नेमणूक झाली. नंतर १२ वर्षांनीं ते त्याच युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष झाले.

शिक्षणाचा मुख्य उद्देश सद्गृहस्थ तयार करणें हा आहे, हें डॉ. विलसन ह्यांच्या अंतःकरणांत बिंबलें होतें. आणि तें सिद्धीस नेण्यास ते कायावाचामनेंकरून झटत असत. "व्यर्थ भाराभर केलें पाठांतर जोंवरी अंतर शुद्ध नाहीं" ह्यावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. म्हणून घोकंपट्टी त्यांस मुळीं नको असे. नीति आणि न्याय ह्यांच्या भक्कम पायांवरच खऱ्या राजकारणाची उभारणी केली पाहिजे असें ते आग्रहानें शिकवीत असत. त्यांस खरें ज्ञान पाहिजे असे. आपल्या म्हणण्याचा आशय आपल्या विद्यार्थी मंडळीच्या अंतःकरणांत उत्तम प्रकारें ठसला आहे, असें त्यांच्या मुखचर्यावर स्पष्ट दिसेपर्यंत, ते विषयाचें प्रतिपादन, उदाहरणांनीं, दृष्टांतांनीं, द्राष्टांतांनीं, उपमांनीं, आणि कोटिक्रमांनीं एकसारखें चालवीत असत. ही विवेचनपद्धति त्यांच्या विद्यार्थ्यांस फार आवडत असे. तिच्या योगानें त्यांच्या मनांत एका प्रकारचा उत्साह आणि स्वकर्तव्यप्रेरणा हीं अत्युत्तम जागृत राहात असत. त्यांच्या शिक्षणपद्धतीस नांवें ठेवणारे शब्दपां-

डित्याचे भोक्ते असे कितीएक गुरु त्यांच्या कुचेष्टा करीत असत तरी त्यांस ते ऱ्जुमानीत नसत, आणि आपला क्रम एकसारखा चालवीत असत. "आपणांसारीखें करती तात्काळ, नाहीं काळ वेळ तयांलागीं" हें त्यांचें सद्गुरुतत्त्व फार बळकट होतें, तें त्यांची छाप बसण्यास फार उपयोगीं पडलें, आणि त्यांचे पट्टशिष्य, नुसते शब्दपंडित गप्पीदास न निपजतां सत्यशील, आपल्या समजुतीप्रमाणें बेधडक वागणारे, आणि निस्पृह असे निपजूं लागले.

कायदा आणि राजकारण हे दोन्ही विषय त्यांचे फार आवडते होते आणि ते विषय मनुष्यास चांगले कळले म्हणजे तो चांगला गृहस्थ होतो, असें ते समजत. तेंच खरें आहे. परंतु, हे विषय फार विस्तृत आहेत. त्यांची व्याप्ति फार मोठी आहे. त्यांत मोहपाश पुष्कळ आहेत. कल्पनासृष्टीस त्यांत विहार करण्यास पुष्कळ जागा मिळते. त्यांत खांचखळगे पुष्कळ असतात ते तरुणांस कधीं कधीं दिसेनातसे होतात. तें त्यांच्या घातास कारण होतें. तें आपल्या विद्यार्थ्यांस होऊं नये म्हणून, साक्रेटिसानें, आलसिबायदीजच्या घमेंडीचें निरसन ज्या प्रश्नपद्धतीनें केलें, त्यासारख्या पद्धतीनें, आपल्या विद्यार्थ्यांच्या ज्ञाननेत्रांवरचें पटल डॉ. विल्सन हे दूर करीत असत, आणि त्यांस नेहमीं, स्वसामर्थ्य पूर्णपणें जाणून तद्नुरूप सर्व कामांत वागण्याचा उपदेश करीत असत. कल्पनासृष्टींत भराऱ्या मारूं देत नसत. हें मुख्य तत्त्व सर्व गुरुजनांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. विशेषेंकरून आमच्या देशांतील गुरुमंडळानें हें तत्त्व मनांत ठेऊन आणि सध्याचें मन्वंतर मनांत आणून तदनुरोधानें सर्व कार्यांत वागण्याविषयीं आपल्या शिष्यांस उपदेश करावा.

इ० स० १९१० ह्या वर्षीं डॉ. विल्सन हे न्यूजर्सी ह्या

संस्थानाच्या गव्हरनरच्या जागेकरितां उमेदवार म्हणून उभे राहिले. तेथें लोकमत कांहीं खटपटी श्रीमंत धेंडांच्या स्वाधीन बहुत दिवस गेलें होतें. त्यांना असें वाटलें कीं, डॉ. विलसन ह्यांसच आपण मतें देऊन गव्हरनर करूं, आणि मग हा पुस्तकपाठी व्यवहारशून्य गव्हरनर झाला म्हणजे, त्याला आपण हवें तसें वळवून, सगळा कारभार आपण हवा तसा चालवूं. त्यांस असें वाटत होतें यांत कांहीं नवल नाहीं. कां कीं पुस्तकपाठी विद्वान् हे बहुधा व्यवहारज्ञानशून्य असतात असा बहुतेक सर्वत्र ग्रह प्राचीन काळापासून आहे. पण डा. विलसन हे या कल्पनेस अपवाद निघाले. बहुमत मिळून डॉ. विलसन हे गव्हरनर झाले. ते आपलें काम अगदीं आपल्या तत्त्वांप्रमाणें, कोणास न जुमानितां चालवूं लागले. त्यांची तेजस्विता पाहून, तीं सगळीं लटपटी धेंडें गांगरून गेलीं. प्रधानमंडळींतही त्यांच्या वतीचा कोणी लटपट्या निवडून आला नाहीं. तेव्हां त्यांस हात चोळीत स्वस्थ बसावें लागलें, आणि डॉ. विलसन ह्यांच्या लोककल्याणबुद्धीविषयीं, कर्तबगारीविषयीं, आणि निस्पृहतेविषयीं लोकांत चांगली प्रसिद्धी होऊन, आणि लोकांवर त्यांची चागली छाप पडून, सगळीं लोककार्यें त्यांच्या मताप्रमाणें चाललीं. हें पाहून सर्व लोकांस मोठें आश्चर्य वाटलें, आणि "सत्यसंकल्पाचा दाता नारायण सर्व करी पूर्ण मनोरथ" ह्याविषयीं चांगली प्रतीती आली. ह्यांत, डॉ. विलसन ह्यांचें अगाध ज्ञान आणि अगाध चातुर्य तर प्रगट झालेंच. पण, त्याहीपेक्षां, मतदारांची खरीखरी गुणग्राहकता चांगली दिसून आली. कामदार निवडण्यांत, इतर सर्व गोष्टींपेक्षां, उमेदवारांच्या योग्यतेकडे म्हणजे पात्रतेकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे, ही गोष्ट आमच्या देशांतल्या मतदारांनीं विशेष लक्षांत ठेविली पाहिजे.

डॉ. विलसन न्यूजर्सी संस्थानाचे गव्हरनर झाले, तेव्हां तें नांवानें मात्र प्रजासत्ताक होतें. बड्या लोकांच्या हातांत सर्व अधिकार होता. ते करीत तें प्रमाण असे. लांचलुचपत, वशीला, खोटेंनाटें करून श्रीमंतांची मर्जी संपादणें, सार्वजनिक हिताच्या नांवाखालीं पाहिजे तें करून आपली तुंबडी भरणें, हें सगळें पुष्कळ चाललें होतें. तें सगळें, बुड्रो विलसन ह्यांनीं, कोणास न भितां, केवळ जनहिताकडे दृष्टि ठेवून मोठ्या युक्तीनें चवाठ्यावर आणून त्याचा समूळ नाश केला, आणि लोकांचें राज्य, लोकांच्या हिताकरितां, लोकांच्या हातूनच कसें चालवावें हें प्रत्यक्ष प्रयोगानें लोकांस दाखवून दिलें. ते एकदा स्पष्ट म्हणाले, "बड्या धेंडांचा अपमान न करितां देशकार्य कसें करावें, हें मी विद्यार्थ्यांस सांगत आलों आहें, आणि तें प्रत्यक्ष कृतींत कसें आणून दाखवितां येतें, हें मीं तर त्यांना दाखविणें अवश्यकच आहे." म्हणजे, एका मोठ्या ग्रंथकारानें जें म्हटलें आहे कीं, जगाच्या व्यवहारांत कसें वागावें, हें विद्यार्थ्यांनीं शाळांतून गुरूजवळ शब्दांनीं शिकावें आणि प्रौढ झाल्यावर तें प्रत्यक्ष हातांनीं करण्यास राजदंडधाऱ्यांपाशीं शिकावें, हा खरा विद्याभ्यास होय, तें सर्व न्यूजर्सीच्या लोकांस विलसन ह्यांच्या प्रसादानें प्राप्त झालें. हें त्यांचें मोठें भाग्य होय.

अशा प्रकारें विद्येचें आणि राजकारणाचें शिक्षण आपल्या देशबांधवांस देण्यांत डॉ. विलसन ह्यांनीं परिश्रम एकसारखे आज दोन तपें चालविले असून, त्यांच्या परिपूर्णतेस त्यांनीं कितीएक मोठमोठे ग्रंथही लिहिले आहेत. ते सर्वमान्य आहेत. म्हणजे, आपल्या देशकार्यास ह्यांनीं बहुतेक सर्वस्वीं वाहून घेतलें आहे, असें म्हटल्यास प्रत्यवाय नाहीं. अशा पुण्यशील गृहस्थांस परवांच्या निवडणुकींत, युनैटेड स्टेट्स संस्थानांतल्या लोकांनीं

सगळ्या संस्थानांचे प्रेसिडेंट–म्हणजे सात वर्षेपर्यंत राजे–निवडले आहेत, आणि गेल्या मार्च महिन्यापासून ते आपलें हें मोठें काम पाहूं लागले आहेत, हा सत्यज्ञानविजयाचा एक अमोलिक आणि अत्यंत वर्णनीय उत्सवप्रसंग होय. ह्यांत विशेष आनंद होण्यासारखा हा एक प्रकार आहे कीं, ह्या परवांच्या निवडणुकीच्या वेळीं त्या मोठ्या अधिकारासाठीं, तें काम पूर्वी केलेले नामांकित विद्वान् आणि राजकारणपटु रुझव्हेल्ट आणि टाफ्ट हे भगीरथ प्रयत्न करीत असतां, त्यांत, टाफ्ट ह्यांस ४१९०००, रुझव्हेल्ट ह्यांस ४९३०००, आणि डॉ. विल्सन ह्यांस ६९८००० मतें मिळून, ते अध्यक्ष झाले आहेत.

ह्यांच्या संबंधाची लोकांची अपेक्षा पूर्णपणें सफल होईल असें दिसतें. एक तर त्यांचीं तत्त्वें फार उदार असून त्यांची राहाणी अगदीं साधी आहे. ते मद्याला शिवत नाहींत आणि तमाखू ओढीत नाहींत. घरीं येणाऱ्या पाहुण्यांस देखील मद्य मिळत नाहीं. त्यांचा नीतितत्त्वांवर एवढा भरंवसा आहे कीं, शस्त्रास्त्रांपेक्षां उच्च नीतितत्त्वांच्या बळावरच आपण युनैटेड स्टेट्सच्या सरकाराचें वजन जगांत वाढवूं अशासारखें त्यांनीं अलीकडे बोलून दाखविलें आहे. आणि त्याच धोरणावर ते आपला राज्यकारभार चालविणार अशीं लक्षणें दिसूं लागलीं आहेत. ह्यांस पुष्कळ आयुरारोग्य देऊन परमेश्वरानें ह्यांच्या हातून पुष्कळ स्वराष्ट्रकल्याण करवावें, आणि जगास उत्तम उदाहरण दाखवावें, असें आम्ही मनापासून इच्छितों.

---

## बालपण हें देवपण आहे.

**अभंग.**

मांडी पडतांची हांसती खेळती
बोलाया लागती मित्रांवाणी. १.

तूं कोण मी कोण नांव गांव काई
हें त्यांच्या हृदयीं नये कधीं. २.
मी राजा तूं रंक हा तो भेदराशी
कधीं त्यांच्या पाशीं जात नाहीं. ३.
ओंवळें सोंवळें त्यांतें नसे ठावें
सर्व शुद्ध भावें करायाचें. ४.
क्षणें वितंडावें क्षणें एक व्हावें
क्षणें विसरावें सर्व कांहीं. ५.
भाकर मागाया शंका न वाटावी
मोहरही द्यावी निर्लोभत्वें. ६.
देवा जसे भक्त एका ओळखिती
तैशीं तीं जाणती आई मात्र. ७.
जरा दुःख होतां आईला बाहती
संत हांकारिती जैसे देवा. ८.
पुढची काळजी तयांसी न शिवे
तयांसी नाठवे गतानंद. ९.
दया क्षमा शांती कशाशीं खाताती
हें तयांची मती नेणे कधीं. १०.
आकाशाच्या ठायीं वारे येती जाती
तयांचिया रीती त्यांच्या मना. ११.
मग सुखदुःखभावना राहावी
कोठें ती सांगावी तुम्हीं मातें. १२.
हेंचि थोरपण निरपेक्ष वाटे
बाकीच्यांत दाटे सापेक्षता. १३.
म्हणोनियां वाटे शुद्ध बालपण
आहे देवपण पृथ्वीवरी. १४.

---

## फलज्योतिष निरूपायाचें विश्वासस्थान.

मनुष्यें आणि इतर प्राणी ह्यांच्या व्यवहारांमध्यें जें एक फार

मोठें अंतर आहे तें हें कीं, माणसांचे ठायीं स्वभावतःच शोधक बुद्धि आहे, आणि ती शोधक बुद्धि इतर प्राण्यांत नाहीं. माणसांस जें कांहीं बरें वाईट घडतें, तें उपभोगून किंवा सोसून तीं स्वस्थ राहात नाहींत. तर, त्याचें कारण शोधून काढण्याची इच्छा त्यांस होते. आणि तत्प्रीत्यर्थ, आपापलेपरी, यथाशक्ति तीं प्रयत्न करीत असतात. कुतऱ्यांमांजरांचें पाऊल कोठें पडून त्यांस चटका बसला किंवा दंश झाला तर तीं, तशींच धूम तेथून दूर पळून जातात; पण, अशा प्रसंगीं माणसें तेथें उभीं राहून त्या दुःखाच्या कारणाचा पत्ता लावण्याच्या उद्योगास लागतात. जरा कोणाला असमाधान वाटलें कीं, तें कशामुळें वाटलें असावें, ह्याची चालना मनांत चालू होते. तिला अनेक दिशा असतात. त्यांतल्या कोणत्यातरी एका दिशेनें, त्याचें कारण अमकें आहे असें मनास पटेपर्यंत चैन पडत नाहीं. पण, तें, खऱ्या प्रकारें म्हणा कीं खोट्या प्रकारें म्हणा, मनास पटल्यासारखें झालें म्हणजे चित्त स्थिर होतें. अशा प्रकारें कार्यांचीं कारणें शोधून काढण्याचे माणसांचे प्रयत्न अनादिकालापासून चालले आहेत. आणि जीं काय शास्त्रें म्हणून सध्या उपलब्ध आहेत, तीं सगळीं त्यांचींच फळें आहेत. ही सगळी मनुष्यकृति आहे. तरी मनुष्यास सर्वसाक्षित्व नसल्याकारणानें, त्याच्या अभिप्रायांत पुष्कळ भ्रम सहजींच भरला आहे. कोणत्याही कार्याच्या कारणाचा शोध मनुष्यास पाहिजे असतो. तें खरेंच कारण त्याला नेहमीं सांपडतें असें नाहीं. आणि खरें कारण सांपडण्याच्या संबंधानें त्याचे उपाय हरले, म्हणजे, समाधानार्थ त्याची बुद्धि प्रत्यक्षास सोडून देऊन, सहजच कल्पनासृष्टीकडे वळते. तेव्हां अर्थात् सगळा भ्रमाचा बाजार भरतो. ह्याचाच अर्थ भ्रम हें अज्ञान आहे. किंवा भ्रम म्हणजे असत्य, खोटें,

खरें नव्हे तें काल्पनिक. हें व्यावहारिक रीतीनें समजून देण्यास समर्थांनीं म्हटलें आहे:—

वाजे पाऊल आपुलें म्हणे मागें कोण आलें. १.
कोण हालतसे आड पाहूं जातां झालें झाड. २.
भावीतसे अभ्यंतरीं कोण चाले बरोबरी. ३.
कांहीं दिसे अकस्मात तेथें वाटे आलें भूत. ४.
शब्दपडसाद ऊठिला म्हणे कोणी रे बोलिला. ५.
रामीं रामदास म्हणे ऐसीं शंकेचीं लक्षणें. ६.

ह्यांत विश्वासाच्या संबंधानें मनुष्यवृत्ति कशी आहे, ह्याचें उत्तम दिग्दर्शन आहे. म्हणजे विश्वास हा मनुष्याच्या जीवास एक मोठा आवश्यक आधार आहे. त्याशिवाय त्याचें चालत नाहीं. तो त्यास प्रत्यक्ष प्रतीतींत न सांपडला, म्हणजे, तो त्याला, कोणत्याना कोणत्या युक्तीनें, कल्पनासृष्टींतून शोधून काढून, त्यास धरून चालणें भाग पडतें. पाऊल आपलेंच वाजलें असतां तें आपलें आहे, असा विश्वास न बसल्यामुळें, मागें कोणीतरी आलें, असें कल्पून चालावें लागतें.

ह्या विषयाच्या संबंधाचें अत्यंत व्यापक असें उदाहरण म्हटलें म्हणजे फलज्योतिषाचें आहे. त्यांतली सुखांच्या संबंधाची गोष्ट क्षणभर एकीकडे असो. त्यांच्या प्राप्तीच्या कारणाचें सगळें श्रेय मनुष्य आपण स्वतः बळकावीत असतो, आणि त्या संबंधाचा फार विचार किंवा शोध करीत नाहीं. सुख सगळें आपल्या आंगच्या गुणांनीं प्राप्त झालें आहे, असें घेऊन चालतो. परंतु दुःखाविषयींचा प्रकार ह्याहून अगदीं वेगळा आहे. माझ्या स्वतःच्या पापकर्मांनीं मला संकटें किंवा दुःखें प्राप्त झालीं आहेत असें सहसा कोणास वाटत नाहीं. त्यांचीं कारणें बहुतेक माणसें दुसऱ्या कोणावर तरी लादण्याची खटपट करीत असतात. त्यामध्यें तें ऐहिक व्यवहारांत नच साधलें,

दृष्ट असें कांहीं न सांपडलें, म्हणजे त्यांची बुद्धि अदृष्टाकडे—म्हणजे प्रारब्धाच्या क्षेत्राकडे—वळते, आणि मग युक्तिप्रयुक्तीनें, त्या अरिष्टाचें कारण कोणाच्या ना कोणाच्या तरी डोक्यावर थापतात, आणि अशा प्रकारें, आपल्या विश्वासास बसायास नवी जागा उत्पन्न करून, तिजवर त्याला बसवितात, तेव्हां त्यांचा जीव खालीं पडतो, आणि त्यांस तो स्वस्थपणा वाटतो म्हणा किंवा ते तो वाटून घेतात म्हणा. हें थोडें व्यावहारिक गोष्टींनीं स्पष्ट केलें पाहिजे. फलज्योतिष हें कांहीं नवें नाहीं. फार प्राचीन आहे. तिथि, वार, नक्षत्रें, ह्यांवरून ग्रह वर्तवणें हें आपणांतल्या प्रमाणें कांहीं मुसलमान लोकांतही आहे. मोठें दुखणें किंवा संकट आलें म्हणजे ती ग्रहपीडा समजून ती टाळण्यास आपण हिंदूलोक जशीं ग्रहांचीं दानें करितों, त्याप्रमाणें इ० स० १७९९ ह्या वर्षी श्रीरंगपट्टणाच्या वेढ्याच्या संकटांत, टिपूसुलतानानें आपणां हिंदूंच्या समजुतीप्रमाणें, तेल, लोखंड, इत्यादि अनेक शनीचीं दानें दिलीं, अशी साक्ष इतिहासांत आहे. ती अगदीं खरी आहे. तरी तिजविषयीं आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. कां कीं, तें सामान्य मनुष्यवृत्तीचें फल होतें. टिपूच्या विश्वासास बसायास दुसरी कोठें जागा दिसेनाशी झाली, तेव्हां, त्याची दृष्टि साहाजिक रीतीनें हिंदु फलज्योतिषाकडे वळली. हें अगदीं साहजिकच झालें. अशीं आणखीही कितीएक उदाहरणें लिहायास सांपडतील.

ग्रहांवरून मुहूर्त ठरविणें, आणि पुढच्या शुभाशुभाचें भविष्य करणें हेंही चाललें आहे. त्यावर पुष्कळ लोकांचा विश्वासही आहे. तो प्रत्यक्ष प्रमाणावरून नाहीं आहे. कां कीं पत्रिकांवरून ज्या काय गोष्टी सांगतात, त्यांतल्या प्रत्ययास येतात अशा फार थोड्या, आणि चुकतात पुष्कळ हें, प्रत्यक्ष जोशीबावा प्रांजलपणें कबूल करतात. तरी, ह्या थोड्याशा गोष्टी खऱ्या मानून, त्यांसच धरून

लोक चालतात ह्यांतलें बीज एवढेंच आहे कीं, आपल्या सुखदुःखांच्या कारणांची उपपत्ति लावण्यास सामान्य व्यवहारांत माणसांस जेव्हां कोठें मार्ग सांपडेनासा होतो तेव्हां, ते अदृष्टावर–प्रारब्धावर, किंवा आकाशांतल्या ग्रहमालेंतल्या गोलांच्या अवाढव्य आणि अतर्क्य गतींवर, कोणाची काडीभरही सत्ता नसतां, भार घालून, आपल्या विश्वासास तेथें बसण्यास जागा करून देतात. एवढेंच ह्या सगळ्या व्यवहाराचें तात्पर्य आहे.

हें कांहीं आजकालचें नाहीं, फार जुनें आहेः—

"सांगों जाणती शकुन भूत भविष्य वर्तमान १
त्यांचा आह्मांसी कंटाळा पाहों नावडती डोळां २"

तुकाराम.

आणखी आधुनिक विद्वानांचेंही म्हणणें तेंच आहे. ह्याचें कारण पाश्चात्य ज्ञानाचा प्रसार होय. त्याविषयींचे कै. गोपाळराव हरि देशमुखांचे लेख प्रसिद्ध आहेत. त्यांचें तात्पर्य हेंच आहे. दुसरें प्रत्यंतर असें पाहा कीं, ज्योतिषविद्येवरून पुढें होणाऱ्या गोष्टी जर सगळ्या बिनचूक समजतात, तर मग इतर सामान्य मनुष्यांप्रमाणेंच ज्योतिष्यांवरही संसारांतील संकटें कां गुदरतात? जर त्यांस ग्रहांच्या गतीवरून भावी संकटें अगोदर समजतात व त्यांचा प्रतीकार कसा करावा हेंही जर त्यांस माहीत असतें तर मग सर्व उपद्रवांपासून, सर्व आपत्तींपासून, ते अगदीं मुक्त असावेत कीं नाहींत? पण असा प्रकार कोठें तरी आढळतो काय? एकाद्या अवाढव्य घड्याळाच्या अगदीं वरच्या बारीकशा टोंकावर कांहीं मुंग्या चालत असतां, त्यांच्या गतिस्थितीशीं घड्याळांतील चाकांच्या फेऱ्यांचा किंवा गतींचा कांहीं संबंध नसतो, या न्यायानें, ही आपली ग्रहमाला म्हणजे, अफाट वाळवंटांत बारीकशा रेतीच्या कणापेक्षांही बारीक दिसत असतां त्या ग्रहमालेचा आपल्या एव-

ह्याशा पृथ्वीवरच्या यःकश्चित् मनुष्याच्या सुखदुःखांशीं संबंध असणें हें साहजिकच शक्य नाहीं. हें ज्ञानप्रसारच्या योगानें लोकांस कळूं लागलें आहे. आणि त्याच्या योगानें फलज्योतिषावरचा त्यांचा विश्वास कमी कमी होत चालला आहे. हें सगळें ठीक चाललें आहे. ह्यांत मुख्यत्वेंकरून सांगावयाचें तें एवढेंच कीं, प्रपंचांत काय आणि परमार्थांत काय, विश्वास हा अवश्यक आहे. त्याशिवाय माणसाचें चालतच नाहीं. म्हणून विश्वास जो ठेवायाचा, तो चांगला शोध आणि विचार करून ठेवावा. वरवर पाहून ठेवूं नये. अदृष्टापेक्षां प्रत्यक्षाचें प्रामाण्य अधिक समजावें. जोशांच्या भविष्यांपेक्षां ज्योतिष्यांचीं ग्रहणें पुष्कळ अधिक आणि बहुधा बिनचूक पटतात तेव्हां ग्रहणगणित खरें आहे, ह्याविषयीं कोणास शंका नाहीं. पण हें विचाराचें फल आहे. ही विचारदृष्टि नसली म्हणजे विनाकारण कशी विपत्ति घडते, तिचें एक लहानसें उदाहरण सांगतों. एक तरुण मनुष्य वर्ष सहा महिने आजारी पडला. त्याला डॉक्टर वैद्यांनीं अनेक प्रकारचीं चांगलीं चांगलीं औषधें देऊन बरें करण्याचा प्रयत्न केला. तो सर्व व्यर्थ जाऊन त्या गृहस्थाची प्रकृति अधिकाधिकच बिघडत चालली. तेव्हां, मंडळीची दृष्टि दृष्टावरून उडून अदृष्टाकडे वळली. औषधोपचाराचा नाद सोडून देऊन फलज्योतिषाकडे वळले. तेव्हां त्यांस जोशीबावांनीं पंचांगें, जन्मपत्रिका वगैरे घेऊन, पुष्कळ मोठें गणित करून असें सांगितलें कीं, त्या आजारी गृहस्थास जो मुलगा नुकता झाला आहे, तो त्याच्या मुळावर आहे, त्यामुळें त्याच्या रोगावर कोणतेंही औषध चालत नाहीं. तें ऐकून त्या मंडळीस आणि त्या गृहस्थास काय वाटलें असेल, ह्याची कल्पना करावी! आणखी ह्या मताच्या सिद्ध्यर्थ पुढें असेंही कोणीं शहाणपण विकिलें कीं त्या मुलाच्या खेपेस त्या बाईला डोहळे होऊं लागल्यापासूनच

त्या गृहस्थांच्या प्रकृतीस विकार चालू झाला आहे! आतां येथें काय करावें !! हा बादरायणसंबंध अगदीं भ्रामक आहे. त्या मुलाचा जन्मसंभव कोणीकडे आणि ह्या गृहस्थाच्या प्रकृतीचें मान कोणीकडे! परंतु त्या गृहस्थाच्या आजाराला दुसरें कांहीं कारण सांपडत नाहीं असें झालें तेव्हां निरुपायास्तव त्या मंडळीचा विश्वास यावर बसला. विश्वासस्थान विश्वसनीय निवडावें, हें आपलें मोठें कर्तव्य आहे.

---

## शास्त्रीयज्ञानाभिवृद्धि.

**पितळ आणि अल्यूमिनम ह्यांचा एक नवा मिश्र धातुः**—पितळ हें तांबें आणि जस्त ह्यांच्या मिश्रणानें तयार करितात हें प्रसिद्ध आहे. त्याचा उपयोग अनेक ठिकाणीं होतो, परंतु तें समुद्राच्या पाण्यांत राहिल्यानें बिघडतें. ह्या संबंधानें त्याची सुधारणा करण्यासाठीं फ्रान्सदेशांत त्यांत अल्युमिनम धातु मिसळून पाहिला. त्याच्या योगानें त्यांत चमत्कारिक फेरफार घडून आले. रंगाचे फेरफार विशेष नवल वाटण्यासारखे आहेत. शेंकडा एकपासून पांच भाग अल्यूमिनम पितळेंत मिसळलें असतां त्या मिश्र धातूस शंभर नंबरी सोन्याच्यासारखा पिंवळा-धमक रंग येतो. पांचपासून सात भागपर्यंत अल्यूमिनमच्या योगानें अत्यंत सुंदर असा गुलाबी रंग येतो, आणि शेंकडा दहा भागांनीं तो रंग चांदीसारखा अगदीं शुभ्र होतो! ह्या नव्या मिश्रधातूचा उपयोग पाण्याखालून चालणाऱ्या लढाऊ आगबोटी बांधण्याच्या कामाकडे करावयाचा विचार आहे.

**फुलें ताजीं ठेवण्याची एक नवी युक्तिः**— हिंदुस्थानासारख्या उष्णप्रदेशांत जेथें उत्तम सुवासिक सुंदर फुलें हवीं तितकीं आणि स्वस्त मिळण्याची अडचण बहुतेक पडत नाहीं तेथें तोडलेलीं फुलें जास्त दिवस कशीं टिकतीं करावीं याबद्दलचा

विचार बहुतेक कोणाच्याच मनांत येत नसेल. परंतु पाश्चिमात्य सुधारलेल्या राष्ट्रांतली स्थिति निराळी आहे. त्या देशांत सुंदर फुलांची लोकांस फार आवड आहे, परंतु एकंदर राहाणीचा खर्च वाढला आहे, त्या मानानें फुलेंही अतिशयित महाग झालेलीं आहेत. त्यामुळें मनाची हौस भागविण्यासाठीं पुष्कळ लोकांस कागदाच्या केलेल्या कृत्रिम फुलांवर अवलंबून राहावें लागत आहे. ह्यास्तव त्या देशांत, खरीं फुलें जास्त वेळ टिकतील कशीं ह्यासंबंधाचे प्रयोग चाललेले असतात. अमेरिकेंतील एका युनिव्हर्सिटीनें सुमारें शंभर जातींच्या फुलांवर अनेक प्रयोग करून असा शोध लाविला आहे कीं, साखरपाण्यानें फुलांचें आयुष्य वाढवितां येतें. मात्र निरनिराळ्या जातींच्या फुलांकरितां निरनिराळ्या प्रमाणानें साखर पाण्यांत मिसळावी लागते. हें प्रमाण शेंकडा दोनपासून वीस भागांपर्यंत आहे. पंचेचाळीस जातींच्या गुलाबाच्या फुलांच्या बाबतींत सात-पासून दहा भाग साखरेचें प्रमाण उपयोगीं पडतें. ह्या नव्या युक्तीच्या योगानें कांहीं कांहीं फुलें वीसवीस दिवस टिकल्याचा अनुभव आलेला असून तिजमुळें, पाश्चिमात्य देशांमध्यें होत असलेला फुलांसंबंधाचा खर्च कोट्यवधि रुपयांनीं कमी होईल असा अजमास आहे.

**बोलता विजेचा दिवाः—** दोन जर्मन शास्त्रज्ञांनीं एक विलक्षण शोध लाविला आहे. त्यांचे विजेसंबंधाचे कांहीं प्रयोग चाललेले असतांना त्यांनीं वीज वाहाणाऱ्या एका तारेला एक टेलिफोनचें बोलण्याचें यंत्र ( रिसीव्हर ) आणि टंगस्टेन धातूच्या तारेचे नवीन विजेचे दिवे निघाले आहेत तसा एक दिवा अशीं दोन्हीं जोडलीं. त्यांचे दुसऱ्याच एका विषया-संबंधाचे प्रयोग चालू असतांना त्यांना असें आढळून आलें कीं, त्या टेलिफोन रिसीव्हरमध्यें कांहीं बोललें कीं, तें त्या विजेच्या

दिव्याशीं कान लावला असतां त्यांतून स्पष्ट ऐकूं यावें! हा त्या दिव्याचा नवीनच उपयोग त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आला. ध्वनि त्या दिव्यांतून कां ऐकूं यावा ह्याचें खरें कारण अद्याप समजलेलें नाहीं. ध्वनि वाहून नेण्यास हवा पाहिजे, ती तर त्या दिव्यांतून काढून टाकिलेली असते. तेव्हां तो ध्वनि त्या दिव्याच्या कांचेच्या फुग्याच्या बाजूंनीं वाहून आणला असला पाहिजे अशी कल्पना सध्या बसविली आहे. ह्या नवीन शोधाच्या योगानें टेलिफोनच्या यंत्रांच्या रचनेंत महत्त्वाचा फेरफार होईल असें पुष्कळांस वाटत आहे.

**एक्स्-किरणांचा एक नवा उपयोगः—** एक्सकिरण म्हणजे ज्यांच्या योगानें मनुष्याच्या शरीरांतलीं हाडें, किंवा शरीराच्या कोणत्याही भागांत जाऊन बसलेला कोणताही पदार्थ पाहातां येतो किंवा त्यांचा फोटो काढतां येतो, ते. हे किरण हवा काढून टाकून रिकामा केलेल्या कांचेच्या फुग्यांतून विजेचा प्रवाह पाठविला असतां उत्पन्न होत असतात. ह्या किरणांचा अलीकडे शस्त्रक्रियेंत पुष्कळ उपयोग होत आहे. आपले लोकप्रिय व्हाइसराय लार्ड हार्डिंज ह्यांस दिल्लीस बाँबच्या स्फोटामुळें झालेली जखम एकदां बरी झाल्यानंतरही चांगलें बरें वाटेना, तेव्हां ती जखम एक्स्-किरणांनीं सूक्ष्म रीतीनें तपासून पाहिल्यावरून तींत बाँबमधल्या सुयांचे तुकडे राहून गेल्याचें आढळून आलें, आणि ते तुकडे पुनः शस्त्रप्रयोग करून काढून टाकतां आले. अलीकडे, सूक्ष्मदर्शक यंत्रांत ह्या किरणांचा उपयोग करून सूक्ष्मप्राण्यांच्या शरीरांतली अंतर्गत रचना पहातां यावी अशी योजना केली आहे. ह्या कामाकडे एक्स्किरणांचा उपयोग करण्याच्या मार्गांत अनेक अडचणी होत्या, परंतु त्या सर्व मि० गोबी नांवाच्या एका फ्रेंच शास्त्रज्ञानें दूर करून शोधकांच्या हातांत एक नवीन साधन दिलें

आहे, आणि त्याच्या योगानें शास्त्रीय दृष्ट्या महत्त्वाचे असे अनेक शोध लागत आहेत. उदाहरणार्थ अत्यंत सूक्ष्मप्राण्यांच्या ज्या कांहीं जाती एकच आहेत असें साध्या सूक्ष्मदर्शक यंत्रांतून पाहिल्यानें वाटत होतें, त्या जातींची शरीरांतर्गत रचना ह्या नव्या एक्स्-किरणांच्या योगानें सूक्ष्मदर्शक यंत्रांतून स्पष्ट दिसून आल्याकारणानें त्या जाती अगदीं भिन्नभिन्न आहेत असें आतां ठरलें आहे. ह्या एक्स्-किरणांच्या योगानें मनुष्यास एक नवीन दृष्टी प्राप्त झाली आहे, आणि तिच्या साह्यानें पुष्कळ प्रकारचे नवीन शोध लागण्याचा संभव आहे.

**लांकडाच्या भुशापासून नवे उपयुक्त पदार्थः—** लांकूड करवततांना निघणारा भुसा हल्लीं बहुतेक फुकट जात असतो, त्याचाही चांगला उपयोग करण्याची युक्ति निघाली आहे. ह्या भुशामध्यें सल्फ्यूरस आसिड मिसळून तें सगळें एका बंद केलेल्या पात्रांत खूब मोठा दाब घालून बराच वेळ ठेवितात म्हणजे त्या आसिडाचें त्या भुशाच्या घटकावयवांवर कार्य होऊन त्यांत साखरेसारखा एक गुळचट पदार्थ उत्पन्न होतो. मग त्या सगळ्यांत थोडीशी काकवी घालून त्याचा रांधा बनवितात. हा रांधा गुरांढोरांस व घोड्यांस खाऊं घातला असतां त्यांस चांगला मानवतो, आणि त्यांचें वजन पुष्कळ वाढतें. सल्फ्यूरस आसिडाच्या योगानें भुशांत जो शर्करायुक्त पदार्थ उत्पन्न होतो, त्यापासून मोटरगाड्यांस उपयोगीं पडणारा असा चांगला स्पिरिटही तयार करतां येतो. एक टन भुशापासून तीसपासून पस्तीस ग्यालन स्पिरिट निघण्यासारखा असल्याकारणानें पाश्चिमात्य देशांमध्यें त्याचे कारखाने निघतील असें दिसतें.

**पाणी चढविण्याची एक नवी युक्तिः—** पाणी चढविण्याची नेहमींची पद्धत म्हटली म्हणजे राहाटाची किंवा

पंपांची होय. ह्याहून अगदी निराळी युक्ति अलीकडे मि. हंफ्रेज नांवाच्या मनुष्यानें काढली आहे. पंपाला सिलिंडर. दट्ट्या वगैरे लागतात. तसें ह्या नव्या युक्तीस कांहींएक लागत नाहीं. ही नवी युक्ति, मोटारगाड्या ग्यासच्या स्फोटांनीं चालतात त्याच तत्त्वावर बसविलेली आहे. असे स्फोट बंद केलेल्या जागेंत पाण्याच्या पृष्ठभागावर केले म्हणजे त्या पाण्याला वाट ठेविलेली असते तिकडे तें आपोआप चढतें, आणि हवें तिकडे पाठवितां येतें. लंडनजवळील एका नदीचें पाणी चढविण्यासाठीं ह्या नव्या युक्तीची योजना केली आहे. तिच्या योगानें दररोज अठरा कोटि ग्यालन पाणी चढविण्यांत येऊन लंडन शहरास पुरविण्यांत येत आहे. ही युक्ति तेथें चांगली साधलीशी पाहून सर्व देशांतून तिजकरतां मागण्या येत आहेत.

---

## उजवा हात.

हात हा हस्त ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. डाव्या हातापेक्षां उजवा हात अधिक काम करणारा आणि प्रमुख आहे, नमस्कार, रामराम व सलाम करणें, वचन देणें घेणें, पानसुपारी अत्तरगुलाब देणें, देवास फुलें वाहणें, मिशीवर ताव देणें, समरांगणांत शस्त्र धरणें, चित्रें काढणें व लिहिणें, कशीदा काढणें, इत्यादि शाहाणपणाचीं, शौर्याचीं, कुशलतेचीं आणि भूषणाचीं सगळीं कार्यें उजव्या हाताकडे असतात. हाताला बोटें पांच आहेत. त्यांना संस्कृतांत वेगळीं वेगळीं नांवें आहेत. तशीं मराठींतही आहेत. अंगुष्ठ—आंगठा; तर्जनी—आंगठ्याच्या जवळचें बोट; मध्यमा किंवा कर्णिका—मधलें बोट; अनामिका-मधल्याबोटाच्या खालचें बोट; आणि कनिष्ठिका किंवा करांगुली-शेवटचें लहान बोट—करांगळी. ह्या पांचांत, संस्कृतामध्यें, आंगठ्याला मात्र पुल्लिंगी नांव आहे. बाकीच्या चोहोंना स्त्रीलिंगी

नांवें आहेत. ह्या पांचांत मुख्य अंगुष्ठ आहे, कां कीं तो पुरुष आहे, बाकी चार स्त्रिया आहेत. त्या चौघींत, अंगुष्ठाच्या खालोखाल बलवान् मध्यमा म्हणजे कर्णिका आहे. ह्या चौघी एका पंक्तींत बसलेल्या आहेत. अंगुष्ठाची पंक्ति वेगळी आहे. अंगुष्ठाच्या साह्याशिवाय, त्या चौघींतल्या एकीला देखील स्वतंत्रपणें कांहीं काम करितां येत नाहीं. तसें अंगुष्ठाला कांहीं श्रम करावयाचे झाल्यास त्या चौघींतल्या कोणाना कोणाचें तरी साह्य लागतें. त्यांतल्या त्यांत कांहीं विशेष कार्यांच्या योजना आहेत. अंगुष्ठ हा पुरुष, त्यासच काय तो जानव्यांत हात घालून जप करण्याचा आणि तर्पणाच्या वेळीं पाणी सोडण्याचा अधिकार आहे. आनंद, संतोष किंवा तिरस्कार प्रदर्शित करण्यास तर्जनीचा उपयोग होतो. वीणा, सतार इत्यादि तंतुवाद्यें आणि मृदंग, पखवाज इत्यादि चर्मवाद्यें वाजविण्यांत मुख्य काम तर्जनीवरच पडतें. आणखी हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें श्राद्धादिकांत पितरांस गंध लावण्याचा अधिकार हिलाच दिलेला आहे त्याचें कारण कळत नाहीं. त्याप्रमाणेंच देवास गंध लावण्याचा अधिकार अनामिकेस दिलेला आहे, तो कां हेंही समजत नाहीं. मध्यमा म्हणजे कर्णिका ही वस्तु धरण्याच्या कामांत अंगुष्ठास फार साह्य करिते. तिच्या खालची अनामिका आणि शेवटची कनिष्ठिका, त्या दोघी अशक्त आहेत. त्या नुसत्या आंगठ्यामुद्यांसारखे दागिने घालण्यास उपयोगीं पडतात.

आमच्या प्रातःस्मरणांत हाताचें ध्यान केलें आहे. तें असें:—

कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती
करमूले तु गोविंदः प्रभाते करदर्शनम्.

ह्यांत परमेश्वर, ज्ञान आणि संपत्ति ह्यांच्या स्थानांचा क्रम दर्शविला आहे. हा विचार करण्यासारखा आहे.

# लोक काय बोलतात.

पृथ्वीवरच्या लोकसंख्येपैकीं फक्त एक तृतीयांश लोक ख्रिस्ती आहेत.

ग्रेटब्रिटनमध्यें बुटांसाठीं दरसाल सुमारें अठरा कोटि रुपयांचें चामडें खपतें.

पारिस शहरांत ३० हून जास्त स्त्रिया कोर्टांमध्यें वकिलीचें काम करीत आहेत.

जर्मनीचे बादशाहा दुसरे विल्यम हे हल्लीं आपलें चरित्र लिहीत आहेत असें म्हणतात.

ह्या महिन्याच्या १५ व्या तारखेपासून मुंबईस "ज्ञानांजन" म्हणून मराठी मासिक पुस्तक निघणार आहे. आयुष्मान् भव.

महाराज सवाईतुकोजीराव होळकर साहेब, थारेपालटाकरितां, गेल्या महिन्याच्या बाराव्या तारखेच्या मेलमधून इंग्लंडास गेले.

स्वसंरक्षणासाठीं उपयोगीं पडण्याकरितां कांहीं इंग्लिश व्यापारी आगबोटींवर लहान तोफा ठेवण्याची इंग्रज सरकारानें परवानगी दिली आहे.

इंग्लिश बजेट प्रसिद्ध झालें आहे त्यावरून ग्रेटब्रिटन व आयर्लंड ह्यांचें उत्पन्न पुढील सालीं सरासरीनें साडे एकोणीस कोटि पौंड होईल असें दिसतें.

सध्या नाटकांच्या सुधारणेकडे लोकांचें लक्ष विशेष लागल्यासारखें दिसत आहे. संगीतावरून प्रख्यात झालेली किर्लोस्कर मंडळी देखील आतां केवळ गद्य नाटकें बसविण्याच्या विचारांत आहे म्हणतात.

युनैटेड स्टेट्सचे व्हाइस प्रेसिडेंट सि. ब्रायन ह्यांनीं इंग्रजसरकारचे वकील मि. ब्राइस ह्यांस नुकतीच एक बडी मेजवानी दिली. तींत मद्य

मुळींच वाढलें नव्हतें. तिकडच्या पद्धतीप्रमाणें ही एक अपूर्व गोष्ट झाली.

---

चीनदेशाच्या नवीन प्रजासत्ताक राज्याच्या अभीष्टचिंतनार्थ सर्व ख्रिस्ती देवालयांतून परमेश्वरप्रार्थना व्हाव्या अशी अध्यक्ष युआनशिकाय ह्यांनीं विनंति केल्यावरून इंग्लंड, युनैटेड स्टेट्स वगैरे ख्रिस्ती देशांस संतोष झाला आहे.

---

इंग्लंडांत दर चौरस मैलास लोकसंख्या ३७२ पडते; कानडा प्रांतांत ती फक्त २ पडते, म्हणून कानडाचें सरकार इंग्रजलोकांस तिकडे पुष्कळ सवलती देऊन बोलावीत आहे, आणि त्याप्रमाणें हजारों इंग्रज लोक तिकडे जात आहेत.

---

सगळ्या पृथ्वीवरच्या सुताच्या गिरण्यांत एकंदर तेरा कोटि चाल्या आहेत, त्यांपैकीं साडेपांच कोटि एकट्या ग्रेट ब्रिटनमध्यें आहेत. ह्यावरून मांचेस्टरसारख्या सुताच्या गिरण्यांच्या शहरांचें महत्त्व कां वाढलें आहे तें लक्षांत येईल.

---

प्रो. मोरो केशव दामले, एम्. ए., नागपुर सिटी स्कूलचे विद्वान् प्रिन्सिपाल, आणि त्यांची पत्नी हीं गेल्या महिन्याच्या ३० व्या तारखेस अकोल्याजवळ बोरेगांव रेल्वेस्टेशननजीक, आगगाड्यांच्या टकरींत सांपडून मरण पावलीं. केवढा अनर्थ हा ! ईश्वरेच्छा !

---

स्कुटारी शहर घेण्यास मांटिनीग्रन लोक पांच महिने खटपट करीत होते तें एकदांचें गेल्या २३ व्या तारखेस त्यांच्या हातीं लागलें. आंतलें तुर्क सैन्य अन्नसामुग्री व दारूगोळा संपल्यामुळें टेंकीस आलें होतें तें फारशी झटपट झाल्याशिवाय शरण आलें. आतां हें शहर मांटिनीग्रोकडे राहातें किंवा स्वतंत्र आल्बेनियामध्य सामील करण्यांत येतें तें पाहावयाचें.

---

सध्या संकेश्वरच्या जुन्या मठाचे आणि करवीर ह्या नव्या मठाचे अधिपति शंकराचार्य मुंबईस आलेले आहेत. ह्यांपैकीं खरी गादी कोणाची ह्याविषयींचा वाद दिवाणी कोर्टांत चालू आहे. उभयतां शंकराचार्य चांगले विद्वान् आणि विचारी आहेत. त्यांनीं एकविचारें हिंदुसमाजांतल्या व्यावहारिक अडचणी दूर कराव्या म्हणजे महाराष्ट्रावर त्यांचे महदुपकार होतील.

---

लोकांस आणि विशेषेंकरून लहान मुलांसाठीं रोगजंतुविरहित असें दूध पुरविण्यासाठीं एक लहानशी कंपनी मुंबईस स्थापन झाली आहे. ती मुंबईजवळ स्वतःचीं गवताचीं शेतें घेऊन, सुमारें शंभर गाई ठेवून त्यांचें दूध बाटल्यांतून भरून मोटारगाड्यांनीं मुंबईस पाठविणार आहे. मुंबई शहरांत लहान मुलें फार मरण पावतात त्यांच्यासाठीं ही व्यवस्था केली आहे. कंपनीचे अध्यक्ष मि. रतन टाटा हे आहेत.

---

बाल्कन युद्ध सध्या अगदीं बंद आहे. त्यांत तहाचा विचार चालला आहे. तडजोड करण्यास इंग्लंड, फ्रान्स, रशिया, जर्मनी इत्यादि प्रबल राष्ट्रें मध्यें पडलीं आहेत. कान्स्टान्टिनोपलचा प्रदेश खेरीज करून युरोपांतील बाकी सगळा देश तुर्क लोकांस सोडून द्यावा लागणार असें दिसतें. मात्र काबीज केलेल्या प्रांतांसंबंधानें सर्व्हिया, बल्गेरिया, ग्रीस व मांटिनीग्रो ह्यांच्या मध्यें आपसांत तंटे लागणार असें दिसतें.

---

इतर जातींच्या आहेत, त्यांप्रमाणें दक्षिणी ब्राह्मण ज्ञातीकरितां लग्नकार्यास उपयोगीं पडणारी एक महाजनवाडी बांधण्याचा विचार येथील ब्राह्मणसभेनें ठरविला आहे, आणि त्यास संकेश्वरच्या श्रीशंकराचार्यांनीं एक हजार रुपये देऊन आपली सहानुभूति दर्शविली आहे, हें ऐकून संतोष वाटतो. अशा इमारतीची आवश्यकता आहे, म्हणून हा उद्योग लवकर सिद्धीस जावो असें आम्ही इच्छितों. ह्या इमारतीस **शंकर**वाडी असें नांव देणार आहेत.

---

सन १९०५ सालीं मुंबईइलाख्यांतील गिरण्यांतून २५ लाख चात्या व २८००० माग चालू होते, आजमितीस २९ लाख चात्या आणि ४३००० माग आहेत. ह्याप्रमाणें चात्या व माग हीं दोन्हीं जरी वाढलीं तरी

गिरण्यांचा नफा एकंदरींत सन १९०५ सालीं ३ कोटि ४७ लक्ष झाला होता तो कमी होत होत सन १९११ सालीं फक्त ५२ लाख रुपये झाला! एकंदरींत असें दिसतें कीं, मागांवर काढलेल्या कापडावर नफा होत असून चात्यांवर काढलेल्या सुतावर तोटाच होत आहे. सरकार गिरण्यांत तयार झालेल्या मालावर शेंकडा ३½ टक्के कर घेतें व तितकाच कर आयात मालावर घेतें.

---

पूर्वसंकेतानुरूप गेल्या महिन्याच्या ४ थ्या तारखेस लार्ड विलिंग्डन् हे मुंबईस येऊन ५ व्या तारखेस ह्या इलाख्याचे अधिपति झाले. मुंबईस पाऊल ठेवल्याबरोबर ते जे शब्द लोकांस अनुलक्षून प्रथम बोलले त्यांचा आशय असा कीं, 'ज्याच्या योगानें सर्व मुंबई इलाख्याचें कल्याण होईल अशा कामांत आपल्या सर्व सामर्थ्याचा आणि आपल्या ठायीं चांगलें म्हणून जें कांहीं असेल, त्याचा उपयोग करावयाचा हा संकल्प करून आम्ही उभयतां आज तुम्हांमध्यें आलों आहोंत. माझ्या अमदानींत मुंबईइलाख्याचा अभ्युदय होवो हीच माझी इच्छा आहे.' राजदंडधाऱ्यांच्या अंतःकरणांत आणि शब्दांत ह्यापेक्षां अधिक अमोलिक तें काय असावें? तथास्तु.

---

कृष्णमूर्ति आणि त्याचा एक भाऊ ह्यांस, कांहीं करारांनीं, ॲनि बेझांट, म्हणजे थिआसफिकल सोसायटीच्या मोठ्या नामांकित विद्वान् आणि उद्योगी अध्यक्ष बाई, ह्यांनीं आपले स्वाधीन करून घेऊन शिक्षणार्थ विलायतेस नेऊन ठेविलें होतें. त्या मुलांविषयीं त्यांच्या बापास कांहीं संशय येऊन, त्यानें ते त्या बाईपाशीं परत मागितले असतां, त्या ते परत देईनात; त्यावरून उभय पक्षांचा वाद आज कितीएक महिने मद्रास हायकोर्टांत चालून गेल्या महिन्याच्या मध्याच्या सुमारास, हायकोर्टाच्या जज्जांनीं असा निकाल दिला कीं, मुलांवरची बापाची सत्ता कोणत्याही अन्य कारणांनीं नष्ट होत नसते. ह्याकरितां त्या बाईनीं ते मुलगे त्यांच्या बापाच्या स्वाधीन केले पाहिजेत. हा ठराव ऐकून पुष्कळ लोकांस आनंद झाला आहे.

# बालबोध.

## मोरो केशव दामले.



जाळें तोडुनियां पळे हरिण तो टाळोनि दावाग्निला
व्याधाचे चुकवोनि बाणहि महा वेगें पुढें चालिला
तों घाईंत उडी चुकोनि पडला आडामधें बापडा
होती सर्वहि यत्न निष्फळ जरी होई विधी वांकडा.

**कृष्णशास्त्री चिपळूणकर.**

महासागरांत पोंहणाऱ्यांना ज्याप्रमाणें लक्षावधि लहान-मोठे मासे, मगर, सर्प इत्यादि प्राणघातक प्राण्यांच्या मुसंड्या

चुकवून आपला निभाव करून घ्यावा लागतो, त्याप्रमाणें, मनुष्यांस, प्रपंचामध्यें, जीवावरचीं लक्षावधि विघ्नें चुकवून चुकवून आणि टाळून पार पडावयाचें असतें. तें खरोखर अत्यंत कठिण असतें. त्याचें पूर्ण स्वरूप लक्षांत आणिलें म्हणजे विचारांतीं असें म्हणावें लागतें कीं, एवढ्या अपघातराशींतून निभून आपण इतकीं माणसें जगत आहों, ही केवळ ईश्वरी कृपा आहे, ह्यांत आमचें कर्तृत्व कांहींएक नाहीं. आणखी ह्याची विशेष शक्यता चांगल्या माणसांच्या अत्यंत आकस्मिक हृदय-द्रावक मृत्यूच्या योगानें डोळ्यांपुढें उभी राहून,

काळाची बा उडी पडेल बा जेव्हां
सोडवीना तेव्हां मायबाप.

ह्या उक्तीची प्रतीति मनास पटते. अशा प्रकारच्या एका आकस्मिक अपघातास बळी पडलेल्या आमच्या एका विद्वान् मित्राची हकीकत सांगावयाचें आज आमच्या वांट्यास आलें आहे.

ती हकीकत मोरो केशव दामले ह्या तरुण विद्वान् होतकरू गृहस्थांची आहे. ह्यांचा जन्म इ० स० १८६८ ह्या वर्षीं रत्नागिरी जिल्ह्यांत खेड तालुक्यांत मालगुंड ह्या गांवीं झाला. ह्यांचा प्राथमिक मराठी विद्याभ्यास दाभोळ येथील शाळेंत झाला. इंग्रजी विद्याभ्यास उमरावती येथील हैस्कुलांत झाला. त्यांची म्याट्रिकची परीक्षा इ० स० १८८७ ह्या वर्षीं उतरली, तेव्हां त्यांना सिंक्लेर साहेबांच्या नांवाचें बक्षीस मिळालें. इ० स० १८९२ सालीं तर्कशास्त्र हा विषय ऐच्छिक घेऊन पुण्याच्या डेक्कन कालेजांतून ते बी. ए. च्या परीक्षेंत पास झाले. यानंतर दोन वर्षें ते कालेजचे फेलो होते. इ० स० १८९४ सालीं त्यांची एम्. ए. ची परीक्षा उतरली त्या वेळीं त्यांचे विषय इतिहास आणि तत्वज्ञान हे होते. शाळेंत आणि कालेजांत अभ्यासाविषयीं यांची मोठी आख्या असे. ह्यांजवर यांच्या सगळ्या गुरूंची फार प्रीति असे.

ह्यांतही प्रिन्सिपाल सेल्बी ह्यांस ते फार आवडत असत. हे जात्याच मोठे उद्योगी होते. आणि पाश्चात्य शिक्षणाच्या संस्कारानें आमच्या होतकरू मंडळीस जे अनेक उद्योग स्वदेशहितार्थ सुचतात, ते सगळे नेहमीं ह्यांच्या अंतःकरणांत घोळत असत, आणि तसे त्यांचे व्यवसाय चालू होते.

ह्यांच्या व्यवसायांत मराठी ग्रंथ लिहिणें हा एक मोठा व्यवसाय होता. ह्या व्यवसायाची खरी किंमत अद्याप आमच्या नव्या मंडळीस बरोबर कळूं लागली नाहीं. याचें प्रमाण एवढेंच कीं गेल्या पन्नास पंचावन वर्षांत या इलाख्यांत जे हजारों ग्राज्युएट झाले आहेत, त्यांमध्यें निरपेक्ष बुद्धीनें, आपण होऊन ग्रंथकाराचा व्यवसाय पत्करलेले फारच थोडे सांपडतात. शेंकडा पांच देखील सांपडत नाहींत. पुस्तक लिहिणें म्हणजे पोटाला दोन पैसे मिळवणें असें ते साधारणपणें समजतात. पण तें बरोबर नाहीं. ग्रंथ लिहिणें म्हणजे व्यवहारतः पांढऱ्या कागदावर काळ्या रेघा ओढणें एवढेंच दिसतें खरें. पण, वास्तविकपणें त्याचा परिणाम फार मोठा आहे. तो एक विलक्षण पराक्रम आहे. तो एकाएकीं दृग्गोचर होत नाहीं. पण त्याचा परिणाम माणसांच्या अंतःकरणांवर अगदीं मुंगीच्या गतीनें हळहळू होत असतो. त्यानें समजुती पालटतात. अज्ञान नाहींसें होतें. मनुष्याचें मूळचें पशुत्व नाहींसें होऊन त्याला देवपण प्राप्त होत जातें. तो प्रपंचामध्यें स्वतः तरून इतरांस तारितो. त्याचें अंतःकरण अगदीं नवें होतें. म्हणजे विचारांतीं असें दिसतें कीं, लोकस्थितीच्या घडामोडींत, मोठमोठ्या शस्त्रास्त्रांच्या खडाजंगीलाही जें दुष्कर असतें, तें हळहळू चालणाऱ्या लेखणीस सुकर होतें. हा लेखणीचा अगाध महिमा अर्वाचीन राज्यकर्त्यांच्या प्रत्ययास आलेला आहे. म्हणून, राष्ट्राच्या लेखणीवर सक्त नजर ठेवणें, राष्ट्र काय लिहितें हें पाहाणें, आणि त्यास नीट मार्गांवर ठेवणें

हें सरकाराचें अत्यंत आवश्यक कर्तव्य ठरून, त्याच्या निमित्त दरसाल लाखों रुपयांचा खर्च होत आहे. तेव्हां अशा व्यवसायाकडे, कोणी आग्रह न करितां, बुद्धिमंतांचा कल जाणें हें अगदीं साहजिक आहे. तसा कल बहुत दिवसांपासून दामले ह्यांच्या मनाचा होता. ह्यांस देशाच्या उन्नतीची आस्था फार मोठी होती. आणि ह्यांची पक्की खात्री झाली होती कीं, ज्या ज्ञानाच्या योगानें युरोप व अमेरिका हीं आज ज्ञानवंत आणि सुखी झालीं आहेत, त्याच ज्ञानाच्या प्राप्तीनें आपलें हिंदुस्थान, कालेंकरून, सर्वतोपरी उच्चपदाप्रत चढेल. म्हणून, इंग्लंडांतल्या नामांकित विद्वानांचे जे काय विचार सर्वमान्य ठरले आहेत, ते कोणत्याना कोणत्यातरी स्वरूपानें आपल्या देशबांधवांस स्वभाषेच्या द्वारें विदित करावे, ह्या हेतूनें हे पुष्कळ लिहीत असत. आणि ह्यांस इंग्रजी भाषेंतल्या विचारांचें चित्र मराठींत बहुतेक हुबेहूब वठवितां येत असे, असें ह्यांच्या लेखांवरून सहज लक्षांत येतें. ह्यांनीं लिहिलेलीं जीं पुस्तकें आम्हांस माहीत आहेत, तीं हीं:—

१. "भाषांतर" मासिक पुस्तकांत एडमंड बर्क ह्यांचें व्याख्यान ( हें २२-३-१७७५ रोजीं झालें )

२. अमेरिकेवरील करांसंबंधीं भाषण. ( १९-४-१७७४ रोजीं झालें. )

३. ग्रंथमाला मासिक पुस्तकांत बर्ककृत आधुनिक असंतोष.

४. विचारपरिभ्रमण, एक निबंध.

५. शुद्धलेखनसुधारणा.

६. न्यायशास्त्र—भाग—१—२. गायकवाड सरकारांनीं प्रसिद्ध केले आहेत.

७. शास्त्रीय मराठी व्याकरण.

ह्यांशिवाय भगवद्गीतेंतले ७०–७५ श्लोक निवडून, त्यांचें एक पुस्तक ह्यांनीं तयार केलें होतें. त्याचें नांव ह्यांनीं शिशुगीता ठेविलें होतें. तें ते लवकरच छापण्याच्या विचारांत होते.

ह्या एवढ्या यादीवरून सहज लक्षांत येईल कीं, एडमंड बर्क-सारख्या पाश्चात्य महात्म्याचे विचार आपलया देशबंधूंस कळावे, असा दामले ह्यांचा फार हेतु होता. आणि ते विचार अत्यंत पवित्र आहेत. त्याचा उगाच एक थोडा मासला एक दोन वाक्यें पूर्वोक्त यादींतल्या दुसऱ्या पुस्तकांतून येथें घेतों. बर्क पार्लमें-टास म्हणाले, "अमेरिकेसंबंधानें तुम्हांस जें काय करावयाचें, तें राजनीतीस अनुसरून करा. त्या कामीं द्वेषास काडी-इतकाही थारा देऊं नका. आपण मनुष्याप्रमाणें वागलें पाहिजे. आणि त्यांतही आपणाला राजकारणकुशल माणसाप्रमाणें चाललें पाहिजे. आपणांस आपलें वर्तन कोणत्यातरी सरळ मार्गास अनुसरून ठेवलें पाहिजे." हा बोध किती पवित्र आणि किती सरळ आहे बरें!

आणखी, अवल इंग्रजीपासून जे कोणी आमच्यांतले थोर गृहस्थ स्वजनहितार्थ ग्रंथ लिहूं लागले, त्यांत हरि केशवजी, बाळशास्त्री जांभेकर, सदाशिव काशिनाथ छत्रे, दादोबा पांडुरंग, इत्यादि मंडळी प्रमुख असून त्यांच्या लेखांचा ओघ असाच आहे.

ह्यानंतरच्या पिढ्यांत, ह्मणजे गेल्या पन्नाससाठ वर्षांत, विद्येच्या प्रसारानें—आणि त्यांतही विशेषेंकरून पाश्चात्य ज्ञानाच्या अभिवृ-द्धीनें—आमच्या हिंदुस्थानांत, बहुतेक सगळ्या श्रेष्ठ व्यवसायांत, आमच्या राज्यकर्त्यांच्या बहुतेक अगदीं बरोबरीचे अनेक गृहस्थ निर्माण झाले; राजकारणांत सर रावराजे दिनकरराव राजवाडे, सर टी माधवराव, जंगबाहादुर, सर सालरजंग, दिवाणबहादुर आर. रघुनाथराव, इत्यादि नांवें प्रसिद्ध आहेत; सार्वजनिक देशहिताच्या उद्योगाच्या संबंधानें शेट दादाभाई नौरोजी, नाम-

दार सर फिरोजशाहा मेथा, नामदार गोपाल कृष्ण गोखले, बाबू-सुरेंद्रनाथ बानर्जी, इत्यादि नांवें गाजत आहेत; मोठ्या इंग्लिश मुत्सद्यांच्या बरोबरीनें राज्यकार्यें चालविण्यास समर्थ ह्मणून सरकारानें पसंत केलेले नामदार सिंह, चौबळ, इत्यादिकांचीं नांवें सर्वतोमुखीं झालेलीं आहेत; सर्वप्रकारीं इंग्लिश मोठ्या लोकांच्या बरोबरीनें, राज्यांतलें पाहिजे तें न्यायाचें काम करण्यास समर्थ असे गृहस्थ न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, बद्रुद्दीन तैयबजी, सर गुरुदास बानर्जी, इत्यादिकांचीं नांवें जिकडेतिकडे ऐकूं येत आहेत. त्याप्रमाणेंच प्रो. बोस, प्रो. गज्जर यांसारखे शोधक उदयास येत आहेत. हीं सगळीं फळें इंग्लिश वाङ्मयाच्या दीर्घपरिशीलनाचीं होत. आणि लार्ड मेकाले ह्यांनीं बहुत वर्षांपूर्वीं जें ह्मटलें आहे कीं, ब्रिटिश वैभवाच्या आणि राज्याच्या अभिवृद्धीस जीं साधनें कारणीभूत झालीं आहेत, त्यांत इंग्लिश वाङ्मयाच्या इतकें कर्तृत्व दुसऱ्या कोणाचेंही नाहीं. ह्यास प्रमाण एवढेंच कीं इंग्लिश राज्यासमागमें बाकी सर्व कांहीं इकडे येऊन जर तेवढें इंग्लिश वाङ्मय इकडे आलें नसतें तर पूर्वोक्त नररत्नें इकडे पैदा झालीं नसतीं. त्याचा हा थोडासा प्रत्यय येथें आला आहे. आणखी रा. दामले हे, स्वभाषेच्या द्वारें अशा प्रकारचें ज्ञान स्वदेशबांधवांत पसरविण्याचा प्रयत्न करीत होते. ते जर दीर्घायु झाले असते, तर त्यांचे हातून हें महत्कार्य पुष्कळ झालें असतें. तें अपघातानें नाहींसें केलें ह्याचें वारंवार वाईट वाटतें. पण काय करणार!

आमच्या नवीन सुशिक्षितांचे ठायीं जो एक मुख्य गुण सध्याच्या मन्वंतरांत यावयास अत्यंत आवश्यक आहे, तो दामले ह्यांचे ठायीं स्वभावतःच विपुल होता. तो गुण म्हणजे दृढनिश्चय किंवा उद्योगसातत्य. एकादें काम हातांत घेतल्यावर

त्यांत यश मिळाल्याशिवाय त्याचा पिच्छा सोडावयाचा नाहीं, हा त्यांचा मोठा नेम अगदीं अखेरपर्यंत होता. त्याचा अनुभव आम्हांला स्वतःला मराठी शुद्धलेखनाच्या प्रकरणांत इ० स० १९०४ ह्या वर्षीं आला. तें प्रकरण एवढेंच होतें कीं, सरकारानें शाळांतील मराठी क्रमिक पुस्तकें सुधारण्यास जी कमिटी नेमिली होती, तिच्या मनांत मराठी शुद्धलेखनपाठांत **आणि**च्या जागीं **आणी**, **परंतु**च्या जागीं **परंतू**, **कवि**च्या ठिकाणीं **कवी**, असे कितीएक फेरफार करावयाचे होते, आणि तिला पाठिंबा एका मोठ्या प्रख्यात संस्कृत गुरूचा होता. पण, हें बाहेर पडतांच त्याविषयीं प्रचलित पद्धतीच्या पुरस्कर्त्यांनीं, सर भालचंद्र कृष्ण ह्यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईस एक सभा काढून तद्द्वारा तें प्रकरण अगदीं सरकारापर्यंत पोंचविलें. पुढें त्याविषयीं ता० ३० सप्तंबर १९०४ रोजीं, उभय पक्षांच्या प्रतिनिधींची एक परिषद् सरकारच्या हुकुमानें पुण्यास भरली. तींत, मुंबईकरांच्या प्रतिनिधींत मोरो केशव दामले हे होते आणि त्या कार्याकरितां, उज्जनीहून मुंबईस मुद्दाम आले होते. ते प्रतिपक्षाच्या विद्वान् पाठिंब्यांचे विद्यार्थी होते. त्यांची ह्यांची दृष्टादृष्ट होतांच गुरुजींनीं शिष्यास विचारिलें कीं, "कांहो, दामले, बुद्ध्या ह्या कामाकरितां उज्जनीहून आलां काय?" त्यांस ह्यांनीं नम्रतेनें उत्तर दिलें, "होय, महाराज!" ही गोष्ट अल्प आहे. परंतु स्वीकृत कार्याविषयींचा दृढनिश्चय, आणि विचारस्वातंत्र्य हे दामल्यांचे दोन गुण चांगले स्थापित करण्यास बस आहे, असें वाटतें. पुढें त्या परिषदेंत खडाजंगीचा वाद झाला. त्यांत, बहुमतानें, जुन्या पद्धतीच्या पक्षपात्यांचें म्हणणें खरें ठरलें, तेंच सरकारानें मान्य केलें, आणि असा हुकूम फर्मावून ठेविला आहे कीं, जुन्या पद्धतींत फेरफार करूं नये. त्याप्रमाणें नवीं पुस्तकें पूर्वींच्या पद्धतीनें छापलीं आहेत,

आणि सर्व कार्य पूर्ववत् चाललें आहे. हें यश येण्यास ज्यांचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत त्यांमध्यें मोरो केशव दामले हे प्रमुखांतले एक आहेत. आणखी, ह्यांनीं ह्या विषयावर एक चांगलें मोठें पुस्तक लिहून छापलें आहे. तें चांगलें वाचनीय झालें आहे.

मोरो केशव दामले हे एम्. ए. झाले, त्याच्या आधींच त्यांस उज्जनीच्या पाठशाळेंत प्रोफेसराच्या जागेवर नेमिलें होतें, त्या जागीं ते चवदा वर्षें होते. ती पाठशाळा इ० स० १९०७ सालीं बंद झाल्यावर त्यांस एकदम नागपुर सिटीस्कूलच्या सुपरिंटेंडेंटच्या जागेवर नेमिलें होतें. ह्यावरून त्यांच्या विद्वत्ते-विषयीं आणि अध्यापनप्रावीण्याविषयीं विद्याधिकारी मंडलांत लौकिक केवढा होता तें व्यक्त होतें. गेल्या पन्नास पंचावन वर्षांत महाराष्ट्रामध्यें एकंदर शेंकडों पदवीधर निघाले आहेत. त्यांत, ह्यांच्याइतकें मराठी लिहिणारे पदवीधर फारच थोडे सांपडतात. हे जर देवदयेनें पुष्कळ वर्षें वांचते तर ह्यांचे हातून मराठी वाङ्मयास खरोखर फार मोलवान् भर पडली असती. असो.

दामले कालमाहात्मास अनुसरून हे प्रथमतः सुधारक होते. परंतु शीलनाथ महाराज आणि हरिहरबुवा उदासी ह्या सत्पुरुषांच्या कृपेनें ह्यांस उपरति झाली. ते काशीस गेले, व प्रायश्चित्त घेऊन आले, व अगदीं जुन्या कर्मठ ब्राह्मणाप्रमाणें स्नानसंध्यादि कर्में करूं लागले. त्यांना दांभिकपणा आवडत नसे. ते प्रत्येक गुरुवारीं भजन करीत असत. वीण्याशिवाय ते दुसऱ्या कोणत्याही वाद्याचा उपयोग करीत नसत.

असे खरे धर्मनिष्ठ आणि कर्मठ गुरु जर शाळांस मिळतील, तर त्यांच्या साहचर्यानें विद्यार्थ्यांस जें धर्मशिक्षण मिळेल, तें सध्याच्या प्रचारांतल्या ओंव्या अभंगांच्या पुटपुटीच्या धर्मशिक्ष-णापेक्षां शंभरपट चांगलें मिळेल, असें आह्मांस वाटतें.

हे आपल्या कामकाजामध्यें कै० मंडलिकांसारखे अत्यंत नियमित असत. ते इतके कीं, उज्जनीस आणि नागपुरास त्यांस त्यांच्या मंडळीमध्यें "घड्याळ" हें टोपणनांव पडलें होतें. हा गुण खरोखर आपणांस फार पाहिजे आहे.

मोरोपंत हे गेल्या मे महिन्याच्या सुरींत पुण्यास जाण्याकरितां नागपुराहून सकुटुंब निघाले, ते अपघातांत सांपडून त्यांचा कसा शेवट झाला, हें मागच्या महिन्याच्या बालबोधांत लिहिलेंच आहे. त्यांच्या बरोबर त्यांची धर्मपत्नी सीताबाई प्राणास मुकली ती माउली सती गेली, असें आम्हांस वाटतें. तितक्या संबंधानें, थोडक्याएका शब्दाच्या बदलानें, मोरोपंती एक आर्या बरोबर बसण्यासारखी आहेः—

पतिसंगें स्त्रीस मरण तें लग्नाहून काय हो ऊन
न रहावेंचि सतीनें पळभरहि विरूपकाय होऊन.

हींत 'पूर्वीं'च्या जागीं 'संगें' शब्द घातला आहे. ह्या उभयतां नवराबायकोच्या आत्म्यांस परमेश्वर चिरस्थायी शांति देवो, असें मागून हें चरित्र समाप्त करितों.

---

## वनस्पतींचें भाग्य.

### आर्या.

पादपहो धन्य तुम्ही! देवकृपा तुमचियावरी मोठी!
ती कोणा प्राप्त नव्हे पुण्यांच्या जोडिल्याविना कोटी. १.
जें व्हावें तें मिळतें तुम्हां सकळ जन्मल्याचिया ठायीं
प्राण्यांपरी पडेना त्यासाठीं भटकणें दिशा दाही. २.
वसुधा आपण होउनि अन्नरस तुम्हांस आणुनी पाजी
देउनि घन जल वायू सुखद स्पर्शाहि ठेविती राजी. ३.
ऐशी सृष्टि तुम्हांला पोशी जणुं माय तान्हुल्या बाळा
ह्याहूनि भाग्य दुसरें मागावें काय तें जगत्पाळा. ४.

देतां प्रवासियांतें अत्युष्णनिवारणार्थ आधार
ते मानितात तुमचे तुष्ट मनें फार फार उपकार. ५.

तुमच्याविण प्राण्यांचें जीवित पळभरहि चालणें नाहीं
करितां विचार न दिसे लवभरहि अयुक्त यामधें कांहीं. ६.

अन्नें परोपरीचीं मधुर फळें खावयास देऊन
रोग हराया औषधि, देतां कीं त्यां पडूं नये ऊन. ७.

तुमच्या देहाधारें शतशा नृपमंदिरें महंतमठ
तैशींच साधुसदनें आजवरी जाहलीं जगीं प्रगट. ८.

इतुकें पुण्य कवणिया इतरांला साध्य जाहलें सांगा
ज्यानें तुम्हांस दिधलें हें त्याच्या नम्रतें पदीं लागा. ९.

जें पुण्य मेळवाया मनुजा यात्रादि कष्ट बहु पडती
तें या वनस्पतींतें सहजीं मिळतें! अगाध ही धरती. १०.

योगायोग असे बहु लावुनि ज्यानें दिले असति धरणीं
त्याच्या रमो निरंतर अनन्यभावें मदीय मन चरणीं. ११.

## न्यायनिष्ठुरता.

हा शब्द बालबोधास म्हणायास कठिण आहे, तशी ह्याच्या अर्थाची कल्पनाही मनांत यावयास बरीच अवघड आहे. परंतु, ह्या अर्थाचा शब्द मराठींत दुसरा नाहीं. ह्यामुळें ह्याचा उपयोग करणें भाग पडलें आहे.

न्याय आणि निष्ठुरता हे दोन शब्द मिळून हा एक शब्द झाला आहे. ह्यांत न्याय म्हणजे योग्य, आवश्यक–जगाच्या कल्याणास जें झालेंच पाहिजे तें–असें समजावयाचें, आणि निष्ठुरता म्हणजे कठोरता निर्दयता–पाषाणहृदयता–असा अर्थ घ्यावयाचा. ह्या शब्दाच्या घटनेंत असा चमत्कार आहे कीं, न्याय हा शब्द सद्गुणांच्या यादींतला आहे, आणि निष्ठुरता हा दुर्गुणांच्या शब्दमालेंतला आहे. परंतु, ह्यांच्या संयोगा-

पासून जो हा एक शब्द झाला आहे, त्याचा सगळा अर्थ सद्गुणवाचक -असा सर्वमान्य झाला आहे. तो थोडक्यांत मनांत भरण्यास एक अगदीं सोपें-व्यावहारिक-उदाहरण दिलें पाहिजे. मनुष्याचा जीव घेणें हें केव्हांही झालें तरी अत्यंत कठोरपण-पाषाणहृदयपण-महत्पाप-असें समजतात. तें अगदीं यथार्थ आहे. ह्याविषयीं कांहीं वाद नाहीं. परंतु, जगाची राहाटी नीट रीतीनें चालण्यास, तें कृत्य अत्यंत दयाळू आणि ममताळू माणसांस, निरुपायास्तव कधीं कधीं करणें भाग पडतें. अशीं माणसें म्हटलीं म्हणजे मोठे न्यायाधीश होत. त्यांचें अंतःकरण कितीही कोमल असलें तरी, आरोपितानें खून केला आहे, अशी शाबिदी मनांत भरल्यावर, त्यास देहान्त शासन करणें हें त्यांस भाग पडतें-त्यांचें अत्यंत आवश्यक कर्तव्य होऊन बसतें-एका प्रकारें पुण्यकर्म होतें-असें म्हटल्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. ह्यालाच आम्ही न्यायनिष्ठुरता म्हणतों. त्याविषयीं आतां थोडा विचार करूं.

प्राण्यांस असे कांहीं भयंकर रोग होत असतात कीं, त्यांचें निरसन करण्यास सोमल मोरचुदासारख्या प्राणघातक विषांपासून औषधें उत्पन्न करावीं लागतात. त्यांवांचून तीं औषधें सिद्ध होतच नाहींत. तसें व्यवहारांचें झालेलें आहे. त्यांत कांहीं भयंकर कृत्यें अशीं शिरलीं आहेत कीं, त्यांचा बंदोबस्त करण्यास किंवा लोकप्रवृत्ति त्यांपासून पराङ्मुख करण्यास, हृदयभेदक अशा खडतर उपायांचाच अवलंब करावा लागतो. त्याशिवाय चालत नाहीं. एवढेंच केवळ नव्हे; तर, वाढतां वाढतां त्या उपायांची पदवी प्राचीन काळापासून इतकी वाढली आहे कीं, तिची गणना अत्यंत पवित्र पुण्यकर्मांत होत असते. त्यांचीं कथापुराणें होतात. आणि त्यांचें श्रवण हें अत्यंत श्रेयस्कर मानितात.

सत्वास जागणें—वचनाप्रमाणें वागणें—हें व्रत सर्वत्र पवित्र समजतात. त्याचें माहात्म्य आमच्या भरतखंडांत प्राचीन काळापासून फार वाढलेलें आहे. त्याची पूर्णता कथाकीर्तनांत ऐकून किंवा नाटकांत पाहून प्रेमळ भाविक माणसें आनंदानें डुलत असतात, आणि एकीकडे अश्रु गाळीत असतात. हरिश्चंद्र राजाची गोष्ट त्या प्रकारची आहे. आपलें वचन खरें करण्यास त्यानें आपणा स्वतःस डोंबाघरीं विकून घेतलें, आणि आपल्या धर्मपत्नीचा विक्रय केला. त्याचें वर्णन पंतांनीं फार रसभरित केलें आहेः—

## आर्या.

मोठ्यानें भूप ह्मणे पुरजनहो वचन आयका मांजें[1]
कोण असें पुसतां तरि पुसिजे येईल काय कामा जें. १.
स्पष्ट नृशंस[2] अमानुष[3] राक्षस त्याहून पापतर[4] आहें
स्त्रीतें धनार्थ विकितों जो मी न मरें हिताहित न पाहें. २.
ज्या कोणाला दासी व्हावी कार्यें करावया गेहीं[5]
तो येउनि घेवो हे जोंवरि आहेत मदसु[6] या देहीं. ३.
ऐसें ऐकुनि आला वृद्ध ब्राह्मण म्हणे गृहीं कार्या
न शके करावया बहु सुकुमारी मम मनःप्रिया भार्या. ४.
व्हावी मज दासी हे. देइ धन उदंड घे करीं सवदा
हर हर दुष्कर तो स्त्रीविक्रय असुविक्रयापरीस वदा. ५.
मग चाल चाल म्हणतां सोडुनि पतिपुत्र न निघतां क्षिप्र[7]
केश धरुनि राज्ञीतें स्वगृहा ओढीत चालवी विप्र. ६.
विप्रें ओढुनि नेतां शिशु शोकें ह्मणुनि अंबं अंब[8] रडे
झोंबे वस्त्रासि मनीं फोडी ती माय गाय हंबरडे. ७.
द्विज केश धरुनि ओढी ओढी तो शिशुहि वस्त्र कवळून
खवळून पदें हाणी विप्र परि नव्हेचि दूर जवळून. ८.

---

१ माझें. २ दुष्ट. ३ माणूस नव्हे असा. ४. अधिक पापी. ५ घरीं. ६ माझे जीव. ७ लवकर. ८ आई आई.

द्विज तो त्याहि शिशूंचें[1] जें झालें मूल्य योग्य शास्त्रमतें
बांधोनि-नृपतिला दे घेऊनि तदुत्तरीय[2] वल्कल तें. ९.

हरिश्चंद्राख्यान.

ही न्यायनिष्ठुरता सामान्य नव्हे! प्रत्यक्ष धर्मपत्नी आणि पोटचा पुत्र केवळ वचन पाळण्यासाठीं बाजारांत गुरांप्रमाणें विकणें ही निष्ठुरतेची शिकस्त नव्हे काय?

ऐरलंडांत फिट्झ स्टीफन ह्या नांवाचा एक मोठा व्यापारी असून गालवे शहरीं न्यायाधीश होता. त्यानें आपला मुलगा, बरोबर पुष्कळ रोकड देऊन, स्पेन देशास मद्याच्या खरेदीस गलबतांतून पाठविला. त्याला दुर्बुद्धि आठवली. त्यानें, तो रोख पैसा तसाच आपणापाशीं चोरून ठेवून, बापाचीं भलामणपत्रें मात्र स्पेनच्या व्यापाऱ्यांस प्रविष्ट केलीं, आणि त्यांपासून मद्याची सगळी खरेदी उधार केली. तेव्हां स्पेनच्या व्यापाऱ्यानें, उधारीची रक्कम आणण्यास त्या मुलाबरोबर आपला मुलगा दिला. तें गलबत ऐरलंडास येऊन पोंचेपर्यंत, ह्या दोन तरुण मुलांची गट्टी फार जमली. परंतु, तें गलबत ऐरलंडाच्या जवळ जवळ येत चाललें तसतसें त्या स्टीफनच्या मुलास आपलें कपट बाहेर पडण्याची भीति अधिकाधिक वाटून, त्यानें, जाहाजावरच्या तांडेलांस वश करून घेऊन, त्यांच्या साह्यानें त्या स्पेनच्या व्यापाऱ्याच्या मुलास ठार मारून समुद्रांत टाकून दिलें. त्या मद्यावर स्टीफन ह्यास चांगला फायदा झाला. नंतर स्टीफनच्या मुलानें आपण मोठे श्रीमंत व्यापारी झाल्याचा डौल मांडून, एका मोठ्या धनाढ्याच्या मुलीशीं लग्न करण्याचें ठरविलें. लग्नमुहूर्तही नेमला. इतक्यांत त्याचें सगळें कृष्णकारस्थान स्पेनच्या व्यापाऱ्यांकडून त्याच्या बापास कळलें. आणि आपल्या मुलानें भयंकर खून केला आहे, अशी त्याची खातरी

१ मुलाचें. २ त्याचा पदर.

झाली. तेव्हां तो क्षणभर अगदीं चकित होऊन स्तब्ध राहिला. त्याच्या तोंडाबाहेर शब्द निघेना. तरी, थोडा विचार करून शांतपणें त्यानें म्हटलें, "ठीक आहे. न्याय झालाच पाहिजे." आणि लागलेंच त्यानें आपल्या मुलास पकडवून तुरुंगांत ठेविलें. त्याच्या अपराधाची चौकशी झाली, आणि त्यावर खुनाची शाबिदी झाल्यावर त्यास देहांताची शिक्षा ठरविली. त्यावेळीं त्याच्या कांहीं मित्रमंडळीनें त्या मुलास, त्याचा जीव वांचविण्याकरितां, तुरुंगांतून पळवून लावण्याची खटपट चालविली. ती बापाच्या कानीं येतांच, त्यानें आपल्या मुलास आपल्या घरीं आणून प्रतिबंधांत ठेविलें, आणि फांशीं देण्याच्या दिवशीं प्रातःकाळीं, उभयतांनीं एकत्रपणें परमेश्वरप्रार्थना करून, एकमेकांची क्षमा मागितली आणि मग वेळ आली तेव्हां त्या मुलास इतरांबरोबर फांशीं दिलें! तेव्हां त्या भक्तिमान पित्यास किती दुःख झालें असेल बरें? पण ही न्यायनिष्ठुरता व्यवहारास आवश्यक आहे, असें समजून त्यानें तो दुःखाघात सोसला.

तशीच एक गोष्ट इंग्लंडच्या एका राजाची आहे. चौथा हेनरी हा राजा गादीवर असतां लंडनचा मुख्य न्यायाधीश ग्यासकैन हा होता. तेव्हां एके दिवशीं असें झालें कीं, युवराजाच्या एका मित्राच्या हातून कांहीं अपराध होऊन, त्यावरून त्याला सरकारच्या शिपायांनीं धरून चौकशीकरितां त्या न्यायाधीशाच्या कोर्टांत नेलें. हें वर्तमान त्या युवराजास कळतांच, त्याला फार राग आला आणि तो त्या तिरमिरीसरसा त्या कोर्टांत जाऊन, एकदम आपल्या मित्रास हातांत धरून तेथून बाहेर नेऊं लागला. त्यास सरकारच्या शिपायांनीं हरकत केली आणि असें करणें कायद्याच्या विरुद्ध आहे, तें तूं करूं नको असें त्यास न्यायाधीशानेंही नम्रतेनें सुचविलें. तेव्हां तर त्या युवराजाच्या पायाची आग अधिकच मस्तकास जाऊन,

तो एकदम न्यायाधीशाच्या सिंहासनाजवळ त्याच्या आंगावर धांवून गेला. तेव्हां अर्थात् त्याला सरकारच्या शिपायांनीं धरून ठेविलें. त्याजकडे पाहून न्यायाधीश त्याला शांत मुद्रेनें म्हणाला, "–अहो महाराज, आपण कोण आहां, ह्याचा पुरता विचार करा. मी येथें, आपल्या पित्याच्या आणि आपल्या प्रभूच्या जागीं बसलों आहें. त्याच्या नांवानें मीं आपणास सांगतों कीं, आपण असें असंबद्ध काम करूं नका, आणि ह्यापुढें केव्हांतरी जे कोणी आपली प्रजा व्हावयाचे आहेत त्यांस चांगला कित्ता घालून द्या. आतां, तुम्हीं जी कायद्याची अवज्ञा केली आहे, तीबद्दल मी तुम्हांस, महाराज मुक्त करीतपर्यंत तुरुंगाची शिक्षा देतों." हें कानीं पडतांच युवराजाचे डोळे उघडले. आणि तो निमूटपणें तुरुंगांत गेला. हें वर्तमान राजाच्या कानीं गेलें, तेव्हां त्याला अत्यंत संतोष झाला. तो म्हणाला, "ज्या राजाच्या संग्रहीं असे न्यायी आणि निस्पृह न्यायाधीश आहेत, तो राजा खरोखर धन्य होय. आणि कायद्याची अवज्ञा केल्याच्या अपराधाबद्दल शिक्षा भोगण्यास निमूटपणें तयार झाला, असा युवराज आहे, हें दुसरें धन्यत्व होय." पुढें, हे युवराज सिंहासनारूढ होऊन पांचवे हेनरी राजे झाले तेव्हां ते आपण होऊन मोठ्या आनंदानें म्हणाले कीं, "गास्काइन हे आपल्या न्यायाधीशाच्या जागेस अत्यंत योग्य आहेत, असें आम्ही समजतों, आणि आम्ही ह्यांना निरंतर परम पूज्य मानूं."

तसें पेशवाईतलें उदाहरण रामशास्त्रीबोवांचें आहे. नारायणराव पेशव्यांचा वध झाल्यावर राघोबादादासाहेबांस शास्त्रीबोवांनीं तोंडावर असें स्पष्ट सांगितलें म्हणतात कीं, हें महत्पाप तुमच्या हातून झालेलें आहे, अशी आमची खातरी झाली आहे, आणि ह्यास देहान्त शासनच पाहिजे. आतां तुमच्या राज्याची गति धड नाहीं. असें अत्यंत निष्ठुरतेचें भाषण करून, ते जे

एकदम पुणें सोडून गेले, ते, परत येण्याविषयीं पुष्कळ आग्रह झाला असतांही, परत आले नाहींत. प्रत्यक्ष यजमानांशीं असें उघड बोलणें आणि असें वागणें ही न्यायनिष्ठुरता सामान्य नव्हे. फार मोठी आहे.

ह्या एका गोष्टींत, येथें थोडी तेथें थोडी अशी न्यायनिष्ठुरता किती आहे, हें सहज लक्षांत येईल. आणि हिजवरून आमच्या लोकांस पुष्कळ चांगला बोध मिळेल अशी आशा आहे.

कवि म्हणजे मधुर वाणीचें आगर, असें सर्व समजतात, तरी, विनोदार्थ म्हणा कीं कोणत्या दुसऱ्या कारणानें म्हणा, न्यायनिष्ठुरतेचें अवलंबन करण्याची इच्छा त्यांस कधीं कधीं होते. एक जुना श्लोक आहे. ह्याचा कर्ता कोण हें ठाऊक नाहीं. तरी ह्यांत न्यायनिष्ठुरता आहे:—

भावें जो हरिनाम सेवि न कदा विश्वास नाहीं जया
नाहीं ज्यास परोपकार करणें ना सर्वभूतीं दया
द्वेषी नित्य सुहृज्जनां बहुपरी माता पिता बांधवा
ब्रह्मा वेडसवा म्हणोनि विभवा देतो अशा गाढवा.

अर्थ उघड आहे तरी, त्यांतल्या शेवटच्या चरणांतल्या दुसऱ्या शब्दाविषयीं एवढेंच सांगायाचें आहे कीं, त्याचें एक अपभ्रष्ट रूप साधारण असभ्य बोलण्याच्या पाठांत येत असतें, तें खरें नव्हे आहे. वेडसवा ह्याचा अर्थ वेड्यावांकड्या सवई लागलेला असा आहे, तो येथें घ्यावा हें बरें.

## समुद्रांतून तार टाकणें.

दृढनिश्चयाच्या योगानें मोठाल्या अडचणींतून कसें पार पडतां येतें याचीं अनेक उदाहरणें सांगतां येतील. परंतु तारायंत्राची तार समुद्रांतून टांकण्याच्या प्रयत्नासारखें लक्षांत ठेवण्यास योग्य असें दुसरें उदाहरण क्वचित सांपडेल. तारा-

यंत्राचा व्यवहार जमिनीवर चांगला सुरू झाला, लहानसान खाड्यांतूनही वेष्टन लाविलेली तार टाकतां आली, परंतु इंग्लंड आणि अमेरिका ह्यांसारख्या परस्परांपासून हजारों मैलांवर असलेल्या देशांच्या मध्यें भरसमुद्रामधून तार टांकण्याचा प्रश्न पुढें आला तेव्हां बहुतेक विद्युच्छास्त्रज्ञांनीं हात टेंकल्यासारखे केले. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं महासागराच्या तळा-वरचे खांच खळगे नीट रीतीनें पाहून चांगल्या बिनधोक मार्गानें त्या तळावरून तार टाकीत जाणें बहुतेक अशक्यच आहे. परंतु ह्या अडचणीस न भितां, तार टांकण्याचा प्रश्न ज्यांनीं हातीं घेतला होता त्यांनीं पहिल्या प्रथम अटलांटिक महासागराचा तळ ठावाच्या दोरीच्या साह्यानें चांगला काळजी-पूर्वक तपासला. त्यांत त्यांस असें आढळून आलें कीं, आयर्लंड आणि न्यूफौंडलँड बेट ह्यांच्या मधला अटलांटिक महासागराचा तळ बराच उथळ आणि बहुतेक सपाट आहे. तारायंत्राची तार टांकण्यास असाच प्रदेश पाहिजे म्हणून त्या तळावरून ती टाकून पहावयाची असा त्यांनीं निश्चय केला.

तारायंत्राची जमिनीवरील तार खांबांवरून लटकविलेली असते हें सर्वांनीं पाहिलेंच आहे. ह्या जमिनीवरच्या तारेस कोणत्याही प्रकारचें आच्छादन नसलें तरी चालतें, कारण ती नुसत्या हवेंतून नेलेली असते. समुद्रांत टाकावयाच्या तारे-संबंधानें जास्त बंदोबस्त करावा लागतो. एकतर पाणी विद्यु-द्वाहक असल्याकारणानें, तारेंतला विद्युत्प्रवाह तारेंतूनच नीट जावा, मध्यंतरीं भोंवतालच्या पाण्यामधून निसटून जाऊं नये, म्हणून त्या तारेभोंवतीं कोणत्यातरी अवाहक पदार्थाचें आच्छादान करावें लागतें. शिवाय, हें आच्छादन समुद्राच्या पाण्यानें कुजून जाऊं नये आणि वजनामुळें तार तुटून जाऊं नये म्हणून त्याच्या वरही दुसरें मजबूत आस्तरण घालावें

लागतें. ह्याप्रमाणें ही तार म्हणजे एका प्रकारचा जाड व जड असा दोरच बनतो. ह्यास इंग्रजींत 'केबल' असें नांव पडलें आहे. त्याच्या मध्यभागीं एका तांब्याच्या तारेच्या भोंवतीं पिळवटलेल्या साहा तांब्याच्या तारा वीज वाहण्यासाठीं घातलेल्या असून त्या सर्वांच्यावर गटापर्चाचीं तीन आच्छादनें असतात. ह्या आच्छादनांत कितीही बारीक च्छिद्र राहून गेलें तरी त्यांतून समुद्राचें पाणी आंत शिरून तांब्याच्या विद्युद्वाहक तारांस लागतें, आणि त्यांतून वीज निसटून जाऊं लागते, आणि तारेंतून संदेश पाठविणें अशक्य होतें. म्हणून हें गटापर्चाचें आच्छादन चांगलें अखंड करण्याबद्दल फार काळजी घ्यावी लागते. ह्या गटापर्चाच्या आच्छादनाच्या बाहेर पोलादी तारा लपेटलेल्या असतात. त्यांच्या योगानें त्या सगळ्यास मजबुती येते. असें केबल तयार करून समुद्रांत टाकण्याचा खर्च दर मैलीं सुमारें ३०० पौंड येतो. ह्या सगळ्या कामांत इंग्लंडच प्रमुख आहे.

अशा प्रकारचें 'केबल' आयर्लंड आणि न्यूफौंडलँड ह्यांच्या मध्यें टांकण्याचें ठरवून एक कंपनी उभारण्यांत आली, आणि अडीच हजार मैल लांबीचें केबल चार महिन्यांत तयार करण्यात आलें. ह्या कामाकरितां 'अगामेमनान' आणि 'नायागरा' नांवाच्या दोन मोठाल्या आगबोटी बांधून त्यांवर तें केबल घेतलें, आणि त्या आगबोटी 'व्हालेन्शिया बे' नांवाच्या आयर्लंडच्या किनाऱ्यावरील एका बंदरांत येऊन त्यांनीं त्या केबलचें ऐरिशच्या बाजूचें टोंक मोठ्या समारंभानें जमिनीवर अडकविलें आणि बाकीचें केबल समुद्रांत हळू हळू सोडीत सोडीत त्या आगबोटी सावकाश अमेरिकेच्या दिशेनें जाऊं लागल्या. परंतु त्या सुमारें ४०० मैल जातात न जातात तोंच तें केबल तुटून समुद्रतळाला गेलें आणि केबल टांकण्याचें काम तात्पुरतें कांहीं महिने बंद पडलें. पुढच्या सालीं केबल टांकण्याची

एक नवी योजना निघाली. जमिनीकडून भर समुद्रांत केबल टांकण्याच्या बदला, त्या दोन आगबोटींनीं अटलांटिकमहासागराच्या मध्यभागीं एकत्र भेटावें आणि तेथें केबल टांकण्याची सुरवात करून एका आगबोटीनें तें टांकीत टांकीत न्यूफौंडलँडकडे व दुसरीनें ऐरलंडकडे जावें अशी ती योजना होती. हींतही विलक्षण अडचणी आल्या. त्या दोन आगबोटींची एकत्र भेट होण्याच्या आधीं एक भयंकर वादळ सुटून त्यांतली एक आगबोट अतिशयित कलांडून तिजवरचीं माणसें पुष्कळ दुखावलीं. एकदां तर त्या आगबोटींत सांठवलेलें एक हजार मैल लांबीचें केबल तिच्या बाजूंवर आपटून आपटून आगबोट फुटून जाते कीं काय अशी भीति पडली होती. परंतु एकदांचें तें वादळ थांबलें आणि शेवटीं त्या आगबोटी एकत्र मिळून केबल टांकण्याचें काम सुरू झालें. त्यांतही पुनः विघ्नें आलीं. सात वेळां केबल तुटलें आणि आठव्या वेळीं पुनः वादळ होऊन त्या आगबोटींवरचीं यंत्रें इतकीं बिघडलीं कीं त्यावेळीं तो प्रयत्न सोडून देऊन आगबोटी परत बंदरास आल्या. ह्याच्या पुढच्या प्रयत्नास चांगलें यश आलें, परंतु ह्यावेळींही अडचणी आल्याशिवाय राहिल्या नाहींत. एकेवेळीं केबलास एक मोठा देवमासा अडकल्यामुळें तें अगदीं तुटण्याच्या बेतास आलें होतें. तथापि हीं सर्व संकटें दूर होऊन तारीख १६ आगस्ट सन १८५८ रोजीं युरोप आणि अमेरिका ह्यांचा संबंध तारेनें जडून त्या दिवशीं अगदीं पहिला संदेश त्या तारेंतून पाठविण्यांत आला. तो असाः— ‘युरोप आणि अमेरिका तारेनें संयुक्त झाली आहेत. ईश्वराचा जयजयकार असो. पृथ्वीवर सर्वत्र शांतता नांदो.’ हें केबल सुमारें एक वर्षभर चालून बंद पडलें. पुढें आठ वर्षांनीं पुनः प्रयत्न करण्यांत आला. त्यांतही सुमारें $\frac{2}{3}$ केबल टांकण्यांत आल्यानंतर तें तुटलें. ह्या वेळीं ‘ग्रेट ईस्टर्न नांवाची आग-

बोट ह्या कामावर होती. ती परत येऊन दुसरें एक केबल घेऊन गेली आणि तिनें तें शेवटपर्यंत निर्विघ्नपणें टाकलें. नंतर, पहिल्यानें जें केबल तुटून समुद्रतळावर पडलें होतें त्याचें टोंक उचलून बाहेर काढण्याकरितां तीच आगबोट पुनः निघाली. तें केबल १३०० वावांच्या खोलींतून गळांनीं वर काढण्यांत येऊन दुसऱ्या केबलास जोडलें आणि शेवटपर्यंत पोंचविलें. ह्याप्रमाणें एकदम दोन केबलें सुरू झालीं.

तेव्हांपासून आजपर्यंत इंग्लंड व अमेरिका ह्यांच्या दरम्यान आणखी पुष्कळ केबलें टांकण्यांत आलेलीं आहेत. शिवाय इतर देशांच्या मध्येंही केबलें टांकण्यांत आलीं असून त्यांचा सगळ्या पृथ्वीस गराडा पडला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या धंद्यांत आज २०००० लोक गुंतलेले आहेत ह्यावरून तो केवढा महत्वाचा झालेला आहे त्याची कल्पना होईल. केबल टांकणाऱ्या आगबोटी हल्लीं चोविसांवर असून समुद्रांत टांकलेल्या केबलांची एकंदर लांबी २५७००० मैल आहे.

समुद्रांत मोठ्या खोलीवर पडलेलें केबल बिघडलें तर त्याची दुरुस्ती करण्यास किती त्रास पडत असेल त्याची कल्पना करावी. तरी ह्या संबंधाची विद्या इतकी पक्क दशेस पोंचली आहे कीं, केबल कोणत्या जागीं बिघडलेलें असावें तें तज्ञांस बहुतेक बिनचूक सांगतां येतें. मग बरोबर त्या जागीं जाऊन गळानें तें केबल हळूच वर उचलून दुरुस्त करितात.

केबल चांगल्या प्रकारें टांकलेलें असलें म्हणजे तें सुमारें चाळीस वर्षें चालण्यास हरकत पडत नाहीं. तें पहिल्याप्रथम समुद्रांतून टांकलें तेव्हां दरमिनिटास फक्त दोनच शब्द त्यांतून पाठवितां येत असत. आतां ह्या कामीं इतकी सुधारणा झाली आहे कीं एकः मिनिटांत शंभर शब्द पाठवितां येतात !

# लोक काय बोलतात.

आतांपर्यंत हिंदुस्थानांत प्लेगनें एकंदर ८० लक्ष माणसें मेलीं.

---

जपाननें आपल्या स्वतःच्या गोद्यांमध्यें तीन प्रचंड ड्रेडनॉट तारवें बांधण्याची सुरवात केली आहे.

---

हिंदुस्थानांतील दगडी कोळशाच्या खाणींतून सन १९१२ सालीं एकंदर १४०४४३६८ टन कोळसा निघाला.

---

त्रिपोली इटलीच्या हातांत आल्यापासून तेथें रेलवे बांधण्याचें काम जारीनें सुरू आहे. तेथले अरबलोक अद्याप इटालियन सैन्याबरोबर स्वातंत्र्यासाठीं झगडत आहेत.

---

विद्युत्प्रवाहाकरितां तांब्याच्या तारांच्या ऐवजीं अल्युमिनमच्या तारांचा उपयोग करूं लागले आहेत. ह्या तारांस तांब्याच्या तारांपेक्षां शेंकडा १० खर्च कमी लागतो.

---

दुकानांतून वगैरे कामावर राहाणाऱ्या लहान मुलींच्या नीतीचें संरक्षण करण्यासाठीं युनैटेड स्टेट्समधल्या इलीनॉइस प्रांतांत पांच स्त्रियांचें एक कोर्ट स्थापण्यांत आलें आहे.

---

इंग्लंड आणि युनैटेड स्टेट्स ह्यांच्या दरम्यानच्या युद्धानंतर तह झाल्यास शंभरवर्षें नुकतींच पुरीं होणार आहेत. त्यासंबंधानें दोन्ही देशांत उत्सव करण्याचा विचार चालू आहे.

---

चिनांतल्या लोकसत्ताकराज्याचें पार्लमेंट नुकतेंच उघडलें असून त्यांत सार्वजनिक विषयांची चर्चा मोठ्या जारीनें सुरू आहे. बहुतेक सर्व प्रतिनिधी युरोपियन पोषाक करून पार्लमेंटच्या सभांस येतात.

---

जपान आणि चीन ह्यांमध्यें जास्त सलोखा होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. जपानांतल्या रेलवेंच्या मुख्य अधिकाऱ्यास चीन सरकारानें आपल्या रेलवे, रस्ते वगैरेंच्या संबंधानें आपला सल्लागार नेमलें आहे.

---

प्लेग झालेल्या माणसास टिंक्चर आफ् आयोडैन थेंबथेंब पाण्यांतून पोटांत द्यावें, आणि गांठीवरही आयोडैनचा लेप वरचेवर करावा, म्हणजे चांगला गुण येतो असा मुक्तिफौजवाल्यांस अनुभव आला आहे.

---

गेल्या वर्षीं सुमारें त्रेसष्ट कोटि रुपयांचें सूत व सुती कापड वगैरे हिंदुस्थानांत बाहेरच्या देशांतून आयात झालें. मोटार गाड्या सुमारें दीड कोट रुपयांच्या व बायसिकली तीस लाख रुपयांच्या आयात झाल्या.

---

मांटिनीग्रोच्या राजेसाहेबांनीं आतां स्कुटारी सोडून देऊन ती युरोपखंडांतील बळाढ्य राष्ट्रांच्या स्वाधीन केली आहे. त्यांनीं असें केल्यावरून युरोपखंडांत नवीन लढाई उपस्थित होण्याची भीति आतां टळली आहे.

---

चालू महिन्याच्या २० व्या तारखेस व्हाइसराय लार्ड हार्डिंज ह्यांचा जन्मदिवस पडतो. त्यादिवशीं हिंदुस्थानांतल्या सर्व शाळांत जाणाऱ्या लहान मुलांस खाऊ वगैरे वांटण्याचा विचार लेडी हार्डिंज साहेबांनीं केला आहे. योजना फार चांगली आहे.

---

मराठी भाषेंतील पहिलें टैपांनीं छापिलेलें पुस्तक म्हटलें म्हणजे सिंहासनबत्तिशी हें होय. हें सन १८१४ सालीं कलकत्त्यास मोडी टैपांनीं छापलेलें आहे. ह्यास्तव मराठी मुद्रणकलेचा शतसांवत्सरिक उत्सव येत्या वर्षीं करावा अशी सूचना झाली आहे.

---

पार्लमेंटाचे सभासद निवडण्यास मतें मागणाऱ्या इंग्लंडांतील स्त्रियांनीं विलायतेस पुष्कळ जाळपोळ चालविली आहे. तिजमुळें लोकमत त्यांच्याविरुद्ध होत आहे. सेंटपॉलस कॅथीड्रल म्हणून लंडनास एक

फार मोठें जुनें देवालय आहे त्यांतही ह्या बायांनीं एक बाँब नेऊन ठेविला होता.

---

| |
|---|
| रा. रा. कृष्णाजी बळवंत वागळे, एम्. ए., संयुक्तप्रांतांचे अकौंटंट जनरल, ह्यांस गेल्या ९ व्या तारखेस मुंबईस देवाज्ञा झाली. फार वाईट झालें. हे विद्वान आणि सुशील असून आपल्या बुद्धिमत्तेनें सरकारी नोकरींतल्या उच्चपदावर चढले होते. त्यांचें वय फक्त बावन वर्षांचें होतें. |

---

मि. बोर्नेर नांवाच्या एका इंजिनेरानें एका प्रचंड विमानाचे नकाशे तयार केले आहेत. तें ९६६ फूट लांब व ८२ फूट रुंद असावयाचें असून तें ३०० माणसें ४००० मैलपर्यंत, मध्यें उतरल्याशिवाय, दर तासास ६० मैलांच्या वेगानें नेईल असें त्या इंजिनेरचें म्हणणें आहे. कोणी बांधण्याचें पत्करतें कीं काय तें पाहावयाचें.

---

नामदार गोखले दक्षिण आफ्रिकेंत जाऊन आले त्यावेळीं त्यांनीं तिकडील हिंदी लोकांस होणारा त्रास लवकरच बराच कमी होईल अशी आशा प्रदर्शित केली होती. परंतु इतर देशांतील लोकांस दक्षिण आफ्रिकेंत येऊं देण्यासंबंधानें जो एक नवा कायदा तिकडे होत आहे त्यावरून तो त्रास कमी न होतां वाढत जाणार असें दिसतें.

---

मिसेस आनी बेझंटबाईच्या कांहीं मतांसंबंधानें मतभेद उत्पन्न होऊन बनारस हिंदू कॉलेजमधील कितीएक प्रोफेसरांनीं आणि शिक्षकांनीं आपापल्या जागांचे राजीनामे दिले आहेत. तें कालेज आतां हिंदूयुनिव्हर्सिटी कमिटीच्या ताब्यांत गेलें आहे. बेझंटबाईनीं बनारसेसच एक नवें थिओसोफिकल विद्यालय स्थापून त्यांत हिंदू कॉलेजमधून निघालेल्या मंडळीची नेमणूक केली आहे.

---

युनैटेड स्टेट्समधली नदी मिसिसिपी थोडा जास्त पाऊस पडला कीं अतिशयित फुगून जाऊन गांवें बुडून जातात आणि प्राणहानि होते. यासाठीं तेथल्या सरकारानें त्या नदीला तिच्या पात्रांत धरुन ठेवण्यासाठीं बांध वगैरे घालून आजपर्यंत ६० कोटि रुपये खर्चले आहेत. परंतु ह्या एवढ्या खर्चाचा व्हावा तेवढा उपयोग झालेला नाहीं असें नुकत्याच आलेल्या पुरानें झालेल्या प्राणहानीवरून दिसतें.

---

गेल्या २४ व्या तारखेस जर्मनीच्या बादशाहांच्या एकुलत्याएक कन्येचें लग्न एका जर्मन राजपुत्राशीं बर्लिन येथें मोठ्या थाटानें झालें. आमचे बादशाहा पंचमजार्ज आणि रशियाचे झारमहाराज मुद्दाम लग्नासाठीं गेले होते. ह्या लग्नासंबंधानें विशेष हें आहे कीं, ज्या राजपुत्राशीं कैसरमहाराजांच्या कन्येचें लग्न झालें त्या राजपुत्राच्या घराण्याचें कैसरमहाराजांच्या घराण्याशीं आज कितीएक वर्षें बरें नव्हतें, तें ह्या प्रीतिविवाहाच्या योगानें नाहींसें होऊन ज्यांनीं अनेक वर्षे एकमेकांचें मुखावलोकनही केलें नव्हतें तीं माणसें ह्या उत्सवाच्या प्रसंगीं एकमेकांस मोठ्या प्रेमानें भेटलीं.

---

घरांचा विमा उतरून तीं जाळावीं आणि अशा प्रकारें पैसा मिळवावा हा एक धंदाच युनैटेड स्टेट्समध्यें होऊन राहिला आहे असें म्हणतात. तेथें दरसाल सुमारें दहा कोटि पौंडांचें आगींनीं नुकसान होत असतें आणि ह्यांतल्या पुष्कळ आगी मुद्दाम लाविलेल्या असतात असें म्हणणें आहे. एकट्या न्यूयार्क शहरांत दरसाल ४००० आगी लागत असून दहा वर्षांत फक्त २० आगींच्या संबंधानें गुन्हेगारांस शिक्षा झालेल्या आहेत. आगीनें जळालेल्या घरांचे विम्याचे पैसे चटकर मिळाले म्हणजे इतर लोकही घरांचे विमे भराभर उतरतात, आणि त्यांत विम्याच्या कंपन्यांस नफा होतो म्हणून तशा कांहीं कंपन्यांचेंही ह्या आगी लावण्यांत अंग असतें असा आरोप आहे!

# बालबोध.

## क्यापटन स्कॉट.



महत्त्वाकांक्षा ही एक अत्युत्तम भावना आहे. तिचें बीजारोपण विश्वंभरानें मनुष्याच्या अंतःकरणांत अनादिकालापासून करून ठेविलें आहे. तिचीं फळें, अनेक रूपांनीं, माणसांच्या सुखाच्या आणि कल्याणाच्या अभिवृद्धीस साधनीभूत झालीं आहेत. त्यांचा इतिहास लक्षपूर्वक पाहून त्याविषयीं विचार करूं लागलें म्हणजे असें वाटतें कीं, महत्त्वाकांक्षा ही एक

विलक्षण प्रकारची वल्ली असून, देशकालानुरूप, तिला अपूर्व असे नवनवे धुमारे फुटत जातात, आणि त्यांच्या फलांच्या योगानें मनुष्याचें श्रेष्ठत्व निरंतर वृद्धि पावत असतें. ह्याविषयींच्या अनेक गोष्टी जगाच्या अर्वाचीन इतिहासांत वर्णिल्या आहेत. त्यांतली एक अत्यंत चित्तवेधक आणि हृदयद्रावक गोष्ट थोड्या दिवसांपूर्वीं घडली. ती आज येथें सांगावयाची आहे.

तीस आरंभ करण्याच्या आधीं असें सांगायाचें आहे कीं, ह्या वल्लीस जो एक नवा धुमारा फुटला आहे, तो युरोपांतला आहे. त्याचें मूळ इतर खंडांत कोठें सांपडत नाहीं. तो धुमारा म्हणजे, पृथ्वीच्या पृष्ठभागावरील अज्ञात आणि अगम्य अशा प्रदेशांचा शोध लावून, त्यांची माहिती जगास करून देणें आणि तद्द्वारा आपण लौकिक मिळवून, आपल्या राष्ट्राच्या पराक्रमांच्या लौकिकास भर घालणें हा होय. ह्या प्रकारचे उद्योग आशिआ खंडांतल्या लोकांत अलीकडे कोणीं केल्याचें आढळत नाहीं.

ह्या प्रकारच्या पराक्रमावर आणि लौकिकावर युरोपियन लोकांच्या उड्यांवर उड्या कशा पडत असतात, हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येण्यास एवढें सांगणें बस आहे कीं, आपण ज्या खंडास सध्या अमेरिका म्हणतों, तें खंड, अगदीं प्रथम खरोखर कोलंबसानें, इ० स० १४९३ ह्या वर्षीं शोधून काढिलें, तेव्हां त्यास त्या पुरुषाच्या नांवावरून कोलंबिया असें नांव पडायास पाहिजे होतें. परंतु, त्याच्या मागून अमेरिकस व्हेस्पुसियस ह्या एका खटपटी मनुष्यानें तें खंड इ० स० १४९८ त पाहिल्यावर, त्याविषयीं आपल्याच नांवाचा गाजावाजा पुष्कळ केला. त्यावरून, त्या खंडाला अमेरिका म्हणून जें नांव एकदा पडलें तेंच चाललें आहे. तरी त्यास इंग्रजी कवितेमध्यें कधीं कधीं कोलंबिया असेंही म्हणतात. असो.

अमेरिकेनंतर आस्ट्रेलिया, न्यूझीलंड, आफ्रिकेंतील अज्ञात प्रदेश, इत्यादि मनुष्यवस्तीस योग्य अशा देशांचा शोध लावणें झाल्यानंतर साहसी युरोपियन लोकांचें लक्ष, मनुष्यवस्तीस अगदीं अयोग्य परंतु भूगोलशास्त्राच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या अशा एका प्रदेशाकडे वळलें. हा प्रदेश म्हटला म्हणजे पृथ्वीच्या अगदीं उत्तरेकडचा व दक्षिणेकडचा, बर्फानें सदोदित आच्छादित असल्याकारणानें मनुष्यास अगम्य झालेला प्रदेश होय. त्यांतही विशेषेंकरून त्या प्रदेशांतल्या मध्यबिंदूंस म्हणजे उत्तरध्रुव आणि दक्षिणध्रुव ह्यांस जाऊन पोंचण्याची त्या लोकांची महत्त्वाकांक्षा विशेष प्रज्वलित झाली. ह्या दोन्ही टोंकांचा शोध लावणें म्हणजे मोठें कार्य आहे, तीं प्रत्यक्ष पाहून येऊन जगास कळविणें हा एक मोठा पराक्रम आहे, अशा भावनेनें त्या उद्योगास एकामागून एक पुष्कळ साहसी पुरुष लागले. त्यांतल्या कितीएकांस बरेंच यश आलें, आणि त्यांचा मोठा लौकिक झाला. परंतु, कितीएक थोर पुरुषांस ह्या प्रयत्नांत आपले प्राण खर्चीं घालावे लागले.

हा ध्रुवाकडचा प्रवास किती कठिण असतो त्याची कल्पना उष्ण कटिबंधांतल्या माणसांस होण्यासारखी नाहीं. अशा मोहिमीबरोबरच्या माणसांस प्रत्यक्ष हिमस्वरूप निसर्गदेवतेबरोबर झगडावयाचें असतें. कडक थंडी आणि बर्फ हेच त्या प्रदेशांतले मनुष्याचे भयंकर शत्रु होत. पायांत आणि हातांत दोन दोन तीन तीन मोजे एकावर एक घालावे लागतात आणि अंगांतही अनेक गरम कपडे, रेनडियरच्या कातड्याचे केलेले, एकावर एक चढवावे लागतात. डोक्याचेंही त्याप्रमाणेंच संरक्षण करावें लागतें, आणि सभोंवार सर्वत्र पसरलेल्या पांढऱ्या शुभ्र बर्फावर पडलेल्या सूर्यकिरणांच्या चकाकीनें डोळयांस इजा होऊं नये म्हणून काळ्या कांचेचे मोठाले चष्मे वापरावे लागतात. बर्फ सर्वत्र पसरलेलें असल्याकारणानें पाणी कोठें

आहे आणि जमीन कोठें आहे ह्याचा पत्ता बरोबर लावून मग पाय पुढें ठेवावा लागतो. बर्फावर चाकाच्या गाड्या चालणें अशक्य असतें म्हणून घसरगाड्यांतून प्रवास करावा लागतो, आणि त्यांस ओढणारे कुत्रे आणि घोडे बरोबर घ्यावे लागतात. जातांना टप्प्याटप्प्यांवर झोंपड्या बांधून त्यांत सामुग्री सांठवून ठेवावी लागते. अशासाठीं कीं, मंडळीस परत येतांना तिचा उपयोग व्हावा. बर्फ सर्वत्र असल्याकारणानें परत येणाऱ्या मंडळीस हे टप्प्यांवरचे साठे सांपडण्याची पुष्कळदां मुष्कील होऊन ताऱ्यांचे वेध घेऊन ते शोधून काढावे लागतात.

अशा प्रकारच्या संकटमय ध्रुवशोधनांत ज्यांस आपले प्राण खर्ची घालावे लागले, त्यांतले अगदीं शेवटचे क्याप्टन स्कॉट हे होते. त्यांची संक्षिप्त गोष्ट येथें सांगतों.

क्याप्टन स्कॉट हे इंग्लिश गृहस्थ होते..त्यांचा जन्म इ०स० १८६८ ह्या वर्षीं झाला. सन१८८२साली ते इंग्लिश आरमारांत नोकरीस राहून क्याप्टनच्या हुद्यापर्यंत चढले. सन १९००सालीं इंग्लिश सरकारानें दक्षिणध्रुवाच्या शोधासाठीं एक संशोधक मंडळ रवाना केलें, त्यांत क्याप्टन स्कॉट हे एक प्रमुख होते. हें शोधक मंडळ इ०स०१९०२ ह्या वर्षीं दक्षिण अक्षांश ८२.१७ अंशापर्यंत गेलें. परंतु, पुढें अनेक विघ्नें आल्यामुळें त्यांस तेथून माघारें फिरावें लागलें. तरी त्याविषयींची क्याप्टन स्कॉट ह्यांची हिंमत खचली नाहीं. तर, ती दुणावली, आणि ते, कोणत्याही प्रकारचा सरकारचा आश्रय न घेतां, स्वतःच्या खटपटीनें सर्व तयारी करून, इ०स० १९१० च्या नोवेंबरच्या दाहाव्या तारखेस टेरा-नोव्हा नामक जाहाजांत बसून ह्या सफरीस इंग्लंडांतून निघाले. त्यांच्याबरोबर स्वसंतोषानें डॉ. विलसन, कॅ. ओट्स, लेफ्टनेंट बावर्स, इत्यादि मंडळी निघाली होती. ही सगळी मंडळी दक्षिण कटिबंधाच्या कक्षेंत दक्षिण अक्षांश ७८ च्या सुमारास येऊन

पोंचली. त्यांच्याबरोबर, बर्फावरचा प्रवास करण्यास घसरगाड्या होत्या, आणि त्या गाड्या ओढण्यास कुत्रे व घोडे होते. येथून दक्षिणध्रुवस्थान ९०० मैलांवर होतें. तिकडे जाण्यास हे संशोधक दररोज सुमारें १५ मैलांचा प्रवास करीत, ८७.३६ अंशापर्यंत पोंचले. येथून ध्रुवस्थान अवघें १५० मैल राहिलें होतें. हा पुढचा संकटप्रचुर प्रवास कंठण्यास क्याप्टन स्कॉट, क्याप्टन ओट्स, डॉ. विलसन, आणि लेफ्टनेंट बावर्स हे चौघेच गृहस्थ पुढें चालले. हा शेवटचा पल्ला गांठण्यास त्यांना घसरगाड्या ओढणारे कुत्रे व घोडे मागें ठेवून एकच घसरगाडी, सामानानें लादून, पुढें ओढीत न्यावी लागली. तरी शेवटीं त्यांनीं ता. १८ जानेवारी १९१२ ह्या दिवशीं आपलें निशाण दक्षिणध्रुवावर फडकविलें. ह्याप्रमाणें क्याप्टन स्कॉट ह्यांची कामगिरी चांगल्या प्रकारें सिद्धीस गेली. पण, तींत फार विरस होण्यास एक मोठें कारण झालें. तें असें कीं, ह्याच्या आधीं सुमारें एकच महिना म्हणजे ता. १४ डिसेंबर सन १९११ रोजीं कॅयाप्टन अमंडसेन ह्या स्वीडिश शोधकानें दक्षिणध्रुवास पोंचून तेथें आपल्या देशाचें निशाण रोविलें होतें. तें पाहून अर्थात् दुसऱ्यानें आघाडी मारली असें मनांत येऊन कॅयाप्टन स्कॉट ह्यांस वाईट वाटलें असावें.

निशाण रोंवल्यावर तेथून क्याप्टन स्कॉट आपल्या मंडळीसह परत फिरले. तों वाटेंत बर्फाचें मोठें वादळ होऊन त्यांत ते सांपडले. डा. विलसन ह्यांच्या डोक्यास बर्फाच्या तुकड्यानें जखम होऊन ते घायाळ झाले. तेव्हां त्यांना घसरगाडींत बसवावें लागलें. त्यामुळें पुष्कळ दिवसगत होऊन त्यांच्या जवळची अन्नसामुग्री बहुतेक सरली. शेवटीं, चाहाचा एक डबा आणि दोन चमचे साखर एवढे कायते पदार्थ त्यांच्या जवळ राहिले. तेही संपल्यावर त्या सर्वांचे प्राण अन्नान्न

होऊन गेले असावे. त्याचा सगळा वृत्तांत उपलब्ध नाहीं. परंतु क्याप्टन स्कॉट ह्यांनीं आपल्या पत्नीस शेवटचें पत्र लिहिलें, तें तिला गेल्या वर्षाच्या मार्चांत मिळालें, त्याच सुमारास तिकडे क्याप्टन स्कॉट ह्यांचा अंत झाला असावा. कशावरून तर, त्यांच्या रोजनिशींत ता. ५ मार्च १९१२ ची शेवटची नोंद आहे. तींत त्यांनीं आपल्या राष्ट्रास जो निरोप लिहून ठेविला त्याचा आशय असा आहे कीं, आपल्या देशाच्या लौकिकार्थ ज्या पुरुषांनीं आपल्या प्राणांची आहुती दिली आहे त्यांच्या कुटुंबांचा प्रतिपाळ राष्ट्रांतल्या लोकांनीं अवश्य केला पाहिजे. हा निरोप इंग्लंडांतल्या लोकांच्या मनास लागला आहे, आणि त्याप्रमाणें त्या अनाथ कुटुंबांचा सांभाळ करण्याच्या तजविजी लोकांत चालू झाल्या आहेत. ह्या परोपकाराच्या कार्यास महाराज बादशाहा पंचमजार्ज ह्यांनीं २००० रुपये आणि महाराणी मेरी ह्यांनीं १००० रुपये दिले आहेत. श्री सयाजीराव महाराज गायकवाड ह्यांनींही ह्या फंडास २००० रुपये दिले आहेत. क्याप्टन स्कॉट ह्यांस ह्या सफरीची तयारी करण्यास ३०००० कर्ज झालें होतें, तें ह्याच फंडांतून फेडण्याचा विचार आहे. पार्लमेंटांतल्या सभासदांपासून शाळांतल्या मुलांपर्यंत सर्वांस क्याप्टन स्कॉट आणि त्यांचे अनुयायी ह्यांची हकीकत माहीत होऊन त्या सर्वांकडून ह्या फंडास यथाशक्ति साह्य मिळत आहे. शिवाय क्याप्टन स्कॉट ह्यांचें स्मारक म्हणून शास्त्रीय विषयाच्या चर्चेकरितां एक मोठी इमारत लंडनांत बांधायाचा विचार चालला आहे. त्या इमारतीच्या दरवाज्यावर क्याप्टन स्कॉट ह्यांचे शेवटचे जे शब्द ठळक अक्षरांनीं कोरावयाचे आहेत, ते हे कीं, "प्रयत्न करा, शोधा, शोधून काढा, आणि संकटांस हार जाऊं नका."

हे शब्द फार मोलवान आहेत. ते पृथ्वीवरच्या सर्व

देशांतल्या लोकांनीं लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. कां कीं, त्यांच्या अर्थाचीं व्याप्ति फार मोठी आहे. तिचें स्थूलमान आमच्या वाचकांच्या लक्षांत येण्यास आह्मी असें सांगतों कीं, अशा प्रकारच्या स्वाऱ्या नांवानें जरी ध्रुवशोधनासारख्या कार्यास निघत असतात, तरी, त्यांचा हेतु, त्याच्या पलीकडे पुष्कळ असतो. त्याच्या सिद्ध्यर्थ ह्या प्रकारच्या स्वारीबरोबर अनेक शास्त्रें जाणणारे अनेक विद्वान लोक, त्यांच्या अवश्य साहित्यासह दिलेले असतात, आणि ते आपापल्या विषयांचे नवनवे शोध आपल्या रोजनिशींत फार जपून लिहून ठेवीत असतात. म्हणजे, जे कोणी ज्योतिषी असतात ते तिकडच्या अंतरिक्षांतले नवे शोध लिहितात, भूस्तरशास्त्री असतात ते तिकडच्या प्रदेशांतले नानाप्रकारचे दगड आणि इतर खनिज पदार्थ जमवून त्यांविषयीं माहिती लिहितात. तसेंच समुद्रांतल्या प्राण्यांविषयीं, आकाशांतल्या पक्ष्यांविषयीं, करवतील तितके नवे शोध करून ते त्यांची माहिती संकलित करितात. ती, एकंदर राष्ट्रांच्या ज्ञानवृद्धीस, वेगळ्या वेगळ्या दिशांनीं, विद्वान लोकांस उपयोगीं पडते, आणि कधीं कधीं अगदीं अकल्पित असे शोध लागतात. ह्या प्रकारच्या शोधांतल्या कांहीं खनिजांच्या परीक्षणावरून आतां असें सिद्ध झालें आहे कीं, जे प्रदेश सध्या ध्रुवांच्या भोंवतीं अत्यंत थंड अशा हवेमध्यें आहेत, ते पूर्वीं केव्हांतरी उष्ण कटिबंधांत असले पाहिजेत. ह्याकरितां, अशा प्रकारच्या स्वारीच्या दप्तराकडे देशांतल्या सर्व प्रकारच्या विद्वान गृहस्थांचे डोळे लागलेले असतात, कां कीं, त्यांत कांहीं तरी नवीन विचार करण्यासारखें सांपडेल, अशी त्या सर्वांस आशा असते. आणि त्याप्रमाणें त्यांस पुष्कळदां अनुभव येतो. असो.

क्याप्टन स्कॉट आणि त्याबरोबरचे तिघेजण दक्षिणध्रुवास

पोंचून परत येतांना थंडीनें आणि उपासमारीनें मरण पावले हें वर सांगितलें. त्यांपैकीं क्याप्टन ओट्स ह्याचे हात पाय थंडीनें अतिशयित अधू झाल्याकारणानें त्याचा भार इतर मंडळीवर फार पडूं लागला होता. तें त्यास वाईट वाटून एके दिवशीं बर्फाचें भयंकर वादळ चालू असतांना तो जो तंबूबाहेर गेला तो परत आलाच नाहीं. त्यानें आत्मघात करून घेतला असावा अशी समजूत आहे. बाकी तिघांचीं म्हणजे क्याप्टन स्कॉट, डा. विल्सन आणि लेफ्टनेंट बावर्स ह्यांचीं प्रेतें, त्या लोकांचा पत्ता बरेच दिवस लागत नव्हता म्हणून त्यांच्या शोधासाठीं पाठविलेल्या मि. राइट ह्याच्या मंडळीस, तारीख १२ नोव्हेंबर १९१२ रोजीं, एका तंबूंत सांपडलीं. त्याच तंबूंत क्याप्टन स्कॉट वगैरे मंडळीनें केलेल्या शोधांचीं टिपणें व इतर वस्तु होत्या. तें सगळें गोळा करून त्या तिघांच्या प्रेतांस त्याच तंबूंत बर्फाखालीं मूठमाती देऊन त्यांवर त्या मंडळीनें दगडांची एक मोठी रास रचली आणि तिच्यावर एक क्रूस लावून ठेविला, आणि त्या क्रूसावर मृतांचीं नावें कोरून ठेविलीं. नंतर त्यांनीं सभोंवार वीस मैलपर्यंत क्याप्टन ओट्सच्या प्रेताकरितां शोध केला, परंतु तें कोठेंच सांपडलें नाहीं. तेव्हां त्याच्या स्मरणार्थ तेथें जवळच दगडांची दुसरी एक रास करून ठेऊन मंडळी परत फिरली.

अशा प्रकारचे उद्योग कोणत्याही राष्ट्राच्या हातून होण्यास आधीं त्यांतील लोकांस भूगोलविद्येचें चांगलें ज्ञान असलें पाहिजे, आणखी, अशा बर्फमय प्रदेशांतून सुरक्षितपणें प्रवास करण्यास जें साहित्य आवश्यक असतें तें माहीत असलें पाहिजे. ही सामुग्री सिद्ध करण्यास लक्षावधि रुपये, साहसाचें धैर्य आणि ज्ञानसंपादनेच्छा हीं विपुल लागतात, आणि हीं संपादण्यास लोकाश्रय आणि राजाश्रय आवश्यक असतो. ह्या सगळ्याची सिद्धता करण्याचें सामर्थ्य असणें हें खरोखर मोठें भाग्य होय.

हें भाग्य ज्या इंग्लंड देशास सध्या प्राप्त झालें आहे, त्या देशाचें सख्य आमच्या देशाशीं होऊन त्याच्या योगानें हा अपूर्व ज्ञान-लाभ आमच्या राष्ट्रांतल्या लोकांस होत आहे ही मोठी ईश्वरी कृपा आहे. हिजबद्दल आपण परमेश्वराचे उपकार मानिले पाहिजेत.

---

## लार्ड हार्डिंज ह्यांची जयंती.

### आर्या.

वाटे आजि उगवला सोन्याचा दिवस भरतखंडासी.
कीं जगदीशकृपेची झाली लीला उमोप सुखराशी. १.
झाले सहाचि महिने तेव्हां दिल्लीमधें प्रळय झाला
तो कारण आजि घडे आमुचिया राजनिष्ठ कुतुकाला. २.
प्रतिनिधि हार्डिंजांच्या झालों संरक्षणीं मुदित जैसे
आज जयंती त्यांची आनंदाची करूं सकळ तैसे. ३.
जीवावरचें गेलें संकट बहु कष्ट साहिले त्यांहीं
परि तळतळिचा शब्दहि तोंडाबाहेर काढिला नाहीं. ४.
कण्हतहि असतां दिधलें आमुचिया पालनार्थ वचनातें
हें मायबालकांच्या नात्याहुनि काय वेगळें नातें. ५.
निजकर्तव्याविषयीं दृढनिश्चय धरुनि वाहिली शपथ
साधूंचा संतांचा हाचि असे वर्णनीय पुण्यपथ. ६.
ऐसा पाता आम्हां सुदैव हें प्राप्त जाहला आहे
काय नवल जन सारा त्यास भजुनि नित्य देवसा राहे. ७.
दे देवा यांस सदा धनधान्य सुपुत्रपौत्र यशराशी
हें मागतों नमुनियां अनन्यभावें त्वदीय चरणांसी. ८.
"गाऊं प्रभुगुण मागूं पाणिद्वय जोडुनी तयापाशीं
संतत विभो असों दे हार्डिंजांच्या शिरीं तुझा आशी." ९.

---

१. गेल्या महिन्याच्या विसाव्या तारखेस लार्ड हार्डिंज ह्यांचा ५५ वा वाढदिवस झाला, आणि त्यासंबधानें शाळांतून उत्सव झाले. त्यासंबंधाची ही कविता आहे.

ऐसें म्हणती कविवर मित्र रसिक मोगरे मधुरवाणी
तें गोड वाटतें मज अमृताची काय होय ती खाणी. १०.
ऐसें सुपर्व गाणें हा कविला लाभ वाटतो मोठा
कीं यांत न आनंद-प्रद पुण्याचा कधीं असे तोटा. ११.

---

## मनुष्याची पराधीनता.

जैशी जैशी वेळ पडे
तैसें तैसें होणें घडे.

तुकाराम.

मनुष्याचें जीवित ही एक मोठी यात्रा आहे. ती त्याच्या इच्छेवरची नाहीं. ती त्याच्या मागें लागलेली आहे. ती त्याला चुकवितां येत नाहीं. ह्या यात्रेंतल्या मुक्कामांचा विचार सत्पुरुषांनीं केला आहे. त्यांस बाल्य, पौगंड्य, तारुण्य, उतारवय, आणि वृद्धापकाल अशीं नावें यथाक्रमें दिलीं आहेत. त्यांच्याविषयींची मर्यादा फारशी कोठें केलेली नाहीं. पौगंड्य ह्याला मात्र पांचव्या वर्षापासून पंधराव्यापर्यंत मुदत कोठें सांगितली आहे. तरी, हे मुक्काम किंवा टप्पे, एकामागून एक बिनचूक येत असतात. त्यांचा क्रम कधीं बदलत नाहीं. आणि ह्यांविषयीं ज्ञात्यांचें सांगणें असें आहे कीं, मनुष्यास समजायास लागल्यावर त्यानें, आपल्या समजुतीप्रमाणें, प्रत्येक मुक्कामांत असें आचरण करावें कीं, तें पुढच्या मुक्कामांत दिवस सुखानें जाण्यास साधनीभूत व्हावें. म्हणजे, अल्प प्रमाणांत, विदुरानें धृतराष्ट्रास म्हटलें आहे—

दिवसा ऐसें वागावें पाहें जेणें रात्र सुखाची जाये

ह्याच न्यायानें, पुढची स्थिति सुखावह व्हावी, असें आचरण पूर्वस्थितींत करायास पाहिजे आहे. हें अगदीं खरें आहे. आणि सगळें शहाणपण ह्यांतच आहे. परंतु, हें साधण्यास

एक मोठी अडचण ही आहे कीं, पुढच्या स्थितींत काय काय गोष्टी घडणार आणि कसे कसे योग येणार हें माणसाला पूर्णपणें कळत नसतें. त्यामुळें, पूर्वस्थितींत रहात असतां, त्यास पुढच्या स्थितीचा मार्ग चोखाळून ठेवितां येत नाहीं. ह्याचा परिणाम अगदीं साहजिक असा होतो कीं, आपणास आपलें जें काय कर्तव्य असें वाटतें, तें मनःपूर्वक करून, त्या त्या स्थितींतल्या योगायोगानुरूप, जें काय शास्त्रपूत किंवा शिष्टसंमत असें मनांत भरतें तें दृढनिश्चयानें करावें लागतें. त्याशिवाय दुसरी गति रहात नाहीं. अशा गोष्टी मोठमोठ्यांच्या चरित्रांत घडलेल्या आपल्या कथापुराणांत वर्णिल्या आहेत. ह्यांतल्या दोनच आज येथें सादर करितों.

ह्यांतली पहिली गोष्ट रामायणांतली आहे. श्रीरामाचा पिता राजा दशरथ हा मोठा ज्ञाता, धर्मनिष्ठ आणि नीतिमान प्रभु होता. शिवाय, विश्वामित्रासारखे महाज्ञानी त्याला सूक्त सांगण्यास सिद्ध होते. कांहीं उणें नव्हतें तरी, त्याला शेवटीं मरण कसें आलें, हें सर्वश्रुत आहेच. समरांगणामध्यें साह्य केल्याबद्दल त्यानें कैकेयीस जे वर दिले होते, ते पूर्ण करणें हें त्याच्या पवित्रतेस अत्यंत आवश्यक होतें. आणखी, ती राजपत्नी पहिल्यापासून चांगली सुशील आणि पवित्रवृत्ति असल्याच्या योगानें, ती असे भलते वर आपल्या पतीपाशीं मागेल आणि सगळ्या राजकुटुंबावर संकट आणील असें कधीं कोणाच्या स्वप्नींही आलें नव्हतें. परंतु, कशामुळें कोणजाणे तिला आइते वेळीं दुर्बुद्धि आठवून तिनें जे वर दशरथ राजापाशीं मागितले ते सत्त्वशीलतेच्या रक्षणार्थ, त्यास देणें भाग पडून त्याला केवळ पुत्रवियोगदुःखानें प्राणत्याग करावा लागला. शिवाय, आपल्या पुत्रास राजपद मिळावें हा जो तिचा मुख्य कटाक्ष होता, तो न साधून ह्या धर्मशील पुत्रानें तिची जी निर्भर्त्सना

केली, ती तिला निमूटणें सोसावी लागली. आणखी शिवाय वैधव्य प्राप्त झालें तें वेगळेंच. भरताचे शब्दप्रहार वज्रप्रहारापेक्षांही कठिण होते. त्यानें तिला ह्मटलें:—

न कळत पतिताचें खादलें अन्न वोकी,
तरि पतित नव्हे तो पापरूपे अवो कीं
ह्मणुनि उदरिं तूझ्या देह हा जन्मला गे
त्यजिन तरि तुला मी पाप तूझें न लागे.

जाळीन हें तोंडचि जाण आधीं
मुखें जया देशि अनंत आधी
न माय तूं वैरिण होसि साची
माझे मनीं भाव खरा असाची.

वामन.

ह्यापेक्षां प्रत्यक्ष पुत्राच्या तोंडचें प्रखरतर उत्तर दुसऱ्या कोण-त्याही मातेस आजपर्यंत सोसावें लागलें नसेल.

ह्या गोष्टीचा विचार सध्याच्या सामान्य पद्धतीनें केला असतां असें मनांत येतें कीं, वचन पूर्ण करण्यास दशरथराजाला रामचंद्रासमवेत वनवासास जातां आलें असतें, आणि राजपद भरतास देतां आलें असतें. त्यांत कांहीं कठिण किंवा अशास्त्र घडलें नसतें. पण तसें कां झालें नाहीं, आणि प्राणत्यागावरच कां आलें, ह्याचा उलगडा होत नाहीं. तेव्हां, ह्यांत कोणासही दोष न लावितां, "भवितव्य" किंवा "अवतारकृत्य" ह्मणून स्वस्थ बसावें लागतें.

दुसरी गोष्ट महाभारतांत आहे. ती कर्णाची आहे. हा पुरुषही असामान्य होता. हा द्रोणाचार्यांचा पट्ट शिष्य होता. मोठा ज्ञाता, मोठा योद्धा, मोठा उदार असा त्याचा लौकिक गाजत आहे. तरी, त्याचें काय झालें तें पाहा.

आमच्या वाचकांस ठाऊक आहे कीं, कर्ण हा मूळचा पांड-

वांकडचा, कौरवांकडचा नव्हे. परंतु, योगायोगांनीं तो कट्टा कौरवपक्षपातीं झाला. पुढें कौरवपांडवांचें युद्ध माजलें, तेव्हां त्यास पूर्वकथा सांगून प्रथम श्रीकृष्ण त्याचें मन पांडवांकडे गुप्तपणें वळवूं लागला. त्यास कर्णानें उत्तर दिलें:—

## आर्या.

श्रीकृष्णजी करावा कैसा विश्वासघात अवसांनीं[1]
युद्ध कसें न करावें आह्मां हा युद्धलाभ नवसांनीं. १.
तरि मग उरलें काय प्रभुजी त्यजिल्या जरी प्रतिज्ञा त्या.
नच सोडवेल देउनि धीर भरंवसा अरिप्रति झाल्या. २.
धारातीर्थींच[2] मिळे सद्गति सत्कीर्ति शुद्धि अधमातें
राजपदभोग नलगे द्यावा देवा रणांत वध मातें. ३.

मोरोपंत.

आपला उपाय हरला, असें पाहून कृष्णानें स्वतः कुंतीस गुप्तपणें कर्णाकडे पाठविलें. तिनें त्यास नाना प्रकारीं सांगितलें. पण, त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं त्याचें वर्णन केलें आहे:—

## आर्या.

कर्ण म्हणे सन्माता लोकीं सुख व्हावया असु खरचिती
किंवा नेत्रें झांकुनि व्हाया सुख आपणा असुख रचिती. १.
माझा घात पुरवला तुज त्यांचा घात मात्र पुरवेना
काय असें अघ विटलें कां त्वन्मन मज जसें स्वपुर वेनां[3]. २.
अरिहि न करिल असें त्वां केलें त्वां नख न लाविलें जननीं
जन नीच मज न म्हणते परि काय करील नियतिला जननी. ३.
कृष्णें जशी यशोदा त्यजिली तशि न त्यजीन राधा मी
ती यातना न नरकीं होय कृतघ्ना न जी नरा धार्मीं. ४.

---

१. आयत्या वेळीं. २. समरांगणीं. ३. वेन राजाला.

हेंच श्रीधरांनीं असें वर्णिलें आहे–

कर्ण ह्मणे कुंती पाहीं, तुवां मज टाकिलें तवांहीं
मज क्षत्रियसंस्कार नाहीं, आतां काय बोलोनियां ॥ १
माझा प्राणसखा दुर्योधन, मजवरी तेणें ठेविला प्राण
त्यास मी सोडितां अधःपतन, पावेन सत्य त्रिवाचा ॥ २.

हेंही उत्तर फार कठोरपणाचें आहे. असे शब्द कर्णासारख्या ज्ञात्याच्या मुखावाटे प्रत्यक्ष मातुश्रीस निघावे, हें विचित्र आहे. परंतु, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. मनुष्यवृत्तीचा एक चमत्कार आहे.

ह्या सगळ्याचें तात्पर्य हें आहे कीं, आपल्या भावी स्थितीविषयीं मनुष्यास आपलें कर्तव्य आधीं योजून ठेवितां येत नाहीं. तर, कालदेशवर्तमानाप्रमाणें त्या वेळीं जें काय योग्य आणि आवश्यक वाटतें, तें करून काल काढावा लागतो.

अशी मनुष्याची पराधीनता सगळ्या व्यवहारांत पावलोपावलीं दृश्यमान होते. ह्याच अनुभवावरून इंग्रजीमध्यें एक अशी ह्मण पडली आहे कीं, कालदेशवर्तमानानुरूप मनुष्य आपोआप बनतो. त्यास प्रयत्न लागत नाहींत. तरी, त्यांतल्या त्यांत, चांगल्याकडे ओढा ठेवणें हें अत्यंत आवश्यक आहे. कर्णानें, आपल्या स्वताच्या सुखाकडे लक्ष न देतां, कृतज्ञतापूर्वक कौरवांचा पक्ष अखेरपर्यंत धरिला, हेंच त्याच्या विद्वत्तेस आणि शौर्यास खरोखर शोभलें. हें धोरण माणसांनीं आपापल्यापरी निरंतर ठेवावें, ह्यांत त्यांचें खरोखर शाहाणपण आहे.

---

## शास्त्रीयज्ञानाभिवृद्धि.

**यांत्रिक श्वासोच्छ्वासः**–ज्या मनुष्यांचीं फुपुसें अशक्त असतात त्यांस डाक्टरलोक जे अनेक उपाय सांगतात त्यांमध्यें

उंच डोंगरावरच्या हवेंत जाऊन राहाणें हा उपाय विशेष महत्त्वाचा असतो. ह्या उपचाराच्या योगानें पुष्कळ आजारी माणसांस गुण येतो असा अनुभव आल्याकारणानें सर्व देशांतून ठिकठिकाणीं उंच डोंगरांवरून अशा रोग्यांस राहाण्यासाठीं आरोग्यस्थानें बांधण्याचा प्रघात पडलेला आहे. आपल्या हिंदुस्थानांतही अनेक जागीं अशीं आरोग्यस्थानें बांधिलेलीं आहेत. अशा उंचावरच्या ठिकाणीं राहिल्यापासून फुपुसाच्या रोग्यांस जो गुण येतो तो तेथील हवेंत एकादा औषधी गुण असतो म्हणून येत नाहीं, तर त्या हवेच्या विरळपणामुळें तो गुण येतो. तेथली हवा विरळ असल्याकारणानें, फुपुसांस जेवढा आक्सिजन वायु जरूर असतो तेवढा मिळण्यासाठीं नेहमींपेक्षां जास्त जोरानें श्वासोच्छ्वास करावा लागतो, आणि असें बरेच दिवस चाललें म्हणजे फुपुसें आपोआप पहिल्याहून जास्त सशक्त होतात. म्हणजे, अशक्त मनुष्यानें बेताची तालीम केल्यानें त्याची जशी ताकद वाढते तसें हें आहे. हा उपाय फारसा कठीण नाहीं, परंतु उंच डोंगरावरच्या हवेंत जाऊन राहाणें सगळ्यांस शक्य नसतें. अशा लोकांसाठीं फुपुसांस स्वल्पांत व्यायाम घडून त्यांची स्थिति सुधरावी यासाठीं एका डाक्टरानें एक लहानसें यंत्र तयार केलें आहे. त्याचे दोन भाग आहेत. एक भाग नाकास लावावयाचा असून दुसरा भाग तोंडास लावावयाचा असतो. नाकास लावावयाच्या भागांतून श्वास आंत ओढावयाचा आणि तोंडास लावावयाच्या भागांतून श्वास बाहेर सोडावयाचा. श्वास आंत ओढावयाच्या भागांत अशी योजना असते कीं, श्वास सहज आंत ओढतां न येतां थोड्याशा जास्त श्रमानें तो ओढतां यावा, आणि श्वास बाहेर टाकावयाच्या भागांत अशी योजना असते कीं, तो नेहमींहून जास्त सुलभपणें बाहेर सोडतां यावा. ह्या यंत्राचा

प्रत्यक्ष उपयोग केल्यावरून असें आढळून आलें आहे कीं त्याचा फुपुसाच्या रोग्यांस पुष्कळ उपयोग होतो. तें एकसारखें नाकातोंडास लावून ठेवावें लागत नसून दिवसांतून दोन तीन वेळां सुमारें अर्धा अर्धा तास पर्यंत लावून त्यांतून श्वासोच्छ्वास केला असतां त्याचा फुपुसांवर चांगला परिणाम होतो असें म्हणतात.

**मिसर देशांत एक नवा उद्योगः**—मिसरदेशांत नैल नदीवर असुवन नांवाच्या गांवाजवळ एक प्रचंड बंधारा घालून त्या नदीचें पाणी अडविलें आहे आणि त्यापासून लाखों एकर जमीन भिजवून तिजमध्यें कापसाची लागवड करण्याचा उद्योग सुरू केला आहे. हा कापूस उत्तम जातीचा आणि विपुल उत्पन्न होऊन त्याचा इंग्लंडांतील गिरण्यांस पुरवठा व्हावा, आणि हल्लींप्रमाणें त्यांस अमेरिकेसारख्या परक्या देशाच्या तोंडाकडे पाहाण्याचें कारण पडूं नये हा ह्या योजनेचा एक प्रधान उद्देश आहे. ह्याशिवाय त्या पाण्यापासून दुसरा एक नवा उद्योग चालू करण्याचा ईजिप्तच्या पाटबंधाऱ्याच्या खात्याचा विचार आहे. असूवनच्या बंधाऱ्यांतून जमीन भिजविण्याकरितां जें पाणी बाहेर पडत असतें तें बऱ्याच उंचीवरून खालीं पडत असून त्याच्या अंगीं पुष्कळ जोर आलेला असतो. ह्या जोराचा उपयोग करून विद्युत्प्रवाह उत्पन्न करण्याचें घाटत आहे. ह्या पाण्याच्या प्रवाहाच्या जोरानें 'टर्बाइन' नांवाच्या पाणचक्या चालवून डायनामोंच्या योगानें वीज उत्पन्न करावयाची आहे. तेथें सुमारें दीडलाख घोड्यांची शक्ति मिळण्यासारखी आहे असा अजमास आहे. ह्याप्रमाणें उत्पन्न केलेल्या विजेच्या योगानें नैट्रेट्स नांवाचीं खतें, हवेंतल्या नैट्रोजन वायूचें रूपांतर करून, तयार करावयाचीं आहेत. ईजिप्तमध्यें दरसाल सुमारें सहासात लाख पौंड किमतीचीं

खतें आयात होत असतात, तीं, हा नवा कारखाना सुरू झाला म्हणजे आयात करावीं लागणार नाहींत आणि तितका पैसा देशांतल्या देशांत राहील.

**फोनोग्राफच्या 'रेकार्ड' मध्यें सुधारणाः**—फोनोग्राफ म्हणजे बोलकीं यंत्रें दोन प्रकारचीं असतात हें प्रसिद्धच आहे. ध्वनीच्या खुणांच्या रेषा, एका यंत्रांत वर्तुलाकार सपाट प्लेटींवर वठविलेल्या असतात, आणि दुसऱ्या प्रकारच्या यंत्रांत रुंद बांगड्यांवर वठविलेल्या असतात, आणि ह्या रेषांमधून यंत्राची सुई चालूं लागली म्हणजे आवाज उत्पन्न होतो. ह्या प्लेटी आणि बांगड्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं न्यावयाच्या वेळीं फार जपावें लागतें, आणि त्यांस जागा पुष्कळ लागते. शिवाय एकएका प्लेटीवरचें किंवा बांगडीवरचें गाणें किंवा भाषण फार फार तर तीन चार मिनिटें चालतें, जास्त वेळ चालणें शक्य नसतें. आलीकडे एक नवीन युक्ति निघाली आहे तिच्या योगानें हे सर्व दोष निघून जाऊन फोनोग्राफच्या यंत्राची उपयुक्तता अतिशयित वाढेल असें दिसतें. ह्या नवीन योजनेंत ध्वनीच्या खुणांच्या रेषा प्लेटींवर किंवा बांगड्यांवर न घेतां एका विशेष रांध्याच्या फितीवर घेतात. ही फीत फक्त पाव इंच रुंद असून, दोन दोन तीन तीन हजार फूटलांब घेतां येते. ती सीनेमोटोग्राफमधल्या 'फिल्म' प्रमाणें एका रुळावरून निघून दुसऱ्या रुळावर गुंडाळली जाते, आणि गाणें किंवा भाषण दोन चार मिनिटांत न थांबतां, तास दोन तासही चालू ठेवितां येतें. म्हणजे एका फितीवर सबंद नाटक-ही घेतां येतें. अर्थात् ह्या फितीचा उपयोग करण्यासाठीं यंत्राच्या रचनेंतही फेरफार करावा लागला आहे. फीत हवी तितकी लांब घेतां येते. ह्याशिवाय तिजपासून आणखी एक असा फायदा आहे कीं, एकाच फितीवर एकाहून जास्त 'रेकार्ड'

घेतां येतात. पाव इंच रुंदीच्या फितीवर एकमेकांच्या बाजून अशीं साहापर्यंत गाणीं किंवा भाषणें सहज वठवितां येतात! ह्या नव्या युक्तीच्या योगानें फोनोग्राफच्या प्रसारास पुष्कळ मदत होईल असें दिसतें.

**टेलिफोनच्या साह्यानें मासे मारण्याची युक्तिः**—ही एका फ्रेंच मनुष्यानें काढली आहे. मासे पाण्यांत पोंहत असतांना त्यांच्या अंगांतून एक प्रकारचा ध्वनि निघत असतो, तो नुसत्या कानांस जरी ऐकूं येत नाहीं तरी पाण्यांत बुडवून ठेविलेल्या विशेष प्रकारच्या टेलिफोनच्या रिसीव्हरच्या योगानें ऐकूं येतो. अशा प्रकारें बुडवून ठेविलेल्या रिसीव्हरजवळच एक विजेनें उडणारा फटाकडा लावून ठेविलेला असून त्या सगळ्याचा संबंध, कांठावर, एक जागा तयार केलेली असते तेथें तारेनें जोडलेला असतो. त्या जागीं असलेला मनुष्य त्या टेलिफोनमधून ऐकत बसतो, आणि त्याला माशांचा आवाज ऐकूं आला कीं, तो एक कळ दाबून तो फटाका उडवितो. म्हणजे तेथें आलेले मासे पटापट मरून पाण्यावर येऊन तरंगूं लागतात. ते काढून नेण्याची व्यवस्था केलेली असते.

---

## उत्कृष्ट स्पष्टोक्ति.

यंदांच्या पुण्यांतील वसंतव्याख्यानमालेच्या अठ्ठाविसाव्या व्याख्यानाच्या संबंधानें जो वादविवाद झाला, त्यांत अध्यक्ष रा. रा. महादेव गोविंद अभ्यंकर, ह्यांनीं जें काय ह्मटलें आहे, तें, गेल्या मे महिन्याच्या बालबोधांतील फलज्योतिषविचारांशीं अगदीं तंतोतंत मिळत आहे. तें सगळें त्यांच्या स्वतःच्या अनुभवाचें आहे, ह्मणून त्याची किंमत फार मोठी आहे. आणि तीस त्यांच्या स्पष्टोक्तीनें विशेष भर पडली आहे. ते म्हणालेः—

"फलज्योतिष हें शास्त्र गणितशास्त्रासारखें ठाम नाहीं. हल्लीं पंचांग किंवा तिथी यांचेंही ज्ञान नसतें व फलज्योतिषावर भरंवसा ठेविला जात नाहीं, हें मला एका दृष्टीनें अभिनंदनीयच वाटतें. कारण त्यानें भ्रामक गोष्टींवर भरंवसा ठेवून फसण्याचा संभव रहात नाहीं. मुहूर्त वाटेल त्या गोष्टीकरितां सांगितलेले आहेत; उदाहरणार्थ हजामतीलाही मुहूर्त सांगितला आहे. हजामतीला योग्य मुहूर्त नसल्यानें येथील अण्णासाहेब पटवर्धन यांची दाढी किती वाढते हें सर्वांस ठाऊकच आहे. ज्योतिषाच्या नादीं लागलेल्यांनीं प्रयत्न सोडून दिले असून, ते वेडे झालेले आहेत. अथेन्सचें साम्राज्य असतांना सिसिलीवर स्वारी करणारा सेनानी नीकेयस यानें चंद्रग्रहण पाहून ज्योतिष केलें कीं, लष्कर एक महिनाभर हालवावयाचें नाहीं व त्याप्रमाणें वागल्यानें ४०–५० हजार लोक मारले गेले! रा. टिळक यांजवर खटला चालला, तेव्हां मी त्यासंबंधानें प्रश्न करून त्यांचीं बरोबर उत्तरें देणारास २५ रु. बक्षीस लावलें होतें. त्याप्रमाणें मजकडे त्याबद्दल २५ पत्रें आलीं; त्यांतील सर्वांचें ज्योतिष खोटें ठरलें. ३६ व्या वर्षीं मी मरेन, असें ज्योतिष सांगितल्यानें मी दोन तीन कंपन्यांत आयुष्य 'इन्शुअर' केलें; पण त्यानें माझें नुकसान मात्र झालें. माझ्या जावयाच्या पहिल्या दोन बायका शास्त्रोक्त मंगळ्या केल्या होत्या; पण त्या वारल्या. त्यावर मी माझी मुलगी दिली. तिला मंगळ नाहीं; पण आज लग्न झाल्यावर तेरा वर्षें ती जिवंत आहे. उच्चीचे ग्रह असतां कांहीं चांगलें झालें नाहीं असा अनुभव आहे. या शास्त्रावर भरंवसा ठेवूं नये, असें ह्मटलें तरी तें शास्त्र खोटेंच आहे, असें मी ह्मणत नाहीं. एका मुलीच्या लग्नाचा योग केव्हां हें मीं सांगितलें तें बरोबर ठरलें. त्याचप्रमाणें एक आजारी माणूस भेटेल, असें सांगितलेलेंही खरें ठरलें.

पण याविषयीं ठाम सांगतां येत नाहीं. तसें पाहिलें तर रा. टिळक यांची कुंडली सामान्यांतलीच आहे. तीवरून पहातां ते षट्कर्में करणारे ब्राह्मण व्हावे; पण ते तसे नाहींत. माझ्या कुंडलीप्रमाणें पहातां मी कुलदीपक व्हावयास पाहिजे; पण मी तसा आहेंसें मला वाटत नाहीं. आजच्या व्याख्यात्यांनीं एक मुलगा मोठा पुरुष होईल, असें भविष्य केलें होतें; पण तो मुलगा सातव्या वर्षींच वारला. अशा गोष्टी आहेत व त्यांचा खुलासा होणें जरूर आहे."

ह्या उक्तींत जसें अण्णासाहेब पटवर्धनांचें उदाहरण सांगितलें आहे, तसेंच कै. प्रो. श्रीधर गणेश जिनशीवाले ह्यांचें एक उदाहरण आहे. हे मोठे नामांकित विद्वान पदवीधर होते, संस्कृत आणि इंग्लिश ह्या भाषांत प्रवीण होते, आणि लहानपणापासून अखेरपर्यंत मोठे कर्मठ होते, हें प्रसिद्ध आहे. त्यांचा विश्वास फलज्योतिषावर फार होता. त्यांनीं इ० स० १८९१ त आपल्या प्रोफेसरच्या कामाचा राजीनामा दिल्यावर, पुढच्या बारावर्षांच्या हयातींत त्यांस दुसऱ्या कालेजांत प्रोफेसरच्या जागा मिळत होत्या, त्या न पतकरितां त्यांनीं इष्टमित्रांस आपल्या पत्रिकेवरून स्पष्ट सांगावें कीं, मला राज्यकारभारांत खचीत मोठी जागा मिळावयाची आहे. पण तो योग कधीं आला नाहीं.

फलज्योतिषाविषयीं ह्यापेक्षां अधिक स्पष्ट बोलावयाचें राहिलें नाहीं. ह्या फलज्योतिषावरच्या विश्वासानें आजपर्यंत अनंत घोटाळे झाले आहेत आणि तसे पुढें होतील असें भय आहे. ह्याकरितां ह्या भ्रम नाहींसा करण्याविषयीं आमच्या आधुनिक विद्वानांनीं यथाशक्ति प्रयत्न करणें हें त्यांचें कर्तव्य आहे.

त्या प्रयत्नांत असें स्पष्ट बोलणें आणि कालानुरूप त्याप्रमाणें वागून दाखविणें हें मुख्य आहे. एवढ्यानें देखील पुष्कळ कार्य होईल.

# लोक काय बोलतात.

मक्केच्या यात्रेकरूंसंबंधानें सरकारानें नवीन नियम केले आहेत. त्यांबद्दल सगळ्या मुसलमानांकडून नापसंती दाखविली जात आहे.

---

केरोसीन तेलाची मागणी अलीकडे इतकी वाढली आहे कीं, तें तेल टांक्यांत भरून नेणाऱ्या शंभरांवर आगबोटी आजमितीस स्काटलंडांत बांधीत आहेत !

---

सर जॉन लुबॉक हे प्रसिद्ध ग्रंथकार ७८ वर्षांचे होऊन गेल्या मे महिन्यांत मरण पावले. ह्यांस अलीकडे लॉर्ड ॲव्हबरी अशी पदवी मिळाली होती.

---

लहान वयाच्या परंतु जाणत्या कैद्यांस धंदे वगैरे शिकवून त्यांची सुधारणा करण्यासाठीं मुंबईसरकार धारवाड येथें 'बोर्स्टल' पद्धतीचा एक नवा तुरुंग काढीत आहे.

---

पालीठाण्याप्रमाणेंच माहुवा आणि कुंडला येथेंही जलप्रलय झाला आहे. माहुवा येथें पस्तीस प्रेतें हातीं लागलीं आहेत. माहुवा आणि कुंडला येथें प्रत्येकीं १॥ लाखाचें नुकसान झालें आहे.

---

युरोपांतलीं राष्ट्रें लष्कर आणि आरमार ह्यांवर दरसाल सुमारें ३६६०००००० पौंड खर्चीत आहेत असा हिशेब निघाला आहे. त्या राष्ट्रांत ४० लाख सैन्य नेहमीं लढाईसाठीं तयार असतें.

---

न्यूयार्क शहरांत सन १८३५ सालीं एक इमारत साठहजार पौंडांस बांधली तिची आजमितीस दहा लाख पौंड किंमत होत आहे. ह्यावरून तिकडे स्थावर मिळकतीच्या किमती कशा वाढल्या आहेत तें समजेल.

---

टर्की आणि बाल्कन संस्थानें ह्यांच्या दरम्यानच्या तहावर एकदांच्या सह्या झाल्या. ह्या कामीं इंग्लंडचे परकीय राज्यांसंबंधाचे प्रधान सर एडवर्ड ग्रे ह्यांनीं मोठी मुत्सद्दिगिरी दाखविली असें सर्वतोमुखीं झालें आहे.

---

बंगाल्यांत बारिसाल येथें नासिकच्या प्रसिद्ध राजद्रोहाच्या खटल्या-सारखाच एक मोठा खटला सुरू आहे. त्यांत पुष्कळ मुलें आणि कांहीं शाळामास्तर आरोपित असून तो कितीएक दिवस चालेल असा रंग दिसत आहे.

---

मॅडम सारा बर्नहार्ट नांवाची एक फ्रेंच नटी आहे, ती नुकतीच युनैटेडस्टेट्समध्यें कांहीं नाटकांत खेळून परत स्वदेशीं गेली. ह्या फेरींत तिला निवळ ३०००० पौंड नफा राहिला. ह्या बाईचें वय सत्तर वर्षांचें आहे.

---

विजेच्या योगानें कातडीं कमावण्याची युक्ति निघाली आहे, तिचा एक मोठा फायदा असा आहे कीं, नेहमींच्या पद्धतीप्रमाणें जीं मोठालीं कातडीं कमावण्यास महिना महिना लागतो, तीं ह्या नव्या पद्धतीनें थोडक्या दिवसांत कमावतां येतात.

---

नामदार गोखले पब्लिक सर्विस कमिशनबरोबर विलायतेस गेले आहेत. तेथेंही त्यांच्या कानाच्या दुखण्यानें त्यांस पुष्कळ त्रास झाला आहे. डाक्टरांनीं त्यांस विश्रांति घेण्यास सांगितलें आहे. ते अक्टोबर-मध्यें हिंदुस्थानांत परत येणार आहेत.

---

मद्रास आणि सदर्न मराठा रेलवेवर गेल्या मेच्या २६ व्या तारखेपासून मोठा संप होऊन उतारू आणि माल नेआण करण्याचा व्यवहार बंद पडला होता. तसा बडोदा रेलवेवर आणि जी. आय्. पी. रेलवेवरही संप झाला होता. तो आतां मोडला आहे.

---

मि. रुझवेल्ट, युनैटेडस्टेट्सचे माजी प्रेसिडेंट, हे दारूबाज आहेत असा तिकडील कांहीं वर्तमानपत्रें त्यांवर कितीएक दिवस आरोप करीत होतीं.

हल्लीं त्यांनीं तशा एका पत्रावर अब्रूनुकसानीची फिर्याद चालवून त्याच्या कर्त्यास माफी मागण्यास लाविलें आहे.

---

गेल्या चार वर्षांत हिंदुस्थानचा परदेशांबरोबरचा पत्रव्यवहार दुप्पट झाला आहे, आणि विलायतच्या मेलची नीट व्यवस्था लावणें कठिण पडूं लागलें आहे. ह्यासाठीं, हल्लीं दर आठवड्यास एकदां मेल निघते ती दोनदां निघण्याची व्यवस्था करावी कीं काय ह्याचा विचार चालू आहे.

---

मि. दयाराम गिधुमल ह्या नामांकित पेन्शनर वृद्ध न्यायाधीशांनीं गेल्या एप्रिल महिन्यांत, शीक धर्माची दीक्षा घेऊन वीसवर्षांच्या एका तरुण गुजराती मुलीबरोबर विवाह केला! ते मोठे एकनिष्ठ सुधारक आणि सेवासदनाचे पुरस्कर्ते होते!! त्यांची पहिली बायको जीवंत असून कितीएक प्रौढ मुलेंही हयात आहेत!

---

इचलकरंजीचे अधिपति बाबासाहेब इचलकरंजीकर प्रकृती सुधरण्याकरितां आपल्या पत्नीसहवर्तमान इंग्लंडांत गेले आहेत. त्यांनीं लंडनमध्यें, ईस्ट इंडियन असोशिएशन सभेपुढें एक चांगलें व्याख्यान देऊन त्यांत हिंदुस्थानांतील इंग्लिश राज्याचें महत्त्व वर्णन केलें आणि त्याच्या सुधारणेसाठीं चांगल्या सूचना केल्या.

---

आम्हांस लिहिण्यास फार संतोष वाटतो कीं, आमचे जुने सन्मान्य मित्र रा. रा. रामकृष्ण रामचंद्र मोरमकर, हे मुंबईसरकारच्या लष्करी खात्याच्या कचेरींत हेडक्लार्क होते, ते थोडे दिवसांपूर्वीं आपलें काम सोडून पेन्शन घेऊन निघाले आहेत, त्यांस त्यांच्या चांगल्या राजसेवेबद्दल सरकारानें **'रावसाहेब'** ही बहुमानाची पदवी दिली आहे. हेच आतां विविधज्ञानविस्तार पुस्तकाचे व्यवस्थापक आहेत. ह्या बहुमानप्राप्तीविषयीं आह्मी रावसाहेबांचें अभिनंदन करितों.

---

गेल्या जून महिन्याच्या २० व्या तारखेस, लार्ड हार्डिंजसाहेब, आपले लोकप्रिय व्हैसराय, ह्यांचा जन्मदिन म्हणून हिंदुस्थानांतील सर्व शाळांस सुटी दिली होती. त्या दिवशीं त्यांच्या कल्याणाविषयीं प्रार्थना झाल्या

आणि शाळांतल्या मुलांमुलींस खाऊ वांटण्यांत आला. हें अगदीं यथार्थ झालें. कांकीं, दिल्ली येथील अत्यंत भयंकर अत्याचारापासून केवळ प्रभुकृपेनें बचावून हा आपला वाढदिवस त्यांनीं पाहिला, हा लाभ अत्यंत वर्णनीय आणि अपूर्व आहे. देव करो, आणि नामदारसाहेब दीर्घायु होवोत.

---

गेल्या महिन्याच्या २४ व्या तारखेस फ्रान्सदेशाचे प्रेसिडेंट पॉइनकेर हे इंग्लंडांत गेले होते. तेथें त्यांचा आदरसत्कार फार मोठा झाला. आणि दरबारी मेजवानीमध्यें त्यांचें आणि आपले बादशाहा महाराज पंचमजार्ज ह्यांचें भाषण झालें. त्या दोहोंतही उभय राष्ट्रांचें परस्परांविषयींचें प्रेम आणि परस्परांच्या कल्याणाचें अगत्य ह्यांचें रहस्य भरलें होतें, आणि त्या सगळ्याचा हेतु, जगांत सर्वत्र शांतता राहावी हा होता. असे सुयोग पूर्वीं कधीं आलेले आढळत नाहींत. "जागोजाग ब्रिटिशलोकांनीं माझें जें आदरातिथ्य अत्यंत प्रेमानें आणि पूज्यबुद्धीनें केलें आहे त्याच्या योगानें माझ्या अंतःकरणास परम समाधान वाटलें आहे." असा संदेश प्रेसिडेंट साहेबांनीं आपल्या बादशाहांस परत आल्यावर पाठविला आहे.

---

गेल्या महिन्याच्या दहाव्या आणि अकराव्या तारखांस काठेवाडांत मनस्वी पाऊस पडला. पालीठाणा येथें चोवीस तासांत वीस इंच पाऊस पडून नदीला पूर आला. गावांत पाणी अठरा फूट चढलें होतें, तेणेंकरून मालमत्तेचें फार नुकसान होऊन प्राणहानि भयंकर झाली आहे! विधवाश्रमांतील सगळ्या स्त्रिया बुडून मेल्या, त्याप्रमाणेंच बोर्डिंगांतलींही पुष्कळ मुलें बुडून मेलीं. एकंदर प्राणहानि दोनशेंच्यावर झाली आहे. गुरें किती मेलीं याचा अंदाज लागत नाहीं. मालमत्तेचें नुकसान दोन लाख रुपयांवर झालें आहे. दरबारानें अनाथ लोकांसाठीं २०००० रुपये दिले आहेत. अमदाबाद, मुंबई, इत्यादि ठिकाणांहून मदत होत आहे. यानंतर पुनः सव्विसाव्या तारखेस काठेवाडांत अठरा तासांत सोळा इंच पाऊस होऊन मालमत्तेची आणखी नासाडी झाली आहे. ईश्वरी क्षोभ!

# बालबोध.

## श्रीनिवासराव कोन्नूर रोद्द.



मनुष्याची ज्ञानसंपन्नता जसजशी वाढत जाते तसतसें त्याचें कर्तव्यक्षेत्र मोठें मोठें होत जातें. हिंदुस्थानांत इंग्लिश भाषेच्या द्वारें जो ज्ञानप्रसार झाला आहे, त्याच्या योगानें, पाश्चात्य थोर माणसांनीं आपल्या देशाच्या कल्याणार्थ कोणकोणत्या प्रकारचे प्रयत्न केले आहेत, हें आमचे इकडच्या आधुनिक विद्वानांस चांगलें कळून आलें आहे, आणि तें एक अत्यंत पवित्र कर्म आहे, असें त्यांच्या मनांत ठसून तें करण्याविषयीं त्यांचे ठायीं स्वभावतः मोठी इच्छा उत्पन्न झाली आहे.

तिचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. त्यांत, आपल्या देशबंधूंत ज्ञानप्रसार करण्याच्या उद्योगाची इच्छा प्रमुख आहे. आणि खरोखर म्हटलें असतां, तोच सगळ्या देशकल्याणाचा पाया आहे. थोरल्या चिपळूणकरांनीं म्हटलें आहे—

ऐश्वर्य बल धनादिक सौख्यें प्रसवे समस्त जी कांहीं
ती विद्या जो देई तेणें वद काय तें दिलें नाहीं.

म्हणजे जो कोणी विद्या देतो तो सर्व कांहीं देतो, तो देत नाहीं असें कांहीं नाहीं. म्हणून विद्यादानाचा उद्योग अत्यंत पुण्यप्रद वाटतो. त्यानें आमच्या आधुनिक विद्वानांचें चित्त वेधिलें आहे. त्याचें एक उदाहरण प्रकृत चरित्रांत चांगलें दृश्यमान आहे.

श्रीनिवास कोन्नूर रोद्द हे कर्नाटकी वैष्णव ब्राम्हण आहेत. ह्यांचें जन्म इ० स० १८५५ च्या सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस धारवाड येथें झालें. ह्यांचें घराणें चांगलें संभावित आणि वजनदार आहे. तरी, घरची गरिबी असल्याकारणानें श्रीनिवासराव ह्यांस लहानपण फार कष्टांत घालवावें लागलें. ह्यांचे वडील हे लहान असतांच निवर्तल्यामुळें त्यांस आपल्या वयाच्या १४ व्या वर्षींच विद्याभ्यास सोडून देऊन आपल्या कुटुंबाच्या निर्वाहार्थ उद्योगांत पडावें लागलें. त्यांनीं, धारवाडानजीक हवेरोपेठ येथें एक खासगी शाळा घातली, तीवर त्यांस दरमहा आठ रुपये मिळत असत. त्यानंतर थोड्या दिवसांनीं त्यांस हुबळी येथील मिशन शाळेंत पंधरा रुपये दरमहाची असिस्टंट मास्तरची जागा मिळाली. तेथें त्यांस धारवाडाहून रोज पायीं जावें लागत असे. नंतर ते बेळगांवच्या ट्रेनिंग कालेजांत सुमारें दीड वर्ष राहिले, आणि तेथें त्यांनीं आपला अभ्यास वाढविला. त्यावेळीं दक्षिणभागाचे एजुकेशनल इन्स्पेक्टर रसेल साहेब होते त्यांची मर्जी रोद्द ह्यांच्यावर बसली. त्यांनीं त्यांस इंग्लिश

आणखी शिकण्याचें उत्तेजन दिलें, आणि साह्य केलें. त्याचें त्यांनीं चीज केलें. ते मोठ्या मेहनतीनें अभ्यास करूं लागले, आणि इ. स. १८६९ त त्यांची म्याट्रिक्युलेशनची परीक्षा उतरली. नंतर कांहीं दिवस ते डेक्कन कालेजांत अभ्यास करीत होते. परंतु इतक्यांत त्यांचे आजोबा आणि सासरे मरण पावल्यामुळें त्यांस अभ्यास तसाच एकीकडे ठेवून कुटुंबनिर्वाहार्थ पुनः नौकरी पाहावी लागली. त्यांनीं कांहीं दिवस रेव्हिन्यू खात्यांत चाकरी केल्यावर इ. स. १८७२ ह्या वर्षीं शाळाखात्यांत ३० रुपयांची शिक्षकाची जागा मिळविली. त्या जागेवर एकसारखी मेहनत करून आणि आपल्या अधिकाऱ्यांस संतुष्ट ठेवून ते केवळ आपल्या सतत उद्योगानें आणि हुशारीनें भराभर चढले आणि इ. स. १८८० ह्या वर्षीं धारवाडचे डेप्युटी एजुकेशनल इन्स्पेक्टर झाले. जिल्ह्यांतल्या शाळा आपल्या असिस्टंटाच्या साह्यानें तपासणें आणि नव्या प्राथमिक शाळा स्थापणें हें ह्या अमलदारांचें काम असतें. ह्यांनीं हें काम हातीं घेतलें तेव्हां त्या जिल्ह्यांत प्राथमिक शिक्षणाच्या शाळा अवघ्या १६७ होत्या. ह्या कामावर ते वीस वर्षें होते त्या मुदतींत म्हणजे इ. स. १९०० पर्यंत त्या शाळांची संख्या ६१३ झाली. म्हणजे वीस वर्षांत ह्यांच्या उद्योगानें शाळांची सुमारें चौपट झाली. ह्या शाळा वाढविणें हें काम फार कठिण असतें. कांकीं खेड्यांतल्या लोकांस शिक्षणाची अभिरुचि नसते ह्यामुळें शाळांस मदत करण्यास त्यांचीं मनें वळविण्याकरितां फारच खटपट करावी लागते. त्यांत ह्यांचें लक्ष स्त्रीशिक्षणाकडे विशेष होतें, आणि मुलींच्या शाळांवर नेमण्यास स्त्रीशिक्षक मिळावे तितके मिळत नाहींत ही अडचण त्यांच्या अनुभवास आल्यावरून त्यांनीं धारवाड येथें स्त्रीशिक्षक तयार करण्यासाठीं एक नार्मल क्लास स्थापित केला. तोच क्लास वाढून आतां स्त्रियांचें ट्रेनिंग कालेज झालें

आहे. त्यांस इ. स. १९०० ह्या वर्षी डायरेक्टर साहेबांनीं धारवाडच्या पुरुषांच्या ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सिपाल नेमिलें. तेव्हांपासून तें नमुन्याचें कालेज आहे असें शाळाखात्यांत समजतात. हे इ. स. १९०८ पर्यंत त्या कालेजावर राहून त्याच वर्षी पेन्शनर झाले. त्यांचें काम सरकारांत इतकें पसंत पडलें कीं त्यांस त्यांनीं लागलीच **रावबहादुर** ही बहुमानाची पदवी देऊन त्यांचा गौरव केला. त्याचप्रमाणें लोकांतही त्यांची मान्यता वाढली. ती इतकी कीं, दक्षिण भागांतल्या लोकलबोर्डांनीं त्यांस १९०९ ह्या वर्षी मुंबई सरकारच्या कायदेकौन्सिलाचे सभासद आपल्या वतीनें निवडून पाठविलें. तेव्हांपासून त्या संस्थांनीं त्यांस आणखी दोनदां कौन्सिलदार निवडलें आहे. हें कौन्सिलाचें काम ते फार मनापासून करीत असतात आणि लोककल्याण करण्याची एकही संधि जाऊं देत नाहींत. स्थानिक सार्वजनिक कामांतही हे प्रमुख असतात. ते सध्या धारवाड म्युनिसिपालिटीचे प्रेसिडेंट आहेत.

एवढेंच करून नामदार रोद्द ह्यांना स्वस्थ राहाणें बरें वाटलें नाहीं. जसें उत्तरभागांत गुजरात कालेज आहे आणि मध्यभागांत डेक्कन कालेज आहे, तसें दक्षिणभागास एक वेगळें सरकारी कालेज असावें, म्हणजे त्या भागांतील विद्यार्थ्यांस पुण्यासारख्या लांब पल्यावरच्या ठिकाणीं जाण्याची आवश्यकता पडणार नाहीं, ही गोष्ट त्यांच्या मनांत ठसून त्यांनीं आज कितीएक दिवसांपासून त्या दिशेनें मोठा उद्योग चालविला आहे. त्याविषयीं सरकाराशीं त्यांचा पत्रव्यवहार झाला आहे आणि तें त्या कामीं त्यांस मदत करण्यास तयार आहे. परंतु त्या कार्यास लोकांकडून दोन लाख रुपये मिळाले पाहिजेत अशी एक अट आहे. ती पुरी करण्याच्या कामास रावबहादुर रोद्द हे कायावाचामनेंकरून लागले आहेत. तें काम त्यांच्या हातून खचित सिद्धीस जाईल अशीं चिन्हें

दिसत आहेत, आणि तें साधलें म्हणजे सगळ्या दक्षिणभागांतील लोकांवर उच्चप्रतीच्या शिक्षणासंबंधानें रावबहादुरांचे फार मोठे उपकार होणार आहेत.

येथें एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती ही कीं, सरकारी मोठे कामदार लोक पेन्शन घेऊन मोकळे झाले ह्मणजे आपली कालक्रमणा स्वस्थपणांत करितात. तेणेंकरून त्यांचा सगळा अनुभव फुकट गेल्यासारखा होतो. तसें रावबहादुर रोद्द ह्यांचें झालें नाहीं. दक्षिणभागाच्या इन्स्पेक्टरचें काम करीत असतां त्यांच्या अनुभवास असें आलें कीं श्रेष्ठ प्रतीचें शिक्षण संपादण्यास दक्षिणभागांतील मुलांस पुण्यास धांव घ्यावी लागते ती खर्चाच्या संबंधानें आणि कुटुंबव्यवस्थेच्या संबंधानें लोकांस मोठी अडचण वाटते. ती अडचण दूर करण्याकरितां त्यांनीं हें धारवाडास कालेज स्थापण्याचें काम हातीं घेतलें आहे. हे त्यांचे मोठे उपकार आहेत. आणि आम्हांला अशी आशा आहे कीं, ह्या लोकहिताच्या कामीं दक्षिणभागांतले उदार आणि श्रीमंत लोक ह्यांस साह्य करतील.

शिवाय रावबहादुर रोद्द हे डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डाचे मेंबर आहेत, धारवाड जिल्ह्यांतल्या नव्या तऱ्हेच्या पतपेढ्यांचे सन्मान्य उत्पादक आहेत आणि धारवाड शेतकी सभेच्या हितार्थ अविश्रांत श्रम करणारे तिचे सभासद आहेत. आणखी कोणतेंही सार्वजनिक हिताचें कार्य निघालें कीं, त्यास मदत करण्यास हे एका पायावर तयार असतात.

ह्यांच्या कारकीर्दीच्या पूर्वीं कानडी प्रांतांतल्या प्राथमिक शाळांत मराठी पुस्तकें वाचवीत असत आणि कानडी शिकविण्याची सोय चांगलीशी नव्हती. ही मोठी अडचण ह्यांनीं पुष्कळ श्रम करून दूर केली. कानडी भाषेच्या अभिवृद्ध्यर्थ ह्यांचे आणखी उद्योग चालू आहेत. मराठी भाषेंतल्या ग्रंथकारांस

मदत करण्यासाठीं जशी डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसैटी नांवाची संस्था पुण्यांत आहे, तशी एक संस्था कानडी भाषेंतल्या ग्रंथकारांसाठीं धारवाडास स्थापन करण्यांत आली आहे, तिचे उपाध्यक्ष नामदार रोद्द आहेत. ह्या संस्थेचें नांव कर्नाटक विद्यावर्धक संघ असें असून तिनें आजपर्यंत सुमारें ५५ कानडी पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत, आणि शिवाय ती एक कानडी मासिक पुस्तक प्रसिद्ध करीत असते. नामदार रोद्द ह्यांनीं स्वतः कितीएक शालोपयोगी कानडी पुस्तकें लिहिलीं आहेत.

आमच्या प्राथमिक शिक्षणपद्धतीमध्यें अनेक व्यंगें राहिलेलीं आहेत तीं परकीयत्वामुळें आमच्या राज्यकर्त्यांच्या लक्षांत येत नाहींत, परंतु आमच्यांतल्या ज्या थोर पुरुषांचे सगळे जन्म शाळाखात्यांत गेले आहेत त्यांस तीं व्यंगें सहज कळतात. परंतु तीं सरकारच्या नजरेस आणून दूर करण्याविषयीं सरकारास आग्रहानें विनंति करण्यास सरकारी नोकरींत असतां त्यांस सवड होत नाहीं. ह्यास्तव पेन्शन घेतल्यावर त्या व्यंगांविषयीं आपला अनुभव नम्रपणानें सरकारास कळवून तीं दूर करण्याचे उपाय सुचविण्यास त्यांस चांगली संधी असते. पण तिचा उपयोग आजपर्यंत कोणीं केल्याचें दिसत नाहीं. देशी भाषेंतील क्रमिक पुस्तकें पुष्कळ गुणांनीं उणीं आहेत. गणित, भूगोल, इतिहास, इत्यादि विषय इंग्रजी शाळांतल्या खालच्या इयत्तांत इंग्रजी भाषेच्या द्वारें शिकवितात; त्यांत शिकणारे आणि शिकविणारे ह्यांचे पुष्कळ श्रम व्यर्थ जातात. तसेंच इंग्रजी अगदीं आरंभींचीं पुस्तकें इंग्लिश ग्रंथकारांच्या हातचीं असल्यापेक्षां तीं आपल्या मुलांच्या अडचणी जाणून एतद्देशीय विद्वानांनीं लिहिलीं असतां तीं शिकणारांस व शिकविणारांस फार सोईचीं पडून अभ्यासाची गति विशेष वाढेल. ह्या सर्व गोष्टींविषयीं कोणासही शंका यावयाची नाहीं असें असतां आमच्यां-

तल्या शाळाखात्यांतल्या मोठाल्या पेन्शनदारांनीं ह्या दिशेनें प्रयत्न केल्याचें कोठें दिसत नाहीं ह्याचें फार वाईट वाटतें. अनुभव हा सुधारणेचा जनिता आहे, तेव्हां तो जेवढा जेवढा मोठा होईल तेवढी तेवढी सुधारणा वृद्धि पावत जाते हें तत्त्व मनांत आणून मोठमोठे इंग्लिश लोक हिंदुस्थानांतलीं महत्त्वाचीं कामें करून पेन्शन घेऊन विलायतेस गेल्यावर आपले इकडचे अनुभव तिकडे पुस्तकरूपानें प्रसिद्ध करितात. लार्ड राबर्टस् आणि सर बार्टल फ्रियर इत्यादिकांचे ग्रंथ आमच्या विद्वान मंडळीस माहीत आहेतच. त्या नमुन्यावर ह्यापुढें तरी आमच्च्यांतल्या मोठ्या विद्वान पेन्शनरांनीं यथाशक्ति उद्योग करून आपल्या अनुभवाचें सार्थक्य करावें अशी विनंति आहे. अशी विनंति करण्यास देखील संधी क्वचित मिळते म्हणून ही संधी साधून ही सूचना केली आहे. हिचा उपयोग व्हावा.

---

## सृष्टव्यापारांत चूक नाहीं.

### अभंग.

मन बुद्धि नाहीं तेथें चूक नाहीं
जगताची पाहीं राहाटी ही. १.
नारिंगीला कधीं जांभळें न येती
गव्हांचिया पातीं साळी तैशा. २.
आंब्याला फणस उंसाला डाळिंब
अंजीरा कोकंब कधीं आले ? ३.
पाण्याचें वाहणें उतरणीकडे
न तें कधीं चढे वरवर. ४.
दिव्याचिया ज्योती नित्य वर जाती
तयांस खालती जातां न ये. ५.
सूर्य उगवणें होय पूर्व दिशे
तो कधीं प्रकाशे पश्चिमेसी. ? ६.

आगकाडी पेटे गुलाचिया टोंका.
तो नसे त्या टोंका न पाजळे. ७.

उष्णतेनें होय पाणियाची वाफ
दगडाची साफ नव्हे कधीं. ८.

पाणी जड नित्य तें खालीं राहावें.
तेल वरी यावें हलकें तें. ९.

चुकोनी अनळ नव्हे थंड कधीं
पर्जन्याची वृष्टि उष्ण तैशी. १०.

सृष्टीच्या पद्धतीमध्यें चुकोनियां
भलतें व्हावया जागा नाहीं. ११.

---

## नाटक.

नाटक म्हणजे काय तें लहानमोठ्या सगळ्या माणसांस ठाऊक आहे. तो एका प्रकारचा फार प्राचीन धंदा आहे. त्याचें वर्णन जुन्या कथापुराणांत आढळतें. हा धंदा पूर्वीपासून अगदीं नीच मानिलेला आहे. तो इतका कीं, पन्नास पाउणशें वर्षांच्या मागचीं वृद्ध संभावित माणसें, नटाचें, म्हणजे नाटकांत सोंग घेणाराचें मुखावलोकन हें पाप समजत असत. परंतु, आलीकडच्या वीस पंचवीस वर्षांत, पाश्चात्य कल्पनांच्या भिडेनें, ह्या धंद्याची गणना कांहीं लोक कलांत करूं लागले आहेत. म्हणजे नाटक करणें ही एक कला आहे, असें त्यांस वाटतें, आणि ते तिचें वर्णन करून, तिला उत्तेजन देऊं लागले आहेत, आणि नटांस सुवर्णपदकांसारखीं बक्षिसें मिळूं लागलीं आहेत. ह्यावरून ह्या प्रकरणीं असा प्रश्न उत्पन्न झाला आहे कीं, नाट्यकला ही चांगली आहे कीं वाईट आहे ? ह्याचा विचार आज येथें करावयाचा आहे. तो आमच्या तरुण वाचकांस फार उपयोगीं पडेल अशी आशा आहे.

आधीं प्रथम एक मुख्य तत्त्व लक्षांत ठेवायास पाहिजे कीं, कोणतीही गोष्ट असो, वस्तु असो, अथवा संस्था असो, जीपासून व्यक्तीचें किंवा समाजाचें चांगलें पुष्कळ होतें आणि वाईट थोडें होतें, ती चांगली, आणि जीपासून वाईट फार होतें, आणि चांगलें थोडें होतें, ती वाईट, असें सर्व लोक समजतात, आणि तदनुरूप ते व्यवहारांत वागत असतात. म्हणजे चांगलीस उत्तेजन देऊन ती मात्र वाढीस लावितात, हें आपण नित्य पाहातों.

ह्या दृष्टीनें नाटकाच्या धंद्याचा विचार केला म्हणजे असें उघड दिसतें कीं हा धंदा वाईट आहे. ह्यास मुख्य कारण असें आहे कीं मनुष्याच्या प्रपंचसुखास स्वतंत्रपणें जे व्यवसाय जन्मभर उपयोगीं पडतात, अशा एकाही व्यवसायाचें संपादन बालपणामध्यें ह्या धंद्यांत होत नाहीं. हें थोडें उदाहरणानें स्पष्ट केलें पाहिजे. असें समजा कीं एक तरुण, सुस्वरूप आणि चलाख असा मुलगा नाटकमंडळींत शिरला आहे, तो शकुंतलेची किंवा शारदेची भूमिका रंगभूमीवर उत्तम प्रकारें प्रदर्शित करून रसिक जनांच्या टाळ्यांचे गजरांचेगजर मिळवीत आहे. तो लहान सुकुमार आणि गोजिरवाणा दिसत आहे, आणि पुरुष असा सहसा ओळखतां येत नाहीं आणि त्याचा कंठ फुटला नाहीं तोंपर्यंत त्याची मजा चालते आणि त्याला बक्षिसें मिळतात. तोच पुढें प्रौढ होऊन त्याला दाढ्यामिशा उगवल्या, तो रांठ दिसूं लागला आणि त्याचा घसा घोगरा झाला म्हणजे त्याला त्याच्या अंगच्या गुणांचा कांहींएक उपयोग नाहींसा होतो. सगळें बालपण आणि तरुणपण स्त्रियांचे हावभाव करण्यांत गेलें असल्यामुळें त्याला पराक्रमी राजाची किंवा शूर सरदाराची भूमिका बिलकुल साधत नाहीं आणि तो रंगभूमीवरच्या दुसऱ्या कोणत्याही भूमिकेस पात्र

नाहीं असा होतो. अशा प्रकारें त्याचें बालपण दुसरी कोणतीही विद्या न शिकतां व्यर्थ गेल्यामुळें त्याला निर्वाहार्थ शेणगोळ्याचे किंवा आचारीपाणक्याचे धंदे पत्करून आपलें अवशिष्ट आयुष्य घालवावें लागतें. ह्याच न्यायानें इतर भूमिकांचें पर्यवसान कमजास्त मानानें होत असतें. ह्याचा इत्यर्थ असा कीं, ह्या नाटकाच्या धंद्यांत मनुष्याचें बालपण दुसरा कोणताही धंदा न शिकतां फुकट जातें आणि मनुष्यास जन्मभर विपत्ति भोगावी लागते. तेव्हां हा धंदा चांगला नव्हे हें उघड झालें.

आणखी त्यांतल्या त्यांत दुसरें असें आहे कीं शकुंतलेच्या किंवा शारदेच्या भूमिकांच्या प्रदर्शनांत वाहवा मिळविण्यास दुष्यंत, श्रीमंत व कोदंड ह्यांसारखे अनेक साह्यकारी असावे लागतात ते मिळविणें फार कठीण असतें. म्हणजे दुसऱ्याचे गुणाच्या साह्याशिवाय कोणत्याही प्रकारच्या नाट्यकलाप्रवीण मनुष्यास स्वगुणाचा उपयोग करितां येत नाहीं. हें पारतंत्र्य सर्व पात्रांस लागू आहे ही एक मोठी अडचण आहे.

शिवाय ह्या धंद्यांत शिरल्यानें, बारा घरच्या बारा मंडळीच्या नित्य सहवासानें मनुष्य सहजच उडाणटप्पू, वाचाळ, बेपर्वा निर्लज्ज आणि व्यसनी असा होतो. तो प्रत्यक्ष त्याच्या कुटुंबाच्या माणसांस नकोसा होतो आणि अर्थातच चारचौघांत त्याची अब्रू नाहींशी होते. याचीं उदाहरणें पावलोपावलीं दृष्टीस पडतात म्हणूनच आपला मुलगा नाटकांत जाणें हें सर्व आईबापांस मोठें लांछन वाटतें. त्याविषयींचें ह्याहूनही विशेष विशद उदाहरण असें आहे कीं नाटकमंडळ्यांच्या व्यवस्थापकांस, पुढाऱ्यांस आणि स्तुतिपाठकांस देखील आपले मुलगे ह्या धंद्यांत घालण्याची इच्छा होत नाहीं.

ह्यास ऐतिहासिक प्रमाणेंही आहेत. इंग्लंडांतले प्रसिद्ध नट सर हेनरी ऐरव्हिंग ह्यांस फेलपूस नाटककारानें मंडळींत

घेतांना स्पष्ट सांगितलें कीं, "बाबारे नाटकाच्या नादीं लागूं नकोस, हा धंदा वाईट आहे !" ह्यापेक्षां ह्या धंद्याच्या नीचत्वाची दुसरी कसोटी काय सांगावी? त्याप्रमाणेंच अण्णासाहेब किर्लोस्करांस नाटक करणें म्हणजे काय हें स्वानुभावानें कळल्यावर ते स्वतः असें म्हणत असत कीं, "मीं हें केशराचें शेत लावून ठेविलें आहे, व त्यांत गाढवें चरत आहेत. त्याला शेतानें काय करावें?" यांत एवढेंच वाईट वाटतें कीं, अण्णासाहेब ज्याला केशराचें शेत म्हणतात तें खरोखर निवडुंगाचें रान होतें, हें अण्णासाहेबांस शेवटपर्यंत कळलें नव्हतें ही फार दुःखाची गोष्ट आहे.

हें जरी सगळें खरें आहे, तरी स्तुतिश्रवणाचा मोह असा विलक्षण आहे कीं असंबद्धत्व अल्प असतें, तें असंबद्धत्वच नव्हे, तर तें वाईट नाहीं आणि चांगलेंही नाहीं असें तरुण माणसांस तरुणपणच्या हौसेच्या भिडेनें वाटतें आणि तेवढ्यावरून, थोडी डोळेझांक करून, ते त्यास प्रवृत्त होतात. इ० स० १८७१ त पुण्यास डेक्कनकालेजांतल्या विद्यार्थ्यांनीं संस्कृतांत वेणीसंहार नाटकाचा प्रयोग केला त्यांत, कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांनीं धर्मराजाची भूमिका घेतली, आणि प्रत्यक्ष आपल्या वडिलांसमोर पितृतर्पण केलें. हें तर्पण चाललें असतां प्रेक्षक मंडळींत मोठा हशा पिकला. त्यांच्याप्रमाणेंच कै. सखाराम बापूसाहेब किर्लोस्कर, रा. रा. कोंडोपंत दादासाहेब छत्रे आणि कै. आबासाहेब काथवटे, इत्यादि मंडळींनीं दुसऱ्या एका प्रयोगांत वेगळ्या वेगळ्या भूमिका घेऊन त्यांनीं मंडळीकडून टाळ्यांचे गजर मिळविले, हें कांहीं खोटें नव्हे. पण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं ह्या विद्वान् मंडळीनें प्रौढ झाल्यावर रंगभूमीवर स्वतः कधींही काम केलें नाहीं, कीं आपल्यांतल्या कोणा एकाही मुलास नाटकांत घातलें नाहीं. म्हणजे जी वस्तु

सगळी वाईट आहे, तिचा अत्यल्पांश तरी चांगला निघावा कसा ? कौंडळ म्हणजे सगळें कडू त्यांतला कितीही अत्यल्प भाग काढिला, तरी तो गोड लागेल काय ? अगदीं थोडा कडू लागेल, पण त्याला गोड म्हणतां येणार नाहीं. ह्याच न्यायानें ह्या विषयाचा विचार करावा. अशी भूमिका घेण्यांत परपीडा नाहीं, तेव्हां तें पाप नाहीं, हें खरें आहे. परंतु वडिलांचा आणि श्रेष्ठांचा उपमर्द होतो हें कोणी नाकबूल करील काय ? आणि हा उपमर्द हें लहान कां होईना पण पाप आहे ना ? त्यांत बळें कां पडावें ?

आणखी एक विशेष गोष्ट तरुण माणसांनीं नेहमीं लक्षांत ठेवण्यासारखी ही आहे कीं, नाटकमंडळ्यांतलीं मुलें भरजरी टोप्या, जरीकांठी रुमाल, तऱ्हेतऱ्हेचीं जाकिटें वगैरे घालून आणि विड्यांनीं तोंडें रंगवून किंवा तोंडांतून विडीचा धूर काढीत रस्त्यांतून राजपुत्रांसारखीं स्वैर हिंडत असतात आणि त्यांजकडे कांहीं लोक कौतुकानें व आश्चर्यानें पहात असतात हें पाहून कांहीं मुलांस असें वाटतें कीं ह्यांसारखे सुखी प्राणी दुनियेंत कोणी नाहींत. परंतु तो त्यांचा अगदीं भ्रम असतो. तीं मुलें सुखी दिसतात परंतु तीं खरोखर सुखी नसतात. ह्याचा अनुभव त्यांतल्याच मंडळीस एकांतीं विचारिला पाहिजे. त्यांच्या स्वरूपाचें पृथक्करण एकाची टोपी, दुसऱ्याचें जाकीट, तिसऱ्याचें उपरणें, चौथ्याचा बूट असें आळीपाळीनें चाललेलें असतें.

ह्या धंद्याच्या नादीं लागून कित्येक तरुण होतकरू बुद्धिवान् मुलगे आपले आईबापांस सोडून गेले आहेत, कित्येक पुरुष आपल्या बायकांस टाकून गेले आहेत. अशा प्रकारें कित्येक कुटुंबांचे विघड झाले आहेत. खरें कल्याण असें कोणाचेंही झालें नाहीं. ह्याचें मूळ बीज असें आहे कीं हा धंदा व्यक्तीच्या किंवा समाजाच्या हितास मुळींच अवश्यक नाहीं

म्हणून तो चांगला चालत नसून कंपन्या मोडणें आणि जुळणें ह्याचा कांहीं नेम राहिला नाहीं. तेणेंकरून जीं लहानमोठीं माणसें दुसऱ्या व्यवसायांत पडून, स्वबुद्धिबलानें आणि स्वचातुर्यानें चांगलीं उदयास आलीं असतीं आणि राष्ट्रास भूषणावह झालीं असतीं तीं ह्या धंद्याच्या भ्रामक स्वरूपाच्या मोहानें फुकट गेलीं आहेत. आणि तितकें आपल्या राष्ट्राचें कल्याण कमी पडलें आहे. हें लक्षांत ठेवा.

इतकें सांगितलें तरी हें खरें आहे कीं, नाटकांच्या प्रसारानें खेड्यापाड्यापासून तों शहरापर्यंत सर्व तरुण मुलांमुलींस एक प्रकारचें गाण्याचें वळण लागलें आहे. तुम्ही कोठेंही जा, लहान मुलांच्या कंठांतून नाटकांतल्या पदांचा ध्वनि थोडाबहुत तरी ऐकूं येतो. तो कानाला गोड लागतो. त्याप्रमाणेंच ह्या नाटकप्रचारानें आमच्यांतले कांहीं कांहीं नामांकित विद्वान् पुरुष व कांहीं स्त्रियाही ऐतहासिक किंवा स्वकपोलकल्पित नवीं नाटकें लिहूं लागल्या आहेत, तेणेंकरून लोकांच्या इतिहास–ज्ञानास बरीच चांगली भर पडूं लागली आहे, आणि त्या नाटकांच्या वाचनाच्या नादानें लोकांची वाचनाभिरुचि वाढत चालली आहे. हें एक ह्या विषयास लहानसें चांगलें अंग आहे हें नाकबूल करतां कामास नये. तथापि एवढ्यानें ह्या विषयाचें वाईटपण तिळभरही कमी होत नाहीं. **नाटक** ह्या शब्दाचा विग्रह, गांवढळ रीतीनें, कोणी कोणी **न+अटक** असा करून ह्या धंद्यांतल्या माणसांस धर्माची, नीतीची, शिष्टाचाराची आणि संभावितपणाची कोणतीच अटक नसते अशी कोटी करितात. ती कशीही असो पण ती कांहीं अगदींच खोटी नाहीं.

आतां, हीं नाटकें मुख्यत्वें लोकांच्या करमणुकीस आणि अंशतः चतुरस्रपणा वृद्धि पावण्यास साधनीभूत होतात हें कांहीं आम्ही नाकबूल करीत नाहीं. म्हणून ह्या विषयांचें तात्पर्य

येवढेंच घ्यावयाचें कीं तरुण माणसांनीं क्वचित् प्रसंगीं **नाटकाला** पाहिजेतर जावें, परंतु, **नाटकांत** कधीं जाऊं नये.

---

## शास्त्रीयज्ञानाभिवृद्धि.

**नोटा धुण्याचें यंत्रः**—चलनी नोटा आतां सर्वत्र प्रचारांत आलेल्या असून त्या माहीत नाहींत असें एकही मनुष्य सांपडावयाचें नाहीं. ह्या नोटा सरकारी तिजोरींतून बाहेर देतात तेव्हां त्या अगदीं स्वच्छ कोऱ्या असतात, परंतु त्या बरेच दिवस लोकांमध्यें चालल्या म्हणजे निरनिराळ्या माणसांच्या हाताचा मळ लागून अगदीं मळकट होतात. अर्वाचीन रोगजंतुशास्त्राप्रमाणें अशा मळकट नोटांनीं निरनिराळे रोग पसरण्याचा संभव असतो. म्हणून कितीएक सुधारलेल्या देशांमध्यें अशी व्यवस्था केलेली असते कीं, अशा नोटा लोकांमध्यें फिरत फिरत सरकारांत आल्या म्हणजे त्या परत लोकांच्या हातीं देण्यापूर्वीं धुवून चांगल्या स्वच्छ कराव्या. कांहीं सरकारी तिजोऱ्यांतून अशी वहिवाट असते कीं अशा नोटा आल्या कीं त्यांचा नाश करून त्यांच्या ऐवजीं कोऱ्या नोटा द्याव्या. युनैटेड स्टेट्समध्यें ह्या नोटा धुवून देण्याची व्यवस्था केलेली आहे, आणि त्या कामासाठीं एक निराळें यंत्रच ठेविलें आहे. ह्या यंत्राला जाड सुती कापडाचे दोन फिरते पट्टे असतात, आणि त्या पट्ट्यांच्यामध्यें धुवावयाच्या नोटा घातल्या म्हणजे, त्या पट्ट्यांबरोबर त्या नोटा धुण्याच्या पाण्यामधून जाऊन बाहेर येतात. ह्या पट्ट्यांची व्यवस्था अशी असते कीं, त्यांच्या योगानें त्या नोटा अगदीं हळू घांसल्या जाऊन त्यांनीं शोषून घेतलेलें पाणी हळू बाहेर निचरावें. ह्याप्रमाणें त्या नोटा साफ धुतल्या गेल्यानंतर दुसऱ्या पट्ट्यांवर चढतात आणि तापवलेल्या रुळांभोंवतीं फिरतात. म्हणजे त्या सुकतात आणि

इस्तरी केल्याप्रमाणें होऊन बाहेर पडतात. हें यंत्र चालविण्यास दोन मुली पुरतात. त्या यंत्राच्या दोन्ही टोंकांकडे बसून एका तासांत चार हजार नोटा धुवून काढितात. एक हजार नोटा धुण्यास एक पौंड साबण लागतो, आणि यंत्र चालविण्यास एका घोड्याच्या शक्तीचें इंजिन पुरे होतें.

**एक प्रचंड आगबोटः**—हल्लीं सर्व सुधारलेल्या देशांमध्यें आपसांत व्यापारी चढाओढ मोठ्या नेटानें सुरू आहे. त्यांत आगबोटी बांधण्याच्या कामीं चढाओढ मुख्यत्वेंकरून इंग्लंड आणि जर्मनी ह्या दोन देशांमध्यें चालू आहे. ह्यांपैकीं एका देशानें एक मोठी आगबोट तयार करून समुद्रांत लोटली कीं दुसऱ्या देशांत तिच्यापेक्षां मोठी आगबोट बांधण्याची तयारी होते. ह्याप्रमाणें चढाओढ होतांहोतां, पूर्वीं आगबोटी पांचसहाशें फूट लांबीच्या असत त्या आतां वाढत वाढत जाऊन सुमारें हजार फूट लांबीपर्यंत पोंचलेल्या आहेत. हॅमबर्ग—अमेरिकन ह्या जर्मन लैनीची 'वॅाटरलँड' नांवाची आगबोट नुकतीच समुद्रांत लोटली तिची लांबी ९५० फूट असून, तिच्या मधल्या भागाची रुंदी शंभर फूट आहे. आगबोटींस मुख्य भीति टकरीनें बूड फुटून आंत पाणी भरण्याची, ती टाळण्यासाठीं ह्या आगबोटीचें बूड पाण्याच्या रेषेच्या पुष्कळ वरपर्यंत दुहेरी केलेलें आहे. ह्या दोन बुडांच्या दरम्यान थोडेंसें अंतर राखलेलें असून तीं अतिशयित जड अशा भक्कम पोलादी पत्र्यांचीं बांधिलीं आहेत. हीं बुडें बांधण्याच्या कामीं दरेक खिळा पक्का शेर वजनाचा असे पंधरा लाखांहून जास्त खिळे वापरले आहेत! एवढे मोठाले खिळे हातांनीं मारणें अशक्य असल्या-कारणानें ते पाण्याच्या जोरानें चालणाऱ्या यंत्रांनीं बसवावे लागतात. ही प्रचंड आगबोट ८५००० घोड्यांच्या शक्तीच्या चार बाष्पचक्र्यांनीं तासास सुमारें पंचवीस मैल वेगानें चाला-

वयाची आहे. तिच्या डोलकाठ्यांवर अगदीं उंच जागीं ८०००० मेणबत्त्यांच्या प्रकाशाचे मोठाले विजेचे फाणस लावलेले आहेत त्यांच्या योगानें ती समुद्रांत तीस मैलांच्या अंतरावरून दिसेल. प्रसंगीं उपयोगी पडणाऱ्या अशा ८५ बोटी तिजवर असून त्यांत आगबोटीवरच्या सर्व माणसांचा समावेश होईल. शिवाय ह्या सर्व बोटींस ओढून नेण्यासारख्या दोन मोटार बोटी आहेत आणि त्यांवर २०० मैलांच्या अंतरावर संदेश पोंचविणारीं बिनतारांच्या टेलिग्राफचीं यंत्रें बसविलेलीं आहेत. अशासाठीं कीं, संकटप्रसंगीं, तितक्या अंतरावर कोणत्याही दिशेला असलेल्या आगबोटीला बोलावून आणतां यावें. टकरींच्या वेळीं आंत पाणी शिरूं नये म्हणून ह्या आगबोटीचें बूड दुहेरी केलें असल्याबद्दल वर सांगितलेंच आहे. त्याशिवाय, आगबोटीच्या आंतल्या भागांत निरनिराळे पडदे अशा रीतीनें बसविले आहेत कीं, अपघात होऊन एकाद्या भागांत पाणी शिरलेंच तर थोडीशी कळ दाबल्याबरोबर ते पडदे एकदम बंद होऊन तें पाणी आगबोटीच्या दुसऱ्या भागांत मुळींच शिरत नाहीं. उतारूंच्या राहण्याच्या, निजण्याच्या व जेवणाच्या खोल्या व दिवाणखाने एकाद्या राजवाड्याप्रमाणें सुशोभित केलेले असून, त्यांस सुखाच्या कोणत्याही बाबतींत कमीपणा वाटूं नये अशी खबरदारी घेतलेली आहे. ऊन व थंड पाण्याच्या स्नानाच्या खोल्या दोनशेंच्यावर आहेत. आणि पोहोणारांकरितां पोहण्याचीं मोठालीं टांकीं पाण्यानें भरून ठेविलेलीं आहेत. व्यायामाकरितां तालीमखाना आहे, आणि क्रिकेटसारखे खेळ खेळण्यासाठीं ऐसपैस जागा केलेल्या आहेत. धुरांडीं चाळीस फूट रुंद आणि सत्तर फूट उंच आहेत. सुकाणूं ९० टन वजनाचें असून तें ज्या उभ्या खांबावर फिरतें ठेवलें आहे त्याचें वजन ११० टन आहे. सुकाणूं

इतकें जड आहे तरी तें अशा समतोल रीतीनें लावलेलें आहे कीं, तीनशें फुटांहून जास्त अंतरावर तें फिरविण्याचें चक्र ठेविलें आहे त्याला हलच हात लावून हव्या त्या दिशेनें तें एकदम फिरवितां येतें! ह्या वर्णनावरून अशा प्रचंड आगबोटी बांधण्याचें काम युरोपखंडांत किती पक्कदशेस गेलें आहे, आणि त्यांची बरोबरी करण्यास आपणांस अद्याप किती शिकावयाचें आहे ह्याची कल्पना होईल.

**कांहीं जुन्या खाण्याच्या पदार्थांबद्दल नवीन शोध.** कांहीं जुन्या खाण्याच्या पदार्थांबद्दल अर्वाचीन शास्त्राप्रमाणें जे शोध लागत आहेत त्यांवरून असें दिसतें कीं, आपल्या पूर्वजांच्या हातीं जरी सूक्ष्म रीतीचे प्रयोग करण्याचीं बिकट यंत्रें नव्हतीं, तरी अनुभव हा त्यांचा मोठा सहायकर्ता होता आणि त्याच्या मदतीनें त्यांनीं आरोग्यास पोषक असे कितीएक पदार्थ सेवन करण्याची चाल पाडली आहे. उदाहरणार्थ, लिंबूं हें भातावर पिळण्याची चाल दक्षिणेंत सर्वत्र चालू आहे. ह्याच्या रसासंबंधानें असा शोध लागला आहे कीं, त्याच्या एका घटकावयवाच्या योगानें, कार्बालिक आसिडासारखी रोगबीजांचा नाश होण्यास मदत होते आणि म्हणून तो सेवन करणें आरोग्यरक्षणास फार चांगलें आहे. अशीच कांहीं गोष्ट ताकाची आहे. ताक खाणें म्हणजे गरिबीचें लक्षण, असें मानण्याची चाल आहे, परंतु ह्या ताकाच्या अंगीं कांहीं विशेष प्रकारचे औषधी गुण आहेत असें पुष्कळ पाश्चिमात्य धन्वंतरी म्हणूं लागले आहेत, आणि कांहीं रोगांच्या बाबतींत विशेष रीतीनें तयार केलेल्या ताकाचा उपयोग करण्याचा प्रघात वाढत चालला आहे. ह्या उदाहरणांवरून, अनुभवजन्य ज्ञान कधीं कधीं किती महत्त्वाचें असतें, आणि त्याचा उगीच तिरस्कार करणें किती वेडेपणाचें होय हें लक्षांत येईल.

**साखरेचा एक नवा उपयोग.**—एका फ्रेंच सर्जननें साखरेचा एक नवा उपयोग शोधून काढिला आहे. जखमा बऱ्या करण्याच्या कामीं त्या पदार्थाचा चांगला उपयोग होतो असें त्यानें सिद्ध करून दाखविलें आहे. स्वच्छ साखरपाणी तयार करून त्यानें जखम चांगली धुवून काढावी आणि लिंट कापडाचा तुकडा त्या पाण्यांत भिजवून त्या जखमेवर लावावा आणि त्यावर तेल्या रेशमी कापडाचा तुकडा ठेवून तें सगळें बांधून टाकावें. असें केल्यानें तें रेशमी कापड जखमेस चिकटत नाहीं आणि त्रास न पडतां ती वरचेवर धुतां येते. साखरपाण्याची पट्टी न ठेवतां बारीक केलेली साखर धुतलेल्या जखमेवर पसरून ती जखम बांधून टाकली तरी चांगला गुण येतो. नव्या जखमा बऱ्या होण्यास साखरेचा फारच उपयोग होतो. जुनीं क्षतें साखरेनें इतक्या लवकर बरीं होत नाहींत, तरी तीं हळू हळू भरून येण्यास तिचा पुष्कळ उपयोग होतो.

**प्रो० बोस ह्यांचे नवे शोध.**—नवीन शास्त्रीय शोध लावण्याची बुद्धि फक्त पाश्चिमात्यांस दिलेली आहे, पौर्वात्यांमध्यें ती बुद्धि पूर्वीं असली तरी आतां ती लुप्तप्राय झालेली आहे, असें म्हणण्याची चाल कांहीं लोकांत पडलेली आहे. पौर्वात्य लोकांवरच्या ह्या आक्षेपास जबाब, प्रो० बोस ह्यांनीं वनस्पतींतल्या ज्ञानतंतूंसंबंधानें जे शोध अलीकडे लाविले आहेत त्यांवरून चांगलाच मिळाला आहे. लाजाळूचें झाड बहुतेकांनीं पाहिलेंच असेल, त्याला थोडासा स्पर्श झाला कीं त्याचीं पानें तात्काळ मिटतात. हें झाड आणि त्यासारखा इतर वनस्पति ह्यांवर प्रो० बोस ह्यांनीं अनेक प्रयोग करून असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, प्राण्यांच्या शरीरांत ज्ञानतंतूंचें जाळें असतें तसें वनस्पतींतही असतें, आणि प्राण्यांच्या ज्ञानतंतूंवर अंतर्गत आणि बाह्य कारणांनीं जसे बरेवाईट परिणाम

होतात तसे वनस्पतींवरही होतात; म्हणजे प्राणिकोटि आणि वनस्पतिकोटि एकमेकांपासून फार भिन्न नसून त्यांत महत्त्वाच्या बाबतींमध्यें सारखेपणा आहे. प्रो० बोस ह्यांच्या ह्या शोधानें पाश्चिमात्य शास्त्रज्ञांमध्यें प्रचलित असलेल्या कितीएक कल्पनांमध्यें मोठी क्रांति होईल असें म्हणतात.

---

## आनी बिझांटबाई.[1]

आनी बिझांटबाई व मि. लेटबिटर यांनीं नुकतेंच एक पुस्तक प्रसिद्ध केलें असून त्यांत आपल्या ६ । ७ हजार वर्षांपूर्वींपर्यंतच्या जन्मांचा इतिहास दिला आहे, आणि तेव्हां आपण कोण कोण होतों व आपले संबंध काय होते ह्याची हकीकत पुष्कळ दिली आहे, असें म्हणतात. ती वाचून असें आश्चर्य वाटतें कीं, इतक्या प्राचीन काळची हकीकत ह्यांस आतां आठवली तरी कशी? हें कृत्य अमानुष वाटून त्यावर विश्वास बसत नाहीं, कांकीं त्यास कांहीं प्रमाणें नाहींत.

पूर्वोक्त पुस्तक आम्हांस पहावयास मिळालें नाहीं. परंतु त्यांतलें जें कथन सदरीं केलें आहे तें वाचून आम्हांस फार आश्चर्य वाटतें आणि पराकाष्ठेचें दुःख होतें. आश्चर्याचें कारण असें कीं, सहा हजार वर्षांपूर्वींची गोष्ट ह्या बाई इतक्या खातरीनें सांगतात कशा हें कांहीं कळत नाहीं. त्या आपणास इतर माणसांप्रमाणेंच एक माणूस समजतात, आपणास त्या देवाचा अवतार म्हणवीत नाहींत असें जर आहे तर त्यांस सहा हजार वर्षांपूर्वींची गोष्ट आज आठवावी कशी असें वाटतें. तेव्हां ह्यांत भ्रमाचा प्रादुर्भाव आहे असें म्हटल्याशिवाय दुसरा मार्ग नाहीं. आणि दुःख वाटतें याचें कारण असें आहे कीं, एवढी मोठी

---

१ या बाईचें चरित्र इ० स० १९०५ च्या मे महिन्याच्या बालबोधांत दिलें आहे.

ज्ञाती, बुद्धिवान, सुशिक्षित, अत्यंत उद्योगी आणि परहितार्थ देह झिजविणारी अशी स्त्री, आमच्या हिंदुस्थानांतील तरुण विद्यार्थ्यांस ज्ञानदान करण्यास लाखों रुपये खर्चून वाहालेली आहे, तिला असा भ्रम होऊन त्या विद्यादानक्रमांत व्यत्यय येण्याची मोठी भीति आहे. हें हिंदुस्थानाचें मोठें दुर्भाग्य होय. सध्याचें युग हें भावयुग नाहीं, प्रमाणयुग आहे,—म्हणजे कोणाच्याही शब्दावर भरंवसा ठेवून सहाहजार वर्षांपूर्वींची कोणतीही गोष्ट खरी मानण्याचा हा काल नव्हे आहे. तर तीनचोकबारा असें प्रत्यक्ष प्रमाण दाखवावें तेव्हांच लोकांचा विश्वास त्यावर बसणार आहे, एरव्हीं बसावयाचा नाहीं ही गोष्ट या बाईच्या ६६ वर्षांच्या उमरींत कशी लक्षांत आली नाहीं याचें उत्तर पुनरपि भ्रमाचाच आश्रय केल्यावांचून देतां यावयाचें नाहीं. तरी पुनः असा प्रश्न उत्पन्न होतो कीं एवढ्या मोठ्या ज्ञानसंपन्न अंतःकरणांत भ्रमाचा प्रवेश कसा झाला असावा? काय खरा प्रकार असेल तो असो. देव जाणे.

सर्वांस माहीत आहेच कीं, अगदीं आलीकडच्या देखील आमच्यांतल्या साधूसंतांनीं रेड्याकडून वेद बोलविणें आणि मातीची भिंत चालविणें अशा प्रकारचे साक्षात्कार दाखवून आपलें अद्वितीयत्व लोकांच्या प्रत्ययास आणून दिलें. त्याप्रमाणेंच येशू ख्रिस्तानें केवळ हस्तस्पर्शानें आंधळ्यांना डोळस केलें तेव्हां त्याचें देवत्व जनास पटलें, हेंही आनी बिझांटबाईस माहीत असलेंच पाहिजे. त्याप्रमाणें त्या जर कांहीं आपल्या शक्तीच्या अद्वितीयत्वाचे साक्षात्कार लोकांच्या अनुभवास आणून दाखवितील तर सहाहजार वर्षांपूर्वींचेंच काय, साठ हजार वर्षांपूर्वींचेंही त्यांचें कथन लोक गुपचूपपणें कबूल करितील. त्या कामीं त्यांस आग्रह करण्याचे श्रम पडणार नाहींत.

# लोक काय बोलतात.

श्री. सयाजीरावमहाराज गायकवाड हल्लीं इंग्लंडांत आहेत, त्यांची प्रकृति बरी आहे.

---

मुंबई पोर्टट्रस्टचें एकंदर उत्पन्न गेल्या सालीं ८८८८००० रुपये झालें आणि खर्च वजा जातां सुमारें साडे अकरा लाख रुपये शिलक राहिले.

---

सिंधप्रांताचा कांहीं भाग खेरीज करून मुंबई इलाखाभर पाऊस चांगला पडत आहे. हिंदुस्थानच्या इतर भागांतही पावसाची फारशी हाकाहाक नाहीं.

---

नामदार गोखले ह्यांची प्रकृति आतां बरी असून ते पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्यें काम करूं लागले आहेत. येत्या सप्टेंबर महिन्यांत ते हिंदुस्थानांत परत येणार आहेत.

---

हिंदुस्थानाप्रमाणें पाश्चिमात्य देशांतही कोकैन सेवन करण्याची संवय लोकांमध्यें पसरत चालली आहे आणि तत्संबंधानें पोलिसास पुष्कळ बंदोबस्त करावा लागत आहे.

---

बडोदें संस्थानांत उपाध्याचें काम चालविणाऱ्या भिक्षुकांबद्दल कायदा होत आहे. परीक्षा दिल्याशिवाय कोणीं पुरोहिताचें काम चालवूं नये अशासारखा ठराव होणार आहे असें दिसतें.

---

पुण्याच्या सेशनांत ५७ भामट्यांवर एक खटला चालला आहे. त्यांत ३५० साक्षीदार आहेत. सरकारी वकिलाच्या बोलण्यावरून असें दिसतें कीं, भामट्यांची जात ही एक संघटित संस्था आहे.

---

सन १९१२ सालीं बाल्कन्‌मध्यें भयंकर रणकंदन माजून पुढें त्याचा प्रसार सगळ्या युरोपभर होईल असें एक भविष्यकथन कौंट टाल्सटाय ह्यांनीं आपल्या मृत्यूपूर्वीं कितीएक वर्षें करून ठेविलें होतें.

---

चीनदेशांत प्रजासत्ताक राज्य स्थापित झालें आहे खरें, परंतु उत्तरेकडच्या प्रांतांत राजसत्ताक राज्यपद्धतीस अनुकूल असलेल्या लोकांनीं प्रजासत्ताक राज्याविरुद्ध बंडाळी माजविली आहे. पुढें काय होतें तें पहावें.

---

खानबाहादुर सय्यद समसुद्दीन कादरी, आय्. एस. ओ., मुंबईसरकारचे ओरिएंटल ट्रान्सलेटर, ह्यांस सरकारानें पश्चिम खानदेशचे कलेक्टर नेमिलें आहे. हे ह्या इलाख्यांत पहिलेच मुसलमान कलेक्टर होत म्हणून मुसलमान लोकांस विशेष संतोष झाला आहे.

---

आळशी नवऱ्यांस काम करून बायकांचें पोट भरण्यास भाग पाडण्यासाठीं युनैटेडस्टेट्समध्यें एका प्रांतांत एक नवा कायदा झाला आहे. त्याप्रमाणें अशा नवऱ्यांस कामावर जाणें भाग पडतें आणि त्यांच्या कामाचे पैसे त्यांस न मिळतां त्यांच्या बायकांस मिळतात.

---

अगदीं पहिली संगीत सुप्रसिद्ध किर्लोस्करमंडळी फुटून तिजमधील मुख्य मुख्य नट एक नवी गंधर्व नांवाची संगीत नाटकमंडळी स्थापण्याच्या उद्योगास लागले आहेत. ही फुटाफूट पाहून फार वाईट वाटतें, पण ती कोणत्याही नाटकमंडळीस टाळतां यावयाची नाहीं.

---

गेल्या महिन्याच्या २६ व्या तारखेस पुणें येथील डेक्कन कॉलेजांत, डॉ. सेल्बी, त्या कालेजाचे माजी विद्वान् प्रिन्सिपाल, ह्यांच्या मोठ्या तसबिरीचा अनावरण करण्याचा समारंभ नामदार गव्हर्नर साहेब यांचे हस्तें झाला. तेव्हां नामदार साहेबांनीं विद्यार्थ्यांस फार चांगला बोध केला.

---

कच्छ मांडवी येथें जून २३ रोजीं हिंदूच्या एका देवळावरून मुसलमान लोकांची मिरवणूक जात असतां त्यांवर हिंदू लोकांनीं धोंडमार केल्यामुळें बरींच माणसें दुखावलीं आहेत असें समजतें. त्या देवळावरून मुसलमान लोकांस मिरवणूक नेण्याचा हक्क नाहीं असें हिंदू लोकांचें म्हणणें आहे अशी बातमी आहे.

---

नामदार चौबळ ह्यांनीं पब्लिक सर्व्हिस कमिशनबरोबर हिंदुस्थान सोडल्यावरून सरकारी नियमांप्रमाणें त्यांची एक्झिक्यूटिव कौन्सिलरची जागा गेली आहे. तरी ते कमिशनमध्यें आहेत तोंपर्यंत त्यांस कौन्सिलरचा पगार मिळत जाईल. कमिशनचें काम संपल्यानंतर कौन्सिलरच्या जागीं त्यांची नेमणूक पुनः होणार आहे.

---

गेल्या पंधराव्या तारखेस नामदार लार्ड विलिंगडन व लेडी विलिंगडन तळेगांवचा पैसाफंडाचा कांचेचा कारखाना पहायास गेलीं होतीं. पुण्याचे कलेक्टर मि. मौंटफोर्ड हे त्यावेळीं हजर होते. तेथल्या विद्यार्थ्यांनीं नामदार साहेबांस कांचेचे नवीन सुंदर जिन्नस तयार करून दाखविले. एकंदर व्यवस्था पाहून नामदार साहेबांस संतोष झाला.

---

आनि बिझांटबाई मुलांच्या खटल्यांत गुंतल्यामुळें हिंदुविश्वविद्यालयाचें काम मंदावलें आहे. आणि आपल्या पैशानें आपण विश्वविद्यालय स्थापिलें, तरी शेवटीं त्याचे सगळे अधिकार सरकारच्या हातांत जाणार आहेत, असें कांहीं मुसलमान लोकांस वाटून त्यांचे उद्गार असे निघूं लागले आहेत कीं, असें विश्वविद्यालयच मुळीं आपणांस नको. त्यामुळें त्यांचेही उद्योग ढिलावत आहेत, असें लोक म्हणतात. आतां पुढें काय होतें पाहावें.

---

कलकत्ता विश्वविद्यालयानें कायद्याप्रमाणें आपल्या अधिकारांत तीन लेक्चरर नेमिले होते त्यांची नेमणूक मंजूर करून, ती बंगालच्या सरकारानें, औपचारिक मंजुरीकरितां, हिंदुस्थानसरकाराकडे पाठविली. ती त्यांनीं नामंजूर केली आहे; ह्यास कारण त्यांनीं असें लाविलें आहे कीं ते लेक्चरर राजकारणांत पडतात. ह्यावरून बंगाल्यांत फार चर्चा चालली आहे. लोकमत युनिव्हर्सिटीकडे आहे. आतां पुढें काय होतें तें पाहावें.

---

बाल्कनप्रकरण तह होऊन मंदावल्यासारखें झालें होतें. परंतु काबीज केलेल्या देशासंबंधानें बल्गेरिया, आणि सर्व्हिया व ग्रीस ह्यांच्या-

मध्यें आपसांत लढाया चालू झाल्या आहेत आणि त्यांत रुमेनियाही पडून त्यानें बल्गेरियावर चाल केली आहे. ह्यांत बल्गेरियाचा अगदीं पराभव होऊन तो झारमहाराजांस शरण आला आहे. ही संधि साधून टर्कीनें आड्रिओनोपल परत घेतलें आहे. परंतु तें त्यांकडे राहतें कीं नाहीं तें पाहाणें आहे. युरोपांतील बलाढ्य राष्ट्रांचे वकील एके ठिकाणीं जमून पुढें काय करावें, टर्कीला आड्रिआनोपल सोडण्यास कोणत्या रीतीनें सांगावें ह्याचा विचार करीत आहेत. इकडे पाहावें तों तें शहर परत घेतल्याबद्दल सर्व मुसलमान लोकांस अत्यानंद होऊन ठिकठिकाणीं आनंदप्रदर्शनार्थ त्यांच्या सभा होत आहेत आणि तें शहर तुर्कसरकाराकडेच राहावें म्हणून इंग्लिशसरकारानें कांहींतरी तजवीज करावी अशी ते त्या सरकारास आग्रहपूर्वक विनंति करीत आहेत. ती मान्य होवो.

---

विलायतेंतील मताभिलाषी स्त्रियांची गडबड अद्याप मोडली नाहीं. त्यांनीं जाळपोळ चालविलीच आहे. त्यांस शिक्षा देऊन तुरुंगांत घातलें म्हणजे त्या उपास काढितात, कांहींकेल्या अन्नास स्पर्शही करीत नाहींत. आणि अशा उपासतापासांनीं त्यांची प्रकृति अशक्त झाली म्हणजे त्यांस सोडून द्यावें लागतें! आणि ह्याप्रमाणें तुरुंगांतून बाहेर पडल्यावर त्यांची जाळपोळ पुनः सुरू होते. ह्याचा कसा बंदोबस्त करावा ह्याचें सरकारास कोडें पडल्यासारखें दिसतें. मताभिलाषी स्त्रियांचे पक्षपाती कांहीं पुरुषही आहेत त्यांनींही ठिकठिकाणीं गोंधळ मांडला आहे. त्यांनीं गेल्या १२ व्या तारखेस पार्लमेंट भरलेलें असतांना गलेरींत एक बंदुकीचा वायबार काढून खालीं बसलेल्या मंडळीवर शेंकडों चित्रांचीं चिटोरीं आणि मुलांचीं खेळणीं फेंकलीं. त्याच्या आधीं मुख्य प्रधान मि. आस्क्विथ ह्यांच्या अंगावर एक कणकेनें भरलेली पिशवी फेंकिली होती! मताभिलाषी स्त्रियांचा हा धिंगाणा आवडत नाहीं अशाही स्त्रिया तिकडे पुष्कळ आहेत. त्यांची एक फार मोठी सभा नुकतीच लंडनमध्यें भरून त्यांनीं ह्या धिंगाण्याचा सार्वजनिक रीतीनें निषेध केला आहे.

# बालबोध.

## जॉन पीयरपॉंट मॉर्गन.



व्यापार ही एक संपत्तीची मोठी खाण आहे. तींतलें द्रव्य अनादिकालापासून लाखों लोक काढीत राहिले आहेत तरी,

ती खाण जशाचीतशी धनत्तर राहिली आहे, एवढेंच केवळ नव्हे, तर माणसांची विद्याचारसंपन्नता जसजशी वाढत चालली आहे, आणि राष्ट्रांतला सुरक्षितपणा वृद्धि पावत चालला आहे, तसतसें त्या खाणीचें क्षेत्र मोठमोठें होत चाललें आहे, आणि त्या मानानें व्यापारी अधिकाधिक धनाढ्य होत चालले आहेत. त्याचें प्रमाण आतां कोठपर्यंत पोंचलें आहे ह्याचा अजमास आमच्या तरुण वाचकांस खरा देखील वाटणार नाहीं. मुंबई शहरांत कांहीं धनाढ्य व्यापारी एका एका बैठकीस चारचार पांचपांच लाख रुपये धर्मकृत्यांस वर्गणी घालतात, हें पुष्कळांस ठाऊक आहे. जगांतल्या मोठमोठ्या राष्ट्रांतल्या व्यापाराच्या सध्याच्या घडामोडी पाहिल्या आणि त्यांतल्या व्यापाऱ्यांच्या संपत्तीचें रूप दृष्टीस पडलें, म्हणजे मन अगदीं थक्क होऊन जातें आणि असा प्रश्न पुष्कळांच्या मनांत उभा राहातो कीं, हें असें होतें तरी कसें? ह्याचा उलगडा एकदम सहसा कोणास करितां येत नाहीं, आणि तें सांगतां येत नाहीं. कां कीं, त्या व्यवहाराचें क्षेत्रच असें कांहीं विलक्षण आहे कीं, त्याचें वर्णन यथातथ्य कोणासही करितां यावयाचें नाहीं. एकादा मारवाडी आपल्या देशांतून नुसता पितळेचा लोटा घेऊन इकडे येतो आणि चणेकुरमुऱ्यांच्या विकरीपासून आरंभ करून, दाहापांच वर्षांत लक्षाधीश बनतो. हें कसें झालें, हें त्याला बरोबर सांगतां यावयाचें नाहीं आणि सांगणें त्यास आवडणारही नाहीं. कांकीं, व्यापारांत प्रामाणिकपणा हा जरी मुख्यगुण आहे, तरी त्यास कांहीं मर्यादा आहे असें समजतात. व्यापारांत पैसा मिळतो तो व्याजबट्ट्यानें किंवा वस्तु पैशाला घेऊन ती दीड पैशाला विकून मिळतो. हें थोड्या शब्दांत सांगतां आलें, आणि सोपें दिसलें, तरी, त्यांत, युक्ति, प्रयुक्ति, धोरण, कालदेशवर्तमान, मनुष्याची पारख, अशा

अनेक अंतर्लापिका आणि बहिर्लापिका इतक्या असतात कीं, त्यांचा अंत कोणासही लागावयाचा नाहीं. आणि त्या ज्या मानानें मनुष्यास साधतात, त्या मानानें तो लबाडी न करितां, धनाढ्य होतो.

आणखी त्यांतही युरोप आणि अमेरिका ह्या खंडांमध्यें आलीकडच्या शेंदोनशें वर्षांत व्यापार मनस्वी वाढून, कारखाने, व्यांका, आगगाड्या, आगबोटी, व्यापारी कंपन्या, त्यांचे शेर, त्यांच्या किमतीचा चढउतार, इत्यादि गडबडी इतक्या वाढल्या आहेत कीं, तें एक मोठें विद्यारण्यच झालें आहे. त्यांत प्रवेश होऊन त्याची माहिती होण्यास, आणि त्या माहितीपासून आपला फायदा करून घेण्यास माणसास एका प्रकारचें उपजत शाहाणपण लागत असतें. तें कोणाला शिकवून येत नाहीं. आणि तें शाहाणपण असलें म्हणजे इतर सगळ्या मंडळीवर आपली छाप ठेवून मनुष्यास पुष्कळ संपत्ति मिळवितां येते. ती पुष्कळ म्हणजे किती? नुसती पुष्कळ, पुष्कळ, पुष्कळ, अगदीं पुष्कळ एवढें ऐकून समाधान व्हावयाचें नाहीं. त्यास कांहीं तरी मोजमाप दाखविलें पाहिजे. तें मोजमाप तरी आटोक्यांतलें पाहिजे. पण, तें मोजमाप देखील आटोक्याबाहेर जातें, अशी संपदा सध्याच्या काळीं तिकडच्या माणसांस मिळवितां येते. ह्याचें एक मोठें उदाहरण आमच्या तरुण वाचकांस ऐकवावें, ह्या हेतूनें, संपत्ति मिळविण्याच्या मार्गांच्या वर्णनाच्या चक्रव्यूहांत न पडतां, येथें, तें मि. मॉर्गन ह्या प्रसिद्ध गृहस्थांच्या चरित्राच्या रूपानें संक्षेपतः दाखविण्याचा प्रयत्न करितों.

ह्या गृहस्थांचें जन्म उत्तर अमेरिकेंतल्या स्वतंत्र संस्थानांत इ० स० १८३७ च्या एप्रिलच्या १७ व्या तारखेस कानिक्टिकट प्रांतांत हार्डफोर्ड येथें झालें. त्यांचें शिक्षण प्रथमतः

बॉस्टन येथें झाल्यावर ते जर्मनींत गेले आणि तेथील गार्टिंजन नामक प्रख्यात विश्वविद्यालयांत श्रेष्ठ प्रतीचा अभ्यास करून चांगले विद्वान झाले.

ह्यांचे तीर्थरूप मोठे संभावित व्यापारी आणि बरेच श्रीमंत होते. त्यांच्या पेढीवर त्यांचे चिरंजीव जर्मनींतून आपला अभ्यास पुरा करून आल्यावर, क्लार्क म्हणून राहिले. तेथें आणि दुसऱ्या एका पेढीवर मिळून सात वर्षें काम केल्यानंतर त्यांनीं पातीनें न्यूयार्कशहरांत एक लहानशी स्वतंत्र पेढी काढिली, आणि पुढें १८७१ सालीं परदेशांशीं व्यवहार करणाऱ्या एका मोठ्या पेढीचे ते भागीदार झाले. ह्या वेळीं त्यांचें वय चौतीस वर्षांचें असून आपल्या कर्तबगारीच्या योगानें, त्यांनीं पेढीवाल्यांच्या मंडळांत चांगलें प्रामुख्य संपादिलें होतें.

ह्यांचें सामर्थ्य जें ह्या वेळेच्या सुमारास दिसून आलें, तें अगदीं अपूर्व प्रकारचें होतें आणि त्याचा लाभ त्यांच्या जन्मभूमीला चांगला मिळाला. गुलामांस स्वातंत्र्य देण्याच्या विषयावरून जुंपलेलीं उत्तरेकडील संस्थानें आणि दक्षिणेकडील संस्थानें ह्यांच्या मधली लढाई नुकतीच संपून देशांत राजकीय, व्यापारविषयक, व इतर प्रकारची सुयंत्रिता स्थापण्याच्या कामाकडे सर्व लोकांचें लक्ष लागलें होतें. त्यांत राजकीय बाबींकडे लक्ष देणारे कर्तबगार पुरुष सरकारांत होते, परंतु व्यापारांतल्या अव्यवस्थेस आळा घालणारा कोणी चांगला नव्हता, आणि त्यामुळें, विशेषतः देशांतील आगगाड्यांच्या कारभारांत, अत्यंत अनवस्था माजून राहिली होती. आगगाड्यांच्या कंपन्या बदमाष लोकांच्या हातीं जाऊन त्यांच्या आपसांतल्या चढाओढीनें आणि इतर लबाडीच्या प्रकारांनीं मूळच्या भागीदारांचें आणि देशाचें अतोनात नुकसान होत होतें. ह्या आणीबाणीच्या वेळीं मि. मॉर्गन पुढें येऊन त्यांनीं एकामागून एक सर्व रेल्वेकंपन्यांचे कारभार हातीं घेऊन त्यांतला

गोंधळ मोडून टाकिला, त्यांना नवीन व्यवस्था लावून दिली आणि त्यांची पत वाढविली. त्यांच्या देखरेखीखालीं त्या रेल्वेंचा विस्तार अतोनात वाढला, आणि त्याबरोबर देशाचा व्यापारही वृद्धि पावला. ह्याशिवाय त्यांनीं युनैटेडस्टेट्समधील इतर धंद्यांसही एक नवीन दिशा लाविली. ती ही कीं, लहानसान कारखाने एकत्र करून त्यांचे त्यांनीं मोठाले कारखाने बनविले, आणि इतर चढाओढ करण्याच्या कारखान्यांस, मालाच्या किमती कमी करून व इतर रीतीनें जमीनदोस्त करून टाकून आपण हातीं घेतलेल्या कारखान्यांची बढती केली. म्हणजे युनैटेडस्टेट्समध्यें मि. मॉर्गन ही व्यक्ति एक प्रचंड शक्ति होऊन बसली, आणि त्या देशाच्या सरकारासही त्यांचा डोईजडपणा भासूं लागला. तो इतका कीं, एकाच माणसाच्या किंवा मंडळीच्या हातांत भांडवलसंबंधाची अनिवार सत्ता जाऊं नये अशाबद्दल त्या सरकारास कायदे करावे लागले !

मि. मॉर्गन ह्यांच्या ह्या उद्योगावरून त्यांस व्यापाराचे नेपोलियन असें नांव पडलें होतें. ज्याप्रमाणें नेपोलियन ह्यानें राज्यक्रांतीनंतरची फ्रान्समधील अव्यवस्था मोडून टाकून त्यांत सुव्यवस्थेची स्थापना केली, आणि नंतर अशा सुव्यवस्थित फ्रान्साच्या साहाय्यानें तो जसा सगळ्या युरोपखंडास डोईजड होऊन बसला, तसेंच कांहीं मि. मॉर्गन ह्यांनीं व्यापारासंबंधानें केलें होतें ही गोष्ट वरील हकीकतीवरून स्पष्ट होईल. म्हणून त्यांस व्यापाराचे नेपोलियन म्हणून जें नांव पडलें होतें तें यथार्थ होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

अर्थशास्त्र आतां बरेंच पक्कदशेस आलें आहे आणि त्याच्या मूळतत्त्वांप्रमाणें म्हटलें म्हणजे सोनें आणि इतर माल ह्यांची गणना संपत्तींत एकसारखीच व्हावी, असें सर्व सूज्ञ लोक समजतात. तरी, सर्वांचा ओढा इतर वस्तूंपेक्षां सोन्याकडे

अधिक असतो, आणि तें आपलया देशांतून, कोणत्याही स्वरूपानें बाहेर जाऊं नये असें सगळ्या माणसांस वाटत असतें. ह्याविषयीं पंतांनीं म्हटलेंच आहे—

भारी लोभ मनुष्या कलिरायाच्या युगांत कनकाचा
न तसा दारसुतांचा बंधूचा जननिचा न जनकाचा.

ह्या पाशांतून अमेरिकेंतलीं संस्थानें सुटलीं नाहींत. इ० स० १८९५ ह्या वर्षीं, जगाच्या व्यापारास असा कांहीं ओघ आला कीं, अमेरिकेंतून पुष्कळ सोनें बाहेरच्या देशांत जाणार असें खचीत वाटलें. तें संकट कसें टाळावें ह्याचा विचार करण्याकरितां स्वतंत्र संस्थानांच्या अध्यक्षांच्या घरीं मोठमोठ्या धनाढ्यांची एक सभा भरली. तीस ह्या गृहस्थांस बोलाविलें होतें. तेथें त्या विषयाची पुष्कळ भवतिनभवति झाली. अनेकांनीं आपापलीं अनेक मतें प्रकट केलीं. त्यांत ह्या गृहस्थांच्या शकलीची छाप इतर सर्वांच्या कल्पनांवर पडून शेवटीं ती सर्वमान्य झाली, आणि तें विघ्न टळलें. तेव्हां लहानमोठ्या सर्व लोकांस मोठा संतोष झाला, आणि त्यांनीं मॉर्गनसाहेबांचे फार उपकार मानिले. हा सोन्याचा आणि सोन्याच्या नाण्याचा व्यवहार असाच फार बिकट आहे. सोन्याचें नाणें हिंदुस्थानांत पाडावें किंवा नाहीं हा विचार आज कितीएक वर्षें मुत्सद्दी करीत आहेत आणि त्यापासून नफा नुकसान काय होईल ह्याचा वाद करीत आहेत तरी त्याविषयीं स्पष्ट निर्णय असा कोणाला कांहीं करतां येत नाहीं. आणि हा व्यवहार राष्ट्रीय असल्याच्या योगानें ह्यांत एकदां पाऊल पुढें टाकलें म्हणजे तें सहसा मागें घेतां येत नाहीं, असें आहे. म्हणून ह्याच्या प्रचाराविषयीं सर्वांसच फार जपून वागावें लागतें.

मि. मॉर्गन ह्यांविषयीं कितीही गोष्टी सांगितल्या, तरी, त्यांचा सगळाच कारभार बिकट आणि अत्यंत विस्तृत असल्या-

कारणानें त्यांचें सारें स्वरूप लक्षांत यावयाचें नाहीं. म्हणून कांहीं वर्षांपूर्वी एका इंग्रजी वर्तमानपत्रानें त्यांच्या संपत्तीच्या संबंधानें जें म्हटलें आहे तेवढेंच येथें उतरून घेतों. तें असें कीं 'रशियाच्या झारमहाराजांची जितकी सत्ता जितक्या लोकांवर आहे, तिजपेक्षां अधिक सत्ता अधिक लोकांवर मि. मॉर्गन ह्यांची असून त्यांचें वजन स्वतंत्र संस्थानांच्या अध्यक्षांच्या वजनापेक्षांही अधिक आहे. आजपर्यंत कधीं कोणाच्या हातीं आली नव्हती, इतकी संपत्ति त्यांच्या ताब्यांत आहे. म्हणजे जगांतील इतर सर्व सोन्याची किंमत केली तरी, तीपेक्षां २०००००००००००० इतक्या डालरांची अधिक संपत्ति त्यांच्या कह्यांत आहे. एवढी मोठी शक्ति ह्यांचे ठायीं असल्याकारणानें मोठमोठ्या देशांचे बादशाहा आणि राजे ह्यांशीं ह्यांचा परिचय आहे. त्याप्रमाणें त्यांचा धर्मादायही फार मोठा आहे. रशियाचे झारमहाराज, स्वतंत्र संस्थानांचे अध्यक्ष, इंग्लंडचे राजे किंवा हिंदुस्थानचे बादशाहा ह्यांच्या हातीं जितक्या लहानमोठ्या माणसांचें कल्याण आहे, त्यापेक्षां अधिक माणसांचें कल्याण मॉर्गन ह्यांच्या हातांत आहे. जगांतील ४३ मोठ्या राष्ट्रांचीं उत्पन्नें एकत्र केलीं, तर त्यांच्या बेरजेपेक्षांही त्यांचें उत्पन्न एक अब्ज डालरांनीं अधिक आहे. सोळा आगबोटींच्या लैनींचे आणि ४४ रेलवे-लैनींचे ते मुख्य असून त्यांच्या देखरेखीखालीं ३०० मोठाल्या आगबोटी व ३०००० आगगाड्या चालत आहेत.' ह्यावरून त्यांच्या संपत्तीची थोडीशी कल्पना करितां येईल. ह्यांचा आयुष्याचा विमा इंग्लिश कंपन्यांनीं दोनकोटि डालरांचा उतरलेला होता. हे जे आंकडे दिले आहेत ते खरे देखील वाटत नाहींत. कल्पित कादंबरीसारखे दिसतात. पण ते खोटे म्हणण्यास कांहीं कारण नाहीं. तरी त्यांत थोडी अतिशयोक्ति

आहे असें कल्पून तिजबद्दल कांहीं रक्कम बाद केली असतांही असें म्हणावें लागतें कीं व्यापारासारखा संपत्त्युत्पादक व्यवसाय दुसरा एकही नाहीं. कदाचित तो राजसत्तेपेक्षां देखील प्रबल आहे. आणि त्यांत विशेष हें आहे कीं, तें सगळें बुद्धिबलाचें राज्य आहे, त्यांत बाहुबलाचा स्पर्शही नाहीं. ही गोष्ट कांहीं सामान्य नव्हे. आमच्या महाराष्ट्रांत अर्वाचीन काळीं श्रीमंत कायते नाना फडणवीस ह्यांस समजत, आणि त्यांस नवकोट नारायण असें नांव पडलें होतें. तें अद्यापही कधीं कधीं कानीं पडतें. पण, ती संपत्ति सत्ताप्राप्त होती, व्यापारप्राप्त नव्हती, हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

ह्या सगळ्या गोष्टीचें मुख्य तात्पर्य हें लक्षांत ठेवायाचें कीं, खरोखर बुद्धिबल हीच प्रत्यक्ष संपत्ति आहे. ती प्रयत्नसाध्य नसून केवळ सुदैवानें ॲंड्रू कार्नेजी आणि मॉर्गन ह्यांसारख्या भाग्यवान् पुरुषांस प्राप्त झालेली असते. इतरांस तिची कल्पनाही करितां येत नाहीं आणि ती संपादन करण्याचा मार्ग कोणत्याही शास्त्रांत सांगितलेला नाहीं.

हे मॉर्गन साहेब मोठे मितभाषी असत. कोणत्याही सभेंत कोणत्याही विषयावर आपलें मत ते बाकी सर्वांचीं बोलणीं ऐकून घेतल्यावर मोठ्या शांतपणानें देत असत. त्यांचें एवढें माहात्म्य होण्यास त्यांचें मुख्य भांडवल कायतें त्यांचें प्रामाणिकपण होतें. सध्या सर्व अमेरिकन लोक असें म्हणत आहेत कीं अमेरिकेंतल्या सर्व लोकांच्या कायदेशीर हक्कांचे उत्तम खजीनदार जसे अध्यक्ष डॉ. वुड्रो विलसन हे आहेत, तसे अमेरिकेंतल्या सगळ्या व्यापाऱ्यांतल्या पतीचे उत्तम खजीनदार मॉर्गनसाहेब हे होते. ह्यापेक्षां अधिक मानाचें राष्ट्रीय अभिनंदन तें कोणतें व्हावें.

हे गृहस्थ गेल्या मार्च महिन्याच्या ३१ व्या तारखेस

परलोकवासी झाले. हे मनानें फार सरळ, सात्विकवृत्तीचे आणि खरे धर्मनिष्ठ होते. ह्यांचा धर्मादाय मोठा होता, परंतु अमक्या संस्थेस किंवा इमारतीस आपलें नांव द्यावें अशा अटीवर त्यांनीं पैसा कधीं दिला नाहीं. ह्याच गुणांचें फळ त्यांस त्यांच्या संपत्तीच्या आणि सन्मानाच्या रूपानें प्राप्त झालें होतें. अशीं माणसें राष्ट्रांत पैदा होणें हें त्याचें महत् भाग्य होय.

---

## भक्ति करणें हें मनाचें काम, देहाचें नव्हे.

### अभंग.

पाळायाला एकादशी तुम्ही राहातां उपाशीं
ह्यांत भक्ति कोठें आहे व्यर्थ देह क्लेश वाहे. १.
काशी पंढरी करीतां तुम्हीं तंगड्या तोडितां
ह्यांत भक्ति कोठें आहे व्यर्थ देह क्लेश वाहे. २.
टाळ कुटोनी नाचतां गाया मुखासी वासितां
ह्यांत भक्ति कोठें आहे व्यर्थ देह क्लेश वाहे. ३.
गळां रुद्राक्षांच्या माळा तोंडा कांहीं तरी चाळा
ह्यांत भक्ति कोठें आहे व्यर्थ देह क्लेश वाहे. ४.
भिक्षा हिंडोनी मागावी खळी पोटाची भरावी
ह्यांत भक्ति कोठें आहे व्यर्थ देह क्लेश वाहे. ५.
अर्थ न कळे ज्या मंत्राचा त्यानें दमवावी वाचा
ह्यांत भक्ति कोठें आहे व्यर्थ देह क्लेश वाहे. ६.
नमः नमः घोकुनि तोंडीं घाला बेलतुळशीकोडी
ह्यांत भक्ति कोठें आहे व्यर्थ देह क्लेश वाहे. ७.
खावा सदा निंबपाला हाडें मांस झिजवायाला
ह्यांत भक्ति कोठें आहे व्यर्थ देह क्लेश वाहे. ८.
भक्ति करणें हें मनाचें काम नव्हे तें देहाचें
पाहा पाहा भगवद्गीता काय आवडे भगवंता. ९.

तया मुख्य व्हावा भाव मन हाचि त्याचा ठाव
तेंचि तयासी अर्पावें तेणें खरें भक्त व्हावें. १०.
असे जे कोणी वागले तेचि वंदनीय झाले
यासी आमुचीं पुराणें साक्ष देती आनंदानें. ११.
तुका समर्थ सांगती त्याची हे कीं पुनरावृती
परी स्मरणार्थ बोलतों आणि आतां संपवितों १२.

## दमयंतीचें चातुर्य.

आमच्या कथापुराणांमध्यें कांहीं कांहीं गोष्टी अशा आहेत कीं त्या ऐकून सध्याच्या काळच्या चांगल्या सुशिक्षित माणसांनींही चकित व्हावें, आणि प्राचीन काळीं आमच्यांतल्या राजमंडळांमध्यें देखील ज्ञानाचा प्रसार किती झालेला असला पाहिजे, ह्याचें अनुमान करावें. अशा प्रकारची एक गोष्ट आज येथें आमच्या तरुण वाचकांस सादर करावयाचें आह्मीं योजिलें आहे. त्या गोष्टीची नायिका **दमयंती** होय. ती वैदर्भ देशच्या भीम राजाची कन्या होती. ती अत्यंत रूपवती असा तिचा मोठा लौकिक झाला होता. ती उपवर झाल्यावर तिच्या पित्यानें तिचें स्वयंवर मांडिलें आणि जिकडे तिकडे देशोदेशींच्या राजांस त्याकरितां निमंत्रणपत्रिका पाठविल्या. तेव्हां केवळ राजेरजवाड्यांसच नव्हे, तर इंद्र, अग्नि, वरुण, यम, ह्या चार महा विभूतींसही तिजविषयीं अतिशयित लोभ उत्पन्न झाला. ते चौघे एकत्रपणें स्वयंवरास यावयास निघाले. इतक्यांत तिकडून त्याच हेतूनें निघालेला नलराजा त्यांस भेटला. हा नलराजा निषध देशच्या वीरसेन राजाचा पुत्र होता, तोही रूपानें केवळ मदनाचा पुतळा होता. त्याचा लौकिक आधींच दमयंतीच्या कानीं जाऊन तिनें त्याला आपल्या मनानें वरिलें होतें, परंतु तो नळ प्राप्त होईल किंवा नाहीं या शंकेनें व्याकुळ होऊन ती आजारी पडली. तेव्हां

तिची मातुश्री तिला औषधोपचार करीत असतां तिनें आपल्या आईला उत्तर दिल्याचें वर्णन **रघुनाथपंडितांनीं** एका आर्येंत असें केलें आहे कीं,

> ती शीतलोपचारीं जागी झाली हळूच मग बोले
>
> औषध **नलगे** मजला परिसुनि जननी बरें ह्मणुनि डोले.

ह्या आर्येंत 'नलगे' ह्या शब्दावर श्लेष आहे. ह्याचा उघड अर्थ नको असा दर्शवून गर्भितार्थ अगे मला नल हेंच औषध असा घातला आहे. अशा स्थितीमध्यें परस्परांचे हेतु जाणून पूर्वोक्त चौघां महापुरुषांनीं **नलास** असा आग्रह केला कीं तूं दमयंतीकडे जाऊन आम्हा चौघांतून जो तिला योग्य वाटेल तो वरण्याविषयीं तिचें मन वळवावें. त्याप्रमाणें **नल** मोठ्या युक्तीनें दमयंतीच्या महालांत जाऊन, त्यानें त्या चौघांचें यथातथ्य वर्णन करून त्यांचा निरोप तिला कळविला, आणि आपण स्वतः कोण हेंही स्पष्टपणें सांगितलें.

तें वर्तमान ऐकिल्यावर आतां पुढें काय विचार करावा हें तिला मोठें संकट पडलें, आणि काय उत्तर द्यावें हें तिला सुचेना. कांकीं नलानें आधीं तिचें मन वेधून टाकिलें होतें. तेणेंकरून तिच्यानें त्याला सोडवेना आणि ते चौघे ह्यापेक्षां मोठे पराक्रमी असल्यामुळें त्यांना ना म्हणण्याचें धैर्य तिला होईना. तरी त्या चौघांविषयीं नलाचा आग्रह विशेष पाहून त्यांतल्या कोणाचेंही मन न दुखवितां तिनें युक्तीनें त्यांस जें उत्तर दिलें तें पंतांनीं एका आर्येंत गोंविलें आहे. त्यांत चातुर्य फार मोठें आहे. ती आर्या अशीः—

> वरिले हेचि चरण म्यां त्यजितां ज्वलनांत[1] काय[2] होमीन[3]
>
> यज्जीवन[4] जीवन[5] तो दुग्धीं वांचेल काय हो मीन[6].

---

१ अग्नी. २ देह. ३ जाळीन. ४ ज्याचा जीव. ५ पाणी. ६ मासा.

ह्यांत त्या चौघांचें श्रेष्ठत्व कबूल करून असें म्हणून दाखविलें आहे कीं, ज्या माशाला पाणी हा जीव आहे, तो मासा, पाण्यापेक्षां श्रेष्ठ जें दूध त्यांत वांचेल काय? अर्थात वांचणार नाहीं. ह्यांत आपला दृढ निश्चय प्रकट करून तिनें उभय पक्षांचें मन धरिलें आहे. हें कांहीं अल्प चातुर्य नव्हे; आणि त्या उत्तरांतला दृष्टांत अत्यंत समर्पक आहे. पुढें नल ह्या चौघांकडे परत आल्यावर त्यांनीं एक डाव असा योजिला कीं आपण सगळे नळाचें रूप धरून पांचही नल स्वयंवरसभेंत जाऊन बसूं, आणि मग खरा नल कोणता हें ओळखून ती त्याला कशी वरिते हा चमत्कार पाहूं. त्याप्रमाणें ते पांच नळ स्वयंवरमंडपांत जाऊन बसल्यावर दमयंतीला तेथें आणिलें. तेव्हां स्वभावतःच पहिला सगळा प्रकार तिच्या मनांत उभा राहून ती अगदीं गोंधळल्यासारखी झाली. तिला खरा नळराजा ओळखतां येईना. तरी थोडा विचार केल्यावर तिनें त्या नळांस लक्षून जें भाषण केलें त्याच्या योगानें सर्व संशयाचें निरसन होऊन तिचे मनोरथ पूर्णपणें सिद्धीस गेले. तें भाषण **रघुनाथ** पंडितांनीं एका ओंवींत ग्रथित केलें आहे, ती ओंवी अशीः—

माझा भीम जैसा पिता तैसे तुम्ही जी तत्त्वता ।
करा कन्यादान आतां नलनाथाचिये करीं ।

हें कानीं पडतांच, मोठ्या आनंदानें त्या चौघां वेषधारी नळांनीं आपआपलीं सत्य स्वरूपें प्रगट केलीं आणि ते आपआपल्या स्थानीं निघून गेल्यावर नलदमयंतीविवाहोत्सव भीमराजानें मोठ्या हर्षानें केला. त्याचें वर्णन **रघुनाथपंडितांनीं** एकाच श्लोकांत फार उत्तम केलें आहेः—

मावेचना सुख मनीं कमनीय बाला
मायेसही विसरली न पुसेचि बाला[1]

---

१ बापाला.

दूर्वा-दळीं कदलि-बंध मधूक-माला
तीनें अलं-कृत करी नळ-कंठनाला.

आणखी त्याच पंडितांनीं वर्णन केलें आहे.

**श्लोक.**

नृपालाचे मांडीवरि बसुनी मांडी हरिख ते
तया पाहों आले, जन सकळ झाले हरिखते
महा-वाद्यें नाना, नि-नदहि तनाना मग घडे
पिता तीचा पांटीभरहि धन वांटी बहु विडे.

असो अशा प्रकारें नळदमयंतीस्वयंवर झालें तें आमच्या राष्ट्रीय कवींनीं आपल्या अमृतमय वाणीनें गाइलें आहे. त्यांत आमच्या आधुनिक सुशिक्षित मुलींस अत्यंत लक्षांत ठेवण्यासारखीं जीं दोन उत्तरें आम्हांस वाटलीं तीं येथें प्रेमपूर्वक दाखल केलीं आहेत. ह्या उत्तरांत विशेष गुण हे आहेत कीं, त्यांत सगळें सत्य आहे, तरुण युवतींस अत्यंत भूषणावह अशी मर्यादा आहे, आणि त्याशीं ज्यांचा ज्यांचा संबंध होता त्या सर्वांस आनंद वाटण्यास उत्तम स्थान आहे.

अशा प्रकारचें चातुर्य प्राप्त होण्यास उत्तम प्रकारचें शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. हें उघड आहे. ह्यावरून त्या काळीं स्त्रीशिक्षणाचा परिपाठ आपल्या देशामध्यें पुष्कळच असला पाहिजे ह्यांत कांहीं संशय नाहीं.

## शास्त्रीयज्ञानाभिवृद्धि.

**ज्वालामुखी पर्वतांच्या स्फोटांचा हवेवर परिणामः—** हिंदुस्थानासारख्या उष्णकटिबंधांतल्या देशांतल्या लोकांस सूर्यप्रकाशाची फारशी परवा वाटत नाहीं; ऊन जितकें कमी प्रखर पडेल तितकें लोकांस जास्त सुखच वाटतें. परंतु, इंग्लंड, फ्रान्स, रशिया, इत्यादि समशीतोष्ण व शीतकटिबंधांतल्या

देशांची गोष्ट अगदीं निराळी आहे. तिकडे उन्हाचा दिवस म्हणजे मोठा आनंदाचा समजतात आणि लोक उन्हाळ्याची वाट पहात असतात. कारण उन्हाळा आला म्हणजे तिकडच्या बर्फमय हिंवाळ्यापासून लोकांची सुटका होऊन सर्व मानवी व्यवहार सुरळीतपणें चालविण्यास सर्वांस मोकळीक होते. अलीकडे कांहीं वर्षांपासून पश्चिमयुरोपखंडाच्या हवेमध्यें पुष्कळ बदल झालेला आहे. तिकडील थंडी वाढत आहे आणि उन्हाळ्याचे दिवस पहिल्याइतके सुखावह नसतात असें म्हणणें आहे. हवेमध्यें असा बदल होण्यास कारण काय झालें असावें ह्याचा तिकडील लोक अर्थात शोध करूं लागले आहेत आणि त्यांस तशीं कांहीं कारणें सांपडलीं आहेत. त्यांतलें एक कारण पश्चिमयुरोपखंडास लागून असलेला अटलांटिक महासागराचा भाग पूर्वींपेक्षां जास्त थंड झालेला आहे असें आहे. उत्तर अमेरिकेच्या दक्षिण भागीं मेक्सिकोचें आखात म्हणून एक मोठा जलसंचय आहे. त्याचें पाणी सूर्यकिरणांनीं तापून त्याचा एक मोठा प्रवाह फ्लॉरिडावरून उत्तर दिशेनें वाहात असतो, आणि ह्या तापलेल्या पाण्याच्या उष्णतेमुळें पश्चिमयुरोपखंडाच्या थंडीचा कडकपणा कमी होत असतो. ह्या प्रवाहास 'गल्फस्ट्रीम' असें म्हणतात. कांहीं कारणानें ह्या प्रवाहाच्या पाण्याची उष्णता अलीकडे कमी झाल्यामुळें त्यापासून पूर्वींच्या इतकी उष्णता पश्चिम युरोपखंडास मिळत नाहीं आणि त्याची हवा उत्तरोत्तर जास्त थंड होत चालली आहे. 'गल्फस्ट्रीम'च्या पाण्याची उष्णता कमी झाल्याचा आणखी एक परिणाम असा झाला आहे कीं, उत्तर ध्रुवाजवळच्या प्रदेशांतून दक्षिणेकडे वाहत येणारे प्रचंड बर्फाचे डोंगर, जे पूर्वीं फारसे दक्षिणेस येण्याच्या आधींच त्या गरम पाण्यामुळें वितळून जात, ते आतां तसेच जास्त दक्षिणेस येऊं लागले आहेत आणि त्यांमुळें आगबो-

टींच्या मार्गांत एक मोठा धोका उत्पन्न झाला आहे, आणि युरोपखंड व अमेरिका ह्यांच्या दरम्यान जाणाऱ्या येणाऱ्या आगबोटींची नेहमींची वाट बदलावी लागली आहे. युरोपखंडांतील ह्या हवेच्या थंडाव्यासंबंधानें, किंबहुना सगळ्या पृथ्वीवरील हवेच्या स्थितीसंबंधानें अलीकडे आणखी एक नवीन शोध लागला आहे. तो असा कीं, ज्वालामुखींच्या स्फोटांचा परिणाम आपल्या वातावरणावर होत असतो. ह्या विषयावर एक स्वतंत्र ग्रंथ अमेरिकेंतील एक विद्वान शास्त्रज्ञ प्रो० आबट ह्यांनीं अलीकडे प्रसिद्ध केला आहे. ज्वालामुखीपर्वतांचा स्फोट होऊं लागला म्हणजे त्यांतून माती राख वगैरे पदार्थ किती प्रचंड प्रमाणानें बाहेर पडतात ह्याविषयींची संपूर्ण माहिती प्रो० आबट ह्यांनीं आपल्या ग्रंथांत दिलेली असून, ह्याप्रमाणें अंतरिक्षांत उडालेली राख धूळ वगैरे वातावरणांत पसरल्यामुळें सूर्यकिरण संपूर्ण रीतीनें त्यांतून आंत येण्यास कसा प्रतिबंध होतो आणि त्यामुळें त्या किरणांच्या उष्णतेची तीव्रता कशी कमी होते तें त्यांनीं स्पष्ट करून दाखविलें आहे. ज्वालामुखींपासून उडणारी धूळ वातावरणाच्या वरच्या प्रदेशांतून दर तासास सुमारें ४० मैल अशा वेगानें प्रवास करीत असून पंधरा दिवसांच्या अवधींत ती अर्ध्या पृथ्वीच्या भोंवतीं जाऊं शकते. प्रो. आबट ह्यांनीं अशी भीति प्रदर्शित केली आहे कीं, एकाद्या हिंवाळ्याच्या अखेरीच्या सुमारास कोठें ज्वालामुखीचा स्फोट होऊन त्याची धूळ समशीतोष्ण कटिबंधावरील वातावरणांत पसरली तर त्या प्रदेशांत हिंवाळ्याचा कडकपणा तसाच चालू राहून पिकें सर्वस्वीं बुडून जातील! ही गोष्ट हिंदुस्थानासारख्या उष्णकटिबंधांतल्या प्रदेशांस अर्थात लागू नाहीं. येथें हें मात्र लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, सूर्यकिरणांच्या उष्णतेची तीव्रता कमी होण्यास ज्वालामुखींतूनच उडालेल्या

धुळीचे कण कारणीभूत होतात असें नाहीं. वातावरणांत नेहमीं तरंगत असलेल्या इतर प्रकारच्या धुळीचाही तोच परिणाम होत असतो. शास्त्रवेत्त्यांचें असें ह्मणणें पडतें कीं, हवेमध्यें धुळीचे आणि पाण्याच्या वाफेचे कण नसते तर सूर्याच्या प्रखर उष्णतेमुळें सृष्टीमध्यें कोणताही प्राणी जीवंत राहिला नसता. सूर्यकिरण वातावरणांत शिरल्यानंतर ते पहिल्यानें ह्या कणांवर पडून त्यांचा कांहीं भाग परावर्तन पावून परत आकाशांत जातो, आणि बाकीचा पृथ्वीतलावर येऊन पोंचतो. ह्या परावर्तन पावलेल्या किरणांमुळेंच आकाशाचा रंग सुंदर निळा दिसतो.

**न्यूयार्क शहरास पाण्याचा पुरवठा करण्यासाठीं एक प्रचंड योजना:**—कोणत्याही शहराचें आरोग्य सुधारण्यास किंवा चांगलें राखण्यास अत्यंत आवश्यक गोष्ट म्हटली म्हणजे निर्मळ पाण्याचा मुबलक पुरवठा ही होय हें आलीकडच्या अनुभवानें चांगलें ठरून गेलें आहे. त्याबरोबरच अशा पाण्याचा निकाल लावण्याच्या गटारांची व्यवस्थाही जरी करावी लागते, तरी पाण्याचा पुरवठा हीच मुख्य बाब होय ह्यांत शंका नाहीं. ह्यासाठीं ह्या कार्यासाठीं लागेल तितका पैसा खुल्या हातानें खर्चण्यास सार्वजनिक आरोग्याविषयीं जबाबदार असलेले अमलदार नेहमीं तयार असतात. ह्या संबंधानें मुंबईनें काय केलें आहे त्याबद्दल मागें एकदां लिहिलेंच आहे. आतां न्यूयार्क ह्या नामांकित शहरानें आपल्याला मुबलक पाणी पुरविण्यासाठीं जी प्रचंड योजना हातीं घेतली आहे तिजविषयीं थोडेंसें सांगावयाचें आहे. न्यूयार्कची लोकसंख्या सुमारें वीस लाख असून ती दरसाल सरासरीनें दीड लाखानें वाढत आहे. हल्लीं शहरास पाणी पुरवणारे अनेक तलाव आहेत, परंतु हे पुरत नसल्याकारणानें सुमारें ९२ मैल

अंतरावरून कॅट्स्किल नांवांच्या डोंगरांतील चार ओढे अडवून दररोज सुमारें पन्नास कोटी ग्यालन पाणी शहरांत यावें अशी योजना मंजूर होऊन तत्संबंधाचीं निरनिराळीं कामें सुरू झालीं आहेत. ह्या सगळ्यास खर्च सुमारें १८ कोटि डालर म्हणजे ५४ कोटि रुपये लागावयाचा आहे. जे चार ओढे अडवावयाचे आहेत त्यांतून सुमारें ९०० चौरस मैलांवरचें पाणी वाहून येत असतें. ह्या चार ओढ्यांपैकीं फक्त एकच अशोकन नांवाचा ओढा हल्लीं अडविलेला आहे. आणि बाकीचे तीन ओढे लागतील तसतसे अडविण्यांत येऊन ह्या निरनिराळ्या तलावांच्या दरम्यान पाणी जाण्यासाठीं मोठाले बोगदे बांधण्यांत येतील. अशोकन ओढ्याचा बांध ४६५० फूट लांब असून तो तळाशीं १९० फूट आणि माथ्याशीं २३ फूट जाड आहे, आणि ह्या तलावाचा विस्तार १२½ चौरस मैलांवर होणार आहे. ह्या साठीं त्या ओढ्याच्या कांठचीं २००० माणसांचीं सात गांवें उठवावीं लागलीं. ह्या अशोकन बांधापासून न्यूयार्क शहराच्या उत्तरहद्दीपर्यंत पाणी नेलें आहे, ती एक जमिनीखालून दाहा पंधरा फूट रुंदीच्या बोगद्यांमधून वाहाणारी एक ९२ मैल लांबीची प्रचंड नदीच बनली आहे. हे बोगदे कोठें दगडी व कोठें लोखंडाचे बांधून इंजिनियरिंगचें सर्व सामर्थ्य खर्चून अगदीं पक्के केले आहेत. ह्या सगळ्या योजनेमधलें सर्वांत महत्त्वाचें आणि आश्चर्यकारक काम म्हटलें म्हणजे, तें पाणी न्यूयार्क शहराच्या उत्तर सरहद्दीपर्यंत येऊन पोंचल्यावर तेथून हडसन नदीच्या खालून न्यूयार्क शहरांत ज्या बोगद्यांनीं नेलें आहे ते बोगदे होत. हडसन नदी बरीच मोठी आहे, आणि तिच्यावरून नळांच्या योगानें पाणी नेणें अशक्य होतें. कारण त्यानें नदीवरच्या तारवांच्या रहदारीस अडथळा आला असता. तेव्हां तें पाणी तिच्या खालून, मागें पुढें कधींही धोका

न येईल अशा रीतीनें पाण्याचा नहर बांधून न्यावयाचें ठरविलें. हें काम मोठें जोखमीचें होतें. हा नहर त्या नदीखालून पक्क्या खडकांतून न्यावयाचा होता. असा खडक शोधून काढण्यासाठीं पहिल्यानें नदीच्या दोहोंबाजूंस खोलचखोल बुराख पाडावे लागले. शेवटीं त्या नदीखालीं सुमारें ११०० फुटांवर हवातसा पक्का मजबूत खडक सांपडला. तेव्हां त्या नदीच्या दोहों बाजूंस तितक्या खोलीचे उभे बोगदे पाडून ते आंतून पक्के बांधून काढिले, आणि त्यांस जोडणारा तसाच एक आडवा बोगदा त्या नदीखालील पक्क्या कठिण खडकांतून फोडून काढिला! हें सगळें करण्यास केवढे प्रयास लागले असतील ह्याची कल्पना करावी. इतक्या खोलीवर कामकरी नेणें, तेथें निघालेली दगडमाती वर काढून आणणें, आणि आंतील बांधकाम बरोबर बिनचूक रीतीनें करणें ह्या सगळ्यास इंजिनियरलोकांस आपलें कौशल्य पराकाष्ठेचें खर्च करावें लागून पैसा पाण्यासारखा ओतावा लागला आहे. ह्या नदीखालच्या बोगद्यांत पाण्याचा दाब दर चौरसफुटास चाळीस टनांवर पडत आहे ह्यावरून त्याचें बांधकाम किती मजबूत करावें लागलें असेल त्याची कल्पना होईल. हें पाणी गाळण्याची सध्या व्यवस्था केलेली नाहीं, परंतु पाण्यांत हवा चांगली मिसळली गेली म्हणजे तींतल्या आक्सिजन वायूच्या योगानें त्या पाण्यांतल्या अशुद्ध पदार्थांचा नाश आपोआप होतो म्हणून तलावांतलें पाणी बोगद्यांत शिरण्यापूर्वीं पूर्णपणें हवामिश्रित होण्यासाठीं तें हवेमध्यें १५ फूट उंच फवाऱ्यांनीं उडावें अशी व्यवस्था केली आहे. ह्यासाठीं पांचशें फूट लांब आणि अडीचशें फूट रुंद असें एक तळें बांधून त्यांत सुमारें अठराशें फवाऱ्यांच्या तोट्या लाविल्या आहेत.

**रेशमी कापड कधीं कधीं फार लवकर कां फाटतें?**

खरें रेशीम म्हटलें म्हणजे पुष्कळ दिवस टिकलें पाहिजे. परंतु अलीकडे बाजारांत मिळणारें रेशमी कापड फार लवकर फाटून जातें, घडीच्या ठिकाणीं त्याचे तुकडे पडतात, आणि खाक आणि मान ह्यांसारख्या घाम यावयाच्या ठिकाणीं बेरंग होऊन तें लवकर कुजतें असा पुष्कळांस अनुभव आला आहे. असें होण्याचें कारण अलीकडची व्यापारीपद्धति होय. कच्चें रेशीम व्यापारी घेतो तेव्हां त्यांत रेशमी किड्यांच्या अंगचा बराच चिकटा असतो. तो घालविण्याकरितां तें पाण्यांत उकळावें लागतें, आणि ह्या उकळण्यानें त्याचें वजन सुमारें दहाव्या हिश्शानें कमी होतें. ह्याप्रमाणें कच्चें रेशीम साफ केल्यानंतर तें रंगवावें लागतें, आणि ह्याप्रमाणें रंगवितांना, तें, कथलापासून तयार केलेल्या कांहीं द्रव्यांत, त्याचें वजन वाढण्यासाठीं उकळितात. हें द्रव्य त्यांत कधीं कधीं इतकें घालतात कीं, बारा औंस रेशीम ६० किंवा ८० औंसपर्यंत भरतें ! इतकें कथील त्या रेशमांत भिनवल्याचा परिणाम वाईट होतो. असा रेशमाचा कपडा बांधून ठेविला तर तो फारसा बिघडत नाहीं, परंतु तो वापरूं लागलें म्हणजे बाहेरच्या हवेच्या योगानें त्याच्या अंगीं भिनलेल्या कथलाचे कण हळू हळू निराळे होऊन त्यांनीं रेशमाचे धागे कापूं लागतात. म्हणजे अर्थात् तो कपडा लवकर फाटतो. रेशीम अस्सल आहे किंवा वर सांगितल्याप्रमाणें बनावट आहे तें पाहाण्याचा एक सोपा मार्ग आहे. त्याचा एक तुकडा घेऊन दिव्यावर धरावा. रेशीम अस्सल असलें तर केंस जाळला म्हणजे होतें त्याप्रमाणें त्याची गोळी बनते, आणि बनावट असलें तर कागद जाळल्याप्रमाणें त्याची तशीच राख राहाते. ही राख जितकी टणक लागते तितकें त्या रेशमांत कथील जास्त असें समजावें.

# खाण्याचे पदार्थ आणि प्रकृति.

आलीकडे सगळ्या माणसांचें, आणि त्यांतही शहरांतल्या माणसांचें लक्ष, सर्व प्रकारच्या कामांत वेळ आणि श्रम वांचविण्याकडे फार असतें. त्यास यंत्रें पुष्कळ साह्य करितात, पण, त्या सर्वांचा परिणाम माणसांच्या प्रकृतीवर काय होतो इकडे कोणी फारसें पाहात नाहीं ही फार दुःखाची गोष्ट आहे. ह्याचें थोडेंसें स्पष्टीकरण उदाहरणांनीं केलें पाहिजे.

स्वैंपाक लांकडांपेक्षां कोळशांवर लवकर होतो, आणि कोळशांपेक्षां स्टोव्हवर अधिक लवकर होतो. परंतु लांकडांवर सावकाश शिजविलेले पदार्थ रुचकर लागून कसदार असतात, कोळशावरचे पदार्थ त्यांहून त्या गुणांत कमी असतात आणि स्टोव्हवरचे त्यापेक्षां अधीक बेचव आणि निकस असतात. गिरण्यांत दळण लवकर आणि थोड्या पैशांत होतें, पण तें पीठ आगीनें जळून अर्धमेलें आणि निकस होतें. त्याचा पदार्थ बेचव लागतो, आणि शक्तीला कमी पडतो.

ह्याचा परिणाम लोकप्रकृतीवर अगदीं उघड उघड दृश्यमान होतो, तो असा कीं, अगदीं खेड्यापाड्यांतल्या माणसांस हीं कामें करून घेण्यास यंत्रें मिळत नसल्यामुळें त्यांनीं हाताच्या बलावर केलेले पदार्थ चांगले रुचकर आणि कसदार असे त्यांस खायास मिळाल्याच्या योगानें तीं माणसें, सामान्यत्वें, शहरच्या माणसांपेक्षां अधिक सशक्त आणि अधिक कामासू असतात. तींच शहरांतील माणसें, यंत्रांनीं केलेले पदार्थ खात असल्यामुळें, अशक्त आणि कामकाजास कुचकामाचीं अशीं असतात. हें एकंदर मनुष्यजातीच्या हानीस कारण होणार आहे. ह्याचा विचार सर्वांनीं केला पाहिजे.

# लोक काय बोलतात.

सरकारी शाळांतून नीतिशिक्षण चालू करण्याबद्दल मुंबईसरकारानें एक ठराव प्रसिद्ध केला आहे.

---

रस्त्यांतून जात असलेल्या तरुण मुलींच्या संरक्षणार्थ शिकागो शहरांत स्त्रियांस पोलीस नेमिलें आहे.

---

बडोद्याचे गायकवाडसरकार यांच्या पदरीं जें सैन्य आहे त्या सगळ्याला दरवर्षी १८४०४८८ रुपये खर्च लागतो.

---

पुढच्या महिन्यांत पुणें येथें एक मोठी शेतकीपरिषद् भरणार आहे. तिचें सुरवातीचें भाषण नामदार लार्ड विलिंग्डन हे करणार आहेत.

---

चिनामध्यें बंडाळी अद्याप सुरू असून सरकारपक्षास हळूहळू जय येत आहे. बंडवाल्यांस जपानसरकार गुप्त रीतीनें मदत करीत आहे असें ह्मणतात.

---

फिलिपैन बेटांस युनैटेड स्टेट्सचें सरकार आणखी दाहापांच वर्षांनीं पूर्ण स्वातंत्र्य देण्यास तयार आहे असें हल्लींचे प्रेसिडेंट डा. वुड्रो विल्सन आणि त्यांच्या पक्षाचे इतर लोक उघड ह्मणत आहेत.

---

आपले गव्हर्नर नामदार लार्ड विलिंग्डनसाहेब ह्यांचें लक्ष शेतकीकडे विशेष असून, ते गणेशखिंड येथील गव्हर्मेंटहौसभोंवतालच्या मोकळ्या जागेंत नमुनेदार शेतकी करून दाखवीत आहेत.

---

जर्मनीचे बादशाहा दुसरे विल्यम हे आलीकडच्या एका भाषणांत असें म्हणाले कीं, माझ्या देशांतल्या व्यापाऱ्यांचे जे कोणी शत्रु आहेत ते माझे शत्रु आहेत असें मी समजतों! केवढा अभिमान!

---

टाटांच्या लोखंडी कारखान्यापासून जवळच जजभूम जहागिरींत सोनें, तांबें, वगैरे धातूंच्या खाणींचा शोध लागला असून त्यांची पहाणी करण्यासाठीं २५०००० रु. भांडवलाची एक कंपनी स्थापन झाली आहे.

---

आड्रियानोपल तुर्कसरकारानें परत घेतलें आहे तें त्याकडेच राहाणार अशीं लक्षणें दिसत आहेत. बल्गेरियन लोक अत्यंत क्रूरकर्मे आहेत, त्यांपेक्षां तुर्कींच राज्यकर्ते बरे असें तेथले खिस्ती लोकही म्हणत आहेत!

---

आतां असें समजलें आहे कीं, आमच्या कितीएक संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें प्राचीन काळीं प्रथमतः तिबेटी भाषेंत होऊन त्यांचीं भाषांतरें मंगोलियन भाषेंत झालीं आहेत. मंगोलियन लिपीचें मूळही देवनागरी लिपींतच दिसतें. वेताळपंचविशीचें मंगोलियन भाषांतर तिकडे फारच लोकप्रिय झालें आहे!

---

कलकत्ता युनिव्हर्सिटीचे लेक्चरर आणि हिंदुस्थान सरकार ह्यांमधील प्रकरण कोर्टापर्यंत गेलें आहे. युनिव्हर्सिटीकडून नेमणुकीप्रमाणें आपणास व्याख्यानें देण्याची परवानगी देववावी असा दावा एका लेक्चररनें केला आहे, आणि दुसऱ्यानें बेअब्रूची फिर्याद करतों म्हणून हिंदुस्थान सरकारास नोटीस लाविली आहे.

---

हिंदुस्थानांतील ब्रिटिश हपिसरांनीं ह्यापुढें हिंदी गृहस्थांकडून कोणत्याही प्रकारच्या देणग्या—लग्नाच्या वेळचे अहेरही—घेऊं नयेत, असा सक्त हुकूम स्टेट सेक्रेटरीकडून नुक्ताच झाला आहे. लग्नाचे अहेर तेवढे हिंदुस्थान सरकारच्या परवानगीनें घ्यावे, असा पूर्वीं नियम होता, तो अर्थात आतां रद्द झाला आहे.

---

शाळाखात्यांत एक नवा हुकूम सुटला आहे कीं मास्तर लोकांनीं टोप्या घालून वर्ग शिकवूं नयेत; तर पागोटीं किंवा रुमाल तरी घालून ते शिकवावे. ठीक आहे. ह्याच्या योगानें मास्तरलोकांस खर्च अधिक पडेल हें खरें आहे, पण त्यानें त्यांच्या संभावितपणास चांगली भर पडेल. ती पाहिजेच आहे.

---

श्रीनगर येथें काश्मीर सरकारानें रेशीम पैदा करण्याचा फार मोठा कारखाना स्थापून उत्तम तऱ्हेनें चालविला होता. त्यांत युरोपियन तज्ज्ञांचे हाताखालीं ५००० लोक काम करीत होते. हा सर्व

कारखाना आग लागून जळाल्यामुळें काश्मीर सरकारचें अतोनात नुकसान झालें आहे. हा कारखाना जगांतील मोठ्या कारखान्यांत अग्रगण्य होता.

---

नामदार व्हैसराय साहेबांच्या कचेरींत एक नवीन एतद्देशीय संस्थानांकरितां वेगळा पोलिटिकल सेक्रेटरी नेमण्याचा विचार विलायतसरकाराच्या दरबारांत होत आहे. त्या सेक्रेटरींनीं वरचेवर एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या सभा भरवाव्या, आणि त्यांच्या राज्यांत कोणकोणत्या सुधारणा कशा कराव्या, ह्याचा त्यांत ऊहापोह करावा, अशी त्यांत एक सूचना आहे.

---

महाराज सयाजीराव गायकवाड ह्यांची कन्या इंदिराराजा ह्यांचा विवाह लंडन शहरीं कुचबिहारच्या महाराजांचे बंधु जितेंद्रसिंह ह्यांबरोबर गेल्या महिन्याच्या २५ व्या तारखेस झाला. तत्पूर्वी नवऱ्या मुलीस ब्राह्मधर्माची दीक्षा दिली, आणि हा विवाह ब्राह्मविवाहाच्या पद्धतीनें झाला. विवाहसमयीं वधूपक्षाकडील आप्त कोणीही आलेले नव्हते. हा संबंध ब्रह्मकृपेनें वधूवरकुलांस संतोषदायक होवो.

---

कानपुरच्या एका मशिदीच्या कोंपऱ्याचें एक दालन रस्ता रुंद करण्यासाठीं अधिकाऱ्यांनीं पाडल्याकारणानें तेथील मुसलमान लोकांत चळवळ होऊन ३ आगष्ट रोजीं त्यांचा एक घोळका तेथें जाऊन पाडलेला भाग पुनः बांधूं लागला. त्यास पोलिसानें हरकत केल्यावरून मोठा दंगा झाला, आणि माजिस्ट्रेटच्या हुकुमावरून दंगेखोरांवर गोळ्या घालण्यांत आल्या. त्यामुळें बारातेरा माणसें मेलीं आणि पुष्कळ जखमी झालीं. दंगा करणारांवर खटला चालू आहे.

---

मुसलमानांतल्या प्राथमिक शिक्षणाच्या सुधारणेचा विचार करण्यास सरकारानें चांगल्या विद्वान मुसलमानांची कमिटी नेमिली आहे, आणि तिचें काम चाललें आहे. त्याप्रमाणें मराठी प्राथमिक शिक्षणाच्या सुधारणेचा विचार करण्याकरितां चांगल्या विद्वान अनुभविक महाराष्ट्रीयांचीही एक कमिटी नेमावी. कांकीं त्यांतही पुष्कळ व्यंगें

आहेत, आणि त्यांच्या पायीं विद्यार्थ्यांचें फार नुकसान होत आहे. इकडे आमच्या लोकप्रिय गव्हरनरसाहेबांनीं अवश्य लक्ष द्यावें.

---

आपलेकडच्या बायकांत ज्या अनेक प्रकारच्या कहाण्या सांगत असतात त्यांचें इंग्रजी भाषांतर आज कितीएक दिवसांपासून टाइम्स ऑफ् इंडियामध्यें मेहरबान किंकेडसाहेब, सातान्याचे सध्याचे डिस्ट्रिक्ट जज्ज, हे छापवीत असतात. वेद असोत किंवा इतर गोष्टी असोत, तें सगळें इंग्लिश वाङ्मयांत आलें पाहिजे अशी इंग्लिश वाङ्मयाची हांव आहे. अशी हांव दुसऱ्या थोड्याच भाषांच्या वाङ्मयास असेल. ह्या हांवेनेंच इंग्लिश वाङ्मयाचें क्षेत्र इतर सर्व भाषांच्या वाङ्मयापेक्षां मोठें झालेलें आहे, आणि वाढत चाललेलें आहे.

---

कलकत्याचे नामांकित वकील बाबू राशबिहारी घोस ह्यांनीं **दाहा-लाख** रुपयांची देणगी, शास्त्रीय विषय शिकविण्याची संस्था काढण्या-करितां कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या स्वाधीन केली आहे. हें औदार्य खरो-खर अत्यंत स्तुत्य होय. इ. स. १९०७ च्या दिसेंबरांत भरलेल्या सुरत येथील ज्या राष्ट्रीय सभेचा विघाड झाला, त्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष हे गृहस्थ होते. ह्यांचें संक्षिप्त चारित्र इ. स. १९०८ च्या जानेवारीच्या बालबोधांत दिलें आहे. मन्वन्तर हा एक उत्तम सद्गुरु आहे. दानधर्म कसा करावा, हें देखील तो माणसांस शिकवितो.

---

बाल्कन युद्धापासून एकंदर किती हानि झाली ह्याचे आंकडे येणें-प्रमाणें:—

| देश | मेले, जखमी झाले. | खर्च पौंड. |
|---|---|---|
| बल्गेरिया | १४०००० | ९०००००० |
| सर्व्हिया | ७०००० | ५००००००० |
| ग्रीस | ३०००० | २५०००००० |
| मौंटिनीग्रो | ८००० | ८००००० |
| तुर्कस्थान | १००००० | ८००००००० |
| एकूण | ३४८००० | १६४८००००० |

इतकीं माणसें आणि एवढी संपत्ति राज्यतृष्णेस बळी पडली !

# बालबोध.

## सर आदमजी पीरभाई.



शल्या कल्याणगुणां
पात्र जगीं पुण्यसंग्रहें व्हावें.

**मोरोपंत.**

सत्समागम, सद्विद्या आणि सुशिक्षण ह्यांच्या साहचर्यानें मनुष्याचे ठायीं कल्याणगुण उत्पन्न होतात, असा अनुभव जगाच्या उत्पत्तीपासून आजपर्यंत आलेला आहे. त्यांत कांहीं कोणाला विशेष वाटत नाहीं. परंतु ह्या कारणांचा फारसा संपर्क नसतां कांहीं माणसें केवळ जन्मतःच कल्याणगुणी निपजतात आणि जनांच्या अभिनंदनास पात्र होतात, त्यांच्या चरित्रांचा

विचार केला म्हणजे असें म्हणावें लागतें कीं, कल्याणगुणप्राप्तीस पुण्यसंग्रह म्हणजे पूर्वसंचित हेंही एक अत्यंत पवित्र कारण मनुष्याच्या स्थितींत नेहमीं जागृत असलें पाहिजे. तें पाहून विलक्षण आश्चर्य वाटतें. अशीं उदाहरणें त्या माणसांच्या कृतीवरून आणि आचरणावरून इतरांस पुण्यमार्गदर्शक होतात, म्हणून त्यांचें स्तुतिस्तोत्र करण्याविषयीं लेखकांस साहजिकपणें फार इच्छा होते. अशीं जीं थोडींशीं थोर माणसें अलीकडच्या शेंपन्नास वर्षांत आमच्या राष्ट्रामध्यें उत्पन्न होऊन गेलीं, त्यांतल्या प्रमुखांत सर आदमजी पीरभाई ह्यांची गणना केली पाहिजे. त्यांचें चरित्र जितकें अम्हांस मिळालें आहे तितकें येथें सादर करितों.

हे गृहस्थ गुजराथेंत गोंडाल संस्थानांत धोराजी येथें इ० स० १८४५ च्या आगष्ट महिन्याच्या १३ तारखेस बोहरी कुटुंबांत जन्मले. ह्यांचीं आईबापें जरी घरचीं खाऊनपिऊन बरीं होतीं, तरी त्यांस आपल्या चिरंजीवांस थोडेंसें लिहिण्यावाचण्यापलीकडे कांहीं शिकवितां आलें नाहीं. ते सतरा वर्षांचे झाल्यावर आपण होऊन मुंबईस आले, आणि पोटापुरता धंदा म्हणजे डोक्यावर कटलरी सामान घेऊन फेरीवाल्याचें काम करूं लागले. नंतर कांहीं दिवसांनीं ते एका तंबूच्या कारखान्यांत शिवणकाम करण्याकरितां राहिले. तेथें त्यांस रोज आठचार आणे मिळत असत. पुढें लौकरच त्यांनीं कांहीं सरकारी कामाचीं कंत्राटें घेतलीं आणि तीं चांगल्याप्रकारें पुरीं करून सरकारी अमलदारांची मर्जी संपादिली. इ० स० १८६७ त ते तोफखान्याकडचीं कंत्राटें घेऊं लागले, आणि तेव्हांपासून आजपर्यंत त्या खात्याशीं त्यांचा संबंध होता. इ० स० १८७० त त्यांनीं लष्करास सामान पुरविण्याचें कंत्राट घेतलें. त्यावेळीं तें सामान पुरविण्याची आख्या फत्तेघर आणि जबलपूर ह्या दोन ठिकाणांची असे. म्हणजे ह्या ठिका-

णांच्यासारखें सामान दुसरे कोठें होत नाहीं असा ग्रह होता. असें असतां, ह्यांनीं, विशेषतः तंबू पुरविण्याचें काम इतक्या उत्तम रीतीनें केलें कीं, तेव्हांपासून आजपर्यंत सरकारच्या लष्करास तंबूंचा पुरवठा ह्यांच्याच कारखान्यांतून होत आहे. ह्यांचे तंबू मजबूत आणि टिकाऊ असल्याकारणानें सरकारी अमलदारांस चांगले पसंत पडून, इतर कंत्राटदारांचें ह्यांच्यापुढें कांहीं चालत नसे, आणि लढाईची कोणतीही मोहीम निघाली कीं, तंबूंचें बहुतेक काम ह्यांस मिळे आणि त्यांस त्यांत चांगली कमाई होई. सर रिचर्ड टेम्पल हे मुंबईचे गव्हर्नर असतांना इ० स० १८७८ ह्या वर्षीं सरकारच्या लष्करास पुष्कळ खटाऱ्यांची एकाएकीं गरज लागली. तेव्हां सरकारी कारखान्यांतून लष्करी अधिकाऱ्यांस असें कळविलें गेलें कीं, त्यांजकडून दरमहा फारतर ४०।५० खटारे पुरविले जातील. परंतु एवढ्यानें सरकारची गरज भागेना. तेव्हां ती कामगिरी सरकारानें आदमजी पीरभाई यांस फरमाविली. त्यांनीं २० दिवसांत ५०० खटारे देण्याचें कबूल केलें, आणि अणखी पुष्कळ खटारे लवकरच पाठविण्याचें वचन देऊन थोड्या वेळांत एकंदर ९०० खटाऱ्यांचा पुरवठा केला. त्यांत त्यांस चांगला द्रव्यलाभ झाला, आणि त्यावरून त्यांच्या साहसाची आणि उद्योगाची मोठीच ख्याती झाली. इंग्रजसरकारच्या अमदानीमध्यें आमच्या उद्योगी लोकांस जे कांहीं नवे धंदे चांगल्या प्रकारें करतां येऊं लागून संपत्तिदायक झालेले आहेत, त्यांत सार्वजनिक कामांचीं कंत्राटें घेणें ह्याची गणना आहे. परंतु आदमजी हे केवळ सरकारी कंत्राटें करून स्वस्थ न रहातां त्यांनीं स्वतःचा एक मोठा कातड्याचा कारखाना मुंबईस चालू केला. तसा कारखाना त्या वेळेपर्यंत मुंबईस निघाला नव्हता. त्यांनीं एक कापसाची गिरणीही काढिली. अशा प्रकारें मोठमोठीं कामें

करून आणि त्याचप्रमाणें पुष्कळ धर्मादाय करून ते बडे लोकांत प्रसिद्धि पावले. नंतर सरकारानें त्यांस इ०स० १८९७ च्या डिसेंबरांत मुंबईचे शेरीफ नेमून त्यांचा बहुमान केला.

इ० स० १८८६ ह्या वर्षीं आदमजींनीं ३,२५,००० रुपये खर्चून आपल्या जातीच्या लोकांकरितां एक भव्य आरोग्यगृह मुंबईस धर्मार्थ बांधिलें आहे. ही इमारत ५७५ फूट लांब असून तींत ५२ कुटुंबें चांगल्या प्रकारें रहाण्याची सोय केली आहे. तींत दक्षिणेच्या बाजूस लहानशी सुंदर मशीदही आहे. एक धर्मार्थ दवाखानाही आहे. पहिल्या गाळ्यांत सुमारें १५० पोरकीं बोहरी जातीचीं मुलें रहाण्याची सोय केलेली आहे. त्या मुलांना तेथें अन्नवस्त्र फुकट मिळून त्यांचें पालनपोषण होतें, त्यांना कुराण वाचावयास शिकवून त्याचा अर्थ गुजराथींत सांगतात, आणि मोठमोठे आरबी ग्रंथ पढवितात. या ठिकाणीं मुलांस कलाकौशल्याचेंही चांगलें शिक्षण मिळतें. या ठिकाणीं शिकून तयार झालेली मंडळी मुंबई, कलकत्ता, मद्रास, कोलंबो, रंगून, झांजिबार इत्यादि मोठमोठ्या ठिकाणीं चांगले मोठाले धंदे चालवीत आहेत. आदमजी पीरभाईंचें लक्ष या संस्थेकडे फार असून, त्यांनीं ह्या मुलांच्या कल्याणाकरितां सुमारें ६ लाख रुपये खर्च केले आहेत. शिवाय ह्यांनीं आपल्या जन्माच्या गांवीं म्हणजे धोराजी येथें एक मोठ्या बाजाराचें ठिकाण, पदार्थसंग्रहालय आणि विश्रांतिगृह अशीं उभारिलीं आहेत. इ० स० १८७७, १८८३, १८८८, १८९३, आणि १८९७ ह्या वर्षीं काठेवाडांत दुष्काळ पडला होता तेव्हां ह्यांनीं मोठ्या औदार्यानें आपल्या चिरंजीवांबरोबर रोख पैसा, धान्य, कपडे, औषधें, पाठवून सहस्रावधि अनाथांस साह्य केलें, आणि पुष्कळ गरीबांचे जीव वांचविले.

आदमजी पीरभाई हे लहानपणापासून खरे धर्मनिष्ठ होते. त्यांनीं जीं अनेक धर्मकृत्यें करून ठेविलीं आहेत, त्यांमध्यें एक

विशेष वर्णनीय आहे. तें हें. ते एकंदर चार वेळां मक्केच्या यात्रेस गेले होते, तेव्हां त्यांना आरबस्थानांत वाटेवर असें एक डोंगराळ ठिकाण आढळलें कीं, तेथें आठ दाहा मैलांत पाण्याचा एक थेंब मिळण्याची भ्रांत होती. त्यामुळें मक्केच्या यात्रेकरूंचे अतिशयित हाल होत असत. त्या अरिष्टाचें निवारण करण्याकरितां ह्या गृहस्थांनीं तेथें लाखों रुपये खर्चून एक मोठी धर्मशाळा बांधून तेथल्या उतारूंस बर्फासारखें थंड आणि निर्मळ पाणी व सुग्रास अन्न पाहिजे त्या वेळीं मिळण्याची कायमची व्यवस्था करून ठेविली आहे. हें पुण्यकर्म एकाद्या मोठ्या राजाच्या धर्मकृत्यासारखें दिसतें.

इ० स० १९०७ मध्यें, आदमजी पीरभाई यांचें धर्मौदार्य आणि व्यापारांतलें प्रमुखत्व पाहून त्यांस सरकारनें नाइटची पदवी दिली. तेव्हांपासून हे सर आदमजी पीरभाई झाले. त्या वेळापासून ते फारसे सार्वजनिक कामांत पडत नसत, तरी मुसलमान लोकांच्या राजकीय, धार्मिक आणि विद्याविषयक सुधारणांच्या कामांत ते पुष्कळ लक्ष पुरवीत असत. इ०स० १९०८ ह्या वर्षीं कराची येथें भरलेल्या मुसलमानी शिक्षणपरिषदेचे ते अध्यक्ष झाले होते, आणि त्याच वर्षीं त्यांनीं अलीगड कॉलेजामध्यें शास्त्रीयविषय शिकविण्याची एक प्रयोगशाळा स्थापण्यास एक मोठी देणगी दिली. ह्यांचा शेवटचा कारखाना म्हटला म्हणजे माथेरानची आगगाडी हा आहे.

ह्यांच्या चरित्रापासून सध्याच्या पिढीस पुष्कळ बोध घेण्यासारखा आहे. धंदा करावयास लागल्यापासून त्यांचा एक नियम असा होता कीं, जो काय नफा मिळेल त्याचा चतुर्थांश धर्मकृत्याकडे खर्चावयाचा. हा नियम त्यांनीं अंतकालपर्यंत अखंड चालविला. त्याच्या योगानें त्यांच्या हातून सुमारें ३० । ४० लाख रुपयांचा दानधर्म झालेला आहे. आमचे एक रसिक

मित्र मुंबईतल्या मोहांच्या सुळसुळाटाकडे पाहून तिला मोहमयी असें म्हणत असत, आणि तें एकंदर लोकस्थितीच्या मानानें पाहिलें असतां अगदीं खरें वाटतें. परंतु सर आदमजी पीरभाई ह्या मोहांच्या पाशांत तिळभरही सांपडले नाहींत. ही लहान तपश्चर्या नव्हे. ह्यांना व्यसन असें एकही नव्हतें. त्यांनीं सगळ्या जन्मांत कधीं नाच, तमाशा, बैठक, गाणें अगर दुसरें कोणतेंही चैनीचें ठिकाण पाहिलें नाहीं. त्यांना कामाचा कंटाळा आला म्हणजे ते चर्नीरोडवरील धर्मशाळेंत जात, व तेथें अनाथ मुलांबरोबर व धर्मोपदेशकांबरोबर बोलण्यांत वेळ घालवीत असत. ते जरी अगदीं गरीब स्थितींतून मोठ्या श्रीमंत स्थितीपर्यंत पोहोंचले होते, तरी त्यांचा पोशाख अगदीं साधा असे.

हे गेल्या आगष्ट महिन्याच्या ३१ व्या तारखेस मरण पावले. ह्यांच्या चरित्रापासून एक विशेष बोध घ्यावयाचा तो हा कीं:—

द्रव्यास हे गमनमार्ग यथावकाश
कीं दान भोग अथवा तिसरा विनाश
जो घे न भोग जरि पात्रकरीं न देही
त्याच्या धनास मग केवळ नाश पाहीं.

वामन.

ही साधूंची अत्यंत उपयुक्त बोधवाणी केवळ स्वतःच्या अनुभवानें आणि सांप्रतच्या कालदेशवर्तमानाच्या अवलोकनानें त्यांच्या अंतःकरणांत पक्की बिंबली होती, म्हणूनच त्यांच्या हातून पैशाचा विनियोग दान आणि सात्विक उपभोग ह्या दोन मार्गांकडे अशा उत्तम प्रकारें झाला. असो. ह्यांची प्रपंचयात्रा उत्तम प्रकारची झाली आहे. तेव्हां ह्यांच्या आत्म्यास सद्गति मिळालीच पाहिजे. ह्यांस सहा मुलगे आहेत, त्यांस ह्यांनीं चांगलीं भक्कम भांडवलें देऊन वेगवेगळे धंदे मांडून दिलेले

आहेत. ते ते उत्तम प्रकारें चालवीत आहेत. ते आपल्या तीर्थरूपांप्रमाणेंच भाग्यवान् आणि कीर्तिमान होवोत, असें आम्ही मनापासून इच्छितों.

---

## जगांतील नीतिसंपत्ति.

### ओव्या.

अमोल नीतिसंपत्ति असे भरली या जगतीं
ती साधाया न पडती कांहीं श्रम. १.

भरताची बंधुप्रीति धर्मराजाची स्वजनासक्ती
राधेयाची उदार मती कविश्रेष्ठांनीं वर्णिली. २.

श्रीसमर्थांचा निश्चयो तुकारामांचा देवभावो
कबीराचें धर्मौदार्यो नाना कवींनीं गाइलें. ३.

पीटराची उद्योगनिष्ठा फ्रांकलिनाची निस्पृहता
आलफ्रेडाची सहनशीलता इतिहासांत प्रसिद्ध. ४.

कचविद्यासंपादननिष्ठा सीतादेवीची पतिव्रतता
हरिश्चंद्राची सत्त्वशीलता अद्याप लोक गाताती. ५.

ह्या नीतिसंपदेच्या राशी पुराणीं दिसती ज्ञानदृष्टींशीं
कितीही लुटलिया तयांसी उणें तिळही पडेना. ६.

हें सर्व माणसांचें धन घ्यावयासी शास्त्र प्रमाण
त्यास नलगे पठणश्रवण कोणासही करावया. ७.

कथापुराणें ऐकतां हें सहजचि कळे चित्ता
तदनुरूप जगीं वर्ततां सुख होय अपार. ८.

याचा थोडा अनुभव घ्यावा पुढें उद्योग चालवावा.
धीर कधीं न सोडावा शहाण्यानें. ९.

पूर्वींचिया महात्म्यांनीं मोठ्या औदार्येंकरोनी
ही नीतिसंपत्ति भरोनी ठेविली ग्रंथीं. १०.

असो राजा अथवा रंक त्याची सत्ता पृथक् पृथक्
या संपत्तीवरी निःशंक चालतसे. ११.

ती सर्वांनीं लुटावी तिला थोडी भर घालावी
येणें आपली थोरवी ठेवोनि जावें. १२.

---

### इ० स० १९१५ चें इंग्लंडांतील

## मोठें प्रदर्शन.

## तीन महोत्सवांचें राजकीय स्मारक.

प्रदर्शन हा संस्कृत शब्द फार प्राचीन आहे. त्याचा अर्थ साधारण भाषेंत सामान्यत्वें दाखविणें असा होतो, तो सर्वश्रुत आहेच. परंतु आलीकडच्या पन्नास साठ वर्षांत त्याला एक अगदीं नवा असा अर्थ प्राप्त झाला आहे. त्याची उत्पत्ति मूळ इंग्लंडांत आहे. ती अशी कीं, आपल्या देवलोकवासी बादशाहिणी व्हिक्टोरिया ह्यांचे भ्रतार नामदार प्रिन्स आलबर्ट हे मोठे विद्वान, कल्पक, चतुर, कलाकौशल्यप्रवीण असे असून जगामध्यें कलाकौशल्याची वृद्धि करण्याची इच्छा त्यांस फार होती. त्या संबंधानें त्यांना एकदां असें सुचलें कीं, जगामध्यें वेगवेगळ्या राष्ट्रांत ज्या काय वेगळ्या वेगळ्या आणि उपयुक्त वस्तु उत्पन्न होतात, त्या सगळ्या सर्व ले   एकत्र पहावयास सांपडल्या असतां परकीय वस्तु तयार करण्याविषयीं त्यांचे ठायीं ईर्षा उत्पन्न होऊन, त्यांच्या चढाओढीनें पहिल्यापेक्षां चांगल्या वस्तु सहजीं उत्पन्न होऊं लागतील, आणि ज्या उपयुक्त वस्तु आपल्या देशांत मुळींच उत्पन्न होत नाहींत, त्या वस्तु इतर देशांच्या नमुन्यावर आपल्या देशांतल्या लोकांस तयार करण्यास हुरूप येईल. त्याप्रमाणें त्यांनीं सरकारचें फारसें साह्य न घेतां एक मोठें प्रदर्शन इ. स. १८५१ या वर्षीं लंडन शहरीं 'हाईड पार्क' नामक मोठ्या मैदानांत भरविलें. तें पाहण्यास टिकिटें ठेविलीं होतीं, तरी तो नवा प्रकार अत्यंत लोकप्रिय होऊन त्यास

लक्षावधि लोक गेले आणि त्यापासून जें उत्पन्न झालें त्यांतून खर्च वजा जाऊन निवळ नफ्यासारखे २५०००० रु. राहिले. त्याप्रमाणें अलीकडल्या पन्नास पाऊणशें वर्षांत इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, इत्यादि देशांत अनेक महोत्सवांच्या संबंधानें अनेक प्रकारचीं प्रदर्शनें भरण्याची वहिवाट पडली आहे, आणि त्यांचा उपयोग त्या सर्व देशांस नामदार प्रिन्स आल्बर्ट ह्यांच्या अजमासाप्रमाणें पुष्कळ झाला आहे, आणि त्याच्या योगानें व्यापारवृद्धीस आणि समाजसुधारणेस पुष्कळ भर पडली आहे. इतर वस्तूंप्रमाणें अमेरिकेंत मुलांचींही प्रदर्शनें भरत असून त्यांमध्यें मुलांचें आरोग्य आणि सुशिक्षण ह्यांच्या प्रमाणांच्या मानाप्रमाणें त्यांच्या आईबापांस बक्षिसें देण्याचा परिपाठ ठेवला आहे. तोच ओघ इकडे येऊन ह्या देशामध्येंही लहान मोठीं गुरांचीं आणि शेतकीचीं प्रदर्शनें भरण्याची सुरवात झाली आहे. असें एक मोठें प्रदर्शन इ० स० १९१५ ह्या वर्षी तीन मोठ्या राष्ट्रीय गोष्टींच्या संबंधानें इंग्लंडांत भरावयाचें घाटत आहे. म्हणजे त्या तीन गोष्टींचें हें एक अत्युत्तम स्मारक म्हणून करणार आहेत. त्या तीन गोष्टी म्हटल्या म्हणजे इंग्लंडचा माग्नाचार्टा, वाटर्लूचें महायुद्ध आणि आपले पंचम जार्ज बादशहांचे ज्येष्ठ चिरंजीव नामदार प्रिन्स आफ् वेल्स ह्यांच्या उमरीस एकवीस वर्षें पुरीं होऊन ते कायद्यांत येणें ह्या होत. ह्या तिन्ही गोष्टी आणि विशेषेंकरून पहिल्या दोन गोष्टी इंग्लिश लोकांस अत्यंत महत्त्वाच्या वाटत आहेत. त्यांविषयीं आमच्या तरुण वाचकांस थोडी थोडी तरी माहिती असावी हें आवश्यक आहे, म्हणून ती येथें थोडक्यांत सांगतों.

१. **माग्नाचार्टा**—हे ल्याटिन भाषेंतले शब्द आहेत. ह्याचा अर्थ मोठी सनद असा आहे. मोठी सनद म्हणण्याचें कारण असें कीं, हिच्या बरोबरीची दुसरी एकही सनद पृथ्वींत

दुसरी नाहीं. ही सनद इंग्लंडचा राजा जान हा गादीवर असतांना त्याचें आणि त्याच्या प्रजाजनांचें जमेना म्हणून त्याजपासून त्या प्रजाजनांनीं इ० स० १२१५ च्या जून महिन्याच्या १५ व्या तारखेस घेतली. ती बरीच मोठी आहे आणि तिच्या योगानें इंग्लंडांतील उभय पक्षांच्या अधिकारांचें बंधन उत्तम प्रकारें होऊन मधला लढा अगदीं मोडला आहे, आणि इंग्लिश लोक सांप्रतकाळीं जें उत्तम प्रकारचें व्यक्तिस्वातंत्र्य उपभोगीत आहेत, तें आपण ह्या सनदेनें आपल्या प्रभूपासून मिळविलें आहे असा मोठा अभिमान त्या लोकांस वाटत आहे. तो अगदीं यथार्थ आहे. त्या स्वातंत्र्याचा मूळ पाया ही सनद आहे. त्या सनदेमध्यें अनेक कलमें आहेत. त्यांत मुख्य हीं आहेतः—"कोणत्याही मनुष्यास, विनाकारण, कायद्याविरुद्ध, तुरुंगांत टाकूं नये, त्याची जिनगी जप्त करूं नये, किंवा त्याला कायद्याच्या रक्षणाबाहेर टाकूं नये; न्यायाचा विक्रय होऊं नये; न्यायास उशीर होऊं नये किंवा तो कोणास मिळेनासा होऊं नये; लोकांच्या सल्ल्यावांचून नवे कर बसवूं नयेत; अपराध्यांस शासन व्हावयाचें तें त्यांच्या बरोबरीच्या लोकांच्या अनुमतावांचून होऊं नये; वजनें आणि मापें बरोबर ठरवून टाकावीं; आणि लढाईचा प्रसंग खेरीज करून, व्यापाऱ्यांस, पाहिजे तेव्हां देशांत येण्यास किंवा देशाबाहेर जाण्यास परवानगी असावी."

इ० स० १८५८ ह्या वर्षीं बंड मोडल्यावर महाराणी व्हिक्टोरिया ह्यांनीं जो मोठा जाहीरनामा हिंदुस्थानच्या लोकांस प्रगट केला, तो आम्हा हिंदी लोकांस माग्नाचार्टाप्रमाणेंच मोठ्या महत्त्वाचा वाटतो. कां कीं, त्यांतलीं अभिवचनें हीं आमच्या कल्याणास आजपर्यंत पुष्कळ साधनीभूत झालीं आहेत, आणि यापुढें आणखीही होतील अशी आशा आहे.

**२. वाटर्लूचें महायुद्ध**—नेपोलियन बोनापार्ट हा अत्यंत पराक्रमी फ्रेंच बादशहा कांहीं दिवसपर्यंत सगळ्या युरोपास भारी होऊन बसला होता, आणि सगळीं राष्ट्रें त्याला थरथरां कांपत होतीं. त्याचा बंदोबस्त करण्याकरितां इतर राष्ट्रांनीं आपआपलीं सैन्यें सिद्ध केलीं, आणि त्या सगळ्यांचें प्रमुखत्व हिंदुस्थानांत पूर्वींच प्रसिद्धीस आलेला इंग्लिश सरदार आर्थर वेलस्ली ह्यास म्हणजे जो ह्या वेळेस ड्यूक ऑफ् वेलिंग्टन झाला होता, त्यास दिलें. ह्या सुमारच्या स्पेनमधल्या त्याच्या पराक्रमांचें जें वर्णन केलें आहे, त्यांत एके ठिकाणीं सांगितलें आहे कीं, "सहा आठवड्यांत, बरोबर सुमारें एक लक्ष सैन्य घेऊन ड्यूक आफ् वेलिंग्टन हा ६०० मैलांची मजल करून गेला, तींत मोठमोठ्या ६ नद्या त्यानें ओलांडल्या, दोन मोठ्या लढाया मारून जय मिळविले, दोन किल्ल्यांना वेढे घालून ते घेतले, आणि १,२०,००० फ्रेंच लोकांस स्पेन आणि पोतुर्गाल ह्या द्वीपकल्पांतून हांकलून दिलें." ह्या त्याच्या पराक्रमाबद्दल त्याला ड्यक ही पदवी सरकारांतून मिळाली होती. ह्यानंतर नेपोलियन बोनापार्ट हा फ्रान्सच्या गादीवरचा आपला हक्क सोडून इतर राष्ट्रांस शरण आला, आणि त्यांनीं त्याला एलबा बेटांत नेऊन ठेविलें. परंतु तो पुढें तेथून पळाला, आणि फ्रान्समध्यें येऊन त्यानें मोठें सैन्य जमवून पुनः लढाईची तयारी केली. त्याची व ड्यूक ऑफ् वेलिंग्टनच्या हाताखालीं दिलेल्या संयुक्त सैन्याची मोठी लढाई बेलजममध्यें वाटर्लू येथें इ० स० १८१५ च्या जून महिन्याच्या १८ व्या तारखेस झाली. तेव्हां नेपोलियनकडे एक लक्ष पायदळ व २५ हजार स्वार आणि ३५० तोफा होत्या; आणि ड्यूक आफ् वेलिंग्टनकडे अवघें ७६००० सैन्य होतें, तरी नेपोलियनचा अगदीं पराभव होऊन, ड्यूक ऑफ् वेलिंग्टन यास

अप्रतिम जय मिळाला. तेव्हां सगळ्या युरोपचा जीव खालीं पडला, आणि सर्व राष्ट्रांनीं त्याचे फार फार आभार मानिले. हें यश खरोखर अप्रतिम होतें.

**३. तिसरी गोष्ट**—म्हणजे आपल्या बादशहांचे ज्येष्ठ चिरंजीव नामदार प्रिन्स ऑफ वेल्स, यांस इ० स० १९१५ ह्या वर्षी २१ वर्षें पुरीं होऊन ते कायद्यांत येणार ही होय. हीही मोठ्या महत्त्वाची आहे. कां कीं, हे आपले भावी बादशहा आणि पालनकर्ते व्हावयाचे आहेत. तेव्हां ह्यांस विश्वंभरानें आयुरारोग्य विपुल देऊन प्रजाहिताविषयीं ह्यांचे ठायीं ह्यांच्या तीर्थरूपांप्रमाणेंच निरंतर कल्याणीबुद्धि ठेवावी, अशी विश्वंभराची प्रार्थना करण्यास ही वेळ अत्यंत युक्त आहे. ह्यांचें आरमारासंबंधाचें शिक्षण पूर्ण झालें आहे. ते आतां आक्सफोर्ड येथें राहून, तेथला शिक्षणक्रम पुरा करून सगळ्या इंग्रजी राज्याची प्रत्यक्ष माहिती करून घेण्यासाठीं एक वर्षभर सफरीवर निघणार आहेत. तींत त्यांना त्यांच्या भावी प्रजाजनांसंबंधाचें चांगलें ज्ञान होऊन, एकंदर राज्याचें हित होईल ह्यांत शंका नाहीं.

ह्याप्रमाणें ह्या तीन महामंगल कार्यांच्या स्मरणार्थ हें प्रदर्शन व्हावयाचें आहे. हें परमेश्वरकृपेनें उत्तम प्रकारें सिद्धीस जाऊन, जगाच्या हितवृद्धीस साधनीभूत होवो, असें आम्ही इच्छितों.

---

## पोलाद.

मनुष्यजातीला जंगली अवस्थेंतून निघून हल्लींच्या सुधारणेच्या अवस्थेप्रत येण्यास लोखंडाचा जितका उपयोग झाला आहे, तितका दुसऱ्या कोणत्याही धातूचा झालेला नाहीं. कारण ह्या धातूच्या योगानें मनुष्यास इतर सर्व पदार्थ कापतां

आणि तोडतां येऊन त्यांस वाटेल तें स्वरूप देतां आलें आणि आपलीं सुखाचीं साधनें वाढवितां आलीं. ह्या कामीं मनुष्यास नुस्त्या लोखंडापेक्षां पोलाद जास्त उपयोगीं पडलें आहे. कारण तें हिऱ्याइतकें कठिण करतां येतें, किंवा पत्रे करण्याइतकें, किंवा केंसासारखी बारीक तार काढण्याइतकें नरमही करतां येतें. ह्या त्याच्या गुणांचा मनुष्यानें पूर्ण उपयोग करून घेतला आहे.

पोलाद म्हणजे ज्यांत कार्बान (शुद्ध कोळसा) अगदीं सूक्ष्म परिमाणानें मिसळलेला आहे, असें लोखंडच होय. कार्बान पुष्कळ प्रमाणानें मिसळलेलें असतें, त्या लोखंडास बीड म्हणतात, आणि तें प्रमाण विवक्षित प्रमाणानें अगदीं कमी झालें म्हणजे त्याचेंच पोलाद होतें. बीड फार ठिसूळ असतें, आणि त्याचे जिन्नस ओतून तयार करावे लागतात. हातोड्याखालीं तें टिकत नाहीं. ज्यांत कार्बान मुळींच नाहीं, तें शुद्ध लोखंड होय. तें नरम असून घनवर्धनीय म्हणजे हातोड्यांनीं ठोकून पत्रे करण्यासारखें असतें. पोलादही घनवर्धनीय असतें, परंतु त्याच्या अंगीं कठिणपणा फार असतो.

पोलादांत कार्बान शेंकडा $\frac{3}{4}$ पासून २$\frac{1}{2}$ भागांपर्यंत असतो. कार्बान जितका जास्त तितका पोलादाचा कठिणपणा जास्त, परंतु वरील मर्यादेबाहेर कार्बानचें प्रमाण गेलें कीं त्याचा ठिसूळपणा फार वाढतो, आणि मग तें बीड होतें. त्याचप्रमाणें पोलादांत जितका कार्बान जास्त तितकें तें लवकर वितळतें.


पोलादांत सिलिकान, मँगानीज, गंधक, फास्फरस, इत्यादि पदार्थही सूक्ष्म प्रमाणानें असतात. परंतु त्यांच्या योगानें त्याच्या अंगचे चांगले गुण कमी होतात, आणि म्हणून ते त्यांतून काढून टाकण्याची तजवीज करावी लागते. हे बाह्य पदार्थ जुन्या पद्धतीप्रमाणें लोणारी कोळशांनीं तयार केलेल्या लोखंडाच्या

पोलादांत अगदीं नसून, नवीन पद्धतीच्या दगडी कोळशांच्या भट्टींत गाळलेल्या लोखंडाच्या पोलादांत मात्र असतात. कारण दगडी कोळशांच्या अंगभूत ते पदार्थ असल्याकारणानें ते त्या पोलादांत भिनतात. पोलादांतील हीं अशुद्ध द्रव्यें सर्वस्वी अशीं काढून टाकतां येत नाहींत, म्हणून ह्या सुधारलेल्या विसाव्या शतकांतही जुन्या पद्धतीनें तयार केलेलें पोलाद शस्त्रें आणि नाजूक हत्यारें बनविण्याच्या कामीं जास्त पसंत करितात.

पोलाद तयार करण्याच्या रीति दोन तीन आहेत. एक रीत अशी आहे कीं, चांगलें शुद्ध लोखंड घेऊन त्याच्या कांबी एका विवक्षित जातीच्या लोणारी कोळशांच्या थरांमध्यें पुरून ठेवून, त्या सगळ्याला आठ दहा दिवसपर्यंत चांगली आंच द्यावयाची, आणि मग तें सगळें आठ दहा दिवस निवूं देऊन त्या कांबी बाहेर काढावयाच्या. ह्या कृतीनें भोंवतालच्या कोळशांतला कार्बान त्या कांबींत शिरतो. तो कसा शिरतो त्याचा अद्याप कोणाला पत्ता लावतां आला नाहीं. परंतु तो शिरतो ह्यांत संशय नाहीं. कांबी बाहेर काढल्या म्हणजे त्या कांबींवर जिकडे तिकडे पोपडे उठलेले दिसतात. त्यांवरून त्या कांबींत कोठपर्यंत किती कार्बनचा शिरकाव झाला आहे तें समजतें. हा शिरकाव सर्वत्र सारखा झालेला नसतो. तो सारखा व्हावा म्हणून, त्या कांबींचे तुकडे पाडून मोठाल्या मुशींत घालून गाळतात, आणि त्या मुशींतल्या रसांत आक्साइड ऑफ् मँगानीज आणि फेरोसायनाईड ऑफ् पोट्याशम हे पदार्थ थोडथोडे घालून, त्याच्या कांबी ओतितात. ह्याप्रमाणें तयार केलेलें पोलाद चांगल्यापैकीं समजतात. ह्यास ओतींव पोलाद म्हणतात. ह्या कृतींत, मुशींतल्या रसांत मिळवलेल्या दोन पदार्थांचें त्या रसावर कार्य काय होतें तें अद्याप बरोबर समजलेलें नाहीं. कांबींचे तुकडे मुशींत घालून

वर सांगितल्याप्रमाणें गाळण्याच्या बदला ते एकत्र बांधून तापवून लाल करितात, आणि यंत्रानें चालणाऱ्या घणांनीं खूब बडवितात. ह्या रीतीनेंही त्या कांबींत भिनलेला कार्बान सर्वत्र सारखा शिरून साधारण प्रकारचें पोलाद तयार होतें, परंतु तें ओतींव पोलादाइतकें चांगलें नसतें.

पोलाद करण्याच्या सदरील कृतीची आणखी अशी एक विशेष गोष्ट आहे कीं, लोखंडी पदार्थांच्या विवक्षित भागांतही पोलादाचे गुण आणतां येतात. उदाहरणार्थ कुऱ्हाड सगळीच पोलादी असली पाहिजे असें नाहीं. तिच्या धारेकडची बाजू पोलादी असली म्हणजे पुरे. तेवढीच बाजू कोळशांत पुरून पोलादाची करतां येते. लढाऊ आगबोटी मढवावयाच्या लोखंडी पत्र्यांची एकच बाजू लोणारी कोळशांत बसवून तापवितात, आणि मग त्या बाजूवर थंड पाण्याच्या धारा सोडतात. म्हणजे ती बाजू तेवढी तोफेच्या गोळ्यांस अटकाव करण्यासारखी कठिण होऊन आंतल्या बाजूस चिवट लोखंड राहतें.



बेसेमर कन्व्हर्टर.

दुसरी एक रीत आहे, तिला 'बेसेमर प्रोसेस' असें नांव आहे. ती बेसेमर नांवाच्या मनुष्यानें काढली म्हणून हें नांव तिला पडलें आहे. तिच्या योगानें, सदरील रीतीच्या पोलादाच्या दशांश खर्चांत, रेलवेचे रूळ, गाड्यांचीं चाकें, बायलरचे पत्रे, इत्यादि कामांसाठीं उपयोगीं पडण्यासारखें साधारण प्रतीचें पोलाद तयार करितां येतें. ह्या कृतीकरितां चंबूच्या आकाराचें

एक भक्कम पात्र लागतें. त्यास 'बेसेमर कन्व्हर्टर' म्हणतात त्याची आकृति मागच्या पानावर दिली आहे. त्याच्या आंतल्या अंगास उष्णतेनें न वितळणाऱ्या अशा पदार्थांचा थर दिलेला असून त्याच्या बुडांत भोंकें पाडलेले मातीचे ठोकळे बसविलेले असतात, आणि त्या भोंकांतून वारा अतिशयित जोरानें सोडण्याची व्यवस्था यंत्रांनीं चालणाऱ्या भात्यांच्या योगानें केलेली असते. पहिल्याप्रथम ह्या पात्राच्या आंतल्या बाजूचा थर, त्यांत लोणारी कोळसे पेटवून तांबडा लाल करितात, आणि मग तें कलतें करून, त्याच्या तोंडांतून त्यांत बिडाचा रस ओतितात, आणि नंतर तें पुनः उभें करतात. त्याबरोबर तळांतल्या भोंकांतून मोठ्या वेगानें वर चढत असलेल्या वाऱ्याच्या धारा त्या बिडाच्या रसांतून घुसून वर येऊं लागतात, आणि त्यांतला आक्सिजन त्या बिडांतल्या कार्बानाशीं संयोग पावूं लागून त्या पात्राच्या तोंडांतून भयंकर ज्वाला निघूं लागतात. ह्या ज्वालांतून ठिणग्यांचाही पाऊस पडत असतो, आणि मेघगर्जनेसारखा मोठा ध्वनि निघत असतो. ह्या ज्वाळांचा लोट सुमारें दाहा मिनिटें वाढत जाऊन पुढें आणखी दाहा मिनिटांनीं कमी होऊं लागतो. ह्याचा अर्थ असा समजतात कीं, त्या बिडाच्या रसांतला कार्बान सगळा जळून जाऊन खुद्द लोखंडच जळूं लागलें आहे. ह्या कृतींत, नवीन उष्णता लावल्याशिवाय त्या 'कन्व्हर्टर' मधला बिडाचा रस अत्यंत तप्त स्थितींत कसा ठेवतां येतो, अशी साहजिक शंका निघते. तिचें उत्तर असें आहे कीं, त्या रसांतून घुसणाऱ्या हवेंतला आक्सिजन आणि त्या रसांतला कार्बन ह्यांच्या संयोगापासून उत्पन्न होणाऱ्या उष्णतेनेंच तो रस तप्त स्थितींत राहातो. लोखंड जळूं लागतांच वारा बंद करून त्या रसांत 'स्पीजेलीसेन' नांवाचें, मॅंगानीज व पुष्कळ कार्बान मिळविलेलें लोखंड असतें, त्याचा रस करून

विवक्षित प्रमाणानें ओतितात. त्यासरसा मोठा कडकडाट होऊन त्या पात्राच्या तोंडांतून एक प्रचंड निळी ज्वाळा बाहेर पडते, आणि त्यांतल्या रसाचें पोलाद बनतें. मग तो रस ओतून त्याच्या कांबी, पाटे, वगैरे बनवितात. ह्याप्रमाणें बनविलेल्या पोलादांत फास्फरसचा थोडासा अंश राहातोच, आणि त्यामुळें त्याचीं धारेचीं हत्यारें, करवती, कानशी वगैरे चांगलीं होत नाहींत; त्यांस लवकर खांडी पडतात.

बीसेमरप्रमाणें अलीकडे सीमेन्स–मार्टिन नांवाची एक नवीन कृति निघाली आहे. तिनें उंची प्रकारच्या बिडाच्या रसांत चांगल्या लोखंडाचे तुकडे आणि ‘फेरो–मँगानीज’ घालून कार्बानचें प्रमाण बरोबर आणून ठेविलें म्हणजे, त्या बिडाचें पोलाद होतें.

वर पोलाद तयार करण्याच्या निरनिराळ्या अर्वाचीन कृतींची साधारण कल्पना येण्यासाठीं ठोकळ माहिती सांगितली आहे. शास्त्रीय पद्धतीची सुसंगत माहिती मराठींत सुलभ रीतीनें देणें बहुतेक अशक्यच आहे.

पोलादाची किंमत त्याला दिलेल्या पाण्यावर अवलंबून असते. पाणी देऊन त्याच्या अंगीं हवा तितका कठिणपणा आणतां येतो. शेंकडा १/२ भाग आणि जास्त कार्बान ज्यामध्यें आहे, असें पोलाद तांबडेंलाल होईपर्यंत तापवून एकदम पाण्यांत बुडविलें म्हणजे तें त्यांतल्या कार्बानच्या मानानें कठिण होतें; परंतु त्याबरोबरच तें ठिसूळही होतें. हा ठिसूळपणा घालविण्यासाठीं तें पुनः विवक्षित रंग येईपर्यंत वरचेवर तापवून निववावें लागतें. ही हत्यारांस पाणी देण्याची निराळी विद्या आहे, आणि ती ज्यांस येत असते ते चांगला पैसा कमावितात. शस्त्रक्रियेचीं हत्यारें, पितळ कापण्याचीं हत्यारें, चाकू, कातऱ्या, सुताराचीं हत्यारें, घड्याळांच्या कमानी, इत्यादिकांना निरनि-

राळ्या तऱ्हेचें पाणी लागत असतें, ह्यावरून ही विद्या किती कठिण असली पाहिजे तें लक्षांत येईल.

---

## स्फुट.

**लॉर्ड लिस्टर यांचें धैर्य.**—हे एक नामांकित धन्वंतरी इंग्लंडांत होऊन गेले. त्यांची अशी एक मोठ्या धाडसाची गोष्ट सांगतात कीं, एडिंबरो येथें त्यांस सर्जरीचे प्रोफेसर नेमल्यावर महाराणी व्हिक्टोरिया यांस मोठें गळूं झालें होतें, तें फोडण्यास बालमोरल राजवाड्यामध्यें त्यांस बोलावून आणिलें. त्यांनीं तें फोडिलें व त्याचा निचरा होण्याकरितां, त्यांनीं त्याच्या छिद्रांत क्यारबोलिक लिंटची वात घालून ठेविली. परंतु त्या वातीनें व्हावा तसा उपयोग झाला नाहीं, आणि गळूं फारच दुखूं लागून महाराणीसाहेबांस पुष्कळ ज्वर आला. हें पाहून ते मोठ्या काळजींत पडले, आणि पुढें काय करावें हें त्यांस सुचेना. अशा प्रसंगीं एकांतांत जाऊन विचार करण्याचा त्यांचा परिपाठ होता, त्याप्रमाणें राजवाड्याच्या बाहेरच्या बगीचांत ते आले, आणि विचार करीत करीत फिरत राहिले. तेव्हां, त्यांस असें सुचलें कीं, हा निचरा होण्यास रबराच्या बारीक नळीचा लहानसा तुकडा फार उपयोगीं पडेल. असें मनांत आलें खरें, परंतु हा पहिला प्रयोग महाराणीसरकारसारख्या मोठ्या माणसाच्या अंगावर व्हावयाचा आहे, तेव्हां तो एकाएकीं करावा कीं न करावा असें भय वाटणें कोणाही मनुष्यास स्वाभाविक होतें, पण ह्याविषयीं त्यांच्या मनांत तिळभरही शंका न येतां, त्यांनीं तो एकदम केला. त्याच्या योगानें इष्ट कार्य झालें व राणीसाहेबांस

---

१ ह्यांचें चरित्र इ. स. १९११ च्या आगष्ट महिन्याच्या बालबोधांत दिलें आहे.

पुष्फळ आराम वाटला. ह्यावरून आपल्या स्वतःच्या विचारांवर त्यांचा केवढा भरंवसा होता, हें चांगलें दिसून येतें. तेव्हांपासून असा निचरा करण्याच्या कामांत, रबराच्या नळ्यांचा उपयोग करूं लागले आहेत. विद्वान मनुष्याची बुद्धि जशी प्रगल्भ होते, तसा त्याचा स्वतःवरचा भरंवसाही वृद्धि पावत जातो. ह्यालाच धैर्य ह्मणतात.

**उद्योग.**—नामांकित विद्वान उद्योगी तत्त्ववेत्ता बेंजामिन फ्रांकलिन हा अमेरिकेहून इंग्लंडास गेला, तेव्हां त्यानें आपल्या बरोबर एक चाकर नेला होता. तो जातीचा सिध्धी होता. त्याला समागमें घेऊन बेंजामिन फ्रांकलिन हा बहुतेक सगळ्या इंग्लंडभर फिरला. तो परत लंडनास आल्यावर त्याला बेंजामिनानें विचारिलें कीं, "तूं जें काय ह्या देशांत पाहिलेंस, त्यांत तुला विशेष काय वाटलें?" त्यास त्यानें उत्तर दिलें, "इंग्लंड हा देश फार चमत्कारिक आहे. त्यांत मला सगळा उद्योग दिसला. उद्योगाशिवाय कोणीही राहात नाहीं. पाणी, धूर, घोडे, बैल, कुत्रे, मुलें, बायका, पुरुष हीं सगळीं नेहमीं उद्योगांत गुंतलेलीं असतात. कांहींएक उद्योग न करितां नुसतें खाऊन पिऊन स्वस्थ राहतात, त्यांना जर संभावित गृहस्थ म्हणायाचें आहे, तर तशीं येथें डुकरें मात्र आहेत." आमच्यांतले जे कोणी गृहस्थ इंग्लंडास जाऊन आले आहेत, ते सगळे असेंच सांगतात. नामांकित इंग्लिश ग्रंथकार स्माईल्स ह्यानें आपल्या ग्रंथांत एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, आपलें कर्तव्य करावयाचें त्यांत कमी पडूं द्यावयाचें नाहीं, हें ज्यांचें ध्येय आहे, त्या वस्तु सजीव असोत किंवा निर्जीव असोत, त्यांची गणना सरसकट सभ्यगृहस्थ ह्या वर्गांत करावी. म्हणजे कर्तव्यदक्षतेवरून निर्जीव पदार्थांनीं सजीवांची बरोबरी केली आहे, असें झालें. हा गुण देशांत

वाढत जाणें हें उन्नतीचें एक मोठें लक्षण आहे. हा आमच्या देशांत वाढो.

**गृहस्वामी व गृहस्वामिनी ह्यांचीं कर्तव्यें.**—सौ. काशीबाई कानिटकर ह्यांनीं आपल्या एका व्याख्यानांत म्हटलें आहेः—

"गृहस्वामी व गृहस्वामिनी ह्या दोघांचें कर्तव्य जर पाहिलें, तर आपण स्वतः शुद्धाचरणी, परोपकारी, निरलस, स्वार्थत्यागी, असें होऊन त्यासारखें आपल्या मुलांबाळांना बनविणें, आपल्या उदाहरणानें शेजाऱ्यांना चांगलें वळण घालून देणें, आपल्या विनयी स्वभावानें उद्धटांना नम्र करणें, आपल्या स्वार्थत्यागाच्या उदाहरणानें लोभी माणसांचा लोभ कमी करणें, आपल्या शांत स्वभावानें क्रोधी माणसांचा क्रोध घालविणें, इत्यादि गोष्टी साधणें हें गृह मांडून रहाणाऱ्या दंपत्याचें कर्तव्य आहे, असें माझें मत आहे. जो आपण चांगला होऊन आपल्या कुटुंबाला व आपल्या सभोंवतालच्या एकंदर लोकांना चांगलें वळण लावतो, तोच जगाच्या प्रगतीच्या कामीं उपयोगीं पडला, त्यानेंच परमेश्वराचें अंशतः काम केलें. तोच खरा गृहस्वामी व तीच खरी गृहस्वामिनी होय." गृहस्थाश्रमाच्या धन्यतेची ही परमावधि आहे. ही साधणें ही एक मोठी तपश्चर्या आहे. घरांत झालेला स्वयंपाक घरांतल्या माणसांना पुरून उरण्यासारखा असला तर त्यांत पाहुण्यांची सोय व्हावयाची, त्याच न्यायानें पूर्वोक्त गुण गृहस्वामी व गृहस्वामिनी ह्यांचे ठायीं ओतप्रोत असले तरच त्यांच्या प्रभावानें ते गुण त्यांच्या समागमानें इतरांस प्राप्त होतात, एरव्हीं होत नाहींत. ह्यासाठींच शेजारपाजार चांगला पाहून शहाणे लोक वस्ती करीत असतात.

# लोक काय बोलतात.

श्रीमंत सयाजीराव महाराज ह्या महिन्यांत युरोपांतून हिंदुस्थानांत परत येणार आहेत.

---

हिंदुस्थानांत सन १९१२ सालीं सुमारें साडेचार कोटि रुपयांचा दगडी कोळसा निघाला, आणि सोनें तीन कोटि रुपयांचें निघालें.

---

एकंदर सर्व देशांतल्या आगगाड्यांच्या रस्त्यांवर १३५०० कोटि रुपये खर्च झाले आहेत; पैकीं १९५० कोटि रुपये इंग्लंडांत खर्चले आहेत.

---

मेक्झिकोचें युनैटेड स्टेट्सशीं वांकडें आल्यासारखें झालें आहे. युनैटेड स्टेट्स आपल्या राज्यकारभारांत हात घालूं पाहात आहे असें मेक्झिकोचें म्हणणें आहे.

---

शेट दादाभाई नौरोजी ह्यांचा ८९ वा वाढदिवस गेल्या महिन्याच्या ४ थ्या तारखेस झाला. ते आतां वेसावा येथें अगदीं स्वस्थपणें राहात आहेत. त्यांस ईश्वर शतायु करो.

---

नॅन्‌किंन हें मोठ्या मजबूत तटबंदीचें शहर चिनी बंडवाल्यांच्या हातीं होतें तें युआनशिकायच्या फौजेनें सर केल्यामुळें चिनांतलें बंड आतां सपशेल मोडेल असें म्हणतात.

---

चालू सालच्या पहिल्या साहामाहींत युनैटेड स्टेट्समधल्या शिकागो शहरांत एक लक्ष बासष्ट हजार पौंड किंमतीच्या ५४० मोटारगाड्या चोरीस गेल्या. ह्यांपैकीं ४७० गाड्यांचा पत्ता लागला, परंतु ह्या चोऱ्यांच्या संबंधानें फक्त १५ च माणसांस शिक्षा झाल्या !

---

खारें पाणी भरलेल्या मोठाल्या कांचेच्या टांक्यांत मासे सोडलेले असतात असें एक प्रशस्त मत्स्यसंग्रहालय मुंबईस बांधण्याचा विचार चालला आहे. असें एक संग्रहालय मद्रासेस असून माशांच्या जीवनक्रमाची माहिती होण्यास त्याचा पुष्कळ उपयोग होत आहे.

---

तुर्कस्थान आणि बल्गेरिया ह्यांचा तह झाला आहे, आणि त्यांत तुर्कस्थानाच्या सुलतानसाहेबांच्या इच्छेप्रमाणें आद्रियानोपल हें तुर्कांच्याच अमलांत ठेवलें आहे. आद्रियानोपल शहरांतील सर्व धर्मांच्या लोकांस तुर्कसरकारचाच अंमल सुखावह वाटत आहे.

---

कुचबिहारच्या महाराजांस तारीख १ सप्टेंबर रोजीं विलायतेस देवाज्ञा झाली. ह्यांस औरस पुत्र नसल्याकारणानें कुमार जितेंद्र, महाराज गायकवाडसरकार ह्यांचे जामात, हे कुचबिहारच्या गादीवर बसतील. हे इकडे येण्यास निघाले आहेत. हें संस्थान १३०७ चौरसमैलांचें असून, त्याची लोकसंख्या ६ लाख आणि उत्पन्न २३ लाख रुपये आहे.

---

तारयांचीं विमानें दिवसानुदिवस पक्कदशेस येत चाललीं आहेत. ह्या कामीं फ्रान्स देशानें पुढाकार घेतला आहे. अशा विमानांत बसून वर गेल्यानंतर तें उलथें पालथें करून चालविणें, तीन तीन हजार फूट उंचीवर असतांना गोलांट्या घेणें, घारीप्रमाणें सरळ उभें झपाट्यानें खालीं येणें, अशा आश्चर्यकारक गोष्टी फ्रेंच वैमानिक करून दाखवूं लागले आहेत.

---

धातूच्या पात्रांत त्याला लागून बारीक पदार्थ ठेविलेला असला तर तो पुष्कळ अंतरावरून विजेच्या तरंगांच्या योगानें उडवण्याची युक्ति निघाली आहे. तिच्या साह्यानें, आतां, बंदरांच्या तोंडाशीं वगैरे बुडवून ठेविलेले टार्पिडो शत्रूंच्या तारवांस लांब अंतरावरून उडवून देतां येतील एवढेंच केवळ नव्हे, तर दारूगोळा भरलेलीं लढाऊ तारवेंच्या तारवेंही उडवून देतां येतील.

---

मुंबईत अलीकडे बांधलेल्या बऱ्याच नव्या इमारतींस मोठाल्या भेगा जाऊन त्या इमारती निरुपयोगी ठरत आहेत. येथील सालकाज कोर्टाकरितां नवी इमारत बांधीत आहेत, त्या मुदतींत तें आज दोन तीन

वर्षें दुसऱ्या एका नवीन इमारतींत भरत होतें, त्या इमारतीस भेगा जाऊन कोर्टास दुसरीकडे जावें लागलें आहे. लायक इंजिनेरांच्या देखरेखीखालीं बांधलेल्या इमारतींची अशी अवस्था कां होते, ह्याची चौकशी झाली पाहिजे.

---

चीनदेशांत शांघाय शहराजवळच्या एका डोंगरावर दोन तीन महिन्यांपूर्वीं एका माणसाचा पाय एका भोंकांतून बाहेर आलेला दिसला. तेथें जाऊन पाहातां एक मनुष्य तेथल्या जमिनीखालील पोकळींत पडलेला असून,कण्हत आहे असें दिसून आलें. त्या पोकळीच्या सभोंवार पक्का खडक असल्यामुळें तो मनुष्य आंत कसा गेला असावा ह्याची कोणास कल्पना होईना. आपणांस सैतानानें आंत आणून टाकलें असें तो मनुष्य म्हणे! शेवटीं त्याला तो खडक फोडून बाहेर काढावें लागलें! चमत्कार!

---

लार्ड किचनेर ईजिप्तसरकारचे सल्लागार आहेत, त्यांनीं अलिकडे तेथल्या राज्यव्यवस्थेंत असा एक फेरफार केला आहे कीं, जनरल असेंब्ली आणि कायदेकौन्सील म्हणून ज्या दोन सभा तेथें वेगळ्या वेगळ्या होत्या त्या एक केल्या आहेत आणि या एका सभेला कायदेकौन्सिल असेंब्ली असें नांव दिलें आहे. ह्या नव्या एका सभेंत एकंदर सभासद ८९ आहेत, त्यांपैकीं ६६ लोकनियुक्त आहेत, आणि २३ सरकारानें नेमलेले आहेत. पूर्वीं गांव लहान असो किंवा मोठा असो, त्यांतला एक एक मनुष्य सरसकट निवडला जात असे. परंतु, ह्या नवीन व्यवस्थेंत गांवाच्या किंवा शहराच्या लोकसंख्येच्या मानानें मेंबरांची निवड व्हावयाची आहे. हें फार चांगलें आहे.

---

पनामा कालव्याच्या सुरवातीच्या स्मरणार्थ म्हणून युनैटेड स्टेटसच्या पश्चिम किनाऱ्यावरील सान् फ्रान्सिस्को शहरांत सन १९१५ सालीं एक प्रचंड प्रदर्शन भरविण्याची तयारी होत आहे. हें तयार करण्याच्या कामीं २४ कोटि रुपये खर्च व्हावयाचे आहेत, ह्यावरून त्याच्या अलौकिक मोठेपणाची कल्पना होईल. ह्या शहराजवळ ४५० चौरस मैल

विस्ताराचीं, सर्व राष्ट्रांचीं सगळीं आरमारें सहज राहातील एवढी एक खाडी आहे. तींत प्रदर्शनाच्या वेळीं निरनिराळ्या राष्ट्रांचीं दीडशें लढाऊ तारवें हजर राहणार आहेत. त्याच वर्षी इंग्लंडांतही एक मोठें प्रदर्शन व्हावयाचें आहे, म्हणून ह्या प्रदर्शनांत इंग्लंडाचे पदार्थ यावयाचे नाहींत म्हणतात.

---

**महाराष्ट्रसाहित्यपरिषद**—ह्या नांवाची एक संस्था महाराष्ट्रांतील विद्वान आणि थोर लोकांनीं आलीकडे स्थापित केली आहे. तिचा उद्देश मराठी भाषा व साहित्य यांची उन्नति, विस्तार, व व्यासंग वाढविणें हा आहे. या संस्थेस जे कोणी एक हजार रुपये देतील, ते तिचे आश्रयदाते होतील, व १०० रुपये देतील ते तहाहयात सभासद होतील, व ३ रुपये देणारे साधारण सभासद होतील. ह्या संस्थेच्या वतीनें **महाराष्ट्रसाहित्यपत्रिका** म्हणून दरमहा १२ पृष्ठें गेल्या जुलै महिन्यापासून विविधज्ञानविस्तारांत येऊं लागलीं आहेत. ही योजना फार चांगली आहे. ह्या संस्थेचे अध्यक्ष रावबहादुर विष्णु मोरेश्वर महाजनी एम., ए., असून उपाध्यक्ष खालील गृहस्थ आहेत:—

| | |
|---|---|
| डॉ. सर. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, एल्. एम्. | मुंबई. |
| डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख, एम्. डी., बी. एस् सी. | ” |
| रा. रा. दामोदर गणेश पाध्ये, एम्. ए. | ” |
| रा. रा. हरि नारायण आपटे. | पुणें. |
| रा. रा. रघुनाथ पांडुरंग करंदीकर. | सातारा. |

## चिटणीस.

| | |
|---|---|
| रा. रा. वासुदेव गोविंद आपटे, बी. ए. | पुणें. |
| रा. सा. रामकृष्ण रघुनाथ मोरमकर, | मुंबई. |

## खजीनदार.

| | |
|---|---|
| रा. रा. भास्कर महादेव पंडित. बी. ए. | मुंबई. |

ही संस्था कृतकार्य होवो असें आम्ही इच्छितों.

# बालबोध.

## एम्. प्वांकारे.



पृथ्वीच्या पाठीवर मनुष्यांची उत्पत्ति झाल्यापासून त्यांच्या सगळ्या व्यवहारांत, त्यांच्या त्यांच्या योग्यतेनुरूप, उत्क्रांति होत चालली आहे. ती सगळ्या विषयांत सगळ्यांची एकसारखी नाहीं. त्यांमध्यें राज्यव्यवहार ह्या विषयांत एशिया खंडांतल्यापेक्षां युरोपखंडांतल्या लोकांत ती उत्क्रांति विशेष झालेली दिसते. फार प्राचीनकाळीं रोम, ग्रीस, इत्यादि राष्ट्रांमध्यें प्रजासत्ताक राज्यांचा प्रघात पडल्याची साक्ष इतिहास देत आहे. परंतु तसें कांहीं एशिया खंडाचें दिसत नाहीं. कदाचित् प्रजासत्ताक राज्य हे शब्द एशियाखंडांत अगदीं नवे म्हणजे पाश्चात्य विद्येचा प्रचार इकडे पडल्यापासून आलेले आहेत. तरी ते आतां साहचर्यानें आगगाडी, तारायंत्र इत्यादि शब्दांसारखे समंजस लोकांस चांगले कळंत आहेत.

आणि ती राज्यव्यवहाराची अत्यंत पक्कावस्था आहे. म्हणजे राज्याचा कारभार चालविण्यास जे कांहीं अनुपम उत्तम गुण लागत असतात ते राजकुलांत जन्म न होतां साधारण माणसांस स्वप्रयत्नानें कसे संपादितां येतात हा एक चमत्कार ह्या व्यवहारांत झालेला आहे, तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे. तो चमत्कार सध्या फ्रान्स देशांत झाला आहे. म्हणून फ्रान्स देशांतील प्रजासत्ताक राज्याचे नवे अध्यक्ष एम्. प्वांकारे ह्यांचें संक्षिप्त चरित्र येथें सादर करितों.

हे गृहस्थ इ० स० १८६१ ह्या वर्षीं जन्मले. ह्यांचा शाळांतला अभ्यास आटोपल्यावर हे कायदा शिकून ब्यारिस्टरचें काम करूं लागले. त्यांच्या वयाच्या २७ व्या वर्षीं त्यांस फ्रेंच पार्लमेंटाचे सभासद निवडिलें. त्यानंतर पांच वर्षांच्या आंत ते शाळाखात्याचे प्रधान म्हणून प्रधानमंडळांत शिरले. नंतर ते देशाच्या जमाखर्चाचे प्रधान झाले. इ० स० १९०३ मध्यें ते फ्रेंच पार्लमेंटाच्या सेनेटमध्यें नेमले गेले. पुढें ते फ्रान्सचे मुख्य प्रधान झाले. ते त्या हुद्यावर असतां इ० स० १९१२ च्या आरंभीं रशियांत जाऊन तेथील झारमहाराजांस भेटले, तेव्हां उभयतां राष्ट्रांचें ऐक्य पुष्कळ वृद्धि पावलें. तेव्हांची एक विशेष गोष्ट अशी लिहिली आहे कीं, त्यांची आगबोट बाल्टिक समुद्रांतून सेंट पीटर्सबर्गाकडे चालली असतां ती एका जर्मन लढाऊ जहाजांच्या तुकडीजवळून गेली. तींत हे थोर गृहस्थ आहेत असें त्या जर्मन जहाजांच्या तुकडीच्या मुख्यास कळतांच त्यानें त्यांस आपण होऊन २१ तोफांची सलामी देऊन फ्रेंच राष्ट्राचा बहुमान केला. पुढें बालकन युद्धाच्या वेळीं त्यांनीं आरंभीं जीं जीं भविष्यें केलीं, तीं तीं सगळीं खरीं होत गेलीं. म्हणजे त्यांस बहुतेक सर्व खात्यांतल्या कामाचा पुष्कळ अनुभव येऊन ते राज्याच्या अध्य-

क्षाच्या जागेस योग्य झाले. त्याप्रमाणें ते इ० स० १९१३ च्या जानेवारी महिन्यांत केवळ आपल्या बुद्धिवैभवानें फ्रान्साचे प्रेसिडेंट निवडले गेले आहेत. हा फ्रान्स देश कांहीं लहान नाहीं, ह्याच्या राज्याचें क्षेत्रफळ २,०७,२१८ चौरस मैल आहे. लोकसंख्या ३,९६,०१,५०९ आहे. त्याचें उत्पन्न सुमारें १७,९९,३३,२१८ पौंड आहे; खर्च १७,९९,१८,५२५ पौंड आहे. आयात मालाची किंमत सुमारें ३२,६४,२६,००० पौंड आहे. ह्या एवढ्या देशाचें स्वामित्व सध्या ह्यांस मिळालें आहे. त्यांस पगार दरसाल २४००० पौंड असून शिवाय तितकीच रकम त्यांच्या इतर खर्चास मिळत असते. हें कांहीं सामान्य भाग्य नव्हे. अध्यक्ष ह्या नात्यानें ह्यांचे अधिकारही फार मोठे आहेत. फ्रान्सच्या पार्लमेंट सभा चालू ठेवणें, किंवा बंद ठेवणें, अपराध्यांस क्षमा करणें, परराष्ट्रांशीं तह करणें, फ्रान्सच्या सगळ्या लष्करावर आणि आरमारावर सत्ता चालविणें, त्याप्रमाणेंच मोठ्या अधिकाराच्या जागेवर नेमणुका करणें, हीं त्या अधिकाराचीं मुख्य अंगें आहेत. हीं अंगें मिळूनच राजसत्ता होत असते. आणखी मनुष्याचें खरें थोरपण त्याच्या स्वतःच्या भाषणांमध्यें आणि त्याजविषयीं मोठीं माणसें जें काय बोलतात, त्यांमध्यें दृश्यमान होतें. म्हणून प्रथमतः प्वांकारे ह्यांचीं कांहीं सुप्रसिद्ध वचनें येथें घेऊन मग त्यांजविषयीं मोठीं माणसें काय म्हणतात तें सांगूं. आपल्याला अध्यक्ष निवडिलें म्हणून आभार प्रदर्शित करितांना एम्. प्वांकारे म्हणाले.—"मजवर कोणीं कशीही टीका केली तरी शत्रूपासून फ्रान्साचें संरक्षण करण्यास जें काय करावें असें मला वाटेल, तें केल्याशिवाय मी कधींही रहाणार नाहीं. आणि सांप्रतकाळीं फ्रान्साचे जे संबंध इतर राष्ट्रांशीं आहेत ते मी तसेच कायम ठेवीन."

ते एकदां म्हणाले: "राष्ट्रभक्तांनीं आणि लोकनायकांनीं आपल्या देशबांधवांस जें खरें असेल तेंच सांगावें, अप्राप्य वस्तु सहज प्राप्त होण्यासारख्या आहेत अशा थापा देऊन त्यांस मोहांत पाडूं नये,....हिंमत आणि अभिमान हीं एक नव्हत, त्याप्रमाणेंच दुरभिमान आणि गर्व हीं एक नव्हत. महत्वाकांक्षा आणि अतिलोभ हीं एक नव्हत. मनःपूत वर्तन आणि स्वातंत्र्य हीं एक नव्हत.....सज्जनता, न्यायप्रियता, आणि सत्यप्रियता, ह्या सद्गुणांची जोड राजकारणांच्या सिद्धीस अवश्यक आहे..........आपलें खरें सामर्थ्य खरोखर आपल्या ठायींच असतें. आपली योग्यता आपल्या आंगच्या गुणांच्या मानानें जगांत आपोआप ठरत असते; आणि त्या मानानेंच लोक आपणाशीं स्नेह ठेवितात.......आपली कर्तबगारी, आपलें बाहुबल आणि आपलें ऐक्य ह्यांच्या मानानें जगांत आपल्या राष्ट्राचें वजन रहातें." आणखी ते आपल्या देशबंधूंस म्हणत असतात. "तुम्ही सगळ्या मनुष्यांवर प्रेम करावें. परंतु त्यांतल्यात्यांत अत्यंत निवडक आणि अत्यंत प्रियकर जे फ्रेंच लोक त्यांजकडे विशेष लक्ष देण्याविषयीं मात्र कधीं विसरू नका....तुम्ही मनुष्य या नात्याचें आपलें कर्तव्य आधीं केलेंच पाहिजे. परंतु त्यांतल्यात्यांत फ्रेंच गृहस्थ ह्या नात्याच्या कर्तव्याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे."

हीं वचनें कोणत्याही देशांतल्या कोणत्याही लोकपालाच्या मुखास अत्यंत भूषणावह होणार आहेत. राजा आणि त्याचें प्रधानमंडळ ह्यांस ज्या मूळतत्त्वांवर राज्याचा कारभार चालवावयाचा असतो, तीं सगळीं तत्त्वें ह्या शब्दांत ओतप्रोत भरलीं आहेत. राजकारभारासंबंधाचा पूर्ण अनुभव आल्यावांचून अशा प्रकारचे उद्गार मनुष्याच्या तोंडांतून कधीं निघावयाचे नाहींत. आतां त्यांच्याविषयीं लोकवाणी काय आहे ती पहा.

त्या लोकवाणीमध्यें प्रमुख म्हटलीं म्हणजे वर्तमानपत्रें होत. युरोपांतील सगळीं पत्रें एकविचारानें असें म्हणत आहेत कीं, "एम्. ग्यांबेटा ह्यांच्या मागें फ्रान्सास अगदीं त्यांच्यासारखे जे अध्यक्ष मिळाले आहेत, ते प्वांकारे हेच आहेत." फ्रान्स आणि जर्मनी ह्यांच्यामध्यें जें भारतीय युद्धासारखें युद्ध इ० स० १८७०–७१ ह्या वर्षीं झालें, त्यामध्यें फ्रान्सांतील जे राजकारणी पुरुष अग्रगण्य होते, त्यांत ग्यांबेटा हे एक होते. ते प्रजासत्ताक राज्याचे पक्के अभिमानी होते आणि त्यांनीं केलेल्या चळवळीमुळें त्या वेळच्या फ्रेंच बादशाहास गादीचा राजीनामा द्यावा लागला. ते मोठे बुद्धिवान् आणि साहसी होते; जर्मन लोकांचा वेढा पॅरीस शहरास पडलेला असतां त्यांची नजर चुकवून हे विमानांत बसून निसटून बाहेर गेले होते. फ्रान्सांतील त्या वेळच्या इतर कांहीं मोठ्या राजकारणी पुरुषांवर ते फितूर असल्याविषयीं ह्यांचा आक्षेप होता. त्यांमध्यें मेट्झ येथील किल्ल्यांतले ६ सेनापती, ६६ मोठे सरदार, ६००० लष्करी मोठे अंमलदार, आणि १७३००९ शिपाई एवढें मोठें सैन्य मार्शल बझेन ह्या फ्रेंच सरदाराच्या हाताखालीं असून तें दांतीं तृण धरून प्रतिपक्षाच्या हातीं लागलें. हा सगळा प्रादुर्भाव फितुराचा होता, असें गॅंबेटा ह्यांनीं स्पष्ट म्हणून दाखविलें होतें, तेंच पुष्कळांस खरें वाटलें. आणि त्यानंतर पुढें त्यांच्याच पुष्कळ मसलती फ्रान्साच्या उपयोगी पडल्या. ही प्वांकारे ह्यांच्या बद्दलची सामान्य लोकवाणी झाली. तिच्यापेक्षां पुष्कळ श्रेष्ठ अशी जी राजवाणी तीही अशीच आहे. हे अध्यक्ष झाल्यावर ह्यांच्या अभिनंदनार्थ रशियाच्या झारमहाराजांनीं ह्यांस जी तार केली आहे तींत असें म्हटलें आहे कीं, "तुमच्या राजवटींत फ्रान्स व रशिया ह्यांचा परस्पर स्नेह अधिक दृढतर होऊन त्यांच्यामधील प्रेमबंधनें अधिक दृढ

होतील आणि त्यांच्या योगानें दोन्ही राष्ट्रांची कल्याणवृद्धी होईल, ह्याविषयीं आमची खात्री आहे." सध्याचे जर्मन राज्याचे महापराक्रमी अधिपती **कैसर** ह्यांनींही आलीकडे प्वांकारे ह्यांविषयीं असे उद्गार काढिले आहेत कीं, "हे गृहस्थ फार लोकोत्तर आहेत. ह्यांस भेटावें अशी आमची फार इच्छा आहे." ही राजवाणी खरोखर अमोलिक आहे. कैसर ह्यांच्या तोंडचें असें स्तोत्र आजपर्यंत क्वचित् दुसऱ्या कोणास मिळालें असेल. हें भाग्य सामान्य नव्हे.

प्रे. प्वांकारे ह्यांनीं अध्यक्ष होण्याच्या थोडें आधीं एक लहानसें पुस्तक फ्रान्सांतल्या राज्यव्यवस्थेविषयीं लिहिलें आहे. तें इतकें सोपें आणि सुलभ आहे कीं, तें सर्व लहान मोठ्या माणसांस अगदीं सहज कळतें. फ्रान्समध्यें असा नियम आहे कीं, नागरिकांचीं कर्तव्यें चांगलीं कळल्यावांचून कोणत्याही विद्यार्थ्यास शाळा सोडल्याचा दाखला देऊं नये. म्हणून तद्देशीय विद्यार्थ्यांस हें पुस्तक फार उपयुक्त आहे. ह्या पुस्तकांत अनेक भाग आहेत. त्यांचे विषय वेगळेवेगळे आहेत. ते विषय राज्यव्यवस्थेसंबंधाचे असून तिचा इतिहास त्यांत असा दिला आहे कीं, त्यावरून विद्यार्थ्यास फ्रान्सला सध्याची स्थिति कशी प्राप्त झाली हें सहज कळतें.

प्वांकारे यांनीं फ्रेंचनागरिकांच्या कर्तव्याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "स्वतंत्र संस्थानांतल्या समाजांतल्या लोकांनीं असें वागायास पाहिजे कीं, त्याच्या योगानें एकमेकांची स्थिति सुधारावी आणि एकमेकांस साह्य व्हावें. आपण असें पाहिलेंच आहे कीं, प्रजासत्ताक राज्यामध्यें शिक्षणाच्या योगानें बौद्धिक आणि नैतीक स्थिति आपोआप सुधारत जाते." ते शेवटीं लोकांस असें सांगतात कीं, मनुष्यानें नेहमीं आपल्या स्वतःच्या हितापेक्षां देशाच्या हिताकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे.

ह्यानंतर अगदीं आलीकडे गेल्या जून महिन्यांत प्रेसिडेंट प्वांकारे हे आमचे बादशाह पंचमजार्ज महाराज ह्यांस भेटण्याकरितां इंग्लंडास गेले होते. तेथें त्यांचें आदरातिथ्य मोठ्या थाटाचें झालें. २५ व्या तारखेस गिल्ड हॉल नामक भव्य इमारतींत त्यांच्या अभिनंदनार्थ एक मोठी सभा भरली होती. तीस सगळें दरबार हजर होतें, त्या प्रसंगीं त्यांनीं बोलतां बोलतां असें म्हटलें कीं, "देव करो आणि इंग्लिश राष्ट्राचा नेहमीं जयजयकार होवो." हा फ्रेंच प्रेसिडेंटच्या तोंडचा आशीर्वाद इंग्लंडास फार कल्याणप्रद होईल. याशिवाय ह्यांचीं जीं भाषणें झालीं, त्या सगळयांमध्यें मुख्य आशय एवढाच होता कीं, फ्रान्स आणि इंग्लंड ह्यांचें ऐक्य आणि सख्य असणें हें ह्या उभयतां राष्ट्रांच्या उन्नतीच्या अभिवृद्धीस अत्यंत आवश्यक असून, सर्व जगामध्यें शांतता रहाण्यास त्याहीपेक्षां अधिक आवश्यक आहे. हें त्यांचें म्हणणें सगळ्या इंग्लिश आणि फ्रेंच लोकांस फार मानवलें, आणि त्यावरून त्यांनीं प्वांकारे ह्यांच्या नांवाचा मोठा जयजयकार केला. आणखी ह्यांत ही एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, फ्रान्साच्या अध्यक्षांचा हा हेतु बराच जुना आहे. ह्यास प्रमाण हें आहे कीं, इंग्लंडांत फ्रान्साचे अध्यक्ष लोबे हे इ० स० १९०३ मध्यें आले होते आणि अध्यक्ष फेलियरस हे इ० स० १९०८ मध्यें आले होते, तेव्हांच्या त्यांच्या भाषणांतही हाच मुख्य मुद्दा होता, आणखी त्यासंबंधानें अध्यक्ष प्वांकारे ह्यांनीं असें म्हणून दाखविलें आहे कीं, "तें ऐक्य आणि तें सख्य आतां पूर्वींपेक्षां पुष्कळ वाढलें आहे, तेव्हां त्याचीं फळेंही दिवसेंदिवस अधिक चांगलीं येऊं लागतील अशी आशा आहे." सर्व राष्ट्रांचे अधिपती आपआपल्यापरी अशा प्रकारें जगांत

शांतता ठेवण्याचे जर मनापासून प्रयत्न करतील तर कालेंकरून वेगवेगळ्या राष्ट्रांतला भेदभाव नाहींसा होऊन—

नकुळ सर्प क्रीडती सुखें
मार्जारीस्तना लागती मूषकें
सिंह करिण करिती कौतुकें
वनामाजी विचरती.

असें जें वर्णन मुक्तेश्वरांनीं विश्वामित्राच्याआश्रमाचें केलें आहे, त्यासारखें हें सर्व जग जर निर्विकार होईल तर ह्यापेक्षां स्वर्गांत अधिक तें काय असावयाचें !

---

## एका सात्विक वृद्धाचा अनुभव.

### श्लोक.

नाहीं मज करायाचें आतां कांहींच राहिलें
मनास पाहिजे होतें जें तें संपूर्ण जाहलें. १.
त्यांतला प्रत्ययो थोडा सांगाया तरुणां जनां
बोलतों शब्द जे कांहीं ते ऐकावे स्थिरें मनें. २.
मला ज्ञान नसोनीही शाहणा मज बोलले
द्रव्य नाहीं तरी मातें धनाढ्य बहु मानिलें. ३.
कामें कोपें तसें लोभें व्यापलों असतां सदा
मला पवित्र लोकांनीं म्हटलें भक्तिपूर्वक. ४.
त्यानें तुष्टी मला झाली उमोप गोष्ट हे खरी
परंतु भ्रम तो होता सारा अज्ञानमूलक. ५.
व्यापारू हा असा झाला खोटा लोकांमधें जरी
हानि अल्पहि कोणाची नाहीं झाली अहो तरी. ६.
म्हणोनी मी त्याविषयीं कांहींएक न बोललों
आलें सोईस तैसा मी जनाशीं नित्य वागलों. ७.
मीं होवोनि कधीं कोणा नाहीं तिळहि वंचिलें
स्वताचें परकीयाचें नित्य कल्याण चिंतिलें. ८.

दुष्टांशीं पडतां गांठी त्यांशीं दुष्ट न जाहलों
संबंधू तोडुनी त्यांचा दूर त्यांतून राहिलों. ९.
प्राप्तीपेक्षां कधीं नाहीं केला खर्चहि आगळा
तेणेंचि राहिलों आहें कर्जापासून वेगळा. १०.
मला पसंत नाहीं तें करवी माझिया करें
असा मित्र मला नाहीं कोणीही या वसुंधरे. ११.
मला योग्य वाटतें तें कराया मी न कीं चुकें
त्यामध्यें परवा मातें कोणाचीही न वाटते. १२.
जीवास जीव देणारा ऐसा मित्र मला नसे
करील माझिया घाता ऐसा वैरीहि कीं नसे. १३.
खरा मित्र देव माझा मी त्याच्या आश्रयें वसें
मागतों तें मला देतो आहें मी त्यामधें सुखी १४.

---

## आमचीं कामें आम्हींच करावीं.

प्रत्यक्ष आई झाली, तरी, तान्ह्या मुलाचें कोठें काय दुखतें आहे हें तिला आपोआप एकदम कळत नसतें. तें तिला मुलाच्याच चळवळीवरून आणि हालचालीवरून तर्कावें लागतें, आणि त्याच्या धोरणानें त्यास उपचार करावे लागतात. म्हणजे, ज्याला जें दुःख होत असतें, तें तें त्यानें स्वतः कळविल्याशिवाय तें दुसऱ्यास कळत नाहीं, हा प्रकार जसा सामान्य मनुष्यव्यवहारांत आहे, तसा राष्ट्रव्यवहारांतही आहे. फार दूरचें उदाहरण नको. अगदीं जवळचें घ्या. आपलें इंग्लिश-सरकार अगदीं पहिल्यापासून आपणां हिंदी प्रजाजनांचें हित करण्यास निरंतर सिद्ध असतें. त्याकरितां तें लाखों रुपये खरचिण्यास तयार असतें, हें त्यांच्या पुष्कळ कृतींवरून आपणांस कळून आलें आहे. प्रजेची अडचण त्यांच्या दृष्टोत्पत्तीस येण्याचा उशीर, कीं ती दूर करण्याचे त्यांचे प्रयत्न चालू होतात. पण हें केव्हां? त्यांना अडचण कळतें तेव्हां!

ह्याचें अगदीं आलीकडचें उदाहरण म्हटलें म्हणजे प्लेगचें आहे. आरंभीं प्लेग चालू झाला तेव्हां सरकारानें त्याच्या निवारणार्थ, लोकांच्या मागणीची वाट न पहातां कोणकोणते उपाय योजिले आणि किती पैसे खरचिले हें सर्वांस ठाऊकच आहे. पण हें त्यांनीं केलें केव्हां? ती अडचण कळली तेव्हां! ती अडचण जर त्यांना कळली नसती तर ती दूर करण्याचे उपाय त्यांच्यानें कसे झाले असते? शिवाय, आमच्या राज्यकर्त्यांची अशी फार इच्छा आहे कीं, आम्हीं स्वतःच्या कल्याणाचीं कामें आपल्या जवळच्या साहित्यानें आणि आपल्या स्वतःच्या उद्योगानें करून घ्यावीं. म्हणून, अप्रत्यक्ष रीतीनें, आम्हांस तीं करावयास शिकवावयास त्यांनीं वेगळ्या वेगळया संस्था स्थापून आमच्यांत चालू केल्या आहेत. म्युनिसिपालिट्या, तालुका लोकलबोर्डें, जिल्हा लोकलबोर्डें, कायदेकौन्सिलें, शाळांवरच्या कमिट्या, विश्वविद्यालयें, इत्यादि सगळ्या संस्था ह्या एक प्रकारच्या शाळा आहेत. त्यांतले अध्यापक आपले राज्यकर्ते आपण होऊन झालेले आहेत, आणि त्यांतले विद्यार्थी आपण हिंदी लोक आहों, असें आम्हांस वाटतें. ह्या शाळांत अभ्यास चांगले होण्यास जसें अध्यापकांचें लक्ष पाहिजे तसें विद्यार्थ्यांचेंही पाहिजे. ह्यांत विद्यार्थ्यांचें हित विशेष आहे म्हणून त्यांनीं विशेष लक्ष देणें आवश्यक आहे, हें सांगावयास नको. असें आपल्या देशांतल्या पुष्कळ व्यवहारांत पहिल्यापासून व्हावें तसें होत नाहीं. ही गोष्ट अत्यंत खेदाची आहे. इतर गोष्टी एकीकडे असोत, परंतु आमच्या मुलांचें प्राथमिक शिक्षण हें काम अत्यंत महत्त्वाचें असून त्यांतही उद्योग कमी पडला आहे. अव्वल इंग्रजीपासून ह्या शिक्षणाचा इतिहास पाहिला तर असें स्पष्ट दिसून येतें कीं, आम्हां हिंदी लोकांस ज्ञानामृत पाजण्यास आमच्या ह्या प्रभूंनीं जितके

प्रयत्न केले आहेत, तितके प्रयत्न आजपर्यंत कोणाच्याही राजवटींत झाले नव्हते. गांवचे लोक नको नको म्हणत असतां शाळा घालून त्यांच्या मुलांना फुकट शिकवायाचें, कागद शाई पदरची द्यावयाची, जे गांवकरी ह्या कार्यास प्रोत्साहन देत त्यांस शाबासकी द्यावयाची, हें सगळें आज साठ पाऊणशें वर्षांच्या वयांच्या माणसांस दृष्टीनें पाहिलेलें चांगलें आठवत आहे. आणि त्याचप्रमाणें, आम्हां लोकांस ज्ञानामृतपान करण्यास जीं जीं साधनें त्यांस आवश्यक वाटत आहेत, तीं तीं ते, आपण होऊन आम्हांस देत आहेत. ते आमच्या मागणीची वाट पाहात नाहींत. सध्या आपण पाहातों त्या लहानमोठ्या देशी भाषांच्या शाळा, हैस्कुलें, कॉलेजें, विश्वविद्यालयें, त्यांच्या संबंधाच्या प्रयोगशाळा, त्या सगळ्या सुयंत्रपणें चालविण्यास जसे प्रवीण विद्वान् पाहिजेत तसे युरोपांतून आणून देणें, त्याकरितां लाखों रुपये खरचणें, हीं सगळीं आपल्या प्रभूंच्या त्याच ज्ञानदानशौर्याचीं अंगें आहेत, ह्यांतलीं बहुतेक साधनें त्यांनीं आपण होऊन दिलीं आहेत. हा उद्योग अगदीं आरंभापासून चालला आहे. त्याचीं उदाहरणें अनेक आहेत. त्यांतलें ठळक असें एकच फार जुनें उदाहरण येथें नमूद करितों.

ज्ञानग्रहणास इतर सर्व साधनांपेक्षां स्वभाषा हें साधन फार उपयोगीं पडतें—किंबहुना ह्याच्या बरोबरीचें दुसरें साधन नाहीं, हें आमच्या प्रभूंच्या लक्षांत येऊन, त्या संबंधानें ईस्टइंडिया कंपनीसरकारच्या कारकीर्दींत हिंदुस्थानाच्या राज्यकारभाराचें नियमन करण्यास आणि त्या राज्यावर देखरेख ठेवण्यास नामदार कोर्ट ऑफ् डैरेक्टर्स म्हणून एक सभा नेमलेली होती तींत, हिंदुस्थानांत काम केलेले चांगले अनुभविक कामदारांची सल्लामसलत घेत असत. त्या मंडळीनें इ० स० १८५४ च्या

जुलै महिन्याच्या १९ व्या तारखेस हिंदुस्थानसरकाराला एक खलीता पाठविला, त्याचा आशय असा आहे कीं, हिंदुस्थानच्या लोकांस ज्ञानदान करण्यामध्यें करवेल तितका त्यांच्या स्वतःच्या भाषांचा उपयोग करा, आणि ज्या ठिकाणीं अगदीं अडेल, इंग्लिश भाषेचा उपयोग केल्यावांचून चालतच नाहीं असा प्रसंग येईल, तेथें मात्र इंग्लिश भाषेचा उपयोग करा. हा विचार किती मोठा आणि किती पोक्त आहे म्हणाल, तर, तान्ह्या मुलास देववेल तितकें त्याच्या आईचें दूध पिऊं द्या, आणि तें न पुरेसें होईल, तेवढ्यापुरतें वर दूध पाजा, असें एकाद्या धन्वंतऱ्यानें सांगावें, त्या विचाराच्या तोडीचा हा विचार आहे. आणखी ह्याची योग्यता किती तरी वर्णावी ? हा विचार इतका लवकर आमच्या राज्यकर्त्यांस सुचला, आणि तो त्यांनीं मोठ्या अगत्यानें आणि आस्थेनें हिंदुस्थानसरकारास अमलांत आणावयास सांगितला, ह्याबद्दल त्यांस जितका धन्यवाद द्यावा तितका थोडा वाटतो !

हा हुकूम उगाच फैलांत पडून राहिला नाहीं. त्यानंतर जे इंग्लिश अधिकारी इकडच्या विद्याखात्यांत आले, त्यांच्या मनांत तें तत्त्व भरून त्यांचे हातून त्या दिशेनें थोडेबहुत उद्योग झाले. त्याचें एक मोठें उदाहरण, मराठींतलीं क्रमिक पुस्तकें म्हणजे मेजर क्यांडी साहेबांचीं क्रमिक पुस्तकें हीं होतात. तीं त्यांनीं चांगल्या अनुभविक मराठी पंडितांच्या साह्यानें तयार केलीं होतीं. तीं लोकांस पसंत पडलीं. तीं शिकूनच, अव्वल इंग्रजींतली आमच्यांतली विद्वान् मंडळी तयार झाली. ही केवळ देशभाषांचीच गोष्ट नव्हे. पहिले नामांकित डैरेक्टर ऑफ् पब्लिक इनस्ट्रक्शन हावर्ड साहेब ह्यांस असें वाटलें कीं, त्या वेळीं इकडे इंग्रजी शिकण्याच्या कामांत मेकलकचीं पहिलीं तीन क्रमिक पुस्तकें होतीं, तीं युरोपियन पद्ध-

तीचीं लिहिलेलीं असल्याकारणानें हिंदुस्थानांतल्या मुलांस शिकायास अवघड जातात, म्हणून त्यांनीं, इकडच्या लोकांच्या अभिरुचीचा कल पाहून, त्याच्या अनुरोधानें, इकडच्या मुलांस सोपीं जात अशीं पहिलीं तीन चार पुस्तकें स्वतः लिहून शाळांत चालू केलीं. तीं मेकलकच्या पुस्तकांपेक्षां इकडच्या मुलांस अधिक पटलीं, आणि तीं आरंभीं शिकून इकडचे दुसऱ्या पिढीचे इंग्लिश विद्वान् तयार झाले. त्या पुस्तकांमध्यें विशेष भाषणपद्धतीचे कांहीं धडे, कांहीं तिकडच्या थोर लोकांचीं संक्षिप्त चरित्रें, इत्यादि विषय होते ते लोकांस विशेष आवडले. पुढें हावर्ड साहेबांच्या मागें तें धोरण अगदीं बदललें. आणि मग पुनः विलायतचीं क्रमिक इंग्लिश पुस्तकें इकडे शाळांतून चालू झालीं. त्यांचे प्रकार आतां अतिशयित झाले आहेत. त्यांत कांहीं क्रमिक पुस्तकें, हिंदुस्थानाकरितां म्हणून स्पष्ट लिहून छापलीं आहेत, तीं अंतर्बाह्य फार चांगलीं आहेत. त्यांचा हेतु, विद्याभ्यासाच्या कामांत हिंदुस्थानच्या विद्यार्थ्यांस साह्य करावें हा आहे. तो फार स्तुत्य आहे. परंतु, कांहीं झालें तरी, परकें तें परकें आणि आपलें तें आपलें, हा भेद कांहीं कोणास चुकवितां येणार नाहीं. हिंदुस्थानांतली हिंदु सुगरण कितीही कुशल आणि चतुर असली, तरी, युरोपियनांच्या मुलांस गोड लागण्यासारखे पदार्थ तिला कधीं करतां यावयाचे नाहींत. त्याचप्रमाणें एकाद्या अत्युत्तम सुशिक्षित युरोपियन सुगरणीला आमच्या हिंदु लोकांस गोड वाटण्यासारखीं पक्वान्नें कधीं करतां यावयाचीं नाहींत. हें अगदीं साहजिक आहे. ह्याचें एक मोठें प्रमाण असें पटलें आहे कीं, विश्वविद्यालयाच्या उच्च प्रतीच्या परीक्षांमध्यें अनेक कठीण संस्कृत पुस्तकें नेमलेलीं असतात, त्यांजवर टिपणें जसे पाश्चात्य विद्वान् लिहितात तसेच इकडील विद्वान्ही लिहितात; ह्यांपैकीं

इकडील विद्वानांचीं टिपणें विद्यार्थ्यांस फार उपयोगीं पडतात, असा अनुभव आला आहे. तोच प्रकार ह्या आलीकडच्या अनेक प्रकारच्या इंग्लिश क्रमिक पुस्तकांचा झाला आहे. त्यांच्या एकंदर रचनेवरून तिकडच्या ग्रंथकारांचा ग्रह असा दिसतो कीं, ह्या क्रमिक पुस्तकांत, युरोपांतल्या माणसांचीं, झाडांचीं वगैरे नांवें न घालतां, हिंदुस्थानांतल्या माणसांचीं आणि झाडांचीं वगैरे नांवें घातलीं, म्हणजे तीं हिंदुस्थानांतल्या मुलांस विशेष ग्राह्य आणि सोपीं वाटतील. परंतु, तो ग्रह अगदीं चुकीचा आहे. त्यामुळें त्यांचें इष्ट कार्य चांगलेंसें सिद्धीस जात नाहीं. पहिलें व्यंग आहे तसेंच बहुतेक कायम आहे. कां कीं, अडचण काय ती शब्दांवर नसते, तर ती मुख्यत्वेंकरून वाक्यरचनेवर असते. ह्या संबंधानें असें झालें पाहिजे कीं, अगदीं आरंभीं शिकायाचीं जीं पुस्तकें पाहिजेत, तीं अशा प्रकारच्या सुशिक्षित आमच्या इकडच्या मंडळीनें केलीं पाहिजेत कीं, ज्यांस देशभाषा आणि इंग्लिश भाषा ह्यांचें ज्ञान परिपूर्ण असून त्यांस शिक्षकाचें काम केल्याचा अनुभव पुष्कळ आहे. आरंभीं आरंभीं आमच्या मुलांस अशीं कांहीं इंग्रजींतलीं वाक्यें दिलीं पाहिजेत कीं, तीं देशभाषेंतल्या वाक्यांशीं अगदीं बरोबर मिळावीं. आणि तें बरेंच साधल्यावर, दोन भाषांच्या भाषणपद्धतींत थोडथोडें कसें अंतर पडत जातें, तें अगदीं हळू हळू, उदाहरणांनीं दाखवायास पाहिजे. त्या कामांत नियमांवर भिस्त ठेवून उपयोगीं नाहीं. तें केवळ नित्याभ्यासानें दृढ झालें पाहिजे. ह्याचा अर्थ झालेल्या धड्यांच्या आवृत्तींवर आवृत्ती, संथा, गुंडिका, झाल्या पाहिजेत. अशा रीतीनें जें काय मुलांस पाठ येतें, तें दुसऱ्या कशानेंही येत नाहीं. हें लक्षांत आणलें म्हणजे शिकण्याचा मार्ग सोपा केला

पाहिजे. हें काम जें आहे, तें परभाषी माणसाच्या हातून कदापि चांगलें व्हावयाचें नाहीं.

ह्याकरितां ही उणीव आमच्यांतल्या सुशिक्षित आईबापांनीं आणि शिक्षकांनीं आमच्या राजकर्त्यांच्या नजरेस आणून तशीं इंग्रजी पुस्तकें तयार करण्याविषयीं त्यांस विनंती करावी. ही सूचना कितीएक वर्षांपूर्वींच व्हावयास पाहिजे होती; परंतु आमच्या इकडचीं बहुतेक आईबापें ह्या प्रकरणीं अगदीं अज्ञान असून सुशिक्षित लोक अगदींच थोडे होते, त्यामुळें तिजकडे कोणाचें लक्ष गेलें नाहीं. परंतु ती अडचण आतां बरीच दूर झाली आहे. तेव्हां अशा प्रकारचा विचार सरकारापुढें मांडण्याचा हा समय आला आहे. ही संधी साधून आमच्यांतल्या विद्वान् लोकांनीं तशीं सहज शिकतां येण्यासारखीं प्राथमिक शिक्षणाचीं इंग्लिश पुस्तकें सरकारास रचून दाखविलीं आणि त्यांची उपयुक्तता त्यांच्या मनांत भरविली तर हें कार्य सहज होणार आहे. आणि त्यापासून होतकरू विद्यार्थ्यांस पुष्कळ साह्य मिळणार आहे, हें मनांत आणून आमच्या सुशिक्षित मंडळीनें हा उद्योग अवश्य अवश्य लवकर हातीं घ्यावा. म्हणजे सध्याच्या आमच्या तरुण पिढीवर आणि तिच्या पुढच्या पिढ्यांवर त्यांचे महत् उपकार होतील.

---

## शास्त्रीयज्ञानाभिवृद्धि.

**ग्यासइंजिनांमध्यें एक सुधारणा.**—ग्यास इंजिनें म्हणजे ग्यासच्या योगानें चालणारीं इंजिनें. ह्यांतल्या सिलिंडरांत ग्यास आणि हवा ह्यांचें मिश्रण पेटून एकसारखे स्फोट होत असतात, आणि त्यामुळें तो सिलिंडर अतिशयित तापून जात असतो. तो तसाच तापूं दिला तर यंत्र बंद पडण्याची भीति असते, म्हणून तो थंड ठेवण्यासाठीं स्वतंत्र योजना

केलेली असते. त्या सिलिंडरच्या भोंवतीं बाहेरच्या बाजूस एक निराळें लोखंडी पत्र्याचें पूड करून त्यांतून थंड पाणी एकसारखें वाहात राहाण्याची व्यवस्था केलेली असते, आणि ह्याकरितां पाण्याची एक निराळी मोठी टांकी, आणि पाणी खेळविणाऱ्या निरनिराळ्या नळ्या ह्यांची नेहमीं जय्यत तयारी ठेवावी लागते. ह्यापायीं खर्च पुष्कळ येऊन तें सगळें चांगलें सुरळीत चालण्याबद्दल विशेष काळजी घ्यावी लागते. इतकें करूनही सिलिंडर थंड राखण्यांत ह्या योजनेचा प्रत्यक्ष उपयोग थोडा होत असतो. कारण स्फोट होत असतात सिलिंडरच्या आंतल्या बाजूस आणि पाणी खेळत असतें त्याच्या बाहेरच्या अंगास. तेव्हां त्या खेळत्या पाण्याचा व्हावा तितका उपयोग होत नसला पाहिजे हें उघड आहे. ह्यांत सुधारणा करण्यासाठीं, स्फोटांपासून उत्पन्न होणारी उष्णता चांगल्या प्रकारें कमी करण्यासाठीं, प्रोफेसर हॉप्‌किन्सन नांवाच्या गृहस्थांनीं एक नवीन युक्ति योजिली आहे. त्यांनीं सिलिंडरच्या आंतल्या बाजूस पाण्याच्या धारा उडविणाऱ्या तोट्या बसवून, स्फोट होतांक्षणीं सिलिंडरचें आंतलें अंग आणि दट्ट्याचे सर्व भाग ह्यांवर पाण्याच्या धारा उडाव्या अशी योजना केली आहे. ह्या युक्तीनें सिलिंडरांत स्फोटांपासून उत्पन्न होणारी उष्णता ताबडतोब कमी होऊन थंड पाण्याची टांकी वगैरे ठेवण्याचा खर्च वांचतो. मात्र हे उडणारे पाण्याचे फवारे थंड नसून उकळत्या पाण्याइतके ऊन ठेवावे लागतात. कारण थंड पाण्याचे फवारे ठेविले तर सिलिंडरची आंतली बाजू लवकर जंगून जाऊन यंत्र निरुपयोगी होण्याची भीति असते. आणि ग्यासच्या स्फोटांनीं उत्पन्न होणारी उष्णता तीन चार हजार अंशांइतकी जबर असल्याकारणानें उकळत्या पाण्याचे फवारेही ती कमी करण्याच्या कामीं फार उपयोगीं पडतात. ह्या नव्या

युक्तीच्या योगानें गॅसच्या इंजिनांस लागणारा खर्च कमी होऊन त्यांचा प्रसार जास्त होईल असें दिसतें.

**चालती आगगाडी बिनतारी यंत्रानें थांबविणें.**—तारांच्या मदतीशिवाय हजारों मैलांवर बातम्या पाठविण्याची पद्धति आतां सर्वत्र माहीत झाली आहे, आणि तिचा व्यवहार पृथ्वीच्या सर्व देशांमध्यें चालू होऊन प्रत्येक सुधारलेल्या राष्ट्रांत तें एक निराळें सरकारी खातेंच होऊन बसलें आहे. ह्या पद्धतींत विजेचे एका विवक्षित प्रकारचे तरंग आकाशांत उंचावर सोडून देतात, आणि ते सभोंवार पसरत जाऊन ते घेण्याकरितां उभारलेल्या यंत्रांवर जाऊन आदळले म्हणजे त्यांवरून पाहिजे ती बातमी समजते. ह्या विद्युत्तरंगांच्या योगानें दूर अंतरावर भरून ठेविलेली तोफही उडवितां येते, आणि आकाशांत सोडून दिलेल्या विमानांची गतिही हवीतशी कमजास्ती करतां येते. त्याचप्रमाणें, पाण्याखालून जाणाऱ्या टार्पिडोंची गति देखील ह्या तरंगांनीं हवीतशी बदलतां येते. अलीकडे ह्या पद्धतीचा उपयोग दुसऱ्या एका खरोखर उपयुक्त अशा बाबीकडे करण्याची योजना घाटत आहे. ती बाब म्हटली म्हणजे आगगाड्यांस होणारे अपघात टाळण्याची होय. प्रत्येक ट्रेनीला ब्रेक असतात हें सर्वांस माहीत आहेच. हे ब्रेक ट्रेन भरधांव चालू असतांनाही स्टेशनवरच्या माणसाला, ह्या विद्युत्तरंगांच्या योगानें अपघात टाळण्याकरितां लावतां यावे, अशा प्रकारची ही योजना आहे. पुरामुळें पूल वाहून गेले असतां, किंवा लैनीवर दुसरा अडथळा झाला असतां ह्या नव्या युक्तीनें ट्रेन हव्या त्या ठिकाणीं ताबडतोब थांबवितां येते. नुकतेंच जर्मनींत बाव्हेरिया प्रांतांत ह्या पद्धतीसंबंधानें प्रयोग करून पाहिले. त्यांत असें आढळून आलें कीं, बिनतारेच्या यंत्राची कळ दाबल्या-

पासून २७ सेकंडांच्या आंत शें पन्नास मैलांच्या अंतरावर भर-धांव जात असलेली ट्रेन थांबवितां आली! ह्यावरून ही नवी युक्ति किती उपयुक्त आहे तें समजेल. ती इतकी उपयुक्त असूनही तिला खर्च कांहीं विशेष लागत नाहीं, आणि तिच्या-मुळें बाकीच्या साध्या तारायंत्रांच्या कामांत बिलकुल व्यत्यय येत नाहीं, हें तींत विशेष आहे.

**इंग्लिश चॅनेलच्या खालून बोगदा पाडणार!**— इंग्लंड आणि फ्रान्स ह्यांच्यामध्यें इंग्लिश चॅनेल नांवाची सुमारें २५ मैल रुंदीची खाडी आहे, तिच्या खालून रेलवेचा बोगदा पाडून इंग्लंडचा युरोपखंडाशीं खुष्कीनें संबंध जोडून देण्याचें आज कितीएक वर्षांपासून घाटत आहे. ह्या योजनेस मोठ-मोठ्या इंग्लिश लोकांचा आजपर्यंत विरोध होता. ते म्हणत कीं, आमच्या देशाच्या भोंवतीं ईश्वरनिर्मित जें पाण्याचें वलय आहे, तें आमच्या राष्ट्राच्या सुरक्षितपणास फार जरूरीचें असून त्या खाडीच्या खालून बोगदा करून इंग्लंडाच्या दाराशीं परचक्राची भीति आणून ठेवणें बरोबर होणार नाहीं. ह्या भीतीमुळें ती योजना तशीच पडून राहिली होती. परंतु अलीकडे, अशा बोगद्यापासून होणारे फायदेही इंग्रज लोकांच्या नजरेस येऊं लागले आहेत. जर्मनी किंवा रशिया अशा एकाद्या राष्ट्राशीं इंग्लंडाची लढाई सुरू झाल्यास अशा बोगद्यांतून इंग्लंडास अन्नाचा पुरवठा करतां येईल, आणि अन्नाचा पुरवठा करणाऱ्या तारवांचें संरक्षण करण्यास इंग्लिश आरमाराचा कांहीं भाग लावण्याचें कारण पडणार नाहीं, इत्यादि महत्त्वाच्या गोष्टी इंग्लिश मुत्सद्यांच्या लक्षांत आल्याकारणानें हा बोगदा करण्याच्या कामास लवकरच सुरवात होईल असें म्हणतात. त्याला एकंदर खर्च सुमारें चोवीस कोटि रुपये लागणार असून त्यापैकीं अर्धी रक्कम एक इंग्लिश कंपनी आणि बाकीची अर्धी

रक्कम एक फ्रेंच कंपनी देणार आहे. बोगद्याचें इंग्लिश बाजूचें शेवट डोव्हरजवळ होणार असून त्याच्याजवळ भक्कम किल्ले बांधून त्यांवर प्रचंड तोफा चढवणार आहेत. फ्रेंच बाजूचें शेवट कॅले शहराजवळ होणार आहे. ह्या पंचवीस मैलांच्या बोगद्यांतून ट्रेनी विजेच्या शक्तीनें चालावयाच्या आहेत आणि बोगद्यांत दिवेही विजेचेच लावावयाचे आहेत. त्याचप्रमाणें त्यांत हवा खेळती ठेवण्यासाठीं मोठमोठ्या रात्रंदिवस चालणाऱ्या पंख्यांची योजना करण्यांत येणार आहे. हा सगळा बोगदा तयार होऊन त्यांतून ट्रेनी चालू होण्यास कितीएक वर्षें लागतील हें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

---

## कंपनीच्या नौकरांची राहाणी.

"सुरतेस बैलांच्या दोन चाकी व चार चाकी गाड्या लोक वापरीत. त्यांत पाय सोडण्यास जागा नसून आंत मांडी घालून बसावें लागे. आंतून रंगीबेरंगी कापडांनीं त्या गाड्या मढविलेल्या असत. गाड्यांबरोबर कंपनीच्या शिपायांचे थवे पायीं चालत.

सुरतच्या प्रेसिडेंटाची स्वारी मोठ्या थाटानें बाहेर पडत असे. बरोबर नगारखाना, शिंगें वगैरे वाद्यें, व सजवलेले घोडे असत. तसेंच छत्री, मोरचेल, व पंखा धरणारे बरोबर असून, पालखीच्या दोहीं बाजूंस युरोपियन शिपायांची रांग चाले. मुंबईच्या डेपुटी गव्हरनराचा थाटही जवळ जवळ असाच होता. मद्रासच्या प्रेसिडेंटाचा थाट सुरतच्यासारखा असे. त्याबरोबर ३०० एतद्देशीय शिपाई असून, जरूर पडल्यास आणखी १५०० तयार असत. स्वारी बाहेर जातांना बरोबर वाद्यें वगैरे असून स्वारीबरोबर कौन्सिलदार वगैरे मंडळी घोड्यांवर व त्यांच्या बायका पालख्यांत बसून बाहेर येत. प्रेसिडेंटाच्या तैनातीस मोठा लवाजमा असे. हत्ती, घोडें, पालख्या,

शिवाय डाक्टर, शस्त्रवैद्य, उपाध्ये, नौकर वगैरे पुष्कळ जमाव असे. भोजनाच्या वेळेस सुस्वर वाद्यें वाजत, आणि दरएक पदार्थ बाहेर येतांना शिंग वाजे. दर पदार्थाबरोबर चांदीची छडी धारण केलेले चोपदार सदैव असत. म्हणजे एका खोलींतून दुसऱ्या खोलींत पदार्थ जातांना बरोबर चोपदार असे. बंगल्यांत वरच्या मजल्यावरून खालच्या मजल्यावर स्वारी येतांच तेथें त्यांस सलामी होत असे. कधीं कधीं प्रेसिडेंटाची स्वारी घोड्यावर किंवा घोड्यांच्या बगींत बसूनही बाहेर पडे. सारांश, प्रेसिडेंटाच्या जागेसाठीं कंपनीच्या नौकरांच्या उड्या पडत, हें सांगावयास नकोच. सुरतचा प्रेसिडेंट सर जान चैल्ड ह्याचे गुणानुवाद खालीं लिहिल्याप्रमाणें कंपनीनें सन १६८८ च्या आपल्या एका अर्जांत पार्लमेंटापुढें मांडिले होते. 'हे गृहस्थ आज पस्तीस वर्षें हिंदुस्थानांत आहेत. एवढ्या अवधींत ते एकदाही इकडे विलायतेस आलेले नाहींत. त्यांचें शहाणपण, धैर्य, प्रामाणिकपणा आणि निर्व्यसनता हे गुण सर्वविश्रुत आहेत. त्यांस हिंदुस्थानांतील सर्व जातींचे लोक मान देतात. शत्रूंच्या ठिकाणीं सद्गुण दिसला तर तो ओळखण्यास हिंदु लोक सदा तत्पर असतात. सर जान चैल्ड ह्यांनीं औरंगजेबाशीं इतक्या हुशारीनें युद्ध केलें कीं, मोंगलांचीं सर्व जहाजें त्यांनीं पकडलीं, तरी पण ह्या युद्धांत रक्ताचा एक थेंबही गळाला नाहीं. शत्रूंचे लोक चैल्डच्या हातीं पडले. त्यांस परत पाठवितांना त्यानें कपडेलत्ते व पैसे देऊन त्यांस इतकें खूष केलें कीं, त्यांनीं होऊनच चैल्डबद्दल व इंग्रजांबद्दल बादशाहापाशीं रदबदली करून त्यांच्या वाटेस न जाण्याविषयीं बादशाहाचें मन वळविलें.' ह्या वाक्यांत पुष्कळ गर्भितार्थ आहे." (रा. रा. सरदेसाई ह्यांची ब्रिटिश रियासत.)

# लोक काय बोलतात.

हस्तनक्षत्राचा पाऊस बऱ्याच ठिकाणीं पडून दुष्काळाची भीति कमी झाली आहे.

---

महाराज सवाई तुकोजीराव होळकर युरोपखंडांत गेले होते ते गेल्या १७ व्या तारखेस मुंबईस परत येऊन इंदुरास निघून गेले.

---

गेल्या महिन्यांत वेल्समध्यें कार्डिफ येथें एका दगडीकोळशांच्या खाणींत ग्यासचा भडका उडून सुमारें पांचशें माणसें मरण पावलीं !

---

अलीकडे एक फ्रेंच वैमानिक दर तासास १२५ मैल एवढ्या वेगानें उडून गेला. म्हणजे, मुंबईहून पुण्यास एका तासांत जातां येईल असें दिसतें !

---

१९१३ च्या सिव्हिलसर्व्हिसच्या परीक्षेंत २ हिंदी उमेदवार पास झाले. त्यांचीं नावें येणेंप्रमाणें मि. पट्टानभाई पिले ( मद्रासी ) व मि. फिरोज खारेघाट ( पारशी ).

---

तारेशिवाय बातमी पाठविण्याचें यंत्र ज्या बोटीवर नाहीं त्या बोटीवर १९१४ च्या मे महिन्याच्या पहिल्या तारखेनंतर काम करावयास राहावयाचें नाहीं असें इंग्लंडांतील खलाशांनीं ठरविलें आहे.

---

लंडनमध्यें रेडियमधातू संबंधाचे प्रयोग करण्यासाठीं 'रेडियम इन्स्टिट्यूट' नांवाची एक निराळी संस्था काढलेली आहे. तेथें त्या धातूचा उपयोग काळपुळीवर चांगला होत असल्याचें आढळून आलें आहे.

---

शिकागो शहरांत नुसत्या पोषाकावर दरसाल पंधरा हजार पौंड खर्च करणाऱ्या अनेक स्त्रिया आहेत. तेथल्या गिरण्यांतून काम करणाऱ्या मुलींस प्रत्येकीं दरसाल सुमारें साहाशें रुपयांचा कपडा लागतो !

---

चिनी प्रजासत्ताक राज्याचे अध्यक्षाचे जागीं युआनशिकाय हे २० उमेदवारांत ५०७ मतें मिळून निवडले गेले आहेत. आणि लियु-आन हे उपाध्यक्ष म्हणून निवडले गेले आहेत. हें चिनी प्रजासत्ताक राज्य आतां सर्व सुधारलेल्या राष्ट्रांनीं मान्य केलें आहे.

---

सन १९१४ मध्यें मुंबई युनिव्हर्सिटीच्या परीक्षा नेहमींप्रमाणें नवंबरांत होऊन त्यांत नापास होणारांकरितां १९१५ चे मार्चांत पुरवणी परीक्षा होईल. १९१६ पासून सर्वच आर्टपरीक्षा मार्च महिन्यांत होत जातील. कॉलेजांतील पहिली टर्म १० जून ते १० आक्टोबर पर्यंत व दुसरी १० नवंबर ते १० मार्चपर्यंत व्हावयाची आहे.

---

पनामा कालव्याचा दोहों महासागरांकडचा भाग तयार होऊन मध्यंतरीं थोडी जमीन उरली होती, ती ता. १० आक्टोबर रोजीं प्रे. विल्सन ह्यांनीं तेथून ४००० मैल अंतरावरच्या आपल्या वाड्यांतून विजेचा बटन दाबून डायनामैटनें उडविली! ह्याप्रमाणें आतां अटलांटिक व पॅसिफिक महासागर एक झाले आहेत. विद्याचारसंपन्नतेचा चमत्कार आहे!

---

कानपुर येथील मशिदीसंबंधाच्या दंग्याविषयीं चौकशी करण्याकरितां व्हाइसराय साहेब लार्ड हार्डिंग स्वतः कानपुरास गेले होते. त्यांनीं तडजोडीची युक्ती काढून मशिदीचा पाडलेला भाग पुनः बांधण्याची परवानगी दिली आहे, आणि दंग्याच्या आरोपावर अटकेंत असलेल्या सर्व लोकांस दया दाखवून सोडून दिलें आहे. ह्यामुळें मुसलमान लोकांमध्यें सर्वत्र आनंद झाला आहे.

---

तारीख ९ आक्टोबरच्या दरबारांत नाभाच्या महाराजांनीं आपल्या रयतेस पुढील देणग्या दिल्याः—सर्व सरकारी नोकरांस एक महिन्याचा पगार बहाल केला, व कांहींचे पगार बरेच वाढविले. प्राथमिक शिक्षण मोफत केलें. प्रत्येक जिल्ह्यांत सरकारला सल्लामसलत देण्यासाठीं एक

कमिटी स्थापन करावयाची असून राजधानींत एक मुख्य कमिटी होणार आहे. तसेंच राजधानींतील गुरांस एक मोठें गायरान मोफत ठेविलें आहे.

---

गेल्या महिन्याच्या १४ व्या तारखेस अटलांटिक महासागरांत व्हाल्टर्नो नामक आगबोटीस आग लागून तिचा सर्वस्वी नाश झाला. ह्या अपघातांत सुमारें १५० लोक मरण पावले. त्या आगबोटीवर बातमी पाठविण्याचें यंत्र नसतें तर प्राणहानी ह्याहीपेक्षां भयंकर झाली असती. विद्युत्संदेश मिळाल्यामुळें आठ दहा आगबोटी तिच्या मदतीस धावून आल्या. आगीचें कारण पेटविलेली विडी होय असें म्हणतात.

---

मुंबईस 'क्रेडिट बँक' म्हणून एक बँक होती तिनें देवघेव बंद केली असून मुंबईच्या बॉम्बे ब्यांकिंग कंपनीनेंही आपली देवघेव तारीख १० अक्टोबरपासून बंद ठेविली आहे. बँकिंग कंपनीसंबंधाचा पुढचा निर्णय भागीदारांच्या बहुमताप्रमाणें व्हावयाचा आहे. ह्या कंपनींत पुण्याची डेक्कन ए. सोसायटी, चतुःशृंगी कोऑप. सोसायटी, महिलाविद्यालय, अनाथबालिकाश्रम इत्यादि संस्थांच्या ठेवी ठेविलेल्या आहेत असें म्हणतात.

---

जर्मनीनें बांधलेलें सर्वांत मोठें झेपलिन विमान गेल्या १७ व्या तारखेस जोआनिस्थळ येथें आकाशांत चढलेलें असतांना त्यांतल्या ग्यासचा एकाएकीं स्फोट होऊन तें १००० फूट उंचीवरून खालीं पडलें! त्यावर मोटमोठाले इंजिनियर मिळून ३० माणसें होतीं, तीं सर्व चेंदामेंदा होऊन मरण पावलीं. हें विमान सुमारें ५५० फूट लांब असून त्याचा व्यास ५० फुटांहून जास्त होता. त्यावरचीं इंजिनें ८२० घोड्यांच्या शक्तीचीं असून तें नुकतेंच १२½ तासांत ४०० मैल फिरून आलें होतें!

---

मुंबई युनिव्हर्सिटीच्या बॅचलर ऑफ कामर्सच्या परीक्षेचे विद्यार्थी तयार करणारें व्यापारी कॉलेज गेल्या ता. २२ पासून मुंबईस सुरू झालें. मुंबई युनिव्हर्सिटीची पी. ई. ची किंवा इतर युनिव्हर्सिट्यांची इंटरमिजि-

एटची परीक्षा पास झालेल्यांसच या कॉलेजांत घेतील. फी वर्षाची १२० रु. असून कॉलेजची वेळ सकाळीं ८।९० व सायंकाळीं ५।७ अशी आहे. कॉलेजला सुटी झाल्यानंतर विद्यार्थ्यांनीं एकाद्या अकौंटंटचे हाताखालीं किंवा ब्यांकेंत काम करावयाचें आहे. युरोपियन प्रिन्सिपाल येईपर्यंत मि. के. सुब्रम्हण्य अय्यर, बी. ए., यांस ऑनररी प्रिन्सिपाल नेमलें आहे.

---

सन १९१२–१३ सालाबद्दल पोस्टआफिस खात्याचे आंकडेः—

| | |
|---|---|
| व्हॅल्यू पेबल अर्टिकलें पाठविलींः | ८८१५९१५ |
| व्हॅल्यू पेबलनें पैसे वसूल केलेः | ११ कोट रुपये. |
| मनीआर्डरींची संख्याः | २९६१८५८४ |
| मनीआर्डरींनीं पाठविलेला पैसाः | ५२½ कोट रुपये. |
| सेव्हिंग बँकेंतलीं खातींः | १५६६८६० |
| सेव्हिंग बँकेंतला पैसाः | २० कोट ६१ लाख रुपये |
| खर्चवेंच वजा जातां शिलकः | २८ लाख रुपये. |

---

सिनेमेटोग्राफ हा चित्रें दाखविण्याचा एक नवा करमणुकीचा प्रकार युरोप आणि अमेरिका ह्यांत आधीं चालू होऊन आलीकडे तो हिंदुस्थानांत आला आहे. त्याविषयीं युरोप आणि अमेरिका ह्यांत असा बोभाट झाला आहे कीं, त्याच्या योगानें लहान मुलांचें आणि तरुण माणसांचें पुष्कळ नुकसान झालें आहे. तें असें कीं मुलांचे अभ्यास सुटले आहेत, त्यांनां अद्वातद्वा बोलण्याच्या सवई लागल्या आहेत, लहानसान चोऱ्या कशा कराव्या आणि कशा लपवाव्या त्या समजल्या आहेत, आणि त्यांच्या घरच्या आणि बाहेरच्या वर्तनांत बारीकसारीक खोड्या शिरून त्या त्यांच्या मातापितरांस आणि शिक्षकांस फार त्रासदायक झाल्या आहेत. ह्या अरिष्टाचें निवारण करण्याविषयीं तिकडचे सुजाण लोक आपल्या सरकारांस मोठ्या आग्रहानें विनंति करीत आहेत. असा प्रसंग हिंदुस्थानांत येऊं नये म्हणून त्याविषयीं लोकांनीं वेळेस जपावें अशी सूचना आहे.

# बालबोध.

## भिवाजी रामजी नरे.



वांछा सज्जनसंगमीं गुरुकुळीं वंदारुता नम्रता
निंदेचें भय तुष्टता परगुणीं स्व–स्त्रीसुखीं लुब्धता
विद्याभ्यास महेशभक्ति खल–संसर्गी अनासक्तता
चित्ताचा जय या गुणांस निधि जे त्या वंदिंजे तत्वतां. १.

वामन पंडित.

सध्याच्या विद्याचारसंपन्न मन्वंतरांत मनुष्यास जें कांहीं उत्तमोत्तम म्हणून मिळवावयाचें आहे, तें हेंच कीं, त्यानें उत्तम प्रकारचें नागरिकत्व संपादावें. ह्या नागरिकत्वाचें मा-

हात्म्य केवढें आहे, ह्याची थोडीशी कल्पना गेल्या महिन्याच्या **बालबोधांतील** अध्यक्ष **प्यांकारे** ह्यांच्या तद्विषयक उद्गारांवरून वाचकांच्या लक्षांत आलीच असेल. त्यांत एक विशेष हें आहे कीं, तें नागरिकत्व मनुष्याच्या परिस्थित्यनुरूप लहान मोठें असतें आणि त्या मानानें त्याचा उपयोग समाजास किंवा राष्ट्रास थोडाबहुत होत असतो. म्हणजे तें कधींही फुकट जात नाहीं. तें कितीही अल्प असलें तरी आपला गुण सोडीत नाहींच. म्हणजे **पंतांनीं** जें अमृताविषयीं म्हटलें आहे कीं:—

'स्वल्प म्हणोनि न सोडी अमृताची शक्ति सर्व चव थेंबा'

तें इतर सद्गुणांप्रमाणें नागरिकत्व ह्या सद्गुणासही लागू आहे. त्याचीं मोठीं उदाहरणें मोठ्या माणसांच्या चरित्रांत प्रकाशित होत असतातच. तशीं त्याचीं लहान उदाहरणें लहान माणसांच्या चरित्रांतही विद्यमान असतात. तरी त्यांच्या लहानपणावरून त्यांची किंमत कमी होत नाहीं. आणखी त्यावरून दुसरें अनुमान असें होतें कीं, ह्या सद्गुणाचें प्रमाण सुशिक्षणाच्या प्रमाणावर बिलकूल अवलंबून नाहीं. सुशिक्षण फारसें नसतांही ह्या सद्गुणाचा प्रभाव केवळ माणसाच्या अंगच्या अंकुरानें दृष्टीस पडतो. त्याचें एक उदाहरण आज ह्या चरित्रांत द्यावयाचें आहे.

रा. रा. भिवाजी रामजी नरे हे जातीचे मराठे आहेत. यांच्या कुळाचें मूळ आडनांव नामजादे असें असून त्याचा अपभ्रंश नरे असा झाला आहे. नामजादे हें आडनांव त्यांच्या कुळास केव्हां कशावरून पडलें हें कांहीं कळत नाहीं, तरी 'जादे' ह्या प्रत्ययावरून त्यांस तें मुसलमानी बादशाहीच्या कारकीर्दींत मिळालें असावें असें वाटतें. राजेश्री भिवाजी ह्यांचें मूळ ठिकाण रत्नागिरी जिल्ह्यांत देवगड ताळुक्यांत मिटबाव हें

गांव होय. व मालवण तालुक्यांत सुप्रसिद्ध मालवण गांवीं वाडावायरी येथें यांचे स्वतःचे घरीं ह्यांचा जन्म इ० स० १८५० ह्या सालीं आगष्ट महिन्याचे २८ व्या तारखेस बुधवार रोजीं झाला. त्यांचीं आईबापें गरीब होतीं, आणि ह्यांच्या लहानपणचा वेळ अव्वल इंग्रजीच्या पुढचा असल्यामुळें शाळांची वगैरे व्यवस्था अगदीं कच्ची असून विद्याभ्यासाचा परिपाठ सध्याच्या दहावा हिसा देखील बसला नव्हता. तेव्हां अर्थात् रा. भिवाजी ह्यांच्या प्राथमिक शिक्षणाची आबळ झाली असली पाहिजे हें उघड आहे. तरी त्यांचें आजोळ वेंगुर्लें येथें होतें तेथील त्यांचे चुलत आजोबा ह्यांनीं त्यांस आपलेकडे नेऊन तेथील गांवठी शाळेंत घातलें. तेथें त्यांचा आरंभीचा विद्याभ्यास १८५९ पासून १८६२ पर्यंत थोडासा झाला. त्या वेळांत त्यांना कधीं कधीं गुरें राखावयास रानांत जावें लागत असे. पुढें त्यांस इ० स० १८६२ पासून शेतकीच्या कामांत घातलें होतें. तें दिवसा आटपल्यावर त्यांस स्वभावतःच सत्समागमाची आवड असल्याकारणानें ते आपण होऊनच संध्याकाळच्या वेळीं गांवांत कीर्तन पुराण किंवा भजन जेथें चालत असेल तेथें जाऊन बसत असत, आणि तें लक्ष लावून ऐकत असत. रा. नरे ह्यांस पावसाळ्यानंतर आपल्या चुलत मामांच्या घरचीं शेतकीचीं आणि मिठागराचीं अशीं दोन्हीं कामें करावीं लागत असत. तीं ते मनापासून करीत असत. तेणेंकरून त्यांच्या मामांचा त्यांजवर फार लोभ असे. तेथल्या ह्यांच्या वडील आप्तांनीं ह्यांचें लग्न करण्याचा विचार बहुतेक ठरविला होता, परंतु इतक्यांत लग्न करणें बरें नाहीं असें त्यांच्या मनास वाटून ते तेथून निघून एकदम आपल्या घरीं मालवण येथें आपल्या आईबापांकडे येऊन राहिले. तेथें आईबापें वृद्ध आणि भावंडें लहान लहान असून त्यांस निर्वाहाची पंचाईत पडते, असें

पाहून आसपासच्या लोकांच्या बहिवाटीवरून त्यांच्या मनांत असें आलें कीं, आपणही मुंबईस जाऊन पोटास मिळविण्याचा उद्योग करावा. त्याप्रमाणें ते आपल्या आईबापांची आज्ञा घेऊन गलबतांत बसून १८७० च्या जानेवारी महिन्यांत मुंबईस आले. तेव्हां त्यांचें वय १९ वर्षांचें होतें. रा. नरे हे मुंबईस आपल्या इष्टमित्रांच्या घरीं राहून निर्वाहाच्या धंद्याचा शोध करूं लागले. तेव्हां त्यांस असें आढळून आलें कीं, आपलें शिक्षण कमी असल्यामुळें आपणास कारकुनीचा धंदा करितां यावयाचा नाहीं. म्हणून ते सूत काढणें आणि कापड विणणें हें काम लालबागेंत दिनशा पेटिट नांवाची गिरणी आहे तींत दीड वर्षपर्यंत नोकरीस राहून शिकले, आणि पुढें लवकरच नामदार मुरारजी गोकुळदास ह्यांची सुपारीबागेंतील गिरणी बांधून तयार झाल्यावर त्या शेटजींच्याच कृपाप्रसादानें इ० स० १८७१ ह्या वर्षीं तेथें नौकरीस राहिले. नंतर पुढें एका वर्षानें त्यांनीं आपलें लग्न केलें.

नंतर कै० सदाशिवराव केळकर यांच्या सहवासानें नरे यांचें लक्ष गिरणींतल्या कामदारांच्या मुलांच्या शिक्षणाकडे वळलें, आणि त्यांनीं त्याकरितां आपल्या घरांत एक लहानशी रात्रीची शाळा इ० स० १८७४ त स्थापित केली. ही शाळा तेरा वर्षेंपर्यंत रा. नरे ह्यांनीं स्वतःच्या खर्चानें चालविली. नंतर शाळा मोठी व्हावी आणि ती पुष्कळ मुलांच्या उपयोगीं पडावी ह्या हेतूनें आपल्या मित्रमंडळीच्या आणि हाताखालच्या लोकांच्या साह्यानें इ० स० १८८७ पासून वर्गणी जमा करून गिरणींतील कामगार लोकांच्या मुलांकरितां दिवसाची शाळा त्यांनीं सुरू केली. तीच हल्लीं परेल सुपारीबाग येथील "नरे आणि मंडळी यांची धर्मार्थ मराठी शाळा" या नांवानें प्रसिद्ध आहे. ही शाळा प्रसंगोपात अनेक मोठ्या अधिकाऱ्यांनीं आणि विद्वानांनीं

पाहिली आहे, आणि तिजविषयीं आपला संतोष प्रदर्शित केला आहे. रात्रीच्या शाळेंत येणारे गिरणींत काम करणारे लोक अगदींच अक्षरशत्रु होते, त्यांना त्या शाळेच्या योगानें बालबोध आणि मोडी चांगलें लिहितां वाचतां येऊं लागलें, आणि थोडेंसें गणितविषयाचेंही ज्ञान त्यांस प्राप्त झालें. ह्यां लोकांना रा. नरे ह्यांच्या सहवासानें विद्येची अभिरुचि लागली आणि ते आपला मुख्य उदरनिर्वाहाचा धंदा आटोपल्यावर राहिलेला वेळ विद्याव्यासंगांत घालवूं लागले. त्यांस आणखी मदत करण्यासाठीं त्यांनीं त्या शाळेंत एक लहानसें पुस्तकालय स्थापिलें आहे, आणि तेथें निवडक वर्तमानपत्रें घेण्याचा क्रम चालू ठेवला आहे. त्याचप्रमाणें इ० स० १९१० ह्या वर्षीं "नरे आणि मंडळी" ह्यांनीं एक शाळा दादर येथें स्थापित करून चालविली होती परंतु ती दोन वर्षें चालून बंद पडली. कां कीं त्या जागेच्या आसपास मुंबई म्युनिसिपालिटीच्या दोन आणि मिशनरींची एक अशा तीन शाळा स्थापित झाल्यामुळें या शाळेंत मुलें कमी पडलीं. म्हणून ती बंद ठेविली आहे. नरे आणि मंडळीची नं० ३ ची शाळा इ० स० १९१० ह्या वर्षापासून तीन वर्षेंपर्यंत दादर येथें चांगली चालली आहे. तिजपासूनही पुष्कळ लोकहित होत आहे. थोरल्या चिपळूणकरांनीं जें म्हटलें आहे कीं,

> नाहीं परोपकारापरि दुसरें थोर पुण्य हें वचन
> सत्य असे तरि विद्यादानाशीं तुल्य पुण्य आणिक न.

ह्या सगळ्या उद्योगाचा उपयोग किती झाला आहे, ह्याचें प्रमाण गणितानें कधींच दाखवितां यावयाचें नाहीं; कां कीं, ह्या ज्ञानबीजपेरणीचें क्षेत्र दिवसानुदिवस चांगलें वाढत चाललेलें आहे. त्याच्या पुण्याचा बराच वांटा रा. नरे ह्यांच्या खातीं जमा होईल ह्यांत कांहीं संशय नाहीं, हें अगदीं खरें आहे. असो.

हें इकडे परोपकाराचें काम चाललें असतां नरे आपल्या उद्योगांत दिवसेंदिवस अधिकाधिक प्रवीण होत गेले. त्याचें एक प्रमाण असें आहे कीं, इ० स० १८७८ ह्या वर्षीं गिरण्यांतल्या वेगवेगळया जाबरांच्या विणकामाची तुलना करून पाहिली तेव्हां सर्व प्रकारच्या कापडांत रा. नरे यांचा नंबर पहिला लागला. तेव्हां ह्यांची फार वाहवा झाली आणि शेट मुरारजी गोकुळदास यांस परम संतोष होऊन त्यांनीं त्यांना चांगली बढती दिली. तेव्हांपासून ह्यांच्या कामाचें आणि वजनाचें क्षेत्र वाढून सत्यप्रियता, विद्याभिरुचि, सौजन्य, विश्वासूपणा इत्यादि गुणांनीं लोकांना हे प्रिय होऊन समाजांतील सर्व माणसें जशीं एका कुटुंबांतील माणसें आपल्या कुटुंबचालकास मान देतात त्याप्रमाणें ह्यांना मान देऊन ह्यांच्या मताप्रमाणें वर्तूं लागलीं. नंतर इ० स० १८८८ या वर्षीं रा. नरे गिरणींतून कांहीं महिन्यांची रजा घेऊन सकुटुंब काशीयात्रेस निघाले. त्यांनीं नाशिक, प्रयाग, गया इत्यादि अनेक तीर्थयात्रा केल्या आणि ते तिकडून जेव्हां मुंबईस परत आले तेव्हां गिरणींतल्या मंडळीनें एकाद्या मोठ्या साधूप्रमाणें त्यांचें स्वागत केलें.

पुढें इ० स० १८९३ त मुंबईमध्यें हिंदुमुसलमानांचा दंगा झाला. त्यावेळीं मुंबईंतल्या गिरण्या दहा दिवसपर्यंत बंद पडल्या होत्या तरी सुपारीबागेंतील मुरारजी गोकुळदास यांची गिरणी चालली होती, आणि त्या लगत्यास जरी मुसलमानांची वस्ती होती तरी तिकडे मुळींच दंगा झाला नाहीं. हें सगळें फळ रा. नरे यांच्या उपदेशाचें आणि वजनाचें होतें. ही गोष्ट सरकारच्या कानापर्यंत जाऊन रा. नरे यांस त्यांच्या या कामगिरीबद्दल त्या वेळचे पोलिस कमिशनर मि. व्हिन्सेंट यांच्या हातून एक मोठी मोलवान शालजोडी बक्षीस मिळाली

आहे. हें बक्षीस त्यांच्या कामगिरीच्या मानानें अगदीं थोडें आहे असें आम्हांस वाटतें. इ० स० १८९७ त मुंबईत प्लेगनें कहर मांडिला तेव्हां रा. नेरे यांनीं गरीबगुरिबांस पैसा-आडका आणि धान्य वगैरे पुरवून पुष्कळ साह्य केलें. त्यानंतर दोन वर्षांनीं त्यांची हुषारी पाहून त्यांस त्यांच्या गिरणीमधील मुख्य वीव्हिंगमास्तरचे कामावर कायम केलें. ह्याप्रमाणें तेथें ते केवळ आपल्या हुषारीनें दरमहा अडीचशें रुपयेपर्यंत वाढले.

सुपारीबागेंतल्या चोरगल्लींतला रस्ता पावसाळीं अतिशयित खराब होत असून त्यापासून जाणारायेणारांस फार त्रास होत असे. तो रस्ता कोणी नीट करीना असें पाहून रा. नेरे यांनीं आपल्या पदरच्या खर्चानें त्या गल्लींत दरवर्षीं कोळशाचें कीट, राबीट, माती वगैरे रस्त्यावर घालून तो रस्ता चांगला दुरुस्त केला. रा. नेरे यांची प्रकृति लहानपणापासून अगदीं निरोगी होती, परंतु पुढें पुढें मुंबईच्या हवेनें अगदीं क्षीण झाली होती; पण सुयोगानें तीर्थाटन करून आल्यावर ती कांहींशी सुधारली. गिरणींतील कामाखेरीज बाकीचा रिकामा वेळ ते वाचनांत घालवीत. विशेषतः ते धार्मिक, नैतिक, ऐतिहासिक व बोधपर असे ग्रंथ वाचीत. बेचाळीस वर्षें मुंबईसारख्या मोठ्या शहरांत वास्तव्य करून सोडावॉटर किंवा त्यासारख्या दुसऱ्या पदार्थास यांनीं कधीं स्पर्शही केला नाहीं. ही गोष्ट ह्यांच्या निर्व्यसनीपणाची साक्ष देत आहे. हल्लीं देखील ह्यांचा बराच वेळ एकाद्या चांगल्या विद्यार्थ्याप्रमाणें वाचनांत जातो.

ह्यांनीं इ० स० १९०६ च्या मार्च महिन्यांत गिरणींतील नोकरी सोडली, आणि पुढें डिसेंबर महिन्यांत त्यांस एकाएकीं अर्धांगवायूचा धक्का बसला. त्यानें ते सुमारें वर्षभर आजारी होते. आतां त्यांची प्रकृति कांहीं बरी आहे, आणि आतां ते स्वस्थ घरीं राहून आपली कालक्रमणा लिहिण्यावाचण्यांत

करितात. ह्यांच्या सहवासानें आणि उपदेशानें कित्येक तरुण लोक सन्मार्गास लागले आहेत, ही गोष्ट फार लक्षांत ठेवण्या-सारखी आहे. ह्या चरित्रावरून एवढा एक बोध घ्यावयाचा कीं, मनुष्यास ह्या प्रपंचमहासागरांतून तरून जाण्यास नुसता भक्तिमानपणा बस होतो. हा बोध आमच्या आधुनिक सुशि-क्षितांनीं जर पाळिला तर त्यापासून आमच्या राष्ट्राचें पुष्कळ कल्याण होईल. म्हणून आम्ही असें इच्छितों कीं, असे पुष्कळ नरे अनेक दिशांनीं नागरिकांचीं कर्तव्यें करण्यास आमच्या देशामध्यें उत्पन्न व्हावे. ही इच्छा परमेश्वर पूर्ण करो.

---

## काल काय म्हणतो.

### आर्या.

झालें मज्जन्म कधीं हें कोणालाहि ठाउकें नाहीं<br>
मी नाहीं ज्यापाशीं ऐसें विश्वांत या नसे कांहीं. १.<br>
परि मी कोणा न दिसें नाहीं मज शब्द वास वा नाद<br>
तरि मजविषयीं मोठे ज्ञाते करितात नित्य संवाद. २.<br>
सान असो थोर असो वाईट असो बरेंहि कार्य किती<br>
त्याला मजवांचुनियां या जगतीं सांपडे न अन्य गती. ३.<br>
कार्याचीं इतर सकळ साहित्यें वाणियांकडे मिळती<br>
परि मी मिळतों ऐसें कोठें नाहीं दुकान या जगतीं. ४.<br>
इतर सकल साहित्यें असतां मी एकला नसेन जरी<br>
कार्य कदापिहि नाहीं होणार लहान थोर खचित तरी. ५.<br>
परि मज मिळवायाला कोणाला स्थान शोधणें न पडे<br>
कीं मत्प्राप्ति सकळिकां बसल्या जागीं सदा अखंड घडे. ६.<br>
मज ओळखुनी देणें लक्ष मजकडेस या पुरे होतें<br>
तें शिकवाया न लगति खाणें कोणाहि माणसा गोते. ७.<br>
कोण असा मी आहें सांगा पाहूं बरें समंजस हो<br>
तेणें या संसारीं तुमचें हित निश्चयें अखंडित हो. ८.

तरि मज धरून ठेविल ऐसा बळवंत या जगीं नाहीं
तैसा अशक्तहि नसे ज्यास हिसाडूनि मी निघुनि जाईं. ९.
मज कोंडुनि ठेवाया एकचि भांडें जगामध्यें दिसतें
तें सर्व माणसांच्या हातीं परमेश्वरें दिलें असतें. १०.
त्या भांड्याला म्हणती सुज्ञ सदुद्योग या जगामाजी
यापेक्षां मी नाहीं सांगत येथें तुम्हा अधिक आजी. ११.

---

## देवसेवा आणि देशसेवा.

### श्रीकृष्णार्पणमस्तु ।

आमच्या हिंदु धर्माप्रमाणें कोणताही पुण्यकर्मविधि समाप्त झाला म्हणजे हें वर सांगितलेलें वाक्य अगदीं शेवटीं म्हणण्याचा पाठ आहे. तो कांहीं आजकालचा नाहीं. त्याच्या तत्त्वाची उत्पत्ति आरंभीं कृष्णमुखांतूनच झाली आहे. ती अशी. आमच्या पुराणांमध्यें एक मोठा परिपाठ असा आहे कीं, वक्त्यानें आपण होऊनच शंका काढून आणि तिचें निरसन करून भाविकांस बोध करावा. तसा थोडासा प्रकार पूर्वोक्त वचनाचा आहे. एके वेळीं परमेश्वर–भक्तीविषयीं श्रीकृष्ण बोलत असतां त्यांनीं स्वतः म्हटलें आहे कीं:—

### श्लोक.

मातें न सेवी जन तो सुटेना संसारबेडी सहसा तुटेना
सेवा करावी तरि पूर्णकाम मी काय माझें करणार काम. १.

खरारा खगेन्द्रासि माझ्या कराया
न कोणी मला पाहिजे लोकराया
न लागे जया घांस दाणा न पाणी
उभा जो पुढें नित्य जोडोनि पाणी. २.
लगामाविणें माझिया जो लगामीं
विनाजीन वाहे मला व्योमगामी
तया वाहनालागि तों मानसाची
अपेक्षा नसे गोष्टि हे मानसाची. ३.

ज्ञानांबरें स्वसुख कंचुकि जीस तीचीं
वस्त्रें कशीं धुविल कोण रमे सतीचीं
कीं खेळवूनि उचलील मुला विधीतें
माझ्या करील जन हा कवण्या विधीतें. ४.
मी नित्य तृप्त मज रांधिल अन्न काय
मर्दील अंग तरि केवळ मी अकाय
जो मी अनंत मज रक्षिल तो कसा रे
व्यापूनि जो उरतसें जन लोक सारे. ५.

वामनपंडित.

याचा आशय असा कीं, मनुष्यांमध्यें सेवेचे म्हणजे भक्तीचे जे पर्याय अनादि कालापासून चालत आलेले आहेत त्यांतला एकही पर्याय देवाच्या सेवेस कामीं पडण्यासारखा नाहीं. हें अगदीं शब्दशः खरें आहे. म्हणून त्याविषयीं आपणच आणखी शंका घेऊन तिचें समाधान कृष्णांनीं थोडक्यांत केलें आहे, तें येणेंप्रमाणें:—

सेविल्याविण नसे सुटकाही
सेवणें तरि घडे नच कांहीं
सेवुनी सहजही तुज पाय
पांडवा परिस तोचि उपाय. ६.
स्वकृत लौकिक वैदिक पांडवा
मज समर्पुनि तूं करिं तांडवा
करिसि होमिसि भक्षिसि देशि रे
मजमधेंच समर्पित तें शिरे. ७.

यांपैकीं पूर्वोक्त वचनाच्या उत्पत्तीचें मूळ शेवटच्या श्लोकांत आहे, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. हें जसें देवसेवेविषयीं झालें तसेंच बहुतेक देशसेवेविषयीं आहे. या दोहोंमध्यें मुख्य अंतर हें आहे कीं, देवसेवा ही अनादिकालापासून पृथ्वीवर गाजत आली आहे, आणि ज्यांनीं आपलीं आयुष्यें

तींत घालविलीं त्यांस साधुसंत असें नांव पडलें आहे आणि ते सगळ्यांच्या वंदनास पात्र झाले आहेत. याविषयीं विशेष सांगावयाचें प्रयोजन नाहीं. परंतु देशसेवेचें असें नाहीं. ही कल्पना प्राचीन काळीं नव्हती असें नाहीं; परंतु ती सध्यांच्या कल्पनेहून कांहीं वेगळ्या प्रकारची होती असें दिसतें. म्हणून आमच्या प्राचीन ग्रंथांत देशसेवा हा शब्द कोठें आढळत नाहीं. तरी विचार करून पाहिलें असतां आपल्या स्वतःच्या सेवेविषयीं—देवसेवेविषयीं—जें कांहीं श्रीकृष्णांनीं म्हटलें आहे तें बहुतेक प्रकारीं देशानें आपल्या स्वतःच्या सेवेविषयीं म्हटलें तर तें शोभण्यासारखें आहे. म्हणजे असें:—जर देशाला वाचा फुटून तो बोलला कीं मी अत्यंत विस्तृत आहें, मजमध्यें कोट्यवधि माणसें आहेत, त्यांस रहावयास घरें पाहिजेत, खायास अन्न पाहिजे, अंगास वस्त्र पाहिजे, परचक्रापासून रक्षण करण्यास सैन्य पाहिजे, रोगनिवारणार्थ नानाप्रकारचीं औषधें पाहिजेत, लोकसंरक्षणास पोलिस पाहिजे, पत्रें नेआण करण्यास डांक पाहिजे, प्रवासाच्या सोईस आगगाड्या, विमानें पाहिजेत, मुलांस शिकविण्यास शिक्षक पाहिजेत, ते किती याची गणती सांगतां येत नाहीं. केवढीही संपत्ति असली तरी या सगळ्या सोई सर्व देशाला पुरत अशा पूर्णपणें करणें मनुष्यास अत्यंत अशक्य आहे. हें त्याचें म्हणणें श्रीकृष्णाच्या म्हणण्याप्रमाणेंच कबूल करणें भाग आहे. त्यांत अंतर एवढेंच कीं, देवसेवा ही देवाच्या अतर्क्य व्याप्तीमुळें आणि अतर्क्य शक्तीमुळें मनुष्यास असाध्य दिसते तशी देशसेवाही त्याच्या अवाढव्यपणामुळें अशक्य दिसते. दोहोंचीं कारणें वेगळीं; परंतु परिणाम एकच. तरी अलिकडे देशसेवा म्हणजे काय हें बहुतेक ठरल्यासारखें झालेलें आहे. त्या पंथांत माणसें प्रवीण होऊन इतरांस तो मार्ग दाखवीत आहेत. आणि अशी आशा आहे कीं, देवसेवेंतला

साधुसंतांचा मेळा जसा सिद्ध होऊन चालत आला आहे तसा हा देशसेवकांचा मेळा दिवसेंदिवस वाढत जाऊन त्याचा उपयोग सर्व प्रकारच्या राष्ट्रांस फार होईल. हें थोडेंसें उदाहरणांनीं स्पष्ट करायास पाहिजे.

आपणां सर्वांस ठाऊक आहे कीं, जे कोणी आजपर्यंत साधुसंत होऊन गेले आहेत त्यांस आपल्या स्वतःच्या सुखाचा आणि लाभाचा त्याग करावा लागला आहे. तेव्हांच ते लोकवंदनास पात्र झाले आहेत. त्याप्रमाणेंच देशसेवकांचें आहे. अमेरिकेंतल्या स्वतंत्र संस्थानांचा पहिला प्रेसिडेंत जॉर्ज वॉशिंग्टन यानें त्या संस्थानांत प्रजासत्ताक राज्य स्थापित करून उत्तम प्रकारची व्यवस्था लावून दिली, त्याचा संतोष लोकांस अतिशयित होऊन त्यांनीं त्यास तहाहयात अध्यक्ष रहाण्याविषयीं मोठ्या आग्रहानें विनंति केली. ती त्यानें अत्यंत निस्पृहतेनें नाकबूल केली—राजपद नको म्हटलें. त्याप्रमाणेंच एक इंग्लिश वैद्य गॅब्रिएल बौतन म्हणून होता त्यानें दिल्लीच्या बादशहाच्या मुलीस औषधोपचार करून वांचविलें, आणि दुसऱ्या पुष्कळ सरदार लोकांस औषधें देऊन बरें केलें. त्याबद्दलचें बक्षीस त्यानें स्वतः आपणांस मागितलें नाहीं तर आपल्या देशचे लोक म्हणजे इंग्लिश लोक यांस हिंदुस्थानांत व्यापार करण्याची मोकळीक मिळावी अशी सनद मागितली. ती इंग्लिशांस इ० स० १६५१ त मिळाली. त्याप्रमाणें व्यापार चालून आणि तो वाढून सध्यांचें हिंदुस्थानांतलें इंग्लिश राज्य एवढ्या मोठ्या वैभवास चढलें आहे. आणखी एक अगदीं साधारण उदाहरण असें आहे कीं, पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीमध्यें मूळच्या चालकांत जे कोणी गृहस्थ होते त्यांत प्रो० गोपाळ गणेश आगरकर, एम्. ए. हे असून त्यांनीं इ० स० १८७८ त बी. ए. झाल्यावर आपल्या मातो-

श्रीस असें स्पष्ट लिहून कळविलें कीं, माझ्या मुलाच्या एवढाल्या मोठ्या परीक्षा उतरल्या आहेत तेव्हां तो कोणी मोठ्या पगाराचा कामदार होऊन आपल्या घरांत पुष्कळ पैसे येतील असें मनांत समजूं नको. कां कीं, अल्पप्राप्तींत इतरांहून देशसेवेमध्यें आपलें आयुष्य घालवावें असा संकल्प मीं केला आहे. आणि त्याप्रमाणें ते अगदीं अखेरपर्यंत वागले हें सर्वश्रुत आहेच. त्यांच्याप्रमाणेंच सध्याही, जे लोक द्रव्यलोभ फारसा न धरितां, लोकशिक्षणाचें काम मोठ्या आस्थेनें करीत आहेत त्यांचीं ठळक उदाहरणें फर्ग्यूसन कॉलेज, न्यू इंग्लिश स्कूल, इत्यादि संस्थांत अनेक आहेत. हें त्या सर्वांस मोठें भूषण आहे. हीं तिन्हीं उदाहरणें देशसेवेचीं आहेत.

त्याप्रमाणेंच शेट परमपूज्य दादाभाई नौरोजी, महादेव गोविंद रानडे, काशिनाथ त्रिंबक तेलंग इत्यादि थोर पुरुषांचीं चरित्रें वाचलीं म्हणजे, कोणत्याही अमार्गानें न जातां अगदीं शुद्ध रीतीनें लोकांस सन्मार्ग दाखवून आणि बोध करून त्यांचें हित कसें करावें हें चांगलें कळण्यासारखें आहे. त्याचें वर्णन करण्यास येथें अवकाश नाहीं. या व्यक्तींच्या उदाहरणांवरून कित्येक लहान मोठ्या संस्थाही लोकसेवेकरितां आमच्या देशांत स्थापित होऊन त्यांचीं कामें फार चांगल्या रीतीनें चाललीं आहेत. यात्रा भरतात अशा मोठ्या क्षेत्राच्या ठिकाणीं रोगांचा उद्भव होऊन गरीबगुरिबांस अत्यंत क्लेश भोगावे लागतात आणि मृत्युमुखीं पडावें लागतें त्याचें निवारण करण्यास ज्या मंडळ्या स्थापित झाल्या आहेत त्या वर्गणीनें पैसे मिळवून त्या त्या क्षेत्रीं जाऊन आपल्या सुखाकडे आणखी जिवाकडे न पाहतां मोठ्या कळकळीनें सर्व लहानमोठ्यांस सहाय्य करूं लागल्या आहेत. त्याचा फार उपयोग होत आहे. त्याप्रमाणेंच नामदार गोपाळ कृष्ण गोखले ह्यांनीं मोठ्या उद्यो-

गानें "सर्व्हंटस ऑफ इंडियासोसायटी" म्हणजे हिंदुस्थान सेवक मंडळ ह्या नांवाची एक मोठी संस्था स्थापित करून तिची एक शाखा पुण्यास ठेविली आहे आणि दुसरी मुंबईस ठेविली आहे. ह्या मंडळींत चांगले चांगले विद्वान् पदवीधर स्वार्थत्याग करून दुष्काळादि संकटग्रस्त लोकांस अनेक प्रकारीं साह्य करीत आहेत हें सर्वश्रुत आहेच.

हें केवळ देशांतल्या देशांत चाललें आहे एवढेंच नव्हे. तर परवांच्या तुर्को—बल्गेरियन युद्धाच्या वेळीं त्या समरांगणांतल्या जखमी लोकांस आणि आजाऱ्यांस सहाय्य करण्याकरितां लक्षावधि रुपयांचें अन्न, कपडे आणि औषधें असें लाखों रुपयांचें साहित्य हिंदुस्थानांतल्या मुसलमान लोकांनीं तिकडे पाठविलें आणि शिवाय डॉक्टरही पाठविले. त्यांत केवळ देशसेवा होती आणि दुसरें कांहींएक नव्हतें हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

अशी देशसेवा करण्यास सांप्रतकाळीं आमच्या लोकांच्या स्थितींत पुष्कळ जागा आहे. ती पाश्चात्यांच्या उदाहरणांवरून आमच्या समंजस माणसांस सहज दिसण्यासारखी आहे. त्या जागीं त्यांनीं यथाशक्ति आपआपल्यापरी उद्योग केले असतां एकंदरींत मोठें फळ प्राप्त होण्याची आशा आहे. माझ्या एकट्याच्यानें काय होणार असें म्हणून स्वस्थ बसूं नये. अशा प्रकारच्या उद्योगाचें एकत्र फळ दृष्टोत्पत्तीस येण्यास युगांचीं युगें लागतात हें लक्षांत ठेवून एकसारखा उद्योग चालवावा हें प्रत्येक सुशिक्षित माणसाचें कर्तव्य आहे. वामनपंडितांनीं जें म्हटलें आहे कीं,—

आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षीं
आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी.

या उक्तीवर पूर्ण निष्ठा ठेवून देशसेवा केली असतां ती कोण-

त्याना कोणत्या तरी रूपानें केव्हांना केव्हांतरी आपल्या देशाच्या अल्प स्वल्प कल्याणास साधनीभूत होईल असें मनांत ठेवून आणि त्या सर्वांस निरपेक्ष बुद्धीनें श्रीकृष्णार्पणमस्तु असें मनःपूर्वक म्हणावें म्हणजे झालें.

---

## शास्त्रीयज्ञानाभिवृद्धि.

**ग्यासच्या उपयोगांत सुधारणा.**—हल्लींच्या व्यापारी युगाचा असा प्रभाव आहे कीं, उद्योगधंद्याच्या प्रत्येक शाखेंत सुधारणा झालीच पाहिजे. जो कोणी आपल्या धंद्यांत सुधारणा करीत नाहीं तो मागें पडतो, त्याचा धंदा बुडतो, आणि सुधारणा करणारा त्याची जागा पटकावितो. ह्या तत्त्वास अनुसरून प्रत्येक चाणाक्ष धंदेवाला मनुष्य आपापल्या धंद्यांत सुधारणा करून तो जास्त उपयुक्त आणि कमी खर्चाचा करण्याविषयीं प्रयत्न करीत आहे. पाश्चात्य देशांमध्यें प्रत्येक मोठ्या कारखान्यांत एक स्वतंत्र प्रयोगशाला असते, आणि तेथें नेमलेले शास्त्रज्ञ आणि कलाप्रवीण लोक, त्या कारखान्यांत प्रचलित असलेल्या पद्धतींत सुधारणा कशी घडवून आणावी ह्याबद्दल एकसारखे प्रयत्न करीत असतात. ही रीत हिंदुस्थानांतीलही कित्येक सुज्ञ कारखानदारांनीं उचलिली आहे, आणि तिजपासून त्यांस फायदा होत आहे. ह्या सुधारणाप्रवृत्तीच्या सुपरिणामाचें एक ढळढळीत उदाहरण ग्यासच्या निरनिराळ्या उपयोगांमध्यें झालेल्या सुधारणेचें आहे. ग्यास म्हणजे निरनिराळ्या पदार्थांपासून काढलेला 'धूर' किंवा वायु. तो मुख्यतः दगडी कोळशास आंच देऊन काढीत असतात, परंतु तो तयार करण्याच्या दुसऱ्याही रीती आहेत. केरोसीन तेलाचा गाळ, चरबी, अशासारख्या स्निग्ध पातळ पदार्थांची बारीक धार १००० अंशांपर्यंत तापविलेल्या लोखंडी रिटार्टांत

सोडली असतां त्यांपासून जो ग्यास तयार होतो, त्यास 'ऑइल-ग्यास' म्हणतात. आणि त्याचा उपयोग आगगाडीच्या डब्यांतून दिवे लावण्याकडे करीत असतात. तसेंच, दगडी कोळशास आंच देऊन त्यांतून ग्यास काढून घेतल्यानंतर जो 'कोक' बाकी राहातो, तो तापवून त्यावरून हवेचा प्रवाह सोडिला म्हणजे कार्बानिक आक्साइड व नैट्रोजन ह्यांचें जें मिश्रण त्यांतून निघतें तें चांगलें जळतें. त्याचा उपयोग बहुतकरून उष्णता उत्पन्न करण्याच्या कामीं करितात. त्याचप्रमाणें पाण्याची वाफही तप्त केलेल्या कोकमधून सोडून आणखी एकप्रकारचा 'ग्यास' तयार करितात त्यास 'वॉटरग्यास' म्हणतात. अशा प्रकारें निरनिराळ्या जातींचे ग्यास तयार करीत असतात. ग्यासचे मुख्य उपयोग दोन आहेत. प्रकाश उत्पन्न करणें हा एक उपयोग आणि शक्ति उत्पन्न करणें हा दुसरा उपयोग. ग्यासच्या दिव्यांत अलीकडे कितीतरी सुधारणा झाली आहे. दाहा पंधरा वर्षांपूर्वीं मुंबईसारख्या ठिकाणीं उघडे दिवे वापरीत असत, ते लोकांच्या लक्षांत आहेत. त्यांच्या जागीं आतां मॅंटलचे संथपणें जळणारे दिवे आले आहेत, आणि त्यांच्या योगानें ग्यास कमी लागून उजेड जास्त मिळत आहे. ५००० मेणबत्यांच्या उजेडाचे ग्यासचे दिवे निघतील असें पूर्वीं कोणाच्या स्वप्नींही नव्हतें, परंतु ते हल्लीं निघून रस्त्यांवरून लावूं लागले आहेत. ह्यांत थोडासा जास्त दाबलेला ग्यास वापरीत असतात. ह्या दाबामुळें त्या ग्यासमधले अणु एकमेकांच्या जास्त जवळ येऊन जास्त जोरानें जळतात आणि त्या योगें वर बसविलेली मॅंटलही जास्त प्रकाशमान होते. ग्यासच्या दिव्यांस विजेच्या दिव्यांच्या रूपानें जेव्हां जबर प्रतिस्पर्धी उत्पन्न झाला, तेव्हां त्यांत ह्या सुधारणा घडून आल्या. ग्यास इंजिनेंही ७००० घोड्यांच्या शक्तीपर्यंतचीं निघालीं

आहेत. त्याचप्रमाणें ग्यासच्या चुलीही निघून स्वैंपाकपाण्याचीं गृहकृत्यें त्यांवर समाधानकारक रीतीनें होत आहेत. ग्यासचे दिवे रस्त्यांतून लावूं लागल्यास शंभर वर्षें झालीं तत्संबंधानें एक शतवार्षिक प्रदर्शन लंडनास भरलेलें असून त्यांत ग्यासचे दिवे, इंजिनें, भट्टया वगैरे ग्यासचा उपयोग करावयाच्या उपकरणांत कसकशी सुधारणा होत गेली आहे तें चांगल्या प्रकारें दाखविलें आहे.

**अंडीं कृत्रिम रीतीनें उबविण्याची कला.**—मनुष्यें ज्या पक्ष्यांचा उपयोग खाण्यासाठीं करितात त्यांत कोंबडीं व त्यांचीं पिलें हीं प्रमुख होत. त्यांतही कोंबडीचीं पिलें हें खाणें विशेष पौष्टिक मानितात. परंतु कोंबडी आपल्या अंड्यांवर बसून तीं उबत्रीपर्यंतही मनुष्यास धीर निघत नाहीं. त्यांस कृत्रिम रीतीनें उष्णता लावून तीं लवकर फुटावीं म्हणून निराळीं यंत्रेंच काढिलेलीं आहेत. त्यांत तीं अंडीं ठेवून दिव्यांच्या योगानें त्यांस कृत्रिम उष्णता लावितात आणि ह्याप्रमाणें कोंबडीचीं पिलें लवकर मिळतशीं करितात. ह्या यंत्रांस इंग्रजींत 'इन्क्युबेटर' म्हणतात. अंडीं कृत्रिम रीतीनें उबविण्याची ही रीत ह्या सुधारलेल्या काळांतील आहे असें पुष्कळांस वाटत होतें, परंतु अलीकडे केलेल्या शोधांवरून असें समजून आलें आहे कीं, ही कला ईजिप्त देशांत आज ५००० वर्षें प्रचलित आहे! त्या देशांतले प्राचीनकाळचे लोक दरसाल सुमारें बारा कोटि अंडीं कृत्रिम रीतीनें उबवून पिलें काढीत असत! ही कला त्या देशांत अद्याप कितीएक कुटुंबांमध्यें वंशपरंपरागत चालत असून तींतल्या कृति आतांपर्यंत गुप्त ठेविलेल्या होत्या. त्या अलीकडे एका शोधक गृहस्थानें मोठ्या प्रयासानें माहीत करून घेतल्या आहेत. त्याचें असें म्हणणें आहे कीं, मिसरी लोकांची ही प्राचीन रीत आली-

कडच्या सुधारलेल्या रीतीपेक्षां जास्त चांगली आहे. प्राचीन मिसरी लोक उष्णता उत्पन्न करण्यासाठीं दिव्यांचा उपयोग न करतां पेटवलेलें गवत व शेण ह्यांचा उपयोग करीत, आणि शेवटीं शेवटीं तो विस्तवही विझवून अंड्यांच्या अंगच्याच उष्णतेनें तीं फुटतील अशी व्यवस्था ठेवीत. ह्या शोधकाच्या मतें प्राचीन मिसरी पद्धतच सर्वांनीं उचलण्यांत फायदा आहे! प्राचीनकाळच्या लोकांपासून अद्याप आम्हांस पुष्कळ गोष्टी शिकावयाच्या आहेत असें दिसतें!

**कृत्रिम धुकें.**—कोळशाच्या खाणींमध्यें ग्यासचा भडका होऊन जे भयंकर अपघात होतात, त्यांस कारण तेथल्या हवेंत उडणारी दगडी कोळशाची धूळ असते. ही सहज पेट घेते, आणि मग तिच्या ज्वाळा सर्वत्र पसरून शेंकडों माणसें प्राणास मुकतात. ह्यास्तव ही धूळ नाहींशी करण्यासाठीं एका कल्पकानें एक यंत्र तयार केलें आहे. त्यांतून पाण्याचे फवारे बाहेर पडून त्यांवर हवेचे प्रवाह इतक्या जोरानें आदळतात कीं, त्या पाण्याचे अगदीं सूक्ष्म कण होऊन सभोंवार पसरूं लागतात आणि त्याजागीं एकप्रकारचें धुकेंच उत्पन्न होतें. ह्या कृत्रिम धुक्यांत तेथल्या हवेंतली दगडी कोळशाची धूळ गुंतली जाऊन, त्या पाण्याच्या कणांबरोबर खालीं पडून वाहून जाते, आणि येणेंप्रमाणें खाणींत स्फोट होण्याची भीति कमी होते.

---

## प्राण्यांचे चमत्कार.

एका प्रकारचे समुद्रपक्षी आहेत, ते खवळलेल्या समुद्राच्या लाटांवर बसतात. एका प्रकारचीं कबुतरें आहेत, त्यांस तुम्ही त्यांच्या घरांपासून कितीही लांब नेऊन सोडा, तीं आपल्या घरीं बिनचूक येतात. उंटें रडतात. तीं फार धिमीं असतात; परंतु, पुढचें संकट त्यांना वासानें किंवा दृष्टीनें

कळतें, आणि तें कळलें म्हणजे तीं रडूं लागतात. कुत्र्यांस वर्तमानपत्रें वाचायाची करमणूक नाहीं; पण, खिडकींत उंचावर बसून खालची मौज पाहाण्यास त्यांना मोठी गंमत वाटते. गोगलगाई ह्या पाणी पीत नसतात; तर ओलावा शोषून घेतात; आणि मग तो सोडून देतात. पाऊस लागण्याच्या सुमाराच्या वेळेखेरीज त्या कधीं बाहेर पडत नसतात, आणि त्या झाडांच्या सालींवर किंवा पानांवर चढत असतात. पाऊस पुष्कळ पडायाचा असला, तर त्या, पानांचा आश्रय मिळेल अशा बाजूकडे वळतात; आणि जर थोडासा पडायाचा असला, तर, दुसऱ्या उघड्या बाजूकडे वळतात. कितीएक गोगलगाई पावसाआधीं पिंवळ्या असतात, आणि पाऊस पडल्यानंतर निळ्या होतात. कांहीं गोगलगांईच्या आंगावर पाऊस लागण्याच्या अगोदर दाहा दिवस टेंगळें टेंगळें येतात. त्यांतल्या प्रत्येक टेंगळाला वारीक तोंड असतें. तें, ओलावा घेण्याकरितां, पाऊस पडण्याच्या सुमारास उघडतें. कितीएक गोगलगांईच्या आंगावर, पुढें मोठें वादळ व्हावयाचें असलें म्हणजे, खोल खोल भोंकें दृष्टीस पडतात. पाऊस लवकर पडायाचा असला, वावटळ सुटायाची असली, किंवा कोणत्याही प्रकारें हवा बिघडायाची असली, तर, कोळी आपल्या जाळ्यास सांवरून धरण्याचे शेवटचे दोरे फारच आंखूड लावीत असतो. हे दोरे जर चांगले लांब लाविलेले दिसले, तर खचीत समजावें कीं, हवा चांगली निर्मळ राहून दाहा बारा दिवस तरी पाऊस पडायाचा नाहीं. कोळी कांहींएक उद्योग न करितां स्वस्थ राहिला म्हणजे असें समजावें कीं, हवा लवकर चांगली होणार आहे. पाऊस पडत असतां ते फार गडबडींत दिसले म्हणजे समजावें कीं, हा पाऊस फार दिवस राहावयाचा नाहीं, आणि तो

पाऊस गेल्यावर दाहा बारा दिवसपर्यंत हवा चांगली राहाणार आहे. कोळयाच्या घरांत चोवीस तासांत कांहींना कांहीं तरी कमजास्त होतें. हा फेरफार जर त्यानें सायंकाळच्या साहा वाजल्यापासून सात वाजतपर्यंत केला असला, तर त्या रात्रीं अभ्रें कांहीं यावयाचीं नाहींत, आणि सगळी रात्र छान-दार स्वस्थपणानें जावयाची, असें समजावें. हरिणांस आणि सर्पांस मधुर स्वर फार प्रिय असतो, ही आख्यायिका सर्वांस ठाऊक आहेच. तशीच गोष्ट सील माशाची आहे. जाहा-जावर मधुर वाद्य कोणी वाजवूं लागला म्हणजे, तें ऐकण्या-करितां ते प्राणी त्या गलबताच्या मागें मागें शेंकडों कोसपर्यंत चालत असतात. एक इंग्लिश गृहस्थ पियानो वाजवीत बसला असतां, दाहा वीस कोळी वरून खालीं उतरून त्याच्या मेजाभोंवतीं येऊन बसले, आणि वाजविणें बंद झाल्याबरोबर भराभर आल्या मार्गानें वर गेले. सरड्यालाही मधुर स्वर आवडतो. आफ्रिका खंडामध्यें एक शिकारी रानांत गेला. तेव्हां त्यानें एक मोठा सरडा झाडाच्या एका फांदीवर स्वस्थ पडलेला पाहिला. नंतर लागलाच त्यानें आपला पांवा वाज-विण्यास आरंभ केला. त्याचा शब्द कानीं पडतांच त्या प्राण्यानें आपली मान तुकाविली, आणि शब्द येत होता, तिकडे कान वळविला. तो शेवटीं त्यानें इतका मोहून गेला कीं, त्या शिकाऱ्यानें, स्वस्थपणें त्याच्याजवळ जाऊन त्याजवर फांसा टाकिला, तोंपर्यंत तो तेथून हालला नाहीं. हत्तीला मधुर स्वर फार आवडतो. तो मधुर स्वर ऐकण्यास उभा राहातो, तो ऐकूं आला म्हणजे डोलूं लागतो, आणि केव्हां केव्हां त्या स्वराबरोबर आपण स्वतः शब्द करण्याचा प्रयत्न करितो. कितीएक कुत्र्यांनाही हा मोठा शौक असतो.

# लोक काय बोलतात.

नागपुरशहराजवळ वीज उत्पन्न करण्याचा एक मोठा कारखाना काढला असून शहरांत विजेचे दिवे लावूं लागले आहेत.

---

सोलापुर जिल्ह्यांत सर्वत्र दुष्काळ पडलेला असून, दुष्काळग्रस्त लोकांच्या मदतीसाठीं फंड जमा करण्याचें काम सुरू झालें आहे.

---

सगळ्या हिंदुस्थानांत एकसारखीं वजनें मापें चालावीं कीं काय ह्याचा विचार करण्याकरितां सरकारानें एक कमिटी नेमिली आहे. ती ठिकठिकाणीं फिरून लोकांचे अभिप्राय विचारीत आहे.

---

आपले बादशाह महाराज पंचम जॉर्ज ह्यांच्या सूचनेवरून लार्ड रोजवरी हे विद्वान् गृहस्थ आपले माजी बादशाह सप्तम एडवर्ड ह्यांचें एक विस्तृत चरित्र लिहिणार आहेत. ग्रंथ वाचनीय होईल याविषयीं कांहीं शंका नाहीं.

---

इंग्लंडांतील सुप्रसिद्ध ज्योतिषी सर राबर्ट बॉल हे गेल्या महिन्याच्या २६ व्या तारखेस मरण पावले. ह्यांनीं ज्योतिषशास्त्रावर समजण्यास सुलभ असे अनेक ग्रंथ लिहिले आहेत. ह्यांचें वय ६३ वर्षांचें होतें.

---

सगळ्या पृथ्वीवर क्विनाईन तयार होतें त्याचा सहावा हिसा एकट्या हिंदुस्थानांत खपतो. हें सिंकोना नांवाच्या झाडाच्या सालीपासून तयार करितात. त्या झाडाची हिंदुस्थानांत लागवड करणें फायदेशीर होईल असें वाटतें.

---

कलकत्त्यास एका घरांत बॉंब तयार करण्याचें पुष्कळ सामान आणि पुष्कळ पत्रव्यवहार सांपडलेला असून तत्संबंधानें तिकडचें पोलीस

चौकशी करीत आहे. ह्या चौकशींत दिल्ली येथें घडलेल्या अत्याचाराचाही पत्ता लागेल असें म्हणतात.

---

दक्षिणआफ्रिकेंतील हिंदीलोकांनीं तेथील सरकार आपल्या गाऱ्हाण्यांची दाद घेत नाहींत म्हणून, निःशस्त्रप्रतीकाराची मोहीम सुरू केली आहे. तींत हजारों बायकामुलें अत्यंत कष्ट सोशीत आहेत. त्यांस हिंदुस्थानांतून हजारों रुपयांची कुमक जात आहे.

---

गेल्या महिन्यांत येथें माधवबागेंत सभा भरून करवीरमठाचे श्रीशंकराचार्य ह्यांनीं मुंबईतील कांहीं गृहस्थांस त्यांच्या त्यांच्या व्यवसायाच्या अनुरोधानें निरनिराळ्या पदव्या दिल्याचें प्रसिद्ध केलें. त्यांच्या सनदा देण्याचा समारंभ पुढें कोणा संस्थानिकांच्या हातून होणार आहे असें समजतें.

---

सुप्रसिद्ध सृष्टिशास्त्रज्ञ आल्फ्रेड रसेल वालेस हे गेल्या महिन्यांत मरण पावले. ह्यांचें वय ९० वर्षांचें होतें. सजीव सृष्टीसंबंधाचा उत्क्रांतिसिद्धांत ह्यांनीं डार्विनबरोबर परंतु स्वतंत्रपणें प्रसिद्ध केला. ह्यांचें चरित्र बालबोधाच्या १९०८ मे च्या अंकांत आलें आहे.

---

राजापुरकर संगीत मंडळीचे मालक रा. रा. बाबाजी दौलतराव राणे यांस, गेल्या महिन्याच्या २२ व्या तारखेस नागपूर येथें ते संत तुकाराम नाटकांत आपली भूमिका करीत असतां, एकाएकीं हृदयाचें चलन बंद पडून देवाज्ञा झाली. हे स्वीकृत व्यवसायांत प्रवीण होते. ह्यांच्या आत्म्यास परमेश्वर शांति देवो.

---

हिंदुस्थान सरकारानें बंगालसरकारला असें एक पत्र लिहिलें आहे कीं, सरकारी कामदार आणि रयतलोक ह्यांच्यामध्यें संबंध चांगले

राहावे ह्याकरितां असें समजणें आवश्यक आहे कीं, आपली सौम्यवृत्ति कायम न ठेवणें आणि लोकांशीं तुसडेपणानें वागणें ही सरकारी कामदारांच्या कामांत मोठी उणीव आहे असें समजलें जाईल. तिकडे सरकारी कामदारांनीं लक्ष ठेवावें.

---

अमेरिकन मराठी मिशनचा शतवार्षिक उत्सव गेल्या महिन्यांत मुंबईस व अहमदनगरास झाला. हल्लीं निरनिराळ्या मिशनांच्या संबंधानें सुमारें २००० अमेरिकन लोक हिंदुस्थानांत काम करीत असून गेल्या शंभर वर्षांत ४०००० अमेरिकन मिशनरींनीं हिंदुस्थानांत काम केलें आहे. ह्या मिशनांच्या योगानें हजारों हिंदी लोकांस शिक्षण मिळून त्यांची स्थिति सुधारली आहे, आणि ह्याबद्दल हिंदुस्थान त्या मिशनांचें उपकारी आहे.

---

यंदांच्या माट्रिक्युलेशन परीक्षेपासून देशभाषा आणि शास्त्रीयविषय ह्या दोन विषयांची परीक्षा युनिव्हर्सिटीनें घेऊं नये, तर ते विषय विद्यार्थ्यांस चांगले येत आहेत असे दाखले त्यांच्या त्यांच्या शाळांच्या मुख्य अधिकाऱ्यांनीं दिले म्हणजे, ते विषय त्यांस येतात असें समजून चालावें असें ठरलें आहे. ह्याच्या योगानें ह्या दोन विषयांकडे एकंदरीनें दुर्लक्ष होईल अशी भीति वाटते. ह्याविषयीं विद्याधिकाऱ्यांनीं आणि विद्यार्थ्यांच्या आईबापांनीं वेळीं दक्ष रहावें हें आवश्यक आहे.

---

सन १८९९।१९०० सालीं हिंदुस्थानांत ७६,५६,५१५ रुपयांची कांच व कांचमाल खपला होता. पण हा आंकडा झपाट्यानें वाढून १९१०।११ मध्यें हा माल १ कोटी ५७ लक्षांचा खपला. हा आयात माल वाढविणाऱ्या देशांचे नंबर आस्ट्रिया, हंगेरी, जर्मनी, व ग्रेटब्रिटन असे लागतात. परदेशांतून कांचमाल येतो त्यांतील ½ भाग केवळ बांगड्यांचा असतो! ह्या बांगड्या बहुतेक आस्ट्रियांतून येतात. सन १९१०।११ सालीं ह्या देशांत ५९ लक्षांच्या बांगड्या २८ लक्षांचे मणी ८॥ लक्षांच्या बाटल्या १६ लक्षांचीं तावदानें व ४८ लक्षांचा इतर कांचमाल परदेशाहून आला.

---

प्रख्यात बंगाली कवि बाबू रवींद्रनाथ टागोर ह्यांस त्यांच्या कविताबद्धवाङ्मयप्रावीण्याबद्दल नोबेलच्या वार्षिक बक्षिसांपैकीं एक लाख वीस हजार रुपयांचें ह्या सालचें बक्षीस मिळालें आहे. नोबेलनें डायनामैट तयार करण्याच्या कारखान्यावर मिळविलेले दोन कोटि रुपये, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, वाङ्मय, इत्यादि विषयांमध्यें नांव मिळविलेल्या विद्वानांस दरसाल बक्षिसें वांटण्यासाठीं दिले आहेत. त्यांतलें बक्षीस मिळविणारे पहिले हिंदी गृहस्थ बाबू रवींद्रनाथ टागोर होत. हे सुप्रसिद्ध महर्षि देवेंद्रनाथ टागोर ह्यांचे चिरंजीव आहेत. ह्यांच्या बंगालीभाषेंतल्या कविता रसपूर्ण असून बंगाल्यांत सर्वतोमुखीं आहेत, आणि ह्यांच्या इंग्रजी कवितांनीं पाश्चिमात्य विद्वानांस मोहून टाकिलें आहे.

---

शेठ दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला हे येथें गेल्या महिन्याच्या ११ व्या तारखेस ५८ वर्षांचे होऊन वारले. हे गृहस्थ मुंबईमध्यें गुप्तदानशूरांत प्रमुख असून एकनिष्ठ प्रार्थनासमाजी होते. ते लहानपणीं चंदनाच्या लांकडाचा व्यापार करीत असून पुढें कापसाच्या व्यापारांत दलाल झाले होते. त्या धंद्यांत त्यांना पुष्कळ पैसा मिळत असे. तो ते बहुतेक लोकहितार्थ खर्चीत असत. धर्मार्थ शाळा आणि धर्मार्थवाचनालयें स्थापणें हें त्यांस विशेष प्रिय असे. भडोच पुस्तकालय, माथेरान कर्सनदास मुळजी पुस्तकालय, दादाभाई नवरोजी सेमिनरी लोकपुस्तकालय, इत्यादि शेंकडों धर्मार्थ संस्थांस त्यांनीं हजारों रुपये दिलेले आहेत. त्यांत अत्यंत वर्णनीय गोष्ट ही आहे कीं, धर्मादायानें आपल्या नांवाचा डांगोरा पिटावयाचा नाहीं, गुप्तदान करावयाचें, हें त्यांचें ब्रीद असे. अडला गांजला असा मनुष्य त्यांजकडून कधींही विन्मुख आला नाहीं. ते मोठे शांतवृत्ति असत त्यांनीं कधीं कोणाला दुखविलें नाहीं. ह्यांनीं युरोपखंडांत आणि चीन व जपान देशांत पुष्कळ प्रवास केला होता. परमेश्वर ह्यांच्या आत्म्यास चिरस्थायी शांति देवो.

# बालबोध.

## चुनीलाल धरमदास सरय्या.



बुद्धि ही एक विलक्षण शक्ति आहे. ती विश्वंभरानें केवळ मनुष्याकरितां ह्या जगांत उत्पन्न केली असून तिची वांटणी, तिच्या उत्क्रांतीचे योग, आणि त्या योगांचें पर्यवसान हीं सर्व त्यानें आपल्या हातीं ठेविलीं आहेत. पृथ्वीवरच्या व्यापारधंद्यांतल्या मोठमोठ्या घडामोडी पाहून त्यांचा विचार केला म्हणजे असें वाटतें कीं, हा कारभार सगळाच अतर्क्य आहे, आणि

त्याचे चमत्कार पाहून त्याच्या कारणांचें कौतुक करावें एवढेंच काय तें आपणा माणसांकडे आहे. इंग्लिश सरकाराची राजवट हें एक हिंदुस्थानास अपूर्व नवयुग प्राप्त झालें आहे. त्याच्या साहचर्यानें ह्या देशांतल्या लोकांस आपलें बुद्धिवैभव दाखविण्यास नवनवीं पर्वें प्राप्त होत आहेत, ही एक आपणांवर परमेश्वरी मोठी कृपा आहे असें आम्ही समजतों. कांकीं, आमच्या राष्ट्राच्या उन्नतीस उपयोगी असे पाश्चात्यांतल्या गुणांतले कितीएक अगदीं नवे गुण आमच्यामध्यें प्रगट होत आहेत. त्याचें एक मोठें ठळक उदाहरण सांप्रतकाळच्या मोठ्या व्यापाराच्या घडामोडींत नुक्तें परवां घडून येऊन सर्वांच्या विस्मयास कारणीभूत झालें आहे. तें शेट चुनीलाल धरमदास सरय्या ह्यांच्या चरित्राचें आहे. तें चरित्र आम्ही येथें संक्षेपतः सादर करितों.

शेट चुनीलाल धरमदास सरय्या ह्यांचा जन्म सुरत येथें इ.स. १८६२ च्या जून महिन्याच्या २२ व्या तारखेस दशदिशावळ वाणी जातींत झाला. त्यांच्या वडिलांचें नांव धरमदास दुल्लभदास सरय्या असें होतें. चुनीलाल आपल्या वयाच्या १८ व्या वर्षीं सुरत हायस्कुलांतून मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत पास झाले, आणि लागलेच मुंबईच्या ग्रांट मेडिकल कॉलेजांत जाऊं लागले. तेथें वैद्यकीचा चांगला अभ्यास करून त्यांनीं आपल्या गुरूंची मर्जी इतकी संपादिली कीं, हा कोणी तरी मोठा धन्वंतरी निपजणार आहे असें ते म्हणत असत. त्या कॉलेजांतली शेवटची एल. एम्. अँड एस. ही त्यांची परीक्षा इ०स० १८८५ ह्या वर्षीं उतरली. तींत ते पहिल्या वर्गांत पहिले आले, आणि त्यांस एक सुवर्णपदक आणि दुसरीं कितीएक बक्षिसें मिळालीं. नंतर कांहीं दिवसपर्यंत चुनीलाल ह्यांनीं मुंबईस डॉक्टरीचा धंदा चालवून त्यांत चांगला लौकिक मिळविला.

पुढें, त्यांस पैसा चांगला मिळत असल्याच्या योगानें आणि स्वतःच्या स्फूर्तीनें त्यांचें लक्ष बाजारांतल्या देवघेवीच्या व्यापाराकडे गेलें, आणि ते त्यांत पडले. त्या कामांत अगदीं अनभ्यस्त असतांही त्यांचें चातुर्य पुष्कळ ठिकाणीं फार चांगलें दिसून आलें. तेव्हां त्यांचे एक आप्त रावसाहेब घेलाभाई हरिदास हे मुंबई ब्यांकेमध्यें चांगल्या मोठ्या हुद्यावर होते, त्यांस चुनीलाल हे चांगले व्यापारी होतील असें वाटून त्यांनीं त्यांस इ० स० १८८७ च्या मे महिन्यांत चांगल्या पगारावर त्या ब्यांकेंत घेतलें. तेथें त्यांच्या कामाची तारीफ होऊन तेव्हांच्या म्यानेजरांनीं त्यांस त्या ब्यांकेच्या इंदूरशाखेचे मुख्य सराफ नेमिलें. तेथून लवकरच त्यांची बदली मुंबईतील ऑफिसांत बढतीवर झाल्यावर तेथें ते शेट घेलाभाई ह्यांच्या हाताखालीं ब्यांकेच्या कामांत चांगलेच प्रवीण झाले. पुढें शेट घेलाभाई राजीनामा देऊन गेल्यावर शेट चुनी-लाल यांस त्या ब्यांकेमध्यें बिलकीपरची जागा मिळाली. ही जागा सहसा कधीं हिंदी गृहस्थांस मिळत नसे. ह्या जागेवर त्यांचें मुख्य काम हें होतें कीं, ब्यांकेचा पैसा नीट सुरक्षित जागीं राहून त्याचें व्याज वेळच्यावेळीं येईल असें करणें. ह्या जागेवर असतांना चुनीलाल यांस मुंबई ब्यांकेशीं संबंध असलेल्या सर्व लोकांविषयीं म्यानेजरांस गुप्त रिपोर्ट करावे लागत असत, आणि त्यांच्या हातून दरसाल दाहा बारा कोट रुपयांहून अधिक रकमेची उलाढाल होत असे. त्यांच्या मसलतीनें केलेल्या कारभारांत, इ० स० १९०६ त ते त्या ब्यांकेंतून निघतपर्यंत २० वर्षांत एका पैचीही खोट कधीं आली नाहीं. आणि ह्या सर्व मुदतींत ते कधीं एक दिवस-ही गैरहजर राहिले नाहींत. ही मुंबई ब्यांक सरकारी आहे असा पुष्कळ लोकांचा समज आहे, परंतु तसें कांहीं

नाहीं. तरी ह्या ब्यांकेशीं सरकारचा निकट संबंध आहे. तो असा कीं, सरकारापासून पांच पांच अगर दाहा दाहा वर्षांच्या करारानें शेंकडा कमिशनचा दर ठरवून मुंबईसरकारचे खजीनदार म्हणून ही सरकारचें काम चालवीत असते. म्हणजे, इलाख्याचा वसूल जो येतो तो तेथें जमा केला जातो व सरकारांतून द्यावयाचे पैसे हे तेथूनच देण्याची व्यवस्था केली जाते. हें काम पब्लिक अकौंट्स डिपार्टमेन्ट ह्या नांवाच्या त्या ब्यांकेच्या एका खात्यांत तिच्या देखरेखी-खालीं चालत असतें. तसेंच सरकारानें कोट्यवधि रुपयांचें कर्ज काढलें आहे व दरसाल काढीत असतें त्यावरील व्याज देण्याचें कामही ह्या ब्यांकेकडे दिलें आहे. हें काम पब्लिक डेट् ऑफीस नामक खातें काढून ही ब्यांक कर्जदारांस म्हणजे सरकारी प्रामिसरी नोटी धारण करणारांस नियमित वेळीं वर्षांतून दोन वेळां व्याज देऊन व तत्संबंधीं इतर व्यवस्था नीट चालवून करीत असते. शेट चुनीलाल मुंबई ब्यांकेंतून निघाले तेव्हां त्यांना दरमहा १२५० रुपये मिळत होते, आणि ते जर तसेच तेथें रहाते तर त्यांना लवकरच २००० रुपये झाले असते. परंतु इ० स० १९०६ ह्या वर्षीं हिंदी ब्यांका स्थापण्याचा विषय व्यापारी लोकांत फार प्रचलित झाला, आणि त्या कामांत शेट चुनीलाल सरख्या हे चांगले निष्णात झालेले आहेत असें पाहून मोठमोठ्या व्यापाऱ्यांनीं त्यांस स्वतंत्र हिंदी ब्यांक स्थापित करण्याविषयीं पराकाष्टेचा आग्रह केला. त्याप्रमाणें त्यांनीं 'ब्यांक ऑफ इंडिया' म्हणून एक नवी ब्यांक मुंबईस स्थापण्याची व्यवस्था केली. परंतु डायरेक्टरांनीं त्या ब्यांकेवर म्यानेजर युरोपियन नेमल्या-मुळें त्यांनीं त्या ब्यांकेचा संबंध अजीबात सोडून देऊन 'इंडियन स्पीसी ब्यांक' ह्या नांवाची दुसरी एक २ कोटी

रुपये भांडवलाची नवी ब्यांक स्थापित करून इ० स० १९०६ च्या नोव्हेंबरच्या १७ व्या तारखेस सरकारांत रजिष्टर केली, आणि तिचें सगळें काम ते आपण स्वतः पाहूं लागले. त्यांच्या कर्तबगारीनें त्या ब्यांकेची चांगली चलती झाली, ते भागीदारांस शेकडा सहापेक्षां अधिक व्याज देऊं लागले, आणि तिची कीर्ति सर्वतोमुखीं होऊन, तिच्या शेअरांची किंमत वाढली आणि तिजकडे लाखों रुपयांच्या ठेवी येऊं लागल्या. नंतर शेट चुनीलाल ह्यांचें लक्ष शेअरांच्या सट्टेबाजाराकडे लागलें आणि त्यांतही त्यांनीं इतकें प्रावीण्य संपादिलें कीं, सर्व शेअरांची किंमत ते म्हणत त्याप्रमाणें कमीजास्त होऊं लागली. पुढें इ० स० १९०८ ह्या वर्षीं मोत्यांच्या भावांत फार चलबिचल होऊन कितीएक धनवान व्यापाऱ्यांस दिवाळीं निघण्याची भीति पडली. तेव्हां त्या व्यापाऱ्यांनीं ह्यांची प्रार्थना केल्यावरून ह्यांनीं त्यांस पैशाचें चांगलें साह्य करून त्यांचा बचाव केला. पुढें शेट चुनीलाल चांदीच्या व्यापारांत पडले तोही त्यांनीं काबीज केल्यासारखा केला. हिंदुस्थान-सरकार नाणें पाडण्याकरितां पुष्कळ चांदी एकदम विकत घेणार आहे अशी माहिती मिळतांच ती संधी साधून त्यांनीं मोठ्या प्रयत्नांनीं यूरोपच्या बाजारांतली सगळी चांदी खरेदी करण्याची तजवीज केली. हें पाहून सरकारनें आपला चांदी विकत घेण्याचा विचार लांबणीवर टाकून आयात चांदीवर शेंकडा १५ टक्के कर बसविला. हा कर रद्द करण्याविषयीं त्यांनीं सरकारास वारंवार अर्ज केले. त्यांचा कांहीं उपयोग होईना, तरी तिळभरही न डगमगतां त्यांनीं त्या सट्टयाकरितां एक वेगळी मंडळी काढून एकदम ३ कोटी रुपयांच्या चांदीचा सौदा केला आणि भाव वाढविले. ती महागाई सगळ्या युरोपास जाणवली आणि जगांतल्या चांदीचा सगळा व्यापार हिंदुस्थानां-

तल्या एका कंपूनें आपल्या हातीं घेतला आहे असा बोभाट झाला. तेव्हां या मंडळीसारखीच एक मंडळी इंग्लंडच्या धनवान् व्यापाऱ्यांनीं काढिली, परंतु तिचें शेट सरय्या ह्यांच्या मंडळीपुढें कांहीं चालेना. तेव्हां हिंदुस्थानसरकाराला गेल्या वर्षाच्या शेवटीं म्हणा किंवा ह्या वर्षाच्या आरंभीं म्हणा शेट चुनीलाल ह्यांच्या मंडळीपासून चांदी विकत घेणें भाग पडलें. ह्या सगळया खटपटीचा परिणाम असा झाला कीं, ह्या सांपत्तिक घडामोडीची चौकशी करण्याकरितां सरकाराला एक मोठें कमिशन् नेमावें लागलें आहे. आणि त्या कमिशनपुढें साक्ष देण्यास शेट चुनीलाल यांस विलायतेस बोलाविलें होतें, परंतु इतक्यांत हिंदुस्थानांतील कांहीं ब्यांकांचीं दिवाळीं निघून बाजारांत गडबड उडाल्यामुळें शेट चुनीलाल ह्यांस विलायतेस जाण्याचा विचार रहित करणें भाग पडलें.

येथें ब्यांकांविषयीं थोडें सांगणें अवश्यक आहे. वास्तविक पाहिलें असतां बैलांचे खटारे आणि आगगाड्या ह्यांचा व्यवहार तत्त्वतः एकच म्हणजे माल एका जागेवरून दुसऱ्या जागीं नेणें एवढाच आहे. त्याच न्यायानें आपल्यांतल्या जुन्या पेढ्या आणि ह्या ब्यांका ह्यांचा व्यवहार तत्त्वतः एवढाच आहे कीं, लोकांस आपले पैसे सुरक्षित ठेवण्याची, त्यांवर व्याज मिळण्याची, आणि ते पाहिजेत तेव्हां काढून आपल्या कार्यास लावण्याची सोय करून द्यावी. परंतु एखाद्या खटारेवाल्यास आगगाडीचें यंत्र हें जसें ब्रम्हांडयंत्र वाटेल, त्याप्रमाणेंच आमच्या जुन्या पेढीवाल्यांस सध्याच्या ब्यांका ब्रम्हांड वाटाव्या अशी त्यांची स्थिति आहे. त्यांचे कायदेकानू अगदीं वेगळ्या प्रकारचे असून त्यांप्रमाणें त्यांची व्यवस्था चालवावी लागते. त्यांत इतके कांहीं बिकट प्रकार आहेत कीं, त्यांचें संपूर्ण आकलन आणि त्यांतले गुणदोष हजार पांचशें माणसांत शेट सरय्यांसारख्या

एकाद्यासच कळतात. हें ह्या धंद्याचें खरें स्वरूप अलीकडच्या कांहीं ब्यांकांच्या चौकशीवरून पुष्कळ साधारण लोकांस भयंकर असें वाटून ते आपआपले पैसे ब्यांकांतून काढून घेऊं लागले आहेत. त्यामुळें कितीएक ब्यांकांवर मागण्यांची वृष्टि होऊन आणि त्या पुरविण्यास त्यांजपाशीं रोख पैसा नाहींसा होऊन त्यांचीं दिवाळीं निघालीं आहेत. आणि मध्यस्थितींतल्या आणि गरीब बिचाऱ्या हजारों ठेवी ठेवणारांचा पैसा बुडून त्यांवर कठिण प्रसंग आलेला आहे.

वर सांगितल्याप्रमाणें शेट चुनीलाल सरय्या यांनीं विलायतेस जाण्याचा बेत रहित केला तरी त्यांच्या स्वीशी ब्यांकेवर इतर कांहीं ब्यांकांप्रमाणें अव्यवस्था असल्याचा आरोप होऊन त्याविषयीं मुंबई हायकोर्टांत चौकशी सुरू झाली. परंतु त्या ब्यांकेचे शेअरहोल्डर आणि ठेवी ठेवणारे ह्या सर्वांनीं आपला पूर्ण विश्वास शेट चुनीलाल सरय्या यांजवर असल्याविषयीं कोर्टाची खात्री केल्यावर तो अर्ज कोर्टानें काढून टाकला. अर्ज काढून टाकतांना नामदार सर न्यायमूर्ती दावर म्हणाले कीं, 'ह्या मर्दानीच्या झगड्यामध्यें ७५००००० रुपयांच्या किंमतीचे शेअर ज्यांच्या हातीं होते ते आणि एकंदरींत १०००००० रुपयांच्या ठेवी ठेवणारे लोक ह्या सर्वांनीं शेट सरय्या ह्यांच्या म्हणण्याचें समर्थन एक जुटीनें केलें; आणि त्यांच्या विरुद्ध बोलणारा एकही कोणी निघाला नाहीं ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.'

हें सगळें आटोपल्यावर स्वीशी ब्यांकेच्या विरुद्ध केलेला अर्ज खोटसाळपणाचा आहे असें ठरवून नामदार न्या. सर. डी. दावर यांनीं तो काढून टाकला. तेव्हां सर्वांस फार संतोष झाला आणि शेट चुनीलाल सरय्या यांनीं एक मोठा जय मिळविला म्हणून सर्वतोमुखीं त्यांचें मोठें अभिनंदन झालें.

आणखी त्या ब्यांकेचें काम पुढें पूर्ववत चांगलें चालेल अशी लोकांना फार आशा लागली. परंतु ईश्वरी सूत्र कांहीं वेगळें होतें. मनुष्याचा आनंद किती अल्पायुषी असतो हें प्रत्ययास आणून देण्यासच कीं काय नकळे त्या ब्यांकेवर आकाशची कुऱ्हाड एकाएकीं पडली. ब्यांकेसंबंधाच्या निकालाच्या तिसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं म्हणजे गेल्या महिन्याच्या नोव्हेंबरच्या २९ व्या तारखेस शनिवारीं ७॥ वाजतां शौचमुखमार्जनानंतर शेट चुनीलाल हे वांद्रें येथें आपल्या बंगल्यांत मेजाशीं विलायतचीं पत्रें लिहिण्याच्या कामास आरंभ करण्याच्या विचारांत बसलेले असतां एकाएकीं त्यांच्या छातींत कळ निघाली. तेव्हां लागलीच धांवाधांव होऊन डॉक्टरांस आणिलें, परंतु ते येऊन पोंचण्याच्या आधींच त्यांचा अंतरात्मा देह सोडून निघून गेला होता! परीक्षेअंतीं डॉक्टर लोकांनीं असें मत दिलें कीं, हृदयाची क्रिया बंद पडून मृत्यू आला आहे. तेव्हां अर्थांत सगळे विचार जागचेजागीं तसेच राहिले, आणि त्याच दिवशीं स्पीशी ब्यांकेच्या डायरेक्टर लोकांनीं स्वतः होऊन ब्यांक बंद करण्याविषयीं हायकोर्टांत अर्ज दाखल केला. त्या अर्जाची सुनावणी होऊन ब्यांक बंद करण्याचा अखेरचा हुकुम नुकताच सुटला आहे. ह्या सुनावणींत कितीएक अश्रुत व विस्मयावह अशा विलक्षण गोष्टी बाहेर पडल्या आहेत. हिशोबांच्या तपासणींत कांहीं व्यंग राहिलेलें असलें पाहिजे असें कांहीं लोक म्हणत आहेत, आणि दुसरे कांहीं लोक, शेट चुनीलाल ह्यांनीं चांदीच्या आणि इतर सट्टयांत गरीब बिचाऱ्या ठेवी ठेवणारांचे आणि शेअर धारण करणारांचे पैसे घातले आहेत आणि त्यामुळें हा सगळा घोटाळा झाला आहे असें कांहीं लोक चांचरत चांचरत बोलत आहेत. ह्यांत खरें खोटें किती आहे देव जाणे. ह्या सगळ्या चक्रव्यूहाचा उलगडा होऊन शेवटीं

खरा दोष कोणावर येतो तें अद्याप पाहाणें आहे. ह्या सर्व गोष्टींत कांहीं चमत्कार असे आहेत कीं, ते सांप्रतच्या सुधारणाकालामध्यें कसे घडून आले असावे ह्याच्या आश्चर्यांत चांगले चांगले समजदार लोक अगदीं थक्क होऊन गेले आहेत. तरी स्पीशी ब्यांकेची अंतर्गत स्थीति वाईट नाहीं असें तत्संबंधी मंडळीस अद्याप वाटत असून सरकारच्या मंजुरीनें तिला पुन्हा चांगलें स्वरूप देण्याचा त्यांचा प्रयत्न चालला आहे.

अशा प्रकारें शेट चुनीलाल सरय्या ह्यांची ह्या लोकची यात्रा संपली. तिच्या ह्या अल्प हकीकतीवरून ब्यांकांच्या कामाच्या संबंधानें त्यांची बुद्धिमत्ता केवढी होती हें अगदीं सहज दिसून येईल. हायकोर्टामध्यें त्यांच्या साक्षींत सामान्यत्वें ब्यांकांच्या अंतर्गत वहिवाटींत ज्या कांहीं विलक्षण गोष्टी चालत असतात आणि ज्यांविषयीं साधारण लोकांस तिळमात्रही माहिती नव्हती त्या गोष्टी बाहेर पडून लोकांचें ज्ञान पुष्कळ वाढलें आहे. तें त्यांस ह्यापुढें ब्यांकांशीं संबंध ठेवण्याच्या कामांत आणि ब्यांका चालविण्याच्या कामांत पुष्कळ उपयोगी पडेल आणि हेंच त्यांचें चिरस्थायी स्मारक होईल असें आम्हास वाटतें. ह्यांच्या आत्म्यास परमेश्वर शांति देवो.

---

## मनुष्यपुष्पसंवाद.

म०—बा पुष्पा तुज पाहतां मज गमे तूं दैवशाली खरें
घालीती तव गंध घेऊनि शिरें खालीं सदा अत्तरें
राजे रंक तसे सदा तुजकडे प्रेमादरें पाहती
रत्नाहूनिहि मोलवान गणुनी देवा तुला वाहती १.
या पेक्षां बहु भाग्य या न जगतीं दूजें दिसेना मला
मोठें पुण्य तुझें म्हणोनिच तुला हा जन्म बा लाभला
वाटे व्यर्थ तुझ्या पुढें खचित हें या माणसाचें जिणें
ज्ञानी ज्ञानि म्हणोनिया निशिदिनीं संसारदुःखा भिणें २.

पु०—ऐसें काय बरें उगाच वदसी तूं शाहण्या मानवा
माझें साम्य तुशीं कदापि न घडे हा मोह वाटे नवा
माझें रूप सुगंध देहहि तसा या भूमिचे सोबती
तूं जाशील तपादि पुण्य करुनी बा देवलोकाप्रती ३.
आम्हां वेंचुनियां तुम्ही निजकरीं वाहाल देवावरी
तेव्हां सद्गति मात्र येइल खरी ती आमुचीया करीं
हें का अंतर सान तूज गमतें बोलें खरें मानवा
हें शोभेल तुझ्या अमोलिक पहा बा बुद्धिच्या वैभवा ४.
हें सामर्थ्य तुम्हां समस्त मनुजां देवें दिलेलें असे
तेणें निश्चित जन्ममृत्यु टळुनी लोकीं कधीं ना डसे
तें आम्हास कुठें! अखंड पडतें मातीमधें लोळणें
यापेक्षां अणखीं तुम्हाजवळ मी बा कायतें सांगणें ५.
म०—छी छी छी कुसुमा असें भलतसें तूं काय बा बोलशी
आम्राशीं भ्रम पावुनी उगिच बा कां कौंडळा तोलशी
अंतर्बाह्य सुगंधपूरित तशी तूझी तनू साजिरी
माझी ही मलराशिपूर्ण कसली सारी तियेची सरी ६.
होतीं हीं सगळीं महंत म्हणती पूर्वार्जिताचीं फळें
त्यांचा योग कुणासही न जगतीं भोगावयाला टळे
राहोंया स्थिरचित्त होउनि सदा चिंतोनि विश्वंभरा
नाहीं लाभ जयांत वाद लवही तो कासयाला करा ७.

---

## न्यायशील मनुष्य.

न्यायें वागे त्याचे
होती पशु पक्षिही सहाकारी.

**कृष्णशास्त्री चिपळूणकर.**

न्यायशीलता हें बावनकशी सोनें आहे. तिचें मोल अनादि कालापासून सर्व लहानमोठ्या माणसांस फार मोठें वाटत आहे. त्याची साक्ष इतिहासपुराणांत पुष्कळ पटते. ह्या सद्गुणाचें वर्णन होतकरू मंडळीच्या मनावर जितकें ठसेल तितकें त्यांच्या

कल्याणास तें उपयोगी पडेल हें पूर्णपणें जाणून ह्या विषयाचें प्रतिपादन चांगले लोक अनेक रूपांनीं वारंवार करीत असतात. तशी एका मनुष्याची गोष्ट ग्रीसच्या प्राचीन इतिहासावरून येथें सादर करितों.

सगळे न्यायाधीश सिंहासनारूढ झाले. नंतर त्यांच्या पुढें दोन मनुष्य उभे राहिले. त्यांतला एक फिर्यादी होता, आणि दुसरा आरोपी होता. फिर्यादीचें नांव आरिस्टैडीज होतें.

त्या न्यायाधीशांतला एक न्यायाधीश आरिस्टैडीजकडे वळून त्याला म्हणाला, “आरिस्टैडीज, तुझें सगळें म्हणणें आम्हीं लक्षपूर्वक ऐकिलें आहे. तें सगळें खरें आहे, अशी आमची खातरी झाली आहे. आतां आम्ही ह्या आरोपीस शिक्षा काय ती सांगतों.”

**आरिस्टैडीज**—नाहीं नाहीं महाराज! इतक्यांतच असें करूं नये.

**न्यायाधीश**—कां बरें? कां करूं नये?

**आरिस्टैडीज**—त्याचें म्हणणें काय आहे, तें अद्याप आपण ऐकून घेतलें नाहीं. तो जरी माझा वैरी आहे, तरी, त्याला शिक्षा व्हावयाची ती न्यायानें व्हावी, अन्यायानें होऊं नये, अशी माझी इच्छा आहे. न्याय झाला पाहिजे. मग तो मित्र असो का शत्रु असो.

ह्याप्रमाणें सगळ्या व्यवहारांत, स्वहिताकडे काडीभरही लक्ष न देतां, तो अगदीं न्यायानें वागत असे, म्हणून त्याला सगळ्या अथेन्सांत **न्यायशील** असें नांव पडलें होतें.

इराणी लोकांनीं मोठ्या प्रचंड सैन्यासहवर्तमान ग्रीसवर हल्ला केला, तेव्हां अथेन्सचे मोठमोठे सगळे लोक जमून त्यांशीं टक्कर देण्यास निघाले. त्यांस ठाऊक होतें कीं, इराणी लोक आपल्या बारापटीपेक्षांही अधिक आहेत. तरी, त्यांशीं सामना

करण्यास जाण्यास ते तिळभरही डगमगले नाहींत. एवढी मोठी त्यांची देशभक्ति होती. सामन्याची वेळ जवळ आली तेव्हां अथेन्सच्या एका एका पुढाऱ्यानें लढाईचा एक एक दिवस वांटून घेतला. त्याप्रमाणें युद्ध चालू झाल्यावर, आणि त्यांत सर्वांस जय मिळत गेल्यावर, आरिस्टैडीजची पाळी आली, तेव्हां त्यानें तो दिवस, आपणापेक्षां एका मोठ्या शूर पुरुषास दिला. त्या दिवशीं त्याला जय मिळाला. ह्यांत उघड झालें कीं, आपण स्वतः जयवंत होऊन गाजी म्हणून मिरविण्यापेक्षां, आपल्या ज्या मित्रास तें काम विशेष खातरीनें चांगलें करतां येण्यासारखें त्यास वाटलें त्यास तें त्यानें स्वसंतोषानें दिलें, आपल्या लौकिकाकडे पाहिलें नाहीं. हेंच न्याय्य.

माराथानच्या लढाईत इराणी लोकांचा अगदीं पराभव झाला, आणि त्यांच्या स्वारीबरोबरच्या सगळ्या लहान मोठ्या वस्तु ग्रीक लोकांच्या हातीं लागल्या. त्यांत सोनें, रुपें व जड जवाहीर पुष्कळ होतें. तें सगळें आरिस्टैडीजच्या एकट्याच्या स्वाधीन करून बाकीचे सगळे ग्रीक लोक इराणी लोकांच्या पाठलागावर गेले. ह्याचें कारण असें होतें कीं, सूर्य एकवेळ पश्चिमेस उगवेल, पण आरिस्टैडीज हा भांडारांतल्या एक पैचाही अभिलाष करणार नाहीं, अशी त्यांची पक्की खातरी होती. आणि त्याप्रमाणें तो वागला. हें त्याचें वर्तन मशालची ह्या नांवाच्या दुसऱ्या एका ग्रीक माणसाच्या वर्तनाहून किती भिन्न होतें तें पहा. लढाईच्या जागेजवळ एक इराणी माणूस किती एक दिवस लपून बसला होता. तो लढाई आटोपल्यावर, सगळें सामसूम पाहून, त्या मशालचीकडे आला. त्या मशालचीचा पेहराव राजाच्या पेहरावासारखा त्यास वाटून, त्यानें त्याला लोटांगण घातलें, आणि इराणी लोकांनीं आपला बाकीचा मोठा खजीना ज्या ठिकाणीं पुरून ठेविला होता,

तें ठिकाण त्याला हळूच नेऊन दखविलें. तें दृष्टीस पडतांच, मशालचीनें तरवार काढून त्याला ठार मारिलें आणि तो सगळा पैसा आपण बळकाविला. दोघे ग्रीकच. हा कसा आणि तो कसा! एका हाताचीं सगळीं बोटें सारखीं नसतात. एका आम्रवृक्षाला देखील सगळे आंबे एकसारखे गोड येत नसतात.

वर्षांत एकदा अथेन्सच्या सर्व लोकांस तेथील सरकार असें सांगे कीं, देशांतून जीं माणसें बाहेर घालवून दिलीं पाहिजेत असें ज्या कोणास वाटत असेल त्यांनीं त्यांचीं नांवें एका शिंपीवर किंवा खापरीवर लिहून, त्या शिंपा आणि खापऱ्या एका नियमित ठिकाणीं टाकाव्या. अशा एका वेळीं आरिस्टैडीज हा एका रस्त्यानें चालला असतां, एक माणूस त्याच्या जवळ येऊन त्यास म्हणाला कीं, "महाराज, आपणास लिहितां येतें काय?"

**आरिस्टैडीज**—होय, येतें.

**मनुष्य**—बरें झालें. तर मग, ज्या मनुष्यास देशांतून घालवून द्यावयाचें माझ्या मनांत आहे, त्याचें नांव तेवढें ह्या शिंपीवर मला लिहून द्या बरें.

**आरिस्टैडीज**—ठीक आहे. त्याचें नांव काय आहे?

**मनुष्य**—त्याचें नांव आरिस्टैडीज आहे.

**आरिस्टैडीज**—त्यानें तुम्हांला कधीं दुखविलें आहे काय?

**मनुष्य**—कधीं नाहीं. पण लोक त्याला न्यायशील न्यायशील म्हणतात, तें मला सहन होत नाहीं. वाईट वाटतें. म्हणून तो मला नको आहे. तो मनुष्य ढोंगी आणि लुच्चा असावा असें मला वाटतें.

आरिस्टैडीज ह्यानें, तें ऐकून घेऊन, निमूटपणें आपलें स्वतःचें नांव त्या शिंपीवर लिहिलें, आणि ती त्या माणसाच्या हातीं दिली. ती त्यानें नेमलेल्या जागीं टाकिली. पुढें त्या शिंपांची मोजदाद करितां, आरिस्टैडीज ह्याचें नांव लिहिलेल्या

अशा शिंपा साहा हजारांपेक्षा अधिक निघाल्या. तेव्हां अर्थात् त्याला देशत्याग करावा लागला. असें होण्याचें कारण असें होतें कीं, आरिस्टैडीज अथेन्सच्या सुजाण माणसांस जरी फार चांगला वाटत असे, तरी अजाण माणसें त्याला फार कडक आणि जुन्या चालीचा हेकट समजत. आणि अशा असमंजस माणसांचीच संख्या कोठें झाली तरी मोठी असावयाची.

पुढें लवकरच इराणी लोकांचें एक आरमार ग्रीसवर स्वारी करून आलें. तेव्हां ग्रीक लोकांची घाबरपट्टी झाली, आणि त्यांस आरिस्टैडीजची आठवण झाली. तेव्हां त्यांनीं लागलेंच त्याला बोलावणें पाठवून ग्रीसमध्यें आणिलें. त्यानें एकदम ग्रीसच्या सैन्याचें आधिपत्य पतकरून इराणी लोकांशीं लढाई केली. तींत इराणी लोक पराभव पावून पळत सुटले, आणि ग्रीक लोकांचा जय झाला.

ही लढाई चालली असतां, अथेन्स शहरचे लोक गर्भगळित होऊन, आपलीं घरेंदारें सोडून रानावनांत जाऊन राहिले होते, आणि त्यांच्या मागें इराणी लोकांनीं त्या शहराची जाळपोळ करून त्याची दुर्दशा उडविली होती. त्या वेळीं एका इराणी सरदारानें अथेन्सकरांस असा निरोप पाठविला कीं, तुम्ही जर ह्या पुढें आमच्या आड न येण्याचें वचन देत असाल, तर आम्ही तुमचें अथेन्स शहर, स्वतःच्या खर्चानें, पहिल्यापेक्षां चांगलें बांधून देतों, आणि शिवाय लोकांस पैसाही पाहिजे तितका देतों. त्यास आरिस्टैडीज ह्यानें उत्तर पाठविलें कीं, "ज्या इराणी लोकांनीं आमचें अथेन्स शहर उध्वस्थ करून टाकिलें आहे, आणि आमचीं देवालयें जाळिलीं आहेत, त्यांशीं आम्ही तिळमात्रही सल्ला न करितां, यावच्चंद्रदिवाकरौ एकसारखे लढत राहूं. सोडणार नाहीं." असो.

ह्या गोष्टी वाचून मोठा चमत्कार वाटतो आणि असा प्रश्न

मनांत उत्पन्न होतो कीं, न्यायशीलतेविषयीं एवढी निष्ठा मनुष्याच्या अंतःकरणांत उत्पन्न होते तरी कशी. ह्याचें उत्तर मनुष्याच्या अनुभवांत कोठें सांपडत नाहीं. महाज्ञान हें या वृत्तीस कारण म्हणावें तर आरिस्टैडीजपेक्षांही जे मोठे मोठे ज्ञानी आजपर्यंत होऊन गेले त्यांचे ठायीं ही वृत्ति इतक्या उच्च प्रतीनें कधीं प्रकट झालेली आढळत नाहीं. तेव्हां अशा प्रकारच्या मोठ्या सद्गुणांच्या वांटणींत कांहीं तरी ईश्वरी सूत्र असलें पाहिजे. तें आपणास अतर्क्य आहे असें मनांत समजून स्वस्थ बसणें भाग पडतें. तरी लोकोद्धारास अशीं उदाहरणें अत्यंत आवश्यक आहेत असें जाणून विश्वंभर तीं युगायुगाचे ठायीं स्वेच्छेनुरूप उत्पन्न करितो ह्यांत कांहीं संशय नाहीं. तत्त्वतः पाहिलें असतां न्यायशीलता आणि सत्य ह्यांत तिळमात्रही अंतर नाहीं. अंतर कायतें शब्दांत आहे. बाकी सत्य तेंच न्याय्य किंवा न्याय्य तेंच सत्य असें विचारी पुरुषांच्या बोलण्यांत वारंवार येतें आणि ह्या सद्गुणांचें अस्तित्व हेंच जगाच्या हितास अनेक पर्यायांनीं साधनीभूत होत असतें असें ते सांगत असतात.

### आर्या.

सत्यें हा रवि तपतो
सत्यें भूमि प्रतिष्ठिता जाण
सत्यांत पुंमर्थ[1] सकळ
सत्यचि जीवासि पवितनुत्राण[2]. मोरोपंत.

### ओंवी.

सत्य हाची मुख्य धर्म सत्य तेंची परब्रम्ह
सत्यापाशीं पुरुषोत्तम सर्वकाळ तिष्ठत ॥ १ ॥ मुक्तेश्वर.

ह्यापरतें सांगायाचें तें काय राहिलें ?

---

१ पुरुषार्थ. २ आकाशच्या कुन्हाडीपासून शरीराचें रक्षण करणारें.

## शास्त्रीयज्ञानाभिवृद्धि.

**उंच इमारतींत चढून जावयाच्या पाळण्यांचा विनधोकपणा.**—अलीकडे मोठाल्या शहरांतील जमिनीची किंमत अतिशयित वाढल्याकारणानें तेथें इमारती फार उंच बांधूं लागले आहेत, आणि त्याचप्रमाणें जमीन खणून भुयारांतही मजले करूं लागले आहेत. हा प्रकार युनैटेड स्टेट्समधल्या शहरांतून जितका विकोपास गेला आहे, तितका तो दुसऱ्या कोणत्याही देशांत गेलेला नसेल. तेथल्या इमारतींची उंची वाढत वाढत आतां ४७ मजल्यांपर्यंत जाऊन पोंचली आहे! ही उंची वाढली त्याबरोबर इतक्या उंचीपर्यंत माणसांस पोंचविण्याच्या साधनांतही सुधारणा करावी लागली आहे. तीन चार मजलेपर्यंत माणसें जिन्यांवरून पायांनीं जाऊं शकतात, परंतु चाळीस चाळीस मजले चढून जाणें अशक्य आहे. मजले चढून जाण्याचा त्रास पडूं नये म्हणून इमारतींमध्यें अलीकडे 'लिफ्ट' म्हणजे एका प्रकारचे पाळणे लावीत असतात, आणि त्यांमध्यें बसून त्या इमारतींत वर खालीं चढतां उतरतां येतें. इमारतीच्या तळमजल्यापासून अगदीं वरच्या मजल्यापर्यंत लोखंडी कांबी उभ्या बसवून त्यांस हे लिफ्ट अडकवलेले असतात, आणि त्यांस वर ओढून नेण्याची आणि खालीं उतरविण्याची व्यवस्था विजेच्या किंवा पाण्याच्या शक्तीनें केलेली असते. ह्या लिफ्टच्या व्यवस्थेंत असा एक धोका असतो कीं, त्यास बांधलेले दोर जर अवचित तुटले, तर तो लिफ्ट मोकळा सुटून जोरानें खालीं उतरतो, आणि जमिनीवर आपटून आंतल्या माणसांस इजा होते. हा धोका टाळण्यासाठी उंच इमारतींमध्यें लिफ्टच्या मार्गांत ठिकठिकाणीं दाबलेल्या हवेचे डबे बसविलेले असतात, आणि त्यांच्या योगानें, लिफ्ट सुटून खालीं येऊं लागल्यास त्याचा खालीं उतरण्याचा वेग आपोआप

कमी होतो. ही युक्ति किती चांगली साधली आहे ह्याचा अनुभव नुकताच न्यूयार्कमध्यें घेण्यांत आला. तेथें वुड-वर्थ नांवाची एक इमारत आहे. तिला ४७ मजले असून तींत दररोज सुमारें ३६००० लोक जात येत असतात. तींत अनेक लिफ्ट लाविलेले आहेत, त्यांपैकीं एका लिफ्टमध्यें तीन टन वजनाचे लोखंडाचे तुकडे भरून तो ४७ व्या मजल्या-वरून खालीं सोडून दिला. तो अर्थात झपाट्यानें खालीं उतरूं लागला आणि ११ व्या मजल्यास पोंचेपर्यंत त्याचा वेग दर सेकंडास १८० फूट झाला. परंतु तेथपासून दाबलेल्या हवेच्या डब्यांच्या योगानें त्याचा वेग इतका कमी झाला कीं, तो तळमजल्यावर एकाद्या पिसाप्रमाणें अगदीं हळूच येऊन पोंचला!

**रोग हवेंतून पसरत नाहीं.**—पसरणाऱ्या रोगांचे दोन वर्ग करीत असतात. सांक्रामिक रोग आणि स्पर्शजन्य रोग. सांक्रामिक रोग म्हणजे ज्या रोगांचीं बीजें हवेंतून पसरल्यामुळें जे दुसऱ्यांस लागतात ते रोग. ह्या रोगांत एका रोग्याचा स्पर्श दुसऱ्यास होण्याची जरूरी नाहीं. आणि स्पर्शजन्य रोग म्हणजे रोग्याच्या स्पर्शापासूनच पसरणारे रोग. रोगांम-धला हा कल्पिलेला भेद जाऊन, आजपर्यंत ज्या अनेक रोगांस सांक्रामिक म्हणत असत ते स्पर्शजन्य ठरतील असें अलीकडच्या कांहीं शोधांवरून वाटत आहे. पाश्चिमात्य देशांतील कितीएक इस्पितळांमध्यें असा अनुभव आला आहे कीं, सांक्रामिक रोग झालेल्या माणसांचे बिछाने आणि इतर माणसांचे बिछाने ह्यांच्यामध्यें कांचेचीं तावदानें लाविलेलीं असलीं म्हणजे, त्यांच्या दरम्यान हवा जरी मोकळेपणीं खेळत असली तरी, तो रोग मुळींच पसरत नाहीं. तीं तावदानें काढलीं कीं तो रोग पसरूं लागतो. ह्यावरून, हवेच्या द्वारें रोग पसरतात ही कल्पना बरोबर नाहीं असें पुष्कळांस वाटूं लागलें आहे.

**दुधांतील रोगबीजें नाहींतशीं करण्यास विजेचा उपयोग.**–मनुष्यजातीस होणारे पुष्कळ रोग दूषित दुधापासून होतात असें आतां ठरल्यासारखें झालें आहे, आणि त्याकरितां दूध काढणें आणि तें नीट ठेवणें ह्या संबंधानें पाश्चिमात्य देशांमध्यें विलक्षण रीतीचा बंदोबस्त करीत आहेत. सर्वत्र अगदीं स्वच्छता असावी, दूध दूषित होण्यास यत्किंतही कारण घडूं नये अशाबद्दल तिकडील म्युनिसिपालिट्यांनीं फार कडक नियम केलेले आहेत, आणि ह्या नियमांचा परिणाम लोकांच्या प्रकृतीवर चांगला होत आहे. ह्या संबंधानें प्रयोग करतांना असें समजून आलें आहे कीं, दुधांतलीं रोगबीजें नाहींतशीं करण्यास विजेचा पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे. एका प्रयोगांत असें आढळून आलें कीं, एक घन सेंटिमीटर (१ सेंटिमीटर म्हणजे सुमारें $\frac{२}{५}$ इंच) दुधांतून विद्युत्प्रवाह पाठविण्यापूर्वीं त्यांत एक कोटि नव्वद लक्ष सूक्ष्म बीजें होतीं, तीं विद्युत्प्रवाह फक्त १५ सेकंदपर्यंत चालू ठेवतांच ६००० झालीं! हीं सर्वच बीजें रोग उत्पन्न करणारीं नसतात हें जरी खरें असलें, तरी विद्युत्प्रवाहानें दुधांतलीं रोगबीजें पुष्कळ कमी होत असलीं पाहिजेत हें ह्या प्रयोगावरून सिद्ध होतें. दुधासंबंधानें दुसरे कोणत्याही प्रकारचे बंदोबस्त केलेले असले तरी एकच गोष्ट सर्वांनीं लक्षांत ठेवावी. ती ही कीं, दूध कितीही चांगलें असलें तरी त्याचा तापविल्याशिवाय उपयोग करूं नये.

**एका नवीन प्रकारचे किरण.**—ज्यांच्या योगानें मनुष्याच्या अंगांतील हाडें दृष्टीस पडतात आणि त्यांचा फोटोग्राफ काढतां येतो, आणि ज्यांचा उपयोग कितीएक रोग बरे करण्यामध्यें होऊं लागला आहे, ते ‘एक्स’ किरण आतां पुष्कळ लोकांस माहीत झाले आहेत. आतां सैनोर

उलिवि नांवाच्या एका इटालियन इंजिनियरानें 'एफ्' नांवाच्या नवीन प्रकारच्या किरणांचा शोध लाविला आहे. ह्यांच्या योगानें, दूरदूरचीं लढाऊ तारवें, एकही तोफ सोडल्याशिवाय, उडवून देतां येतील असें म्हणतात. ह्या किरणांच्या संबंधानें इंग्लिश आरमारखात्यांत अनेक प्रयोग करून पाहिले आहेत, आणि हें नवीन शस्त्र लवकरच प्रचारांत येईल असें दिसत आहे. ह्यांच्या योगानें लढाई होणें अशक्य होऊन शांति-युगास प्रारंभ होईल अशी कांहीं लोकांची आशा आहे. परंतु ती व्यर्थ आहे. कारण ह्या नव्या शस्त्रास हाणून पाडणारें दुसरें शस्त्र शोधून काढण्यास लोक कमी करणार नाहींत. शांतियुग सुरू होण्यास मनुष्यस्वभावांतच फरक पडला पाहिजे. असो. ह्या नवीन शोधाची मूळपीठिका अशी आहे. सैनोर उलिवी हे विजेचें रूपांतर करून प्रकाश उत्पन्न करण्यासाठीं एक विशेषप्रकारचें यंत्र तयार करीत असतांना, अकस्मात्, पंधरा हजारांश इंचाच्या मापाचे विद्युत्तरंग उत्पन्न होऊन, उलिवी ह्यांच्या प्रयोगशाळेंत जितकीं म्हणून धातूचीं पात्रें ठेविलेलीं होतीं त्या सर्वांतून एका प्रकारचा नाद निघूं लागला! हा चमत्कारिक परिणाम लक्षांत येतांच उलिवी ह्यांनीं यंत्र तयार करण्याचा मूळचा उद्देश सोडून देऊन ह्या नव्या तरंगांच्या संबंधाचे प्रयोग चालविले. त्यांच्या योगानें त्यांना, काडतुसांस धातूचें टोपण बसविलेलें असलें म्हणजे तीं दुरून उडवितां येऊं लागलीं. पुढें त्यांनीं तीनशें फुटांवर ठेविलेले रिव्हाल्वर उडवून पाहिले, आणि आतां, त्यांनीं हा शोध इतका पक्कदशेस नेला आहे कीं, त्यांना कितीएक मैलांवर असलेल्या लढाऊ तारवांत भरलेल्या दारूगोळ्यास ह्या नवीन किरणांच्या योगानें आग लावून देऊन त्यांस उडवून देतां येईल! हें विघ्न टाळण्यासाठीं, यापुढें दारूगोळ्यांत •कोणत्याही

प्रकारचा धातु घालतां येणार नाहीं आणि तो दारूगोळा, धातूच्या पत्र्यांस वगैरे न लागूं देतां सांठवून ठेवावा लागेल ! हें लोखंडी पत्र्यांनीं मढवून काढलेल्या हल्लींच्या लढाऊ तारवांत कितपत शक्य होईल तें पाहाणें आहे.

## ॲनी बिझांटबाईची एक नवी संस्था.

कालदेशवर्तमानानुरूप हिंदुस्थानांतल्या लोकांच्या स्थितींत सुधारणा होणें आवश्यक आहे, असें ज्यांस वाटतें त्यांतल्या प्रमुखांत ॲनी बिझांटबाई आहेत. ह्या संबंधानें त्यांची नेहमीं चालना चाललेली असते. ह्याकरितां त्यांनीं अड्यार येथें एक नवीन संस्था गेल्या आक्टोबरच्या २० व्या तारखेस स्थापित केली आहे. तिच्या नियमांचा सारांश येणेंप्रमाणें:— "जातिभेदाचें कोणतेंही बंधन मानणार नाहीं; मुलगे सज्ञान होतपर्यंत आणि मुली १७ वर्षांच्या होतपर्यंत त्यांचे विवाह करणार नाहीं; पत्नी, कन्या व इतर आप्त स्त्रिया ह्यांस विद्या शिकवीन; सामान्य लोकांत शिक्षणप्रसार करीन. सामाजिक व राजकीय बाबतींत वर्णभेद धरणार नाहीं; परदेशांत गोरे आणि काळे ह्यांस सारखे हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न करीन. पुनर्विवाहित स्त्रियांवरच्या बहिष्कारास प्रतिबंध करीन." ह्यांतले कोणतेही एक किंवा दोन नियम पाळण्याची शपथ घेतली म्हणजे मनुष्य ह्या संस्थेचा सभासद होतो. त्यांतली शपथ मोडल्यास त्या संस्थेंतून मनुष्यास काढलें जाईल. ह्या एक दोनच नियमांची अट ठेविली आहे ती बरी आहे. कमजास्त प्रमाणानें केवळ प्रघाताच्या जोरावर ह्यांतले अनेक नियम समंजस लोक शपथा न घेतां गुपचूपपणें आपोआप पाळूं लागले आहेत त्यांस ही एक मदत चांगली आहे.

# लोक काय बोलतात.

मुंबईचें बोरीबंदर स्टेशन आहे तें त्याच्या दुप्पट करून त्यांत सर्व नवीन सुधारणा दाखल करण्याचा विचार चालला आहे.

---

कराचीच्या चेंबर ऑफ कामर्स सभेनें सरकारास लिहिलें आहे कीं, ब्यांकांच्या कामावर सक्त नजर ठेवितां यावी असा कायदा होणें आवश्यक आहे. खरें आहे.

---

लंडन शहर वसलें आहे त्या प्रांतांत एकंदर अडीच लाख मोटार-गाड्या आहेत! इतक्या गाड्यांस दरसाल सुमारें नऊ कोटि रुपये किंमतीचें पेट्रोल तेल लागत असलें पाहिजे.

---

हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या औषधोपचाराकरितां डफरीन फंडांतून २५ डॉक्टरणींची कायमची नेमणूक होणार असून ह्या संस्थेस त्याप्रीत्यर्थ सालिना १॥ लक्षाची ग्रांट सरकार देणार आहे.

---

यंदांच्या मुंबई विश्वविद्यालयाच्या एम. ए. च्या परीक्षेंत ११ उमेदवार सेकंड क्लासमध्यें पास होऊन त्यांत एक हिंदु बाई आहे. आणि पास क्लासमध्यें ३५ पास झाले आहेत. एकंदर ४६ आहेत. पुष्कळ झाले.

---

मुंबई व कराची बंदरांपासून १५ । २० मैलांचे अंतरावर समुद्रांत प्रचंड देवमाशांच्या टोळ्या आल्या असून त्यांतील कांहीं ५० । ६० फूट लांबीचे व ३० फूट जाडीचे आहेत ह्मणतात. अरिष्टच आहे.

---

गेल्या २६ व्या तारखेस युनैटेड स्टेट्समध्यें एका ठिकाणीं नाताळाप्रीत्यर्थ मुलांचे खेळ चालू असतांना कोणीं 'आग रे आग' ह्मणून उगीच ओरड केली. त्यासरशी मंडळी दरवाजांकडे घुसली, आणि एका जिन्यांत ८० लहान मुलें, ह्मातारीं माणसें वगैरे तुडवलीं जाऊन प्राणांस मुकलीं!

---

लंडनांतील इंडिया कौन्सिलच्या व्हाइस प्रेसिडेंटच्या जागीं सर कृष्ण गोविंद गुप्त यांची १ वर्षापुरती नेमणूक झाली आहे. ही जागा

अजूनपर्यंत हिंदी मनुष्याला कधीं मिळाली नव्हती. ह्याच गृहस्थांस इ० स० १९०४ ह्या वर्षी बंगालच्या ले० गव्हर्नरची जागा देण्याचा विचार चालला होता.

---

हिंदु विश्वविद्यालयाच्या पुरस्कर्त्यांची एक सभा अलाहाबाद येथें १५ दिसेंबरला भरली होती. तेव्हांच्या बोलण्यावरून असें कळतें कीं, त्या महत्कार्याच्या वर्गणीची एकंदर रक्कम ४२३८७२० रुपये झाली आहे. त्या कमिटीचे अध्यक्षाचे ठिकाणीं दरभंग्याचे महाराज ह्यांची नेमणुक पुन: झाली आहे.

---

राष्ट्रीय सभेची कराची येथील बैठक गेल्या २६ व्या तारखेस चांगल्या थाटानें सुरू झाली. अध्यक्षस्थानीं नामदार सय्यद अहमद हे होते. त्यांचें भाषण चांगलें झालें. नामदार गोखल्यांस ह्या बैठकीस प्रकृतीच्या अस्वस्थपणामुळें जातां आलें नाहीं. ह्या सभेंत दक्षिण आफ्रिकेचा प्रश्न अर्थात् मुख्य होता. पुढची सभा मद्रासेस भरावयाची आहे.

---

पंजाबांतील मुनशीराम ह्यांनीं गुरुकुलाकरितां ३० हजार व तखतसिंग ह्यांनीं ५०००० रुपये वर्गणी जमविली. ह्याचेंच अनुकरण तिकडील ७ शीख मुलींनीं केलें. आणि त्यांनीं बंगाल, ब्रम्हदेश, चीन, मलाया, यांत जाऊन गाणीं गाणें, व्याख्यानें देणें, व शीख गोष्टी शिकविणें या उपायांनीं आपल्या संस्थेकरितां ६१००० रुपये मिळविले! शाबास!!

---

नुकते परवां नामदार व्हाइसराय साहेब बिकानेरास गेले होते, तेव्हां त्यांनीं तेथील खुदाबक्ष पुस्तकालयामध्यें ज्या अमोलिक वस्तु पाहिल्या त्यांत फर्दूसी ह्या कवीच्या शहानामा नामक ग्रंथाची एक जुनी हस्तलिखित प्रत पाहिली. ही प्रत काबूलचे हकीम अली मर्दनखान ह्या गृहस्थांनीं इ० स० १६१७ ह्या वर्षी दिल्लीचा बादशहा शहाजहान ह्यास नजर केली. त्याबद्दल त्यांस त्या बादशहानें एक लाख रुपये आणि ५ हत्ती बक्षीस दिले.

---

लार्ड हार्डिंज ह्यांची व्हाइसरायच्या कामाची मुदत ३० स १९१५ च्या अखेर संपत आहे. तत्पूर्वींच कदाचित् ते व्हाइसरायचें काम सोडून पारिस येथें दरबारांत ब्रिटिश राज्याचे प्रतिनिधीचे कामावर जातील, आणि त्यांचे जागीं लार्ड किचनेर हे हिंदुस्थानचे व्हाइसराय होतील अशी एक अफवा उठली होती, परंतु ती खोटी ठरली. हे लार्ड किचनेर लार्ड कर्झनच्या कारकीर्दीत हिंदुस्थानाचे मुख्य सेनापती होते, हें सर्वश्रुत आहेच.

---

दक्षिण आफ्रिकेंतील हिंदीलोकांच्या निःशस्त्र प्रतीकाराच्या वेळीं त्यांवर तेथल्या अधिकारीवर्गाकडून सक्ती झाली आहे. ह्या झगण्यांत आणि हिंदीलोकांच्या मागण्यांत किती तथ्यांश आहे तें ठरविण्याकरितां दक्षिण आफ्रिकेच्या सरकारानें एक कमिशन नेमिलें आहे. त्याची घटना तिकडच्या हिंदीलोकांस पसंत नसून त्यांत अगदीं निःपक्षपाती अशा आणखी कांहीं मनुष्यांची नेमणूक करून घेण्याची खटपट सुरू आहे. ती सिद्धीस जावो.

---

पनामा कालवा आतां बहुतेक पुरा झाला आहे. कांहीं दिवसांपूर्वीं एक लहानशी सरकारी आगबोट त्या कालव्यामधून कांहींएक अडचण न पडतां नेतां आली. तरी सार्वजनिक रीतीनें कालवा खुला होण्यास अजून बरेच दिवस लागतील. ह्या कालव्यांतून एवढी कांहीं प्रचंड रहदारी सुरू व्हावयाची आहे आणि तिजमुळें त्याच्या आसपासच्या प्रदेशांतही एवढी मोठी घडामोड होण्याचा संभव आहे कीं, तेथें नवीन रेलवे बांधणें, नवीन बंदरें तयार करणें, इत्यादि कामांवर आजमितीस खासगी कंपन्या सुमारें शंभर कोटि रुपये खर्च करीत आहेत !

---

लाहोर येथें दयानंद कॉलेज व गुरुकुल अशा दोन्ही शाखांच्या आर्य समाजाचा वार्षिक उत्सव झाला. त्यावेळीं लाला लजपतराय प्रभृतींचीं भाषणें झालीं. समारंभाकरितां ३० हजार लोक बसतील असा मोठा मंडप तयार केला होता. समाजाचा वार्षिक फंड ८३ हजार रुपये

जमला असून त्यांत लाला लजपतरायांनींच ५० हजार रुपये दिले. त्यांपैकीं १० हजार एका शाळागृहाकरितां, ३० हजार अस्पृश्यवर्गोद्धाराकरितां आणि १००००रुपये हिंदु युनिव्हर्सिटी, दयानंदकॉलेज व कांग्राचें गुरुकुल यांचे करितां, अशी या देणगीची वांटणी केली आहे.

---

नाशिक येथील नारो शंकरचे देवालयांतील सुप्रसिद्ध प्रचंड घंटेची उंची २॥ फूट आहे व बुडाचा घेर १०। फूट आहे. हिजवर पोर्तुगीज लेख असून शिवाय १७२१ सन आहे. ही मूळ पोर्तुगीज लोकांची असून ती बोरवली स्टेशनानजीकच्या मंडलेश्वर गांवच्या पोर्तुगीज देवळांत पुत्रप्राप्ति झाल्याचा नवस फेडावयाकरितां म्हणून कोणा खिस्ती मनुष्यानें आरंभीं टांगलेली होती. वसईचा किल्ला चिमाजीअप्पांनीं घेतला त्यावेळीं तेथून ही घंटा नेऊन १७४७ मध्यें बांधलेल्या नारो शंकरचे देवालयांत बांधली. ह्याप्रकारें मूळची खिस्ती घंटा हिंदूंच्या देवळांत आली. हें देऊळ बांधण्यास नारो शंकर यांनीं १८ लक्ष रु० खर्च केले होते.

---

गेल्या महिन्याच्या ४ थ्या तारखेस अलवारच्या महाराजांनीं नामदार लार्ड हार्डिंज साहेब व्हाइसराय ह्यांस मोटी मेजवानी दिली. तेव्हां एकंदर राज्यव्यवस्थेविषयीं आणि धर्मशिक्षणाच्या संबंधानें बोलतांना ते म्हणाले कीं, “तरुण लोकांच्या शिक्षणक्रमांत धर्माच्या आश्रयावांचून नीतिशिक्षण हें कधींही देतां यावयाचें नाहीं. याविषयीं कांहीं संशय नाहीं. या संबंधानें आम्हांला ब्रिटिश खास अमलांत ज्या अडचणी येतात त्या महाराजांच्या राज्यांत नाहींत हें फार चांगलें आहे. आणि ह्याचा उपयोग महाराजांच्या राज्यांत चांगला होत आहे ही गोष्ट फार संतोषदायक आहे.” हिंदुस्थानांतल्या शाळांत मुलांस धर्मशिक्षण देण्याचा विचार जे करीत असतात त्यांनीं हें म्हणणें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. नवीन धर्मपंथ स्थापिले असतां त्यांतील नीतीचा मेळ प्राचीन धर्मांतील नीतीशीं कसा घालावयाचा ह्याची योजना नीट केली पाहिजे.

# बालबोध.

## सर रॉबर्ट बॉल.



### ओंव्या

अवलांस न कळे संस्कृत वाणी
जैसें आडांतील पाणी
परी दोरपात्रांवांचुनी
अशक्त जनीं केवीं निघे. १.
तें तडागासी येतां त्वरें
तात्काळचि तृषा हरे

भोळे जन तारावया ईश्वरें
प्राकृत ग्रंथ निर्मिले. २.

श्रीधर.

हें जसें पाण्याचा दृष्टांत देऊन कथापुराणांविषयीं म्हटलें आहे तसेंच ज्ञानाविषयीं असें म्हणतां येईल कीं, ज्ञान हें प्रत्यक्ष सुख आहे खरें, तरी तें मनुष्याच्या अंतःकरणास प्राप्त झाल्यावांचून तें सुख प्रत्ययास येत नाहीं. परंतु ती प्राप्ति होण्यास मोठी बुद्धि आणि फार परिश्रम लागतात. हें साहित्य सर्वोजवळ नसतें म्हणून पूर्वीच्या महात्म्यांनीं जो ज्ञानसंचय करून ठेविला आहे तो अनायासानें साधारण माणसांच्या हातीं लागावा आणि त्यापासून त्यांस सुख व्हावें अशा प्रकारचे उद्योग जे कोणी करितात ते बहुतेक त्या महात्म्यांइतकेच वंदनीय होत. असे पुरुष जनाच्या कल्याणास विश्वंभर उत्पन्न करितो त्यांतच **सर रॉबर्ट बॉल** ह्यांची गणना, शास्त्रीय विषयांच्या आणि त्यांतही विशेषेंकरून ज्योतिषशास्त्राच्या स्वल्पीकरणावरून आम्ही करितों आणि त्यांचें अल्प चरित्र येथें लिहितों.

रॉबर्ट बॉल ह्यांचा जन्म डब्लिन येथें इ० स० १८४० च्या जुलै महिन्याच्या पहिल्या तारखेस झाला. ह्यांचे तीर्थरूप डॉ. रॉबर्ट बॉल हे मोठे विद्वान् गृहस्थ होते. त्यांची आख्या विशेषेंकरून प्राणिविद्येच्या प्रवीणतेवरून होती, आणि ते कितीएक वर्षांपर्यंत ट्रिनिटी कॉलेजच्या सर्वसंग्रहाचे डायरेक्टर आणी आयर्लंडांतील रॉयल ॲकॅडेमीचे प्रमुख मेंबर होते. रॉबर्ट बॉल हे इ० स० १८५७ मध्यें ट्रिनिटी कॉलेजांत गेले, आणि इ० स० १८६१ त बी. ए. होऊन इ० स० १८६५ त एम्. ए. झाले. त्यांचा विश्वविद्यालयांतला विद्याभ्यासक्रम अत्यंत वर्णनीय होता. त्यांस तेथल्या शेवटच्या परीक्षेंत दोन सुवर्णपदकें मिळून गणितशास्त्र आणि यंत्रशास्त्र ह्या दोन शास्त्रांच्या संबंधाचे

अध्वर्यु नेमिलें. आणि शिवाय गणितविषयांतली एक मोठी स्कॉलर्शिप त्यांस मिळाली. ह्यानंतर त्यांचें लक्ष ज्योतिषशास्त्राकडे लागलें. त्यांतही त्यांची विद्वत्ता लोकप्रत्ययास येऊन त्यांस इ० स० १८६५ त पार्सन्सटाऊन येथील वेधशाळेंत मुख्य ज्योतिषी नेमिलें. ते इ० स० १८६७ त डब्लिन येथील शास्त्रीय विषयाच्या पाठशाळेंत गणित आणि यंत्रशास्त्र यांचे प्रोफेसर झाले. ह्या जागेवर असतां त्यांनीं १८७० त एक पुस्तक छापून प्रसिद्ध केलें, त्याचें नांव **'सप्रयोग यंत्रशास्त्र'** असें होतें. ह्या पुस्तकांत मुख्यत्वेंकरून त्याच पाठशाळेंत, कामधंद्यामुळें अभ्यास करण्यास बनत नव्हतें अशा लोकांस संध्याकाळच्या वेळीं जीं व्याख्यानें त्यांनीं दिलेलीं होतीं त्या व्याख्यानांचा सारांश होता. हा सारांश छापण्याचा परिपाठ फार उत्तम आहे, कां कीं, व्याख्यानांस येणारे लोक जरी पुस्तकें वाचणाऱ्यांपेक्षां पुष्कळ अधिक असतात तरी विषयाचें तत्त्व मनांत ठसण्यास व्याख्यानाचा सारांश वाचणें हें जितकें साधनीभूत होतें तितकें व्याख्यानें नुसतीं ऐकणें हें साधनीभूत होत नाहीं, असा सर्व विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा अनुभव आहे. पुढें इ० स० १८७२ त त्यांस एल् एल्. डी. ही सर्वांत मोठी पदवी मिळाली. त्याच्या पुढच्या वर्षीं त्यांस रॉयल सोसायटीचे फेलो निवडिलें. अशा प्रकारें त्यांची गणना तेव्हांच्या विद्वान् मंडळींत होऊं लागली, आणि त्यांना इ० स० १८७४ ह्या वर्षीं डब्लिन विश्वविद्यालयामध्यें ज्योतिषशास्त्राचे प्रोफेसर नेमिलें, आणि त्याच वर्षीं ते अस्ट्रानमर रॉयल फॉर आयर्लंड म्हणजे आयर्लंडचे राजज्योतिषी झाले. अशी पायऱ्यापायऱ्यांनीं त्यांची पदवी वाढत गेली, हें येथें असें थोडक्यांत सांगतां आलें, परंतु या पायऱ्यांचें खरें महत्त्व स्पष्ट करण्यास लागणारें साहित्य आम्हांपाशीं नाहीं. त्यामुळें त्यांची थोरवी वर्णावयास येथें मार्ग नाहीं याचें फार वाईट वाटतें. असो.

ह्यानंतर डॉ. रॉबर्ट बॉल ह्यांनीं आपलें दुसरें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें. त्याचा विषय "स्क्रू" ची कल्पना हा होता. त्याच्या विवेचनांत अपूर्व नवे विचार पुष्कळ आल्याच्या योगानें त्यांवरून युरोपांतल्या शास्त्रज्ञ मंडळांत त्यांची मोठी वाहवा झाली, आणि पुढें लवकरच त्या पुस्तकाचें भाषांतर जर्मन भाषेंत झालें. त्यानंतर कांहीं वेळानें मँचेस्टर येथील ब्रिटिश असोसिएशन् सभेमध्यें त्या पूर्वोक्त विषयाच्याच कल्पनेचें त्यांनीं प्रशस्त विवेचन केलें. त्या निबंधाचें भाषांतर युरोपांतल्या दुसऱ्या अनेक भाषांत झालें. ह्या निबंधाच्या लौकिकावरून त्यांस **'कनिंगहाम मेडल'** ह्या नांवाचें एक बहुमोल पदक इ० स० १८७९ ह्या वर्षीं मिळालें.

असे अनेक शास्त्रीय विषय त्यांस चांगले अवगत होते. तरी त्यांमध्यें ज्योतिषशास्त्र हें त्यांचें विशेष आवडीचें शास्त्र होतें. त्यावर त्यांनीं इ० स० १८८४ ह्या वर्षीं एक ग्रंथ प्रसिद्ध केला, त्याचें नांव अगदीं साधें—**'आकाशाची गोष्ट'**—असें होतें. त्यांत त्यांनीं ज्योतिषशास्त्रांतल्या पूर्वींच्या बहुतेक कल्पना सांगून अलीकडे जे नवे शोध झाले आहेत त्यांचेंही वर्णन अगदीं सोप्या भाषेंत केलें होतें. ह्या पुस्तकावरून त्यांचा लौकिक इतका वाढला कीं त्यांस सरकारांतून **'नाईट'**ची पदवी इ० स० १८८६ त मिळाली. तेव्हांपासून अर्थातच हे सर रॉबर्ट बॉल ह्या नांवानें गाजूं लागले. येथें एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी अशी आहे कीं मनुष्याचें मोठेपण वाढण्यास त्याचे ठायीं कांहीं तरी अलौकिक गुण आवश्यक असतात हें खरें, परंतु अशा व्यक्तींचा यथायोग्य गौरव होण्यास गुणज्ञ प्रभु पाहिजेत. असे योग ज्या देशांस साधतात ते देश खरोखर भाग्यवान् होत.

सर रॉबर्ट बॉल ह्यांच्या सदरील पुस्तकांत एक विशेष गोष्ट आहे, ती ही कीं, वेगवेगळ्या ठिकाणाहून खस्थ पदार्थांचे वेध घेतले म्हणजे त्यांत काय अंतर पडतें हें दाखविलें आहे. त्यांनीं

जो विशेष शोध केला तो ६०० ताऱ्यांविषयीं होता. त्याचा हेतु असा होता कीं, सूर्याच्या सर्वांत जवळ असे तारे कोणते आहेत ते ठरवावे. अशा प्रकारचे शोध ग्रंथांत लिहून ते स्वस्थ राहिले नाहींत. कां कीं, त्यांचा मुख्य हेतु असा होता कीं, ज्योतिषशास्त्राचें ज्ञान अगदीं सोप्या भाषेनें लोकांत पसरावें. म्हणून त्यांनीं व्याख्यानें देण्याचा क्रम चालू केला. त्याप्रमाणें त्यांनीं इ० स० १८८७ त बर्मिंगहॅम येथें जें एक व्याख्यान दिलें त्यावरून अगदीं साधारण लोकांसही ज्योतिषशास्त्राचें बरेंच ज्ञान होऊन, कठिण गोष्टी सोप्या करून सांगण्याविषयीं त्यांचा फार मोठा लौकिक सर्व इंग्लंडभर पसरला. त्यांचीं व्याख्यानें आबालवृद्धांस एकसारखीं कळतात असें लोकांच्या प्रत्ययास आल्यावरून त्यांच्या व्याख्यानांस अतोनात गर्दी होऊं लागली. आणि त्या व्याख्यानांचीं तात्पर्यें थोडक्यांत लिहून तींही प्रसिद्ध करण्याचा क्रम त्यांनीं चालविला. पुढें इ० स० १८९२ त त्यांना केंब्रीज येथें ज्योतिषशास्त्राचे प्रोफेसर नेमिलें. तेव्हां त्यांचा मुख्य आवडता विषय जरी ज्योतिषशास्त्र होता तरी ते तेवढा एकच धरून बसले नाहींत. प्राणिविद्या ह्या विषयाचीही गोडी त्यांस फार होती. तिच्या संबंधाचेही ते नवनवे शोध करीत असत. त्यांवरून त्यांस आयर्लंडच्या झुऑलाजिकल सोसायटीचे अध्यक्ष नेमिलें होतें. इ० स० १८९३ त कांहीं इतर शास्त्रज्ञ मंडळीसहवर्तमान नार्वे देशांत नानाप्रकारचे शोध करीत ते फिरले. त्या शोधांचा मुख्य रोख हिमयुगाचें कारण काय असावें हा होता. ह्यानंतर १८९४ ह्या वर्षीं त्यांना दुसऱ्याही कित्येक मोठमोठ्या मानाच्या जागा मिळाल्या.

सर रॉबर्ट बॉल ह्यांच्या भाषणांत मुख्य गुण हा होता कीं, त्यांची वाणी फार मधुर आणि स्पष्ट होती. मनुष्य कितीही मंदबुद्धि आणि आळशी असला तरी त्याचें लक्ष त्यांच्या

बोलण्याकडे एकसारखें लागत असे आणि त्यांचे श्रोते चित्राप्रमाणें स्तब्ध बसून त्यांचें बोलणें ऐकत असत. हा गुण कांहीं सामान्य नव्हे. आपल्या व्याख्यानाच्या विषयाची निवड ते लोकांच्या सामान्य शोधक प्रश्नांवरून करीत असत. तेणेंकरून आपणास जें पाहिजे आहे तें ह्यांच्या व्याख्यानांत मिळतें असें सर्व लोकांस वाटूं लागून त्या व्याख्यानांवर त्यांच्या उड्या पडत असत. पुरुष, बायका, मुलें, ह्यांस ऐकायास काय विशेष आवडतें इकडे त्यांची फार नजर असे, आणि तदनुरूप ते आपलीं व्याख्यानें देत असत. पूर्वीं जें कार्य दुसऱ्या कोणत्याहि ज्योतिष्यानें केलें नव्हतें तें कार्य—म्हणजे खगोलविद्येसारखा अवघड विषय अगदीं सोप्या भाषेमध्यें ग्रथित करून आबालवृद्धांस एकसारखा कळण्यासारखा करणें हें कार्य—या वेळेपर्यंत दुसऱ्या कोणत्याही ज्योतिष्यानें केलें नव्हतें असें म्हणणें हें कांहीं अतिशयोक्तीचें नाहीं. आणखी वास्तविक म्हटलें असतां ज्ञानप्रसाराचा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे हाच आहे. पण हा पूर्णपणें साधण्यास मुख्य साधन हें पाहिजे कीं त्या विषयाचें परिज्ञान वक्त्यास परिपूर्ण असलें पाहिजे—तो त्यांत मुरलेला पाहिजे—त्याचें त्याशीं तादात्म्य झालेलें असलें पाहिजे. एऱ्हीं इतकें चांगलें प्रतिपादन मनुष्याला कदापिही करितां यावयाचें नाहीं. अलीकडे कितीएक ग्रंथांचीं भाषांतरें आमच्या मराठींत झालेलीं दृष्टीस पडतात तीं नुसतीं भाषांतरेंच असतात—शब्दाला शब्द ठेविलेले असतात. त्यामुळें वाचकांस विषयपरिज्ञान तिळमात्रही होत नाहीं. ही स्थिती केवळ शास्त्रीय विषयांचीच नाहीं तर ऐतिहासिक ग्रंथांच्या भाषांतरांतही असाच प्रकार कधीं कधीं दृष्टीस पडतो. ह्या संबंधानें आमच्यांतल्या लेखकांस आणि वक्त्यांस एवढीच सूचना करावयाची आहे कीं, वाचकांस विषय—मग तो थोडा कां होईना—चांगला समजावा—

त्यांत शंका राहूं नये अशी आपली भाषा असावी—ह्याविषयीं त्यांनीं फार जपावें. ह्यास विषयांचें परिज्ञान एवढेंच कायतें मुख्य साधन आहे हें वर सांगितलेंच आहे. आणि ती एक प्रकारची तपश्चर्या आहे. ती पूर्ण होते तेव्हांच सर रॉबर्ट बॉल यांसारखे ऋषि राष्ट्रांत उत्पन्न होतात, आणि त्यांच्या द्वारें राष्ट्राचें कल्याण होतें. परंतु हें कार्य फार वेळाचें आहें; तें कोणा एका माणसाच्यानें व्हावयाचें नाहीं. तें योगायोगानें राष्ट्राच्या कर्मानुसार आपोआप होत जातें. त्याप्रमाणें सर्व गोष्टी घडून येऊन प्रत्येक शास्त्रीय विषयांत प्रवीण असे अनेक सर रॉबर्ट बॉल आमच्या राष्ट्रांत निर्माण होवोत अशी परमेश्वराची प्रार्थना करितों. अशा प्रकारची ज्ञानप्रसारइच्छा विद्याधिकाऱ्यांच्या मनांत सर्वत्र जागृत असते. आमच्या मुंबई इलाख्याच्या विद्याधिकाऱ्यांच्या ठायींही अशी इच्छा पूर्वींच उत्पन्न झाली होती; परंतु त्या वेळीं इकडे कोणी राबर्ट बॉल नव्हते आणि ज्ञानसंपादनाची तितकी इच्छाही सामान्य लोकांत नव्हती. ह्यामुळें तसे व्याख्यानांचे प्रयोग त्यांस घडवून आणतां येईनात, म्हणून इंग्लंडामध्यें त्या वेळेच्या थोडे आधीं "**सायन्स प्रायमर्स**" म्हणजे "**अनेकविद्याविषयक बालशिक्षाग्रंथमाला**" ह्या नांवाचीं अनेक लहान लहान पुस्तकें इंग्रजींत ह्याच उद्देशानें प्रसिद्ध झालीं होतीं, त्यांचीं मराठी भाषांतरें विद्याधिकाऱ्यानीं कै. केरुनाना छत्रे, रावबहादुर काशीनाथ बाळकृष्ण मराठे, इत्यादि चांगल्या नामांकित विद्वान् गृहस्थांकडून करवून छापून प्रसिद्ध केलीं. परंतु लिहिण्यास दुःख वाटतें कीं त्यांचा मुख्य हेतु तिळभरही सिद्धीस गेला नाहीं. ह्याचें कारण असें कीं, पूर्वीं सांगितल्याप्रमाणें तीं पुस्तकें बहुतेक शब्दास शब्द ठेवून दिलेलीं शब्दप्रतिबिंबें होतीं. तेवढीं पाहून वाचकांस विषयज्ञान होण्यासारखें नव्हतें. म्हणून तीं पुस्तकें छापलीं आणि न छापलीं सारखीं झालीं आहेत. ह्याचें

फार वाईट वाटतें. तरी कालांतरेंकरून आमचा मराठी विद्यार्थिवाचकवर्ग सध्याच्या पेक्षां विशेष समजदार झाल्यावर त्यांस ह्या पुस्तकांचा चांगला उपयोग होईल अशी आमची खातरी आहे.

ह्या ठिकाणीं एक अनुभवसिद्ध सूचना आमच्या देशांतील विद्याधिकाऱ्यांस अशी करावयाची आहे कीं, शास्त्रीय विषयांचें ज्ञान अगदीं साधारण बुद्धीच्या माणसांस करून देण्यास प्रश्नोत्तरांचा कोटिक्रम फार उपयोगीं पडतो. असा अनुभव प्राचीन काळच्या लोकांस आल्याच्या योगानें शेंपन्नासवर्षांपूर्वींचीं छापलेलीं मुलांकरितां योजलेलीं शास्त्रीय विषयांचीं पुस्तकें हीं बहुतकरून संभाषणरूपानें लिहिलेलीं असत. ती पद्धति विशेष सुलभ आणि विशेष उपयोगी अशी वाटल्यावरून मुंबईच्या अगदीं आरंभींच्या एजुकेशन सोसैटीनें कै० हरी केशवजी पाठारे यांजकडून मार्सेटमडमच्या मूळ इंग्रजींतल्या अशा प्रकारच्या पुस्तकांचें भाषांतर मराठींत करविलें. तें कित्येक वर्षें उच्चप्रतीच्या मराठी शाळांतल्या वरच्या वर्गांत शिकवीत असत. तें त्यांस चांगलें कळत असे. भाषांतराची गोष्ट असो, परंतु मराठी ग्रंथकारांतले अध्वर्यु विद्वन्मणि बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर यांनीं मराठी भाषेच्या व्याकरणावर जें अगदीं लहान प्रथम पुस्तक लिहिलें, तें देखील प्रश्नोत्तररूपपद्धतीचें आहे. त्यांत अगदीं पहिला प्रश्न "व्याकरण म्हणजे काय?" हा आहे. ही सूचना मुलांकरितां ग्रंथ लिहिणाऱ्यांस उपयोगीं पडेल असें आम्हांस वाटतें.

सर रॉबर्ट बॉल हे स्वतःविषयीं कांहीं गोष्टी सांगत असत. त्या गोष्टी फार मनोरंजक असून ते त्या गोड शब्दांनीं सांगत असत. त्यांत स्वतःच्या मानप्रतिष्ठेकडे त्यांचा ओढा इतर माणसांप्रमाणें नसे. गोष्ट थोडीशी मनोरंजक असली म्हणजे ती ते

कोणालाही सांगत. त्यांत एक गोष्ट अशी आहे कीं, ते एकदां स्ट्रॅफर्ड ऑन् ऍव्हॉन् येथें एक व्याख्यान द्यावयास गेले होते. तेथें ते एका खाणावळींत जेवावयाला उतरले असतां बोलतां बोलतां खाणावळीणबाईस विनोदानें म्हणाले 'बाई, मी तुम्हांला ज्योतिष-शास्त्रांतली एक मोठी गोष्ट सांगतों.' नंतर त्यानीं 'प्लेटॉनिक वर्ष म्हणजे काय हें तुम्हांला माहीत आहे का?' असें बाईस विचारलें, व तिला तें माहीत नाहीं असें पाहून त्याचा अर्थ त्यांनीं तिला सांगितला. ते म्हणाले 'त्या वर्षी जगांतील सर्व वस्तु अगदीं मूळच्या स्थितीला जाऊन पोंचतात. हें वर्ष २६००० वर्षांनीं येतें. व या गोष्टीस अनुसरून आणखी बरोबर २६००० वर्षांनीं आपण याच ठिकाणीं याच गोष्टी करीत असूं'. इतकें सांगितल्यावर सर रॉ. बॉल यांनीं बाईस विचारलें 'तेथपर्यंत मीं माझ्या आजच्या जेवणाचे पैसे न दिले तर चालेल का?' बाईनें लागलेंच उत्तर केलें 'होय, चालेल. पण आपल्या म्हण-ण्याप्रमाणें, २६००० वर्षांपूर्वी जेव्हां असेच आपण माझ्याकडे जेवावयास आलां होतां, तेव्हांचे पैसे पहिल्यानें चुकते करा, म्हणजे झालें!' ह्यांत त्या बाईनें त्यांना चांगलें निरुत्तर केलें. परंतु त्या-जकडे त्यांनीं तिळमात्रही लक्ष दिलें नाहीं. बाईच्या हजरजबाबी-पणाचें मात्र त्यांस कौतुक वाटलें. त्यांनीं आपल्याविषयीं दुसरी एक गोष्ट सांगितली ती अशी. एकदां ते ऐर्लंडमधील एका अगदीं लांबच्या शहरीं व्याख्यान देण्याच्या उद्देशानें गेले होते. तेथल्या कोणीं एका गृहस्थानें त्यांस स्टेशनावरून आणण्याकरितां गाडी पाठविण्याचें पूर्वी कबूल केलें होतें. त्याप्रमाणें स्टेशनावर ते गाडीची वाट पहात बसले. तेव्हां सर्व लोक जिकडच्या तिकडे निघून गेल्यावर त्यांना गाडी कोठें लवकर दिसेना आणि त्यांची विचारपूस कोणी करीना म्हणून ते इकडे तिकडे पहात असतां एक ऐरिश नोकर त्यांच्या जवळ आला व त्यानें त्यांस

विचारलें 'रॉबर्ट बॉल ते आपणच काय?' त्याला 'होय' असें उत्तर मिळतांच त्याला थोडें हंसायला आलें व तो म्हणाला 'आपल्याला तिष्ठत रहावें लागलें याबद्दल मला फार वाईट वाटतें. पण आपण जितके बुद्धिवान् दिसाल असें मला वाटत होतें तितके मला दिसलां नाहीं. त्यामुळें आपणास थोडें तिष्ठत बसावें लागलें, त्याबद्दल मला क्षमा करा.' म्हणजे, त्यांच्या चर्येवर त्यांच्या बुद्धीचें तेज मुळींच दिसत नव्हतें असा भावार्थ! हे विद्वान् गृहस्थ गेल्या नोव्हेंबर महिन्याच्या २६ व्या तारखेस लंडन येथें मरण पावले.

---

## तुझी व्याप्ति कितीशी!

### श्लोक.

बैससी ती तुझी जागा खाशी तें अन्न बा तुझें
बोलसी ते तुझे शब्द फाडिशी वस्त्र तें तुझें. १.
परोपकारा करिसी तेवढें पुण्य बा तुझें
पीडा परासि देसी तें पाप तूझें तुला डसे. २.
वेंचिसी द्रव्य तें तूझें बाकीचें इतरां मिळे
त्याचा योग कसा कोठें तूजलाही न तें कळे. ३.
सोसोनि कष्ट एकानें सांचवावें उमोप जें
अन्यांनीं व्यसनांमध्यें तें खर्चावें हवें तसें. ४.
अन्याय दिसतो मोठा हा सुज्ञां नित्यशः खरा
परी निवारणीं याच्या उपाय न दिसे तयां. ५.
सुखदुःखास ओझेली ज्याचा तो एकटा असे
यांत वांटेकरी व्हाया खरी शक्ति कुणा नसे. ६.
जें जें होवोनियां गेलें त्याचा संबंध सूटला
पुढें जें व्हावयाचें तें अज्ञानें वेष्टिलें असे. ७.
योगायोगें व्हावयाचें होतें तें निश्चयें जगीं
आड त्याच्या यावयाचें सामर्थ्य न कुणासही. ८.

बसा कोठें करा कांहीं पाहिजे तें वदा मुखें
तें नाहींच टळायाचें तुझी छाया जशी तुला. ९.
तरी त्यांत अकर्मांची वृद्धि होऊं नये कधीं
चालोनी सरळें पंथें भोग येईल तें तसें. १०.
देहास क्लेश होतांना पश्चात्ताप मना नहो
एवढेंचि असे हातीं आपुल्या माणसांचिया. ११.
पाप खाई मना होती वेदना तनुला अशी
दुहेरी यातना होते दुःसहा ती न वर्णवे. १२.
यासाठींच ज्ञानवंत परदुःखास वर्जिती
येतां विपत्तिही त्यांसी धैर्यानें नित्य सोशिती. १३.

---

## दृष्ट आणि अदृष्ट.

दृष्ट म्हणजे दिसतें तें; आणि अदृष्ट म्हणजे दिसत नाहीं तें. ह्या दोन्ही महान् प्रदेशांचा संबंध, मूर्तरूपानें म्हणा किंवा अमूर्तरूपानें म्हणा मनुष्याच्या स्थितीशीं अनादिकालापासून इतका निकट जडलेला आहे कीं, त्यांची तुटातूट कदापि व्हावयाची नाहीं. त्यांपैकीं दृष्टप्रदेश निकट असल्याच्या योगानें त्याजकडे माणसाचा ओढा साहजिकच अधिक असतो. आणि अदृष्ट हा प्रदेश दृष्टाच्या कोट्यवधि पट मोठा असून त्यांतल्या गोष्टींवर मनुष्याचा हिताहितसंबंध फार असतो तरी त्याच्या दूरत्वामुळें आणि अपारत्वामुळें त्याजकडे मनुष्यास लक्ष देण्यास फारसें बरें वाटत नाहीं. तथापि कोणत्याना कोणत्या तरी प्रकारानें त्याला अदृष्टाचीच कांस धरून चालावें लागतें. शेतकरी पेरणी करितो तेव्हां त्याची दृष्टी पेरलेल्या बियांवर असते खरी; तरी त्याच्या मनाची सगळी आशा पुढच्या पाऊसपाण्यावर लागलेली असते. त्याप्रमाणेंच व्यापारी लाखों रुपयांचा माल जहाजांत भरून दूरच्या प्रदेशास जावयास निघतो तेव्हां त्याचा सगळा जीव त्या मालावर असतो; तथापि परबंदरीं जाऊन सुरक्षितपणें

पोंचणें आणि तेथें मालाचा दर चांगला सांपडून त्यापासून किफायत होणें ह्याविषयींच्या सगळ्या आशा अदृष्टांत गुंतलेल्या असतात. त्याप्रमाणेंच शहाणे विद्यार्थी रात्रीचा दिवस करून मोठ्या परिश्रमानें अभ्यास करीत असतात तेव्हां, पुढें गुरु चांगले मिळणें, आपल्या गुणांचें चीज करणारा असा आश्रय प्राप्त होणें आणि सगळे योग एकत्रपणें हातीं लागणें ह्या सगळ्यांविषयीं अदृष्टाकडेच नजर ठेवावी लागते. एवढ्या उदाहरणांवरून आमच्या म्हणण्याचा आशय सहज लक्षांत येईल.

ह्या अदृष्टाची व्याप्ति अत्यंत विस्तृत आहे. त्याचें राज्य पर्वतशिखरें, मोठमोठ्या दऱ्या, अगम्य अरण्यें, पशुपक्ष्यांनीं भरलेलीं रानें, सर्व प्रकारचे प्रदेश, सगळा महासागर, राजमंदिरें, गरीबांचीं घरें, कैकाड्यांचीं पालें, पक्ष्यांचीं घरटीं, उंदीरघुशींचीं बिळें, आणि सर्व प्राण्यांचीं अंतःकरणें ह्या सर्वांत गच्च भरलें आहे. त्यांतल्या कोणत्या गोष्टीचा संबंध कोणत्या गोष्टीशीं असतो आणि त्याचा परिणाम काय व्हावयाचा असतो हें एका परमेश्वरासच ठाऊक असतें. तैमूरलंगासारख्या साधारण मुलास राजत्व मिळावें, नेपोलियन बोनापार्टासारख्यानें आपल्या पहिल्या ज्वानींत सगळ्या युरोपखंडास थर्र करून सोडावें आणि अनुभव वाढला असूनही उतारवयांत एकाद्या गरीब कैद्यासारखें रहावें अशा प्रकारच्या ऐतिहासिक गोष्टींचा विचार केला म्हणजे असें कबूल करणें भाग पडतें कीं, ह्या अदृष्ट जगामध्यें जे कांहीं व्यवहार चालले आहेत त्यांविषयीं नुसत्या कल्पना करणें हें देखील आपणा मनुष्याच्या कल्पनाशक्तीच्या पलीकडे आहे. अशी जरी स्थिती आहे तरी जगांतलीं बहुतेक माणसें आपल्या बहुतेक व्यवहारांत दृष्टापेक्षां अदृष्टावरच फार अवलंबून रहातात. त्याशिवाय त्यांचें चालतच नाहीं आणि अदृष्टावर आपल्या पराक्रमाची इमारत बांधल्याशिवाय कोणाचेंही निभत नाहीं. शिकंदर बादशहा मोठा प्रतापी

होता. त्याला भय कसें तें माहीत देखील नव्हतें. त्याजविषयीं अशी एक गोष्ट सांगतात कीं, एके वेळीं बाहेरदेशीं स्वारी जाण्याची तयारी करीत असतां त्यानें एक मोठा दरबार भरविला आणि त्यास आपले सगळे मोठमोठे सरदार बोलाविले. त्या प्रसंगीं त्यानें आपला जामदारखाना उघडून त्यांतील बहुमोल जवाहीर आणि कपडेलत्ते, तशाच अमोलिक वस्तु आपल्या लष्करांतील माणसांस त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें प्रोत्साहनार्थ वांटून दिल्या. हें पाहून त्याच्या एका जुन्या सेनापतीनें त्याला म्हटलें "महाराज, आपण असें करूं लागलां तर आपणाजवळ काय राहील? आणि आपल्या मंडळीनें कशावर आशा ठेवून आपणाबरोबर समरांगणांत यावें?" त्यास बादशहानें थोडें हंसून उत्तर दिलें "अहो सेनापती, आपण वडील आहांत, मीं आपणास काय सांगावें? मनुष्याला सोडून इतर सर्व गोष्टी जातात हें आपण पहातों. परंतु कोणाचें अदृष्ट म्हणजे प्रारब्ध कोणाला कधीं सोडून गेलें आहे काय? आणि आशा ही अदृष्टाची माता आहे आणि हीं दोन जर आपणास अनुकूल आहेत तर ईश्वरी सूत्राच्या योगानें आपणास काय कमी पडावयाचें आहे? जें राष्ट्र आपण पादाक्रांत करूं त्यांतली सगळी संपत्ती आपलीच होणार नाहीं काय? ही जी एवढी आशा आहे ती मला बस वाटते". हें ऐकून तो सेनापती निरुत्तर होऊन स्वस्थ बसला.

ही एक असाधारण गोष्ट झाली. परंतु अलीकडच्या उद्योगमार्गांतही अशीं कितीएक उदाहरणें आढळतात. एका विद्वान् गृहस्थांची एल् एल्. बी.ची परीक्षा उतरल्यावर त्यांनीं रीतीप्रमाणें एकादी २०० रुपयांची सब्जज्जाची जागा मिळविण्याविषयीं पुष्कळ खटपट केली परंतु त्या जागा देण्याच्या संबंधाचे सरकारचे नियम फारच बिकट असल्याकारणानें ती जागा त्यांस लवकर मिळण्याची आशा नाहींशी होऊन त्यांनीं ५०० रुपये

भरून हायकोर्टाची वकीलीची सनद काढली. तेथें वकीली करितां करितां सुदैवानें आणि त्यांच्या बुद्धिमत्तेनें त्यांची योग्यता वाढून आणि ती अधिकाऱ्यांच्या मनांत भरून त्यांस आतां अगदीं अनायासें ४००० रुपयांची हायकोर्ट जड्जाची जागा मिळाली आहे.

आणखी एक अगदीं व्यावहारिक उदाहरण हें मुंबईचें पोष्ट-आफिस जळालें तेव्हांचें आहे. एका गृहस्थानें एक मराठी पुस्तक लिहून तें नित्याच्या वहिवाटीप्रमाणें आश्रयाकरितां वेगळें बुक-पोष्ट रजिस्टर करून आणि त्याविषयींचें एक वेगळें पत्र रजिस्टर न करितां मेहेरबान डायरेक्टर आफ् पब्लिक इंस्ट्रक्शन् मुंबईस होते त्यांजकडे नगराहून पाठवून दिलें. तें रजिस्टर केलेलें पाकिट आणि पत्र हीं दोन्ही मुंबईच्या पोष्टआफिसपर्यंत सुखरूप पोंचलीं आणि इतर पत्रांबरोबर रजिस्टर न केलेलें पत्र डायरेक्टर साहेबांच्या इतर डांकेबरोबर त्यांस सुरक्षित मिळालें. पण रजिस्टर केलेली ग्रंथाची हस्तलिखित प्रत त्या पाकिटाची पावती वगैरे संस्कारांची तयारी करण्याकरितां पोष्टआफिसांत कांहीं वेळ मागें राहिली. इतक्यांत सगळ्या पोष्टआफिसास आग लागून त्याची राख झाली. म्हणजे जो उपाय त्या लेखाच्या बिनचूक पोंचीकरितां अधिक पैसे खरचून योजिलेला होता तोच उपाय तें पुस्तक यथास्थितपणें पोंचण्यास विघ्नभूत झाला. ह्या अदृ-ष्टाच्या कृतीस काय म्हणावें. असो.

हे सगळे अदृष्टांतील कारभारांचे पराक्रम आहेत. तेथें माण-साची अक्कल कांहीं चालत नाहीं. आणि अदृष्टमहाकटाहांत अत्यंत अदृष्ट म्हटला म्हणजे विश्वंभर होय. त्याच्या हातीं भाजीवाल्याच्या नफ्यापासून राज्यप्राप्तीपर्यंत सर्व सूत्रें खेळत आहेत. तेव्हां त्याजकडे लक्ष ठेवून आणि त्याजवर सगळा भार घालून मनुष्यानें आपलीं कर्तव्यें करीत असावें, आणि त्यांत जें


काय हातीं लागेल ती ईश्वरी देणगी आहे असें समजून आणि तिजबद्दल त्याचे आभार मानून शांतचित्तानें कालक्रमणा करावी एवढेंच कायतें माणसाच्या हातीं आहे.

---

## कृत्रिम रीतीनें पाऊस पाडण्याची एक कल्पना.

मोठाल्या युद्धांच्या वेळीं जो तोफांचा भयंकर भडिमार होत असतो त्याच्या गडगडाटानें वातावरणांत कांहीं चलविचल होऊन त्या युद्धांनंतर त्या ठिकाणीं पर्जन्यवृष्टि होत असते असा पुष्कळ प्रसंगीं अनुभव आलेला आहे. त्या अनुभवास अनुसरून, उंच जागीं डायनामैटसारख्या बारी पदार्थांचे मोठाले स्फोट करून कृत्रिम रीतीनें पाऊस पाडण्याचे अनेक प्रयत्न हिंदुस्थानांत आणि इतर देशांमध्यें कांहीं वर्षांमागें करण्यांत आले. परंतु त्यांचा कांहींएक उपयोग झाला नाहीं, आणि तें कोडें अद्याप तसेंच न सुटतां राहिलेलें आहे. तथापि त्या दिशेनें प्रयत्न चाललेलेच आहेत, आणि अलीकडे एका प्रकाराच्या विजेच्या दिव्याचे किरण पाऊस पाडण्याच्या कामीं उपयोगीं पडतील असें एका शास्त्रज्ञानें प्रसिद्ध केलें आहे. हा विजेचा दिवा कांहीं विशेष प्रकारचा असतो. आपण साधारणपणें विजेचे दिवे पाहातों त्यांत कांचेच्या फुग्यांत बसविलेल्या एका नागमोडी धाग्यांतून प्रकाश पडत असतो, किंवा कार्बनच्या दोन कांड्या जवळजवळ आणलेल्या असतात त्यांच्या टोंकांच्या मध्यें विजेचा प्रवाह वाहून त्याचा प्रकाश पडत असतो. परंतु वर उल्लेख केलेल्या दिव्याची रचना कांहीं निराळ्याच तऱ्हेची असते. ही एक कांचेची नळी असून तींतली हवा काढून टाकून तींत पाण्याची वाफ भरलेली असते, आणि त्या वाफेंतून विजेचा प्रवाह सोडला म्हणजे ती वाफ प्रकाशमान होऊन तींतून हिरवट रंगाचा प्रकाश पडूं लागतो. ह्या प्रकाशाच्या किरणांत असा एक गुण आहे कीं, त्यांच्या योगानें खाण्यापिण्याच्या पदार्थांतलीं

रोगबीजें नाहींतशीं करतां येतात, आणि ह्या कार्याकडे पाश्चिमात्य देशांमध्यें त्यांचा उपयोगही करूं लागले आहेत. ह्या रोगबीज-नाशक किरणांशिवाय आणखी एका प्रकारचे अदृश्य किरणही ह्या दिव्यांतून बाहेर पडत असतात. येथें 'अदृश्य' किरण म्हणजे काय चमत्कारिक वस्तु आहे असें आमच्या वाचकांस वाटेल. कारण 'किरण' म्हणजे डोळ्यांस दिसलेच पाहिजेत असा सर्वत्र साधारण समज आहे. परंतु डोळ्यांना दिसणाऱ्या किरणांबरो-बरच डोळ्यांस न दिसणारे किरणही बाहेर पडत असतात असें शास्त्रज्ञांनीं सिद्ध केलें आहे. खालील आकृतींत, सूर्याचा एक किरण 'प्रिझ्म' नांवाच्या तिकोनी कांचेंतून पाठविला असतां




त्याचें पृथक्करण होऊन तांबडा, पिंवळा जांभळा इत्यादि रंगांचे निरनिराळे किरण कसे होतात तें दाखविलें आहे. हे त्या किर-णांचे रंग अर्थात् डोळ्यांनीं दिसतात. परंतु ह्या रंगांचा जो पट्टा वरच्या चित्रांत दाखविला आहे, त्याच्या वरच्या बाजूस आणि खालच्या बाजूसही, त्या सूर्यकिरणाचे पृथक्करण झालेले परंतु डोळ्यांस न दिसणारे असे किरण पसरलेले असतात. तांबड्या किरणांच्या खालच्या किरणांत विशेष उष्णता असते आणि जांभळ्या किरणांच्या पलीकडच्या किरणांत फारशी उष्णता

नसून रासायनिक कार्य घडवून आणण्याची विशेष शक्ति असते. म्हणून पहिल्या प्रकारच्या अदृश्य किरणांस उष्णतेचे किरण आणि दुसऱ्या प्रकारच्या अदृश्य किरणांस रासायनिक किरण म्हणण्याची चाल पडली आहे. ह्या दोन्ही प्रकारच्या किरणांच्या धर्मांचें सूक्ष्म अवलोकन शास्त्रज्ञांकडून चालू आहे.

वरील विवेचनावरून, पाऱ्याच्या दिव्यांतून बाहेर पडणाऱ्या अदृश्य किरणांची थोडी तरी कल्पना होईल. हे किरण मुख्यत्वें-करून जांभळ्याच्या पलीकडचे म्हणजे 'रासायनिक' प्रकारचे असतात. ह्या किरणांचा असा एक विलक्षण धर्म आहे कीं, हैद्रोजन वायु भरलेल्या एकाद्या कांचपात्रावर हे किरण सोडले असतां, त्या हैद्रोजनचें एकदम पाणी बनतें! म्हणजे, हे किरण हवेंतून जातांना ते हवेंतला आक्सिजन वायु आपल्याबरोबर कांचेंतून त्या पात्रांत नेतात आणि त्याचा त्या पात्रांतील हैद्रोजनशीं संयोग घडवून आणितात! कांचेंतून पलीकडे आक्सिजन वायु नेणें हा ह्या किरणांच्या अंगचा धर्म खरोखर विलक्षण होय!

ह्या किरणांच्या ह्या विलक्षण धर्माचा उपयोग पाऊस पाडण्याच्या कामीं करून घ्यावा अशी एका फ्रेंच शास्त्रज्ञानें कल्पना बसविली आहे. पाऱ्याच्या दिव्यांतून बाहेर पडणारे किरण निराळे करण्यासाठीं तो त्या दिव्यांत एक 'प्रिझ्म' बसवितो, म्हणजे त्याच्या योगानें ते अदृश्य किरण बाकीच्या किरणांपासून निराळे होऊन हव्या त्या दिशेनें पाठवितां येतात. हे किरण आकाशांत सुमारें एक हजार फुटांपर्यंत सोडले असतां, त्यांच्या योगानें, तेथें हैद्रोजन वायु बऱ्याच मोठ्या प्रमाणांत असतो त्याबरोबर हवेंतल्या आक्सिजन वायूचा संयोग होऊन तेथें पाणी थोड्याशा प्रमाणावर तयार होईल, आणि त्याबरोबर त्यास आकाशांतील आसपासचें दुसरें पाणी येऊन मिळून पाऊस पडेल अशी त्याची

कल्पना आहे. ही कल्पना खरी ठरल्यास ती काढणाराचे मनुष्यजातीवर अगणित उपकार होतील ह्यांत शंका नाहीं.

ह्या 'अदृश्य' किरणांच्या शोधाचा इतिहास मनोरंजक आहे. हर्शल नांवाचा एक प्रख्यात इंग्लिश ज्योतिषी अठराव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला, त्यास असें वाटलें कीं, सूर्यकिरण 'प्रिझ्म'मधून पाठविल्यानें निरनिराळ्या रंगांच्या किरणांचा जो वर्णपट पडतो, त्याच्या निरनिराळ्या भागाचे धर्म निरनिराळे असावेत. म्हणून त्यानें एक नाजूक असें उष्णतामापक यंत्र त्या वर्णपटांत धरून पाहिलें तेव्हां त्यास आढळून आलें कीं, त्यांतला पारा जांभळ्या किरणांत मुळींच चढला नाहीं. परंतु तें जसजसें तांबड्या किरणांकडे आणिलें तसतसा त्यांतला पारा चढत जाऊन तांबड्या किरणांत तो सर्वांत जास्त चढला, आणि तांबड्या किरणांच्या पलीकडे आणखी जास्त चढला! ह्यानंतर शील नांवाच्या एका स्वीडिश शास्त्रज्ञानें जांभळ्या किरणांच्या पलीकडील अदृश्य किरणांच्या धर्मांचा शोध केला. त्यास असें आढळून आलें कीं, त्यांच्या अंगीं उष्णता जरी नाहीं तरी रासायनिक क्रिया घडवून आणण्याचा विशेष तीव्र गुण त्यांच्या अंगीं आहे. ह्याच किरणांच्या योगानें फोटोग्राफ काढतां येतात. ह्यांपैकीं कांहीं किरणांचे विलक्षण गुण वर सांगितलेच आहेत. दुसरे कांहीं किरण असे आहेत कीं, ते जरी स्वतः अदृश्य असले, तरी ते जर कांहीं विवक्षित पदार्थांवर पडले तर ते त्यांच्या अंगीं तेज उत्पन्न करितात, आणि दुसरे किरण कितीएक कोसांवर ठेविलेली दारू उडवून देतात! ह्या किरणांची ही विलक्षण शक्ति मनुष्यास सांपडलेली असून तिच्या साह्यानें कोणकोणत्या गोष्टी घडून येणार आहेत त्याची आज कल्पना करतां येत नाहीं.

## स्फुट.

**प्राण्यांचे अंगस्वभावः**—जीवांच्या अंगस्वभावाविषयीं प्राणिशास्त्रांत अनेक चमत्कारिक गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांत बदकांच्या पिल्लांविषयीं असें वर्णिलें आहे कीं, कधीं कधीं, अंड्यांतून बाहेर पडल्याबरोबर बदकाचीं पिल्लें पाळायास कोंबडीच्या स्वाधीन करितात. तीं तिला अगदीं स्वतःच्या पिल्लांसारखीं वाटतात. त्यांचा प्रतिपाळ ती स्वतःच्या पिल्लांप्रमाणें करते. आणि त्यांना ती आई वाटते, असें त्यांच्या वागण्यावरून दिसतें. असें होतें तरी, बदकीचीं पिल्लें आंगच्या गुणांनीं कोंबडीचीं पिल्लें होत नाहींत. त्यांच्या पायांच्या बोटांच्या मध्यें पातळ कातडी यावयाची ती येते. तिच्या योगानें त्यांस पाण्यांत पोहण्याचें सामर्थ्य स्वभावतःच असतें. आणि तशी कातडी कोंबडीच्या पिल्लांच्या बोटांच्यामध्यें नसल्याकारणानें, अर्थात्च, त्यांस पाण्यांत पोहतां येत नाहीं. पण, तीं सगळीं अमळ मोठीं झाल्यावर एकदम एकाद्या नदीवर, त्या कोंबडीबरोबर गेलीं असतां, कोंबडीचीं पिल्लें नदीच्या कांठीं थबकून राहातात, पाण्यांत पाऊल ठेवीत नाहींत; परंतु, बदकीचीं पिल्लें परत बोलावण्याकरितां कोंबडीनें नदीच्या तीरावरून कितीही कंठशोष केला, तरी, तीं त्याजकडे तिळमात्रही लक्ष न देतां, तीं एकसारखीं, धडक नदींत जातात, आणि मोठ्या हौसेनें, पाणी उडवीत उडवीत, बेलाशक पुढें पुढें जाऊन, खूब खेळतात. तीं पाण्यांत बुडून मरतील कीं काय, असें भय कोंबडीला वाटत असतें, तें त्यांच्या गांवींही नसतें!

**मनाचा मोकळेपणाः**—हा एक फार मोठा गुण आहे. याच्या योगानें मनुष्यांमध्यें स्नेह वाढून उभय पक्षांचें कल्याण होतें. त्यांतही राज्यकर्ते आणि प्रजा हीं दोन्ही मोकळ्या मनाचीं असलीं म्हणजे राज्यामध्यें उत्तम प्रकारचें ऐक्य वाढून राष्ट्राचें कल्याण

होतें. याचीं उदाहरणें इतिहासांत पुष्कळ आहेत. तसे योग आपल्या हिंदुस्थानांत यावे आणि तद्वारा हिंदुस्थानाचें कल्याण व्हावें अशी ज्या सध्याच्या उदारमति थोर इंग्लिश गृहस्थांची फार इच्छा आहे त्यांतल्या अग्रगण्यांत आमचे सध्यांचे लोकप्रिय व्हाइसराय नामदार लॉर्ड हार्डिंज यांची गणना आहे. तिचें प्रमाण दिल्ली येथील अत्याचाराच्या वेळीं नामदारसाहेबांच्या भाषणावरून आणि वर्तनावरून लोकांस पटलेंच आहे. त्यास आणखी भर पडण्यासारखें दुसरें एक उदाहरण गेल्या महिन्याच्या २६ व्या तारखेस त्यांनीं कलकत्ता क्लबमध्यें जें भाषण केलें त्यांत बाहेर पडलें आहे. तेंही अत्यंत वर्णनीय आणि संग्राह्य आहे. त्याचा गोषवारा येणेंप्रमाणेः—'ह्या क्लबानें कलकत्त्यांतील रहिवासी आणि इंग्लिश लोक यांच्या मधलें प्रेमबंधन वृद्धिंगत करण्याचा जो प्रयत्न चालविला आहे तो अत्यंत अभिनंदनीय आहे. आणि त्यापासून माझ्या अंतःकरणास परम संतोष वाटतो. हेंच माझ्या मनास अत्यंत इष्ट कार्य वाटतें. कां कीं, सर राजेंद्रनाथ मुकरजी यांनीं म्हटल्याप्रमाणें 'ऐक्य हेंच सामर्थ्य आहे'. या राज्याची उन्नति होण्यास जे कठीण प्रश्न सुटले पाहिजेत ते लोकांचें कल्याण होईल अशा रीतीनें सुटण्यास या देशांतील हिंदी लोक आणि युरोपियन यांचें तादात्म्य होणें आणि परस्परांतील सद्धेतूंची खरी किंमत जाणून त्याप्रमाणें परस्परांशीं मोकळे मनानें वागणें हेंच अत्यंत आवश्यक आहे. दोष म्हटले म्हणजे आपणां सर्वांत आहेतच. तरी त्यांजकडे या उभयपक्षांनीं उदारपणानें ढळती नजर ठेविली पाहिजे आणि जे चांगले गुण आहेत त्यांचें मोल यथायोग्य प्रकारें मानिलें पाहिजे........आणखी, एक वर्षापूर्वीं दिल्ली येथें जो अत्याचार घडला आहे, आणि ज्याच्या योगानें हिंदुस्थानाचा अपमान झालेला आहे त्या अत्याचाराचा डाग हिंदुस्थानाच्या इतिहासावरून अगदीं धुऊन टाकावा अशी माझी इच्छा आहे.'

# लोक काय बोलतात.

हिंदु युनिव्हर्सिटी फंडाचा वसूल ४१६०९६१ रुपये झाला आहे.

यंदांच्या मुंबई युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेस एकंदर ४८४५ विद्यार्थी बसले होते. त्यांपैकीं २७८७ पास झाले.

दर सोळा मैलांस एक इंच या प्रमाणानें काढलेला सगळ्या जगाचा एक मोठा नकाशा नुकताच विलायतेस पुरा झाला आहे. हा नकाशा एक अपूर्व चित्रपट होणार आहे.

विलायतेंत एकंदर १६।१७ शें हिंदी विद्यार्थी असून त्यांपैकीं फक्त १४४ च तेथील कमिटीच्या देखरेखीखालीं आहेत. या कमिटीचा खर्च ५९७३ पौंड हिंदुस्थानाच्या उत्पन्नांतून होतो.

दिल्लीचे प्रसिद्ध गवई प्रो. इनायतउल्ला खान सांप्रत रशियांत गेले आहेत. तेथें त्यांचा मोठा सन्मान झाला. प्रो. साहेबांचें हिंदुस्थानी गाणें आणि त्यावरील त्यांचीं व्याख्यानें रशियन गायनशास्त्रज्ञांस फार आवडलीं असें समजतें.

सध्याचे जर्मनीचे बादशहा कैसर आणि त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव ह्यांचीं मतें स्वराज्यांतल्या सैन्यव्यवस्थेसंबंधीं भिन्न असल्यामुळें नामदार राजपुत्रांच्या बदल्या वरचेवर होत असतात. त्यांस ते निमूटपणीं मान्य होतात हें मोठें भूषण आहे.

कोचीनचे राजेसाहेब स्वसंतोषानें आपल्या गादीचा राजिनामा देऊन बाकीचें आयुष्य संस्कृत विद्येच्या अध्ययनांत घालविणार आहेत. ह्यांचें वय ६० वर्षांहून अधिक आहे. अशा प्रकारचें स्तुत्य उदाहरण अर्वाचीन इतिहासांत क्वचित् सांपडेल.

सुप्रसिद्ध राजा तोडरमल व त्याच्या दोन बायका ह्यांचे तांब्याचे अर्धे पुतळे मद्रासेकडे सांपडले आहेत. त्यांवर त्यांचीं नांवेंही देवना-

गरी व तेलगु लिपींत कोरलेलीं आहेत. लाला खेमराज, माता मोह-नदेवी व पिता बिबी अशीं हीं नांवें आहेत.

---

गेल्या महिन्यांत जपानांत फार मोठा धरणीकंप झाला. त्याला मदत म्हणूनच कीं काय लागलेच ज्वालामुखी पर्वत भडकले. लाखों रुपयांचें नुकसान झालें आणि साहाशें लोक प्राणांस मुकले. निराश्रित झालेल्या लोकांस मदत करण्याकरितां फंड उभारला आहे.

---

बांकीपुर येथें व्हाइसरॉय यांनीं प्रसिद्ध खुदाबक्ष लायब्ररींतील बहुमोल हस्तलिखित ग्रंथ पाहिले. शहाजहान बादशाहानें १ लक्ष रुपये व पांच हत्ती देऊन खरेदी केलेली फर्दुसीच्या शहानाम्याची एक मौल्यवान् प्रत या लायब्ररींत आहे. फर्दूसी हा एक मोठा कवी होऊन गेला.

---

मुंबईतल्या बॉम्बे बँकिंग कंपनीचें दिवाळें निघालें. त्याच्या योगानें दक्षिणेंतील पुष्कळ लहानमोठ्या माणसांस आणि संस्थांस नुकसान सोसावें लागलें आहे आणि एकंदरींत ब्राह्मणजातीस अब्रूच्या संबंधानेंही बराच धक्का बसला आहे. ह्याचें फार वाईट वाटतें.

---

आपले बादशहा पंचम जॉर्ज ह्यांचे ज्येष्ठ चिरंजीव नामदार प्रिन्स ऑफ वेल्स ह्यांची स्वारी हिंदुस्थान पहाण्याकरितां लौकरच इकडे येणार आहे म्हणतात. ह्यांचे तीर्थरूप आणि आजोबा हे प्रिन्स ऑफ् वेल्स असतांच हिंदुस्थानांत फिरून गेले. ह्या राजपुत्रदर्शनापासून हिंदुस्थानास अनेक लाभ होतात.

---

स्त्रियांच्या मेडिकल सर्विसमध्यें २५ डाक्टरणी नेमावयाच्या असून पहिल्या वर्षीं २४ ची नेमणूक झाली आहे. त्यांत १८ युरोपियन व ६ हिंदी आहेत. ह्या सर्व डाक्टरणी हिंदुस्थानांतल्याच असून यापुढें डाक्टरणी इंग्लंडांतून न आणतां इकडच्याच नेमावयाच्या असें लेडी हार्डिंज ह्यांनीं ठरविलें आहे. फार चांगलें.

---

मुंबई इलाख्यांत प्रसिद्धीस आलेले सर विल्यिम् लीवार्नर हे गेल्या महिन्याच्या १९ व्या तारखेस मेंदूच्या विकारानें मरण पावले. यांचा Native States of India या नांवाचा ग्रंथ फार प्रसिद्ध असून तो सध्यां प्रमाणभूत समजतात. ह्यांनीं लार्ड डलहौसी यांचें एक विस्तृत चरित्रही लिहिलें आहे.

---

पुष्कळ हिंदी लोक विद्यार्थ्यांच्या वेषानें अमेरिकेंत येतात. कित्येक कानडा व मेक्सिको यांतून गुप्तपणें आंत घुसतात अशी अमेरिकन अधिकाऱ्यांस शंका आली आहे. ते याबद्दल कायदा करणार असून सरहद्दीवरील पहाराही जास्त सक्त करणार आहेत म्हणतात. असा दुजाभाव पूर्वीं ऐकूं देखील येत नव्हता, मग आतांच कां उत्पन्न झाला हें कळत नाहीं. कालमाहात्म्य.

---

गेल्या नाताळामध्यें मराठा शिक्षणपरिषद् नाशकास भरली होती. तेथें जीं कामें वाखाणण्यासारखीं झालीं त्यांमध्यें मराठ्यांनीं आपल्या सुधारणेच्या उद्योगांत चांगल्या सुशिक्षित ब्राह्मणांच्या अनुमतानें आपले उद्योग चालवावे असा कल स्पष्ट दिसून आला. त्याचा आम्हांस फार संतोष वाटतो. हा कल दिवसेंदिवस वाढत जाईल तर त्यांत उभयपक्षांचें कल्याण आहे.

---

ब्रिटनच्या पोस्टल सेविंग ब्यांकेंत लोकांच्या एकंदर ठेवी १८,२१,०४,५६४ पौंड आहेत. इंग्लंड, स्काटलंड व आयर्लंड ह्यांत अनुक्रमें ४.५९,११.१९ व ९.४४ लोकांस एक खातें पडत असून दर खात्याची सरासरी ठेव अनुक्रमें २०,१८ व २७ पौंड आहे. हा पोष्टखात्यावरचा विश्वास हिंदुस्थानांतही वाढत चालला आहे. पोष्टल ब्यांकेचें दिवाळें निघण्याचें भय नाहीं.

---

इ० स० १९१४ ह्या वर्षीं अंटार्टिक महासागरांत नवीन शोध लावण्याकरितां इंग्लंडांतून एक मोठी मंडळी राजाश्रयानें निघणार

आहे. त्याबरोबर जाण्याकरितां शेंकडों लोकांचे अर्ज आले आहेत. ह्या मंडळीबरोबर जाण्यास आस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड ह्या देशांनीं दोन भूगर्भशास्त्रवेत्ते, दक्षिण आफ्रिकेनें एक उल्काशास्त्रवेत्ता आणि कानडा देशानें एक यंत्रशास्त्रवेत्ता पाठविण्याचें ठरविलें आहे.

---

दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांस जो त्रास होत आहे त्याविषयीं आमचे लोकप्रिय व्हाइसरॉय लार्ड हार्डिंज आणि आमचे लोकप्रिय गव्हर्नर लार्ड विलिंग्डन् यांस फार कींव आली आहे. आणखी त्या लोकांस साह्य करण्याकरितां आमच्या देशांतले उदार राजेरजवाडे मोठमोठ्या रकमा मोठ्या औदार्यानें देत आहेत.

---

जर्मन भाषा घेऊन मॅट्रिकची परीक्षा पास झालेल्या मुलांत ज्यांचे मार्क जास्त असतील अशा दोघां चित्पावन विद्यार्थ्यांस ते फर्ग्युसन कालेजांत राहून जर्मन भाषाच घेतील तर—दरमहा १५ रुपये प्रमाणें २ वर्षें स्कालर्शिपा देण्यासाठीं, हुबळीचे रा. रा. कृष्णाजी पांडुरंग जोशी यांनीं १८००० रुपयांचे कर्जरोखे सरकारचे स्वाधीन केले आहेत. फर्ग्युसन कालेजांत जर्मन शिकण्याची सोय नसेल तर इतर कालेजांतही ही स्कालर्शिप चालेल. हा विद्याप्रसाराच्या कामीं स्तुत्य प्रयत्न आहे.

---

सध्या पृथ्वीच्या पाठीवर प्रमुख धर्म ६ आहेत. त्यांतील लोकांच्या संख्यांचें स्थूलमान येणेंप्रमाणें आहे.

| | |
|---|---|
| ख्रिस्ती | ५३,४९,४०,००० |
| मुसलमान | १७,५२,९०,००० |
| यहुदी | १,०८,६०,००० |
| कन्फ्यूशियन | ३०,००,००,००० |
| हिंदु | २१,४०,००,००० |
| बौद्ध | १२,१०,००,००० |
| इतर धर्म | १८,८४,२०,००० |
| | १,५४,४५,१०,००० |

# बालबोध.

## दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला.



### ओंव्या.

अगा अर्जुना जे अनन्य, म्हणजे मजवेगळें नलगे ज्यांस अन्य,
कीं शाश्वत मोक्षही न इच्छिती ते धन्य, तेव्हां नश्वर पदार्थ इच्छि-
ती ते काय. १.

माझे चरण लागतां गोड, ज्यांची मुमुक्षाही जाहली रोड,
माझ्या चिंतनाचेंची कोड, सर्वदा जयांसी. २.

ज्यांस ऐसें माझें भजन, मजवेगळें कांहीं न इच्छिती जे जन,
परि मी सकळ सुखदाता भवभंजन, योगक्षेम वहातों तयांचा. ३.

यथार्थदीपिका, **वामनपंडित.**

हीं सगळीं अत्यंत पवित्र गीतावचनें आहेत. ह्यांत माझे

भक्त कोण आणि त्यांचा भार मी किती वहातों ह्याचें स्पष्ट कथन श्रीकृष्णानें केलें आहे. असे खरे भक्त हे जगाच्या उद्धारास मुख्य साधनीभूत आहेत. असे निस्सीम भक्त गिरिकंदरीं, हिमालयपर्वतीं, ब्रह्मारण्यीं नित्य दृष्टीस पडतात असें आजपर्यंत झालेले सगळे महात्मे जगास सांगत आले आहेत. आणि सध्याचेही कांहीं महात्मे तसेंच सांगत आहेत. परंतु अशा महाविभूतींचा सहवास सामान्य प्रापंचिकांस दूरत्वामुळें आणि व्यवहारभिन्नत्वामुळें अप्राप्त असल्याकारणानें, त्यांच्या हितासाठीं अशा प्रकारचे प्रपंचांत राहाणारे भगवद्भक्त कालदेशानुरूप जागजागीं विश्वंभर उत्पन्न करितो. ही योजना या वसुंधरेवर अनादिकालापासून चालली आहे. तिचीं उदाहरणें विचारशील मनुष्यांच्या ज्ञानदृष्टीस केव्हांना केव्हां तरी पडतात, आणि त्यांपासून त्यांस परमार्थ साधण्यास आणि ऐहिक दुःखाचे चपेटे चुकविण्यास फार चांगला मार्ग सांपडतो. त्याप्रकारचें एक उदाहरण **दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला** ह्यांच्या चरित्रांत आहे. तें चरित्र येथें आज सादर करितों.

आतां चरित्र म्हटलें म्हणजे त्यांत जन्म, बाल्य; पौगंड, तारुण्य, वार्धक्य, इत्यादि सगळ्या जीवनवर्धनाच्या पायऱ्यांची हकीकत यावयाची. परंतु प्राचीनकालापासून आजपर्यंत सगळ्या राष्ट्रांच्या वाङ्मयामध्यें असा एक चमत्कार झालेला आहे कीं, अशा विभूतींच्या कथा साद्यंत अशा कोठें सांपडत नाहींत. ह्याचें कारण एवढेंच कीं, असे महात्मे आत्मश्लाघेविषयीं अत्यंत परान्मुख असल्यामुळें स्वतःविषयींच्या गोष्टी ते लिहून ठेवीत नाहींत, आणखी ते असे महात्मे आहेत अशी ओळख पटण्यासारखें ज्ञान इतर सामान्य लोकांत नसल्यामुळें त्यांजकडे त्यांचें लक्ष ते विद्यमान असतात तोंपर्यंत जात नाहीं. मिळून एकंदर अशा महात्म्यांच्या चरित्रांचा अभाव जगास नेहमीं जाणवत असतो.

ज्ञानदेव होऊन गेल्यास फार वर्षें झालीं नाहींत तरी ज्ञानदेव एक होता कीं तीन होते याचा वाद अद्याप मिटत नाहीं. हें त्याचेंच उदाहरण आहे. तरी त्यांच्या पश्चात् त्यांच्या कांहीं कृतींचा इतिहास घेऊन तो जुळविण्याचा प्रयत्न लोकहितवादी यथाशक्ति करीत असतात. तसाच प्रकार प्रकृत विषयांतही पुष्कळ झाला आहे. एवढें सुचवून ह्या चरित्रांतल्या ज्या थोड्याशा गोष्टी आम्हांस मिळाल्या आहेत त्या येथें संक्षेपतः सादर करितों.

दामोदरदास हे लोहाणा जातीचे होते. ती जात पहिल्यापासून व्यापारधंद्यास वाहिलेली असल्यामुळें त्यांच्यामध्यें शिक्षणवृद्धीचा विचार पहिल्यापासून अगदीं बेताचा होता. ह्यांचें जन्म इ० स० १८४६ त झालें. ह्यांचें लहानपणचें शिक्षण कोणाच्या हाताखालीं कोणत्या प्रकारें कसें झालें ह्याची कांहींएक माहिती उपलब्ध नाहीं. तरी ह्यांना थोडेंसें इंग्रजी येत होतें, आणखी आपल्या भोंवतीं इतर सुशिक्षित जातींचे लोक आपल्या स्वतःच्या सुधारणेकरितां आणि उद्धाराकरितां काय काय उद्योग करीत आहेत हें बारीक दृष्टीनें पहाण्याची फार चांगली आंगची संवय ह्यांस होती. तिच्या योगानें ते अगदीं आपोआप नवीन सुधारकपंथांतल्या सुशिक्षित लोकांच्या रीतींचें अनुकरण करूं लागले. ह्याचें मोठें आश्चर्य वाटतें. कां कीं असें अनुकरण करण्याची संधि पुष्कळ सुशिक्षितांस प्राप्त होत असतां ती त्यांस लोकापवादास्तव साधतां येत नाहीं ती ह्यांनीं साधली. तेव्हां हें कांहीं पूर्वार्जिताचें फळ होतें असें म्हणणें भाग पडतें. त्यांत त्यांनीं जातिबंधनाची वगैरे कशाचीही पर्वा केली नाहीं. ते कै० बाळ मंगेश वागळे ह्यांचे परमस्नेही असून त्यांच्या सहवासानें ते इ० स० १८६८ ह्या वर्षी अगदीं उघडपणें प्रार्थनासमाजास मिळाले. त्या काळीं वयाच्या २१।२२ व्या वर्षी हें धैर्य कांहीं सामान्य नव्हतें.

त्यांच्या मनानें असें घेतलें होतें कीं, धार्मिक, सामाजिक आणि व्यावहारिक सुधारणा ज्या मूळ देशांतून अलीकडे हिंदुस्थानांत आल्या आहेत आणि पसरत चालल्या आहेत ते देश स्वतः दृष्टीनें पाहिल्यावांचून आणि त्यांचें तत्त्व बरोबर कळल्यावांचून आपल्या जन्माचें सार्थक्य व्हावयाचें नाहीं. म्हणून त्यांनीं आपल्या व्यापारधंद्यांत जो कांहीं पैसा मिळविला होता तो इंग्लंड, अमेरिका, चीन, जपान इत्यादि देशांत प्रवास करण्यांत खर-चिला. सुबोधपत्रिकेनें म्हटल्याप्रमाणें 'आपल्याला धन मिळावें व त्याचा व्यय बहुजनांच्या हितासाठीं आपल्याला करतां यावा हें त्यांचें मुख्य ध्येय होतें.' त्या ध्येयाकडे सर्व लक्ष ठेवून त्यांनीं आपला सर्व वर्तनक्रम चालविला. त्यांनीं परदेशीं प्रवास केल्यामुळें त्यांच्या ज्ञातिबांधवांचा कोप त्यांजवर झाला तरी ते तिळभरही कचरले नाहींत, आणि त्यांस जें काय पवित्र आणि योग्य असें वाटत गेलें तें ते अगदीं उघडपणें आणि निर्धास्तपणें करीत चालले. त्यांनीं आपल्या ज्ञातिबांधवांस शांतपणें आणि स्पष्टपणें म्हणावें कीं 'तुम्ही मला बहिष्कार घाला किंवा माझा वाटेल तसा छल तुम्हांला करावयाचा असेल तर करा, पण मी प्रायश्चित्त म्हणून घेणार नाहीं. मीं जर कांहीं अयोग्य केलें नाहीं तर मग प्रायश्चित्त घेण्याच्या विचारांशीं मला काय करावयाचें आहे.' हे उद्गार त्यांच्या निश्चयाच्या फळाचे होते.

त्यांचा व्यापार प्रथम चंदनाचा होता पण ते पुढें कापसाची दलाली करूं लागले. त्यांची सचोटी फार मोठी होती. तिच्या योगानें त्यांस पैसा पुष्कळ मिळत असे, आणखी आरंभापासून त्यांचा स्वतःचा खर्च फार थोडा असल्याच्या योगानें त्यांची शिल्लक पुष्कळ पडत असे. तिचा विनियोग ते सर्व प्रकारच्या स्वजन-हिताच्या सार्वजनिक कार्यांत गुपचुपपणें करीत असत. त्यांचा

हिशेब, आम्हांस वाटतें, त्यांस स्वतःस देखील देतां आला नसता. मग तो इतर जनांस ठाऊक नसावा यांत काय नवल आहे ?

दामोदरदास हे अत्यंत निर्लोभ व धर्मशील गृहस्थ होते. त्यांच्या धर्माचें मुख्य लक्षण गुप्तदान हें होतें. त्यांनीं हजारों रुपये सत्कार्यीं खरचलेले आहेत पण त्यांत आपलें नांव 'एक मित्र' ह्याच्या पलीकडे बाहेर प्रगट केलें नाहीं. म्हणजे

देह तें देवाचें वित्त कुबेराचें ।
तेथें ह्या जीवाचें काय आहे ॥ १ ॥
देता देवविता कर्ता करविता ।
नेता नेवविता देव एक ॥ २ ॥

ह्या तुकारामोक्तीवर त्यांचा पूर्ण विश्वास होता आणि त्याप्रमाणें ते मनापासून वागत असत. त्यांच्या वर्तनांत आंतबाहेर असें कांहीं नसे. ह्याविषयीं त्यांच्या ज्ञातिबांधवांची चांगली खातरी झाल्यावर पुढें ते त्यांशीं मित्रभावानें आणि प्रेमभावानें वागूं लागले होते. शिवदिनकेसरीनें उपदेश केल्याप्रमाणें म्हणजे

कोणी कांहिं म्हणो यासाठीं ।
बळकट धैर्य असावें गांठीं ।
निंदास्तुतिवर लावुनि कांटी ।
मी तुं हरा रे ॥
मानवदेहीं साधा भक्ति ।
यासाठीं याची उत्पत्ति ।
ऐसा विवेक जाणुनि चित्तीं ।
प्रभुसि वरारे ॥ २ ॥

हें साधुव्रत दामोदरदासांच्या नित्याचरणांत मूर्तिमंत दिसत असे. 'निंदास्तुतीस कांटीं लावणें' म्हणजे काय हें त्यांनीं प्रत्यक्ष करून दाखवलें.

शेट दामोदरदास अत्यंत निर्लोभ होते असें वर म्हटलें आहे, त्याचप्रमाणें ते मानाचेही भुकेले नव्हते. त्याचें एक उदाहरण

सुबोधपत्रिकेनें असें दिलें आहे. "दामोदरदासजी मानाचे भुकेले नव्हते. त्यांचें दान गुप्तदान असे असें आम्हीं वर म्हटलें आहेच. सर्व लोकांना त्यांचा हा स्वभाव पूर्णपणें माहीत झाला होता. साऊथ आफ्रिकन फंडासाठीं त्यांनीं पांचशें रुपयांचा आंकडा 'एक मित्र' या नांवावर घालायास दिला. मान, पदव्या, ह्यांपासून ते अगदीं अलग राहात असत. असें असूनही त्यांनीं 'सर' ही पदवी मिळवावी अशाबद्दल निकराचा प्रयत्न एकदां झालाच. एकदां दोन नैट दामोदरदासांकडे गेले आणि अमुक संस्थेसाठीं तीन लाखांची देणगी द्या आणि नाईट व्हा असें सांगूं लागले." ह्यास दामोदरदासांनीं जें उत्तर दिलें तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यांच्या उत्तरावरून त्यांचें अंतःकरण कसें होतें तें स्पष्ट दिसतें. ते म्हणाले, "मजसारख्या गरीब माणसास नाइटहूड कशास पाहिजे? मी जें कांहीं देतों तें मानासाठीं नव्हे. **देवाची सेवा करण्यासाठीं मी दान करितों.**" येथें ग्लाडस्टन साहेबांची आठवण होते. महाराणी व्हिक्टोरिया यांनीं आपण होऊन ग्लाडस्टनांस एकंदर चार वेळां लार्ड ही पदवी द्यावयास काढली होती, पण त्यांनीं ती चारही वेळां नाकारिली आणि म्हणाले 'मी नुसता मि. ग्लाडस्टन म्हणून मरेन'.

आतां त्यांनीं आपलें द्रव्य कोणत्या परमार्थपर कामांत खरचिलें त्याचें थोडेंसें टिपण जसें मिळालें आहे तसें देतों:—

१. मुंबईंत कोटांत धर्मार्थ पुस्तकालय आणि वाचनालय आणि तशा संस्था इतर कित्येक ठिकाणीं स्थापल्या.

२. मुंबई प्रार्थनासमाजांत डा० भांडारकर पुस्तकालय स्थापिलें.

३. मुंबई प्रार्थनासमाजास 'राजाराम मोहनराय आश्रम' ही इमारत बांधून दिली.

४. मुंबईंतली दादाभाई पूअर सेमिनरी नांवाची धर्मार्थ शाळा आणि पुस्तकालय हीं स्थापिलीं.

५. दादाभाई नौरोजी विलायतेंत असतां तेथें हिंदुस्थानच्या हिताच्या वृद्ध्यर्थ पुष्कळ पैसा पाठविला.

६. निराश्रित सहाय्यकारक मंडळी आणि ब्राह्मसमाज ह्यांस द्रव्याश्रय दिला.

त्यांचेकडे कोणी मनुष्य सत्कार्यार्थ साह्य मागण्यास गेला असतां कधींही विन्मुख परत गेला नाहीं. आणखी, त्यांच्या किती देणग्या कोठें कोठें दिल्या गेल्या आहेत हें कोणास ठाऊक नाहीं. तरी तें सर्व देवाच्या घरीं रुजू आहे आणि त्याचें पुण्य दामोदरदासांचे खातीं जमा झालें असलेंच पाहिजे. इतर सर्व प्रकारच्या दाना-पेक्षां ज्ञानदान हें नेहेमीं श्रेष्ठ मानलेलें आहे. कां कीं, तें दान निरंतर वाढत असतें. ती एक प्रकारची ईश्वरभक्ति आहे, तेव्हां तिनें सुखडवाल्यांसारख्या महात्म्यांचें चित्त वेधावें हें अगदीं साहजिक आहे.

त्यांची प्रकृति स्वभावतः चांगली सुदृढ होती. परंतु गेल्या अक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या तारखेस ते आजारी झाले, आणि तेव्हांपासून अजीर्णादिकांनीं त्यांची प्रकृति अधिकाधिक बिघडत जाऊन शेवटीं ता. ११ नोवेंबर मंगळवार रोजीं रात्रीं त्यांनीं आपली इहलोकची यात्रा संपविली. अशा प्रकारें "अनायासेन मरणं विना दैन्येन जीवनं" ह्या पद्धतीनें त्यांची सर्व आयुर्यात्रा होऊन ते हा लोक सोडून गेले. ह्यांत "योगक्षेमो वहाम्यहम्" हें श्रीकृष्णाचें अभिवचन पूर्णपणें सिद्धीस गेल्यासारखें दिसतें. परमेश्वर दामोदरदासांच्या आत्म्यास चिरस्थायी शांति देवो.

# पर्वतस्तवन.

## आर्या.

पर्वत हो धन्य तुम्ही आहां ती मृत्तिकाशिलाराशी
परि पुण्य जोडितां तें मनुजांच्याही न येचि वांट्यासी. १.
माय धरित्री सर्वां तुमची जीवां कृपा करुनि पाळी
आईचे गुण पुत्रीं यायाला टळति ना कदाकाळीं. २.
जाणों निजमातेला साह्य करायास जन्मलां लोकीं
याहूनि पुण्य मोठें जोडावें काय कष्टुनि तोकीं. ३.
जीवां निर्वाहातें जें जें या लागतें जगीं कांहीं
तें तें उपजायाला नाहीं ती म्हणत ती कधीं नाहीं. ४.
हें व्रत तिज साधाया तुमचें सामर्थ्य तीस साह्य करी
कांहीं कमी पडेना कोणाला कंदरीं तसेंचि घरीं. ५.
आकाशीं दूर किती फिरताती मेघसंघ जे भारी
त्यांतील जीवन असे जीवां वृक्षांस सत्य कीं वारी. ६.
तें निजसामर्थ्यानें खालीं ओढूनि आणितां धरणीं
ही इतरां कोणाला नाहीं येणार या जगीं करणी. ७.
हीच्या योगें धान्यें फळें फुलें विपुल या जगीं येती
तीं आपुल्या गुणांहीं सर्वां जीवांस सौख्य बहु देती. ८.
तैशाचि सहस्रावधि औषधि उत्पन्न वृष्टि ती करिती
त्या आपुल्या गुणांहीं जीवांचे रोग सर्वदा हरिती. ९.
जगदीशध्यानभजन चिंतन नानापरी तपश्चर्या
साधाया हीं पुण्यें आश्रय तुमचा अखंड मुनिवर्या. १०.
हा सत्समागम तुम्हां परोपकारां करोनियां घडतो
ऐसा योग जगाच्या दृष्टीला फार थोडका पडतो. ११.
तुमची रीत धरुनि ही मनुजांनीं ह्या जगांत वागावें
तेणें इहपर त्यांचें हित आपोआप नित्य साधावें. १२.

# हिंदुस्थानांतल्या आईबापांचीं कर्तव्यें.

कालदेशवर्तमानानुरूप प्रत्येक राष्ट्रांतील आईबापांचीं कर्तव्यें वेगळीं वेगळीं होत असतात. आमच्या देशांतील शेंदीडशें वर्षीपूर्वींच्या मातापितरांचीं जीं कर्तव्यकर्में होतीं त्यांहून सध्याच्या मातापितरांचीं कर्तव्यें बरींच वेगळ्या प्रकारचीं झालीं आहेत. मागच्या आईबापांचें सगळें कर्तव्य एवढेंच होतें कीं, त्यांस जें कांहीं ज्ञान होतें तें त्यांनीं आपल्या मुलांस द्यावें; म्हणजे तीं मुलें आपल्या प्रपंचांत सुखी होत असत. त्यांस कांहीं कमी पडत नसे. परंतु सध्याच्या काळच्या आईबापांचें तसें नाहीं. सांप्रतची स्थिति अशी आहे कीं, आमच्या देशांतल्या बहुतेक आईबापांस जें काय ज्ञान आहे तें सगळें जरी त्यांनीं आपल्या मुलांस दिलें तरी तेवढ्यानें त्यांस आपला प्रपंच सध्याच्या काळीं सुखानें आपल्या वडिलांप्रमाणें चालवितां यावयाचा नाहीं. त्यांस त्यांच्या आईबापांपेक्षां पुष्कळ अधिक ज्ञान आवश्यक आहे. हें थोडें उदाहरणांनीं स्पष्ट केलें पाहिजे. दीडशें वर्षांपूर्वींच्या आमच्यांतल्या शेतकऱ्यास एवढेंच काय तें माहीत होतें कीं, शेत पिकलें म्हणजे जो ठरलेला मक्ता असेल तेवढा मालकास वेळच्या वेळीं नेऊन द्यावा, आणि बाकीच्या धान्यांत आपण आपला प्रपंच भागवावा. त्यास लिहिण्यावाचण्याची कधींही आठवण देखील होत नसे. परंतु आतांच्या शेतकऱ्यास शेतांच्या चतुःसीमा कागदावर टिपलेल्या कळल्या पाहिजेत, शेतांचे एकर गुंठे कळले पाहिजेत, सारा किती द्यावयाचा आणि कोणास द्यावयाचा तो कळला पाहिजे, तो सारा पोंचल्याबद्दलची पावती बरोबर पाहून घेतली पाहिजे, आणखी तींत कांहीं कमजास्त असल्यास ती गोष्ट वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांस कायदाकलम दाखवून नीट करून घेतली पाहिजे. आणि तितक्यानें न भागलें तर सरकारपर्यंत त्याची दाद मागून

आपलें काम करून घेतलें पाहिजे. ह्या इतक्या गोष्टी करतां येण्यास सध्याच्या होतकरू मुलांस लिहिणें वाचणें आणि कायदेकानू ह्यांचें परिज्ञान आवश्यक आहे. तें त्यांच्या वडिलांकडून त्यांस मिळण्याची मुळीं आशा नाहीं आणि त्यावांचून तर त्यांस गत्यंतर नाहीं. तेव्हां हें ज्ञान त्यांस प्राप्त होईल अशी कांहीं व्यवस्था हस्तेंपरहस्तें त्यांच्या आईबापांनीं केली पाहिजे, हें उघड आहे. त्याकरितांच सध्याच्या प्राथमिक शिक्षणाच्या शाळांतून कुणब्यामाळ्यांचे मुलगे पुष्कळ जाऊं लागले आहेत आणि सरकारांतूनही पाटीलकुळकर्ण्यांच्या परीक्षा निघालेल्या आहेत. आतां एक व्यापाराचें उदाहरण. सांप्रतकाळीं आमच्या न्यायी आणि दयाळू इंग्लिश राज्यकर्त्यांच्या प्रसादानें देशभर सडका, आगगाड्या, आगबोटी आणि तारायंत्रें, ह्यांचीं जाळीं पसरून पहिल्याच्या शंभरपट, किंवा हजारपट म्हटलें तरी चालेल, सगळ्या प्रकारचा व्यवहार वाढला आहे. आणखी तो झपाट्यानें वाढत चालला आहे. त्या संबंधानेंही व्यापाऱ्यांच्या जुन्या पिढ्यांची आणि नव्या पिढ्यांची अवस्था वर सांगितलेल्या शेतकऱ्यांच्या प्रमाणेंच आहे. जुन्या व्यापाऱ्यांनीं आपला सगळा अनुभव मोठ्या आस्थेनें आपल्या मुलांच्या अंतःकरणांत किती जरी खचून भरला तरी तो सध्याच्या व्यापारांतल्या उलाढालींस कधींही पुरावयाचा नाहीं. फार काय सांगावें ? एकाद्या लहानशा खेड्यांतल्या पिढीजाद तरुण व्यापाऱ्यास आपला माल आगगाडीनें किंवा आगबोटीनें पाठवावयाचा असला तर तें काम त्याला स्वतःला स्वतंत्रपणें करितां येत नाहीं. त्यास शहरांतल्या आणि स्टेशनावरच्या हमालांपासून तों दलालांपर्यंत तज्ज्ञ लोकांचें साह्य घ्यावें लागतें. आणि तें साह्य कोणी कोणाला मुफत देत नाहीं. त्याकरितां पैसा खर्चावा लागून हांजी हांजी करावी लागते. ह्याचें कारण उघड हें आहे कीं, बापांनीं त्यांस जें काय शिकविलेलें असतें तेवढ्यानें त्यांची गरज भागत

नसल्यामुळें त्याच्या भरतीचें ज्ञान त्यांस अशा प्रकारें तज्ज्ञांपासून मिळवावें लागतें.

ह्या दोन उदाहरणांवरून सहज लक्षांत येईल कीं, आमच्या देशांतील बहुतेक आईबापांचें ज्ञान सांप्रतकाळच्या त्यांच्या पिढ्यांस पुरण्यासारखें नाहीं. त्याविषयीं निराश होऊन स्वस्थ बसून उपयोगी नाहीं. आपल्या मुलांस एकादा कांहीं रोग झाला आणि त्याच्या निवारणास आपणाजवळचीं किंवा आपल्या गांवांतल्या वैद्यांचीं औषधें उपयोगीं पडत नाहींत असें झालें म्हणजे आईबापें पैशाकडे किंवा परिश्रमाकडे तिळमात्रही लक्ष न देतां त्या रोगाचें परिमार्जन करण्यास जें औषध आवश्यक असतें तें मिळवून मुलांस बरें करण्याचा भगीरथ प्रयत्न करितात, हें आपण नेहमीं पाहतों. तशासारखा हा प्रकृत प्रसंग आहे. अज्ञान हा एक प्रकारचा रोगच आहे. तो घालविण्यास ज्ञान एवढेंच काय तें औषध आहे. तें ज्ञान जर आपल्या घरांत नाहीं तर तें जेथें म्हणून मिळेल तेथून हरप्रयत्नानें संपादून तें आपल्या मुलांस द्यावें हें आईबापांचें अत्यंत आवश्यक कर्तव्यकर्म आहे. तें करण्यास मार्ग आमच्या पूर्वजांनीं सांगावयाचे ठेविले नाहींतः

> गुरुशुश्रूषया विद्या
> विपुलेन धनेन वा
> अथवा विद्यया विद्या
> चतुर्थं नोपलभ्यते १.

परंतु ह्या उपायांचा उपयोग प्रकृतविषयांत अगदींच होत नाहीं म्हटला तरी चालेल. आतां शेतकी किंवा व्यापार अशा सामान्य विषयाच्या संबंधाची माहिती ज्या कोणांपासून मिळते, त्यांस गुरु हा शब्द लावणें अमळसें अवजड वाटतें खरें; परंतु आपणाला जो कोणी एकादा लहानमोठा चांगला गुण शिकवील तो तितक्यापुरता आपला गुरु समजावा असें आमच्यांतल्या प्राचीन महंतांचें

सांगणें आहे. फार काय सांगावें, कष्टाळूपणाचा गुण मनुष्यांस गाढवाच्या वृत्तीवरून शिकण्यासारखा आहे, आणि पुनःपुनः सात वेळ आपलें जाळें बांधल्याच्या एका कोळ्याच्या गोष्टीवरून दृढनिश्चयाचा चांगला बोध आपल्या मनास होतो, म्हणून तितक्यापुरतें त्या क्षुद्र प्राण्यासही आपण आपले गुरु समजावे. असें आमचे कवि आम्हांस सांगतात. ह्या न्यायानें पाहिलें ह्मणजे आलीकडच्या नवीन व्यवहारांत जितकीं माणसें पडलीं आहेत आणि प्रवीण झालीं आहेत, मग तीं कितीही लहानमोठीं असोत तीं तदितर तरुण माणसांचीं गुरु आहेत असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. शाळांतल्या विद्यांची गोष्ट ह्या व्यवहारांसारखीच आहे. परंतु त्यांच्यांत आणि ह्या व्यवहारांत हें एक मोठें अंतर आहे कीं, शाळांतल्या विद्या शिकविण्यास जागोजाग शाळा आमच्या सरकारनीं घातल्या आहेत. त्यांकरितां चांगलीं पुस्तकें लिहिलीं आहेत आणि त्यांवर चांगल्या शिक्षकांच्या नेमणुका केल्या आहेत. तेणेंकरून तें काम ठीक चाललें आहे. परंतु अन्य व्यवहारांचें तसें नाहीं. त्यांच्या कोठें शाळा नाहींत, आणि त्यांजवर कोठें गुरु नेमलेले नाहींत. आगकाड्या, कागद, वाफेचीं यंत्रें, कापड विणणें, इत्यादि कला शिकविण्याच्या कोठें शाळा नाहींत; त्याप्रमाणेंच तारतम्य पाहून धान्य, कापूस, सोनें, रुपें, इत्यादि माल सस्त असला म्हणजे, खरीद करून ठेवणें, आणि त्यांचे दर चढले म्हणजे ते विकून त्यापासून नफा मिळविणें हे व्यवहार शिकविण्याच्याही कोठें शाळा आणि शिक्षक नाहींत. आणि असे कारखाने आणि असे व्यवहार ह्या तर संपत्तीच्या मुख्य खाणी आहेत, असें आतां पाश्चात्यांच्या सहवासानें आमच्यांतल्या सुजाण आईबापांस चांगलें कळून आलें आहे. हें दोन प्रकारचें ज्ञान पुस्तकांच्या अभ्यासानें किंवा गुरुमुखानें कधीं कोणास प्राप्त व्हावयाचें नाहीं तर तें संपादण्यास

मनुष्यास कितीएक वर्षें त्या कारखान्यांत किंवा व्यवहारांत रुळलें पाहिजे. तें मोठ्या सोशिकपणाचें आणि धूर्तपणाचें काम आहे. त्यास वेळही पुष्कळ लागतो. कै० शेट जावजी दादाजी आणि गेल्या डिसेंबर महिन्याच्या 'बालबोधां'त चरित्र दिलें आहे ते भिवाजी रामजी नरे हे कधीं छापखाना चालविण्यास आणि कापड विणण्यास कोणाएका गुरुपाशीं शिकले नाहींत. तर त्यांना त्या कला त्या व्यवसायांत रुळून रुळून प्राप्त झाल्या होत्या, हें आमच्या वाचकांच्या लक्षांत असेलच. तें नेहमीं आपल्या मुलाच्या शिक्षणाच्या संबंधानें आमच्यांतल्या आईबापांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. म्हणजे नानाप्रकारचे कारखाने आणि नानाप्रकारचे व्यवहार हे महागुरु समजून त्यांच्या सेवेस यथाशक्ति आपल्या मुलांस सवड साधेल त्याप्रमाणें लाविलें पाहिजे.

ह्या आवश्यक क्रमास अगदीं आपोआप आरंभ झाला आहे. पाश्चात्य विद्येमध्यें निपुण होऊन आमचे कित्येक हिंदी लोक पाश्चात्यांच्या अगदीं बरोबरीचे सिविल सर्वंट, डाक्टर, बारिस्टर, प्रोफेसर इत्यादि उत्तम कर्ते पुरुष होऊन इकडे आले आहेत आणि ते त्या प्रकारच्या पाश्चात्य विद्वानांच्या बरोबरीनें काम करीत आहेत. ह्याचीं उदाहरणें फार नाहींत, पण थोडींबहुत तरी सर्व हिंदुस्थानभर पसरलीं आहेत. रँगलर परांजपे, प्रो. बोस, हीं त्यांत ठळक उदाहरणें आहेत. परंतु हें भाग्य फार थोड्यांच्या वांट्यास येतें. त्यांस आमच्या जुन्या मंडळीनें पुढें दृष्टी देऊन प्रोत्साहन देत असावें हें त्यांचें मुख्य कर्तव्य आहे.

ह्या विषयांत एका देशाचे परिश्रम एकदम दुसऱ्या देशाच्या उपयोगीं पडत नाहींत. हे परिश्रम ज्याचे त्यानेंच केले पाहिजेत. छापखाने, गिरण्या, आगगाड्या, टेलिफोन, फोनोग्राफ, इत्यादि सुखोत्पादक यंत्रें, अन्य देशांत कितीएक वर्षांच्या श्रमांनीं सिद्ध झालीं आहेत. तीं हिंदुस्थानास आइतीं मिळून त्यांपासून

सुखोपभोग घेतां येत आहे. तसें प्रकृत विषयाच्या स्थितीचें नाहीं. एके वेळीं नेपोलियन बोनापार्टाला कोणीं असें विचारिलें कीं, "राष्ट्र उच्चपदास कशानें चढतें?" त्यास त्यानें उत्तर दिलें "चांगल्या मातापितरांनीं राष्ट्र उच्चपदास चढतें." ह्या उत्तराचा विचार केला म्हणजे समंजस माणसांच्या लक्षांत सहज येईल कीं, जशीं तीं यंत्रें एका देशांतून दुसऱ्या देशांत विकत घेऊन नेतां येतात, तसा प्रकार चांगल्या मातापितरांचा कधीं व्हावयाचा नाहीं. चांगलीं मातापितरें देशांतल्या देशांतच पायरीपायरीनें हळुहळु सिद्ध झालीं पाहिजेत. त्यास उत्तम उपाय एकच आहे. तो एवढाच कीं, जीं राष्ट्रें सध्यां उन्नतावस्थेप्रत पोंचलीं आहेत, त्यांतल्या मातापितरांनीं आपआपल्या मुलांच्या हितार्थ काय काय योजना केल्या आणि कोणते कोणते उपाय योजिले, हें सांप्रतच्या आपणांतल्या सुशिक्षित लोकांपासून समजून घेऊन आपल्या स्थितीप्रमाणें सारासारविचार करून आपल्या मुलांस हस्तें परहस्तें योग्य शिक्षण द्यावें आणि त्यास मनोभावेंकरून परमेश्वराचा आशीर्वाद मागावा म्हणजे पुढें केव्हां ना केव्हां तरी एकामागून एक अशा पिढ्यांनीं अधिक अधिक चांगलीं आईबापें आणि त्यांचीं मुलें पैदा होत जाऊन तीं सगळीं आमच्या राष्ट्राच्या उद्धाराच्या मूळ पायासारखीं होतील अशी आमची खातरी आहे. ह्यांत सगळें मातापितरांचें कर्तव्य आहे.

---

## शास्त्रीयज्ञानाभिवृद्धि.

तेल आणि समुद्राच्या लाटा—समुद्रावर तुफान होऊन पर्वतप्राय लाटा उसळूं लागल्या म्हणजे मोठमोठ्या शक्तीच्या आगबोटींचेंही त्यांपुढें कांहीं चालत नाहीं, असा अनुभव आहे. अशा वेळीं पाण्यावर तेल सोडलें असतां त्याचा उपयोग समुद्र शांत करण्याच्या कामीं फार होतो, ही गोष्ट प्राचीन काळापासून माहीत

आहे, तरी तिचा प्रत्यक्ष अनुभव मोठ्या प्रमाणावर आजपर्यंत फारसा घेतलेला नव्हता. तो नुकता गेल्या आक्टोबर महिन्यांत अटलांटिक महासागरांत एका मोठ्या कठिण प्रसंगीं आला. 'व्होल्टर्नो' नांवाची एक मोठी आगबोट युरोपखंडांतून अमेरिकेकडे चालली होती. अमेरिकाखंडांत वसाहत करण्यासाठीं आणि पोटास मिळविण्यासाठीं जाणारे पांचसाहाशें युरोपियन लोक त्या आगबोटीवर होते. ती अटलांटिक महासागरांत बऱ्याच अंतरावर गेल्यानंतर एक भयंकर तुफान सुरू होऊन प्रचंड लाटांच्या तडाक्याखालीं ती आगबोट जायबंदी झाली, आणि शिवाय तिजवर आग लागून सर्वांवर कठिण प्रसंग गुदरला. तेव्हां त्या आगबोटीचे मुख्य कॅप्टन बार ह्यांनीं, त्या आगबोटीवर बिनतारांचा टेलिग्राफ होता त्याच्या योगानें, आपल्या आगबोटीवर संकट गुदरल्याची खबर सर्व दिशांस पाठविली. त्यासरशा पुष्कळ आगबोटी 'व्हाल्टर्नो'च्या मदतीला धांवून गेल्या, परंतु त्या वेळेस त्या जागचा समुद्र इतका खवळून गेला होता कीं, त्यांपैकीं कोणत्याही आगबोटीला आपल्या होड्या त्या संकटांत असलेल्या आगबोटीकडे पाठवितां येईनात. इतक्यांत 'नरगणसेट' नांवाची केरोसीन तेलाच्या टांक्यांची एक आगबोट तेथें आली, आणि तिनें आपल्या टांक्यांतलें तेल मोठ्या पंपांनीं त्या खवळलेल्या समुद्रांत सोडण्यास सुरवात केली. तिनें हजारों ग्यालन तेल ह्याप्रमाणें समुद्रांत सोडलें तेव्हां व्होल्टर्नो आगबोटीच्या भोंवतालचा समुद्र पुष्कळ शांत झाला, आणि मग तिजवरील बहुतेक लोकांस होड्यांतून उतरून घेऊन वांचवितां आलें. तेलाचा जो हा उपयोग लाटा शमविण्याच्या कामीं होतो, त्याच्या संबंधानें प्रो० रे लँकेस्टर ह्यांनीं आपलें असें मत प्रसिद्ध केलें आहे कीं, होड्या सुरक्षितपणें उतरतां याव्या अशा रीतीनें तारवाभोंवतालचा समुद्र शांत करण्यास एक

बाटलीभर तेल पुरे आहे; ज्यास्त तेलाची गरज नाहीं. मात्र हें तेल चांगल्या रीतीनें सभोंवार पसरण्यास एक लहानसें यंत्र लागतें. त्याच्या योगानें समुद्राच्या पाण्यावर त्या तेलाचा अगदीं पातळ असा थर पसरतो, आणि त्याचा उपयोग त्यावर रबराचा पातळ पापुद्रा ताणावा त्याप्रमाणें होतो; म्हणजे लाटा उठून फुटण्याच्या पुष्कळ अंशीं बंद होतात. ह्यास्तव लाटा शांत करण्याचें हें स्वल्प साधन प्रत्येक आगबोटीनें बाळगिलें पाहिजे, असा कायदा असावा असा त्या गृहस्थांचा अभिप्राय आहे, आणि तो बरोबर आहे.

**पोलादी पत्रे सहज कापण्याची आणि जोडण्याची नवी युक्ति.**—कार्बाईड आफ् कॅल्शियम म्हणून एका प्रकारची पूड बाजारांत मिळत असते, तिजवर पाणी सोडलें ह्मणजे तींतून एक ग्यास बाहेर पडतो, आणि तो पेटविला असतां डोळ्यांस दिपवणारी अशी ज्योत उत्पन्न होते. ह्या ग्यासास 'असिटिलीन' असें नांव आहे, आणि ह्याचे दिवे शोभेकरितां लावण्याची पुष्कळ चाल पडलेली आहे. ह्याशिवाय दुसरा फारसा उपयोग ह्या ग्यासचा आजपर्यंत करीत नसत, परंतु अलीकडे त्याचा एक महत्त्वाचा उपयोग करण्याची युक्ति निघाली आहे. ह्या ग्यासच्या ज्योतींत आक्सिजन वायु मिश्रित केला असतां सुमारें ६३०० अंशांची उष्णता उत्पन्न होते, आणि तिच्या योगानें पोलादही सहज वितळतें. पोलादाचे दोन तुकडे जोडावयाचे असल्यास आतां त्यांना खिळे मारण्याचें कारण राहिलें नाहीं. ते एकमेकांस लावून ठेवून त्यांच्या सांध्याच्या जागीं आक्सिजनमिश्रित ॲसिटिलीनची ज्योत लहानशा भात्याच्या योगानें सोडली कीं तेथलें पोलाद ताबडतोब वितळून सांधा बेमालूम बसतो. त्याचप्रमाणें हवे तितके जाड पोलादी पत्रे कापण्याचेंही काम ह्या ज्योतीच्या योगानें झराझर होतें. कागद जसा कातरीनें कापावा तसे कोणत्याही धातूचे पत्रे ह्या ज्योतीनें

कापतां येतात. ह्या यंत्रास 'असिटिलीन ब्लोवर' म्हणतात. पोलादी किंवा इतर पत्र्यांत कोणताही 'डिझाइन' कापावयाचा असो, त्या डिझाइनवरून त्या यंत्रांतल्या आंखणीचें एक टोंक फिरविलें म्हणजे तिचें दुसरें टोंक त्या पत्र्यावरून हव्या त्या लहान मोठ्या प्रमाणांत फिरतें, आणि त्या टोंकावर बसविलेल्या 'असिटिलीन ब्लोवर'नें त्या पत्र्यांत तो डिझाइन कापून निघतो ! ह्या नवीन साधनाच्या योगानें, मोटार गाड्यांस कोणत्याही ठिकाणीं ताबडतोब दुरुस्ती करतां येईल. असिटिलीन ग्यासचा उपयोग शक्ति आणि उष्णता उत्पन्न करण्याकडे आजपर्यंत फारसें कोणीं लक्ष दिलें नव्हतें. तिकडे आतां कल्पक लोकांचें लक्ष लागलें असून त्यापासून अनेक प्रकारीं फायदा होईल असें म्हणतात.

**बिनतारी टेलिग्राफमध्यें सुधारणा.**—आजपर्यंत, बिनतारी टेलिग्राफनें येणाऱ्या खबरी कोणत्या दिशेकडून येतात हें जाणण्याचें स्वतंत्र साधन नव्हतें. खबरींत सांगितलेल्या जागेवरून तें ठिकाण काढावें लागे, परंतु पुष्कळ प्रसंगीं, संकटांत असलेल्या भर समुद्रांतील तारवाकडून येणाऱ्या खबरींत, ठिकाण सांगणें कठिण असतें. अशा वेळीं येणाऱ्या खबरीची दिशा समजणें अत्यंत महत्त्वाचें असतें, तें एका नवीन युक्तीच्या योगानें साध्य होऊन बिनतारी टेलिग्राफच्या उपयुक्ततेस चांगलीच भर पडली आहे.

**आगबोटी बांधणारांपुढें एक चमत्कारिक प्रश्न.**—लहानसान वस्तूंवर कमजास्त भार पडल्यानें त्या मोडलेल्या आपण नेहमीं पहातों, आणि त्यांत चमत्कारिक म्हणून कांहींएक नसतें. परंतु शेंकडों फूट लांबीच्या लोखंडी भक्कम पत्र्यांनीं बांधलेल्या प्रचंड आगबोटींवरही मधोमध मोडण्याचे प्रसंग यावे ही गोष्ट साधारण माणसांस विलक्षण वाटण्याचा संभव आहे. परंतु

असेही प्रसंग येतात. कधीं कधीं आगबोटी किनाऱ्यावरील खडकांवर किंवा रेतीच्या दांड्यांवर चढतात, आणि ओहट लागून त्यांच्या खालचें त्यांना तोलून धरणारें पाणी निघून गेलें म्हणजे त्या मधोमध मोडण्याची भीति असते. कारण अशा प्रसंगीं आगबोट कधीं कधीं एकाद्या खडकावर मधोमध टेंकून राहिलेली असते, आणि मग तिच्या दोन्ही टोंकांकडल्या वजनानें तीं टोंकें ओथंबून जाऊन आगबोट मधोमध मोडते, किंवा ती दोन्ही टोंकांकडे टेंकून राहिलेली असते तेव्हां मध्यभाग ओथंबून जाऊन ती तेथें मोडते. अशा प्रसंगीं आगबोटीचे दोन निरनिराळे तुकडे होतात असें नाहीं; परंतु तिच्या सांगाड्याचे मधले पत्रे फाटून जाऊन ती निरुपयोगी होते. हें, आगबोटी क्वचित् प्रसंगीं किनाऱ्यावर किंवा रेतीच्या दांड्यावर चढतात तेव्हांच्या संबंधाचें झालें. परंतु, ह्याशिवाय आगबोटी भर समुद्रांत चालत असतांना देखील त्यांना हें भय असतें. तें असें. वादळांत किंवा ऐन भरतीच्या वेळीं समुद्रांत मोठाल्या उंच लाटा येत असतात, अशा वेळीं समुद्रांतून आगबोट वेगानें चालत असतांना केव्हां केव्हां ती दोन्ही टोंकांकडे दोन लाटांनीं उचलली जाते, आणि मध्यभागीं तिला आधार नाहींसा होऊन तो भाग ओथंबल्यासारखा होतो आणि तेथें तिची पाठ मोडून ती निरुपयोगी होते. ह्या अशा प्रसंगीं आगबोटीस इजा न होऊं देण्याकरितां तिच्या बांधणींत कसकसे फेरफार करावे ह्याचा आगबोटी बांधणारे लोक विचार करीत आहेत. 'व्हायपर' नांवाची एक टार्पिडो बोट दर तासास ३५ मैल वेगानें समुद्रांतून जात असतां कांहीं वर्षांमागें अर्ध्यावर मोडली, आणि अगदीं अलीकडे 'ओक्लाहोमा' नांवाची एक तेल भरून चाललेली आगबोट अशीच जायबंदी झाली, तेव्हांपासून ह्या प्रश्नास विशेष महत्व आलें आहे.

## एक अत्यंत हृदयद्रावक गोष्ट.

कलकत्ता येथें हरेंद्रचंद्र मुकरजी या नांवाचे एक संभावित गृहस्थ राहत असून त्यांना एक मुलगी होती. तिचें नांव त्यांनीं 'स्नेहलता' असें ठेविलें होतें. ती मुलगी १४ वर्षांची झाल्यावर तिचा पिता सहजच स्थल शोधावयास लागला. त्याला स्थल सांपडलें, परंतु हुंड्याची मागणी फार मोठी असल्यामुळें आपलें घर गहाण टाकल्याशिवाय दुसरी गति नाहीं अशी जेव्हां वेळ आली, तेव्हां त्याच्या अंतःकरणास अतिशयित दुःख झालें. हा सगळा प्रकार त्या प्रौढ मुलीच्या लक्षांत पूर्णपणें येऊन तिला असें वाटलें कीं ज्या महात्म्यानें आपणास लहानाचें मोठें करून हालकष्ट सोसून वाढविलें त्यास आपल्या विवाहा-निमित्त एवढें संकट प्राप्त व्हावें हें आपणास मोठें लांच्छन आहे, ह्याकरितां ह्यापासून आपल्या बापास कसें तरी विमुक्त केलें पाहिजे. म्हणून तिनें रात्रीचे प्रहरीं आपल्या तीर्थरूपांस एक लहानसें पत्र लिहून ठेविलें. त्यांत तिनें म्हटलें आहेः—

"बाबा! माझ्या लग्नाकरितां आपणांस घरदार गहाण टाकावें लागणार आहे, हें एक मला महत्संकट वाटत आहे. तें मी आपणांवर येऊं देणार नाहीं. आपण खचित समजा कीं, आपणांवरचें हें अरिष्ट टाळण्याकरितां उदईक प्रातःकाळीं सूर्योदय होण्याच्या आधीं, जेथें शांति चिरस्थायी असते आणि जेथें दुःखाचा लेशही नसतो अशा देवलोकीं मी स्वसंतोषानें निघून गेल्याचें आपणांस कळेल, आणि आपला जीव खालीं पडेल. आपण तिळमात्रही कष्टी होऊं नये." अशा प्रकारें स्नेहलतेनें आपल्या बापास पत्र लिहून ठेवून आपला देह जाळून घेऊन हा मृत्युलोक सोडिला. हें तिचें धैर्य आणि पितृप्रेम पाहून राजस्थानांतील इतिहासप्रसिद्ध भीमराजाची कन्या कृष्णाकुमारी

हिचें स्मरण होतें. तिनें अशाच प्रसंगीं आपल्या आईस जें म्हटलें त्याचें वर्णन थोडक्यांत एका ठिकाणीं केलें आहे तें असें:—

**श्लोक.**

ज्यानें जन्म दिलें कडे मिरविलें घेवोनि खांदां भलें
केलें लालनपालनादि सगळें जें मत्सुखा लागलें
त्याचे संकटवारणीं खरचिलें हें देह माझें जरी
माझे पुण्यतरू सुखप्रद फलीं ओथंबले हो तरी. १.
प्राण्यांतें मरणें जगीं सकलही केव्हां न केव्हां तरी
गेले कोट्यवधी तयांत कसली ह्या पामरीची परी
ताताच्या यशरक्षणीं मरण हें लग्नाहिपेक्षां मला
संतोषप्रद वाटतें शपथ गे शंका नसावी तुला. २.

वाटे पिता देव तसाचि मातें
ज्ञानी गुरूचें मत हेंहि माते
वेंचीन हा जीव तदीय पायीं
पावेन मी मुक्ति अशा उपायीं. ३.

यावें मला मरण संकट हें टळावें
तातास दुःख न कधीं तिळ आतळावें
हा दे मला वर दयाकर आजि माते
देईल कोण वद इष्ट दुजें मुलातें ४.

स्नेहलतेच्या लेखाचा आशय बहुतेक अगदीं असाच आहे. तर मग ‘कृष्णाकुमारी’प्रमाणें ‘स्नेहलते’चें नांवही हिंदुस्थानाच्या सामाजिक इतिहासांत अजरामर होऊन राहणें अत्यंत आवश्यक आहे. म्हणून तिला आम्ही दोन ओळी येथें अर्पण करितों.

झाली कृष्णाकुमारी अतुल निजयशें पात्र कीर्तीस कन्या
तैसी गे स्नेहवल्ली तदनुकरणिं तूं वाटसी धन्यधन्या ।
घेवोती लोक बोधा विमल तुमचिया या चरित्रांवरून
चालोती लग्नकार्यीं सुखदनयपथा सर्वदा आदरून ॥

# लोक काय बोलतात.

युनैटेड स्टेस्ट्समधील नीग्रो लोकांची संख्या गेल्या पन्नास वर्षांत ४० लक्षांची एक कोटि झाली आहे.

---

मुंबई हायकोर्टाचे माजी जज्ज मि० जस्टिस रसेल हे गेल्या महिन्याच्या ८ व्या तारखेस इंग्लंडांत मरण पावले.

---

असा अजमास निघाला आहे कीं, गेल्या वीस वर्षांत सुमारें ४०००० हिंदुलोक मुसलमान झाले आहेत आणि १२०००० हिंदुलोक खिस्ती झाले आहेत. हिंदूंना भर नाहीं.

---

कुचबिहारच्या माजी महाराजांच्या राणीसाहेबांनीं ३ पुस्तकें लिहिण्याचा निश्चय केला आहे:—१ आपल्या भ्रतारांचें चरित्र, २ स्वचरित्र, आणि ३ हिंदुस्थानांतील स्त्रियांची प्रगति.

---

दारूच्या दुकानांत आजपर्यंत चवदा वर्षांहून कमी वयाच्या मुलांस दारु विकीत नसत. लोकांच्या आग्रहावरून सरकारनें ती मर्यादा सोळा वर्षांची केली आहे. चांगलें झालें. ही मर्यादा अठरा वर्षांची केली तर ह्याहून चांगलें होईल.

---

पुणें येथील सरकारी हायस्कुलचा प्रश्न फिरून उपस्थित झाला असून त्याचें काय करावें हें ठरविण्याकरितां मुंबई सरकारनें पुण्याचे कलेक्टर, एज्युकेशनल इन्स्पेक्टर, मध्यभाग, त्या हायस्कूलचे हेडमास्तर, ना० काशिनाथपंत गोडबोले, रा० हरि नारायण आपटे, व रा० नरसिंह चिंतामण केळकर, इतक्या गृहस्थांची कमिटी नेमून रिपोर्ट मागविला आहे. हें बंद करूं नये हें बरें.

---

सन १८७० पासून १८८० पर्यंत हिंदुस्थानांत एकंदर ७११ छापखाने होते. यापुढील दहा वर्षांत त्यांची संख्या १४६५ झाली

व पुढील दहा वर्षांत ही संख्या वाढून २१५३ वर आली, व गेल्या सालीं तर २७८१ छापखाने झाले आहेत. याच ३२ वर्षांत वर्तमानपत्रांची संख्या ३२८ वरून ६५९ वर गेली आणि मासिकें तर ३२२ चीं २२६९ झालीं. अभिवृद्धि आहे.

---

एशियाखंडांतील भाषा इंग्लंडांत शिकविण्याकरितां एक मोठी शाळा स्थापण्याचा विचार होऊन त्याकरितां एक मोठी सभा लंडन येथें मे महिन्याच्या ६ व्या तारखेला मॅनशनहाऊसमध्यें भरणार आहे. तेव्हां लॉर्ड क्रोमर, लार्ड कर्झन, इत्यादि मोठमोठी मंडळी भाषणें करणार आहेत. त्या कार्यास इंग्रज सरकारनें दरसाल ४००० पौंड व हिंदुस्थान सरकारनें १२५० पौंड देण्याचें ठरविलें आहे. चांगलें आहे.

---

मुंबई इलाख्याच्या शाळाखात्याचा गतवर्षाचा रिपोर्ट छापला आहे. त्यांतील माहिती:—एकंदर मुंबई इलाख्यांतल्या शिक्षणसंस्था १६४६० होत्या त्या १७१२० झाल्या. विद्यार्थ्यांची एकंदर संख्या ९२२८७७ होती ती ९८७६८५ झाली. शिक्षणसंस्थांची वाढ मुख्यत्वेंकरून प्राथमिक शिक्षणाच्या शाळांत झाली आहे. एकंदर खर्च १७ लाख रुपयांचा वाढला आहे. दक्षिण भागामध्यें मुसलमानांत चांगली विद्यावृद्धि झाली आहे. शाळांतल्या मुलांची ८००० ची संख्या १४००० पर्यंत गेली आहे.

---

सन १९११ सालच्या हिंदुस्थानच्या खानेसुमारीस एकंदर खर्च २० $\frac{1}{2}$ लाख रुपये लागला. तिचे नक्की आंकडे येणेंप्रमाणें:—

ब्रिटिश मुलुख:—२४४२६७५४२

देशी संस्थानें:— ७०८८८८५४

---

सगळें हिंदुस्थान ३१५१५६३९६

सगळ्या हिंदुस्थानाकरितां दर चौरस मैलास १७५ मनुष्यें असें लोकसंख्येचें सरासरी प्रमाण पडतें. नुसत्या ब्रिटिश मुलुखांत हें प्रमाण २२३ पडत असून देशी संस्थानांत १०० पडतें.

---

मेहेरबान महंमद युसफ इसाएल ह्या उदार गृहस्थांनीं मुंबई इलाख्यांतील मुसलमानांच्या विद्यावृद्धीकरितां ८ लाख रुपयांची देणगी नामदार गव्हरनर साहेबांकडे पाठविली आहे. तीबरोबर अशी विशेष सूचना आहे कीं, मुसलमानांकरितां एक कालेज मुंबईस किंवा पुण्यास स्थापावें आणि तें मुंबईच्या विश्वविद्यालयास जोडावें. ही देणगी सरकारनें फार आभारपूर्वक मान्य केली आहे आणि त्याप्रमाणें लवकर व्यवस्था करण्याविषयीं त्या उदार गृहस्थांस अभिवचन दिलें आहे. सध्याच्या स्थितीकडे पाहिलें असतां मुसलमानांकरितां वेगळ्या पाठशाळा स्थापण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

---

दक्षिण आफ्रिकेवर इंग्लिश सरकारानें नामदार लार्ड ग्लाडस्टन ह्यांस व्हाइसराय नेमिलें होतें. ते आपल्या जागेचा राजीनामा देऊन लवकरच परत इंग्लंडास जाणार आहेत. दक्षिण आफ्रिकेमध्यें हिंदी लोकांविषयीं जी गडबड चालली होती तिचा आणि नुकतेच कामकरी लोकांनीं दंगे केले त्यांचा ह्या राजीनाम्याशीं कांहीं संबंध नाहीं. लार्ड ग्लाडस्टन हे कांहीं घरगुती कामानिमित्त स्वदेशीं परत जात आहेत. त्यांच्या जागेवर मि० सिडने बक्स्टन ह्यांची नेमणूक झाली आहे. हेही गृहस्थ फार जुने सरकारी कामदार आहेत आणि यांनीं सरकारचीं मोठमोठीं कामें केलीं आहेत.

---

महाराज सवाई तुकोजीराव होळकर आणि श्री० बाबासाहेब घोरपडे यांच्या स्वाऱ्या कितीएक महिने युरोपखंडांत पुष्कळ प्रवास करून इकडे आल्या आहेत. त्यांनीं तिकडे पुष्कळ गोष्टी पाहून त्यांची माहिती मिळविली असलीच पाहिजे. ती माहिती आपल्या प्रवासवर्णनाच्या रूपानें मराठींत लिहून जर त्यांनीं प्रसिद्ध केली तर तिच्या अवलोकनानें सगळ्या महाराष्ट्रीयांस पुष्कळ लाभ होतील अशी आमची खात्री आहे आणि त्याजबद्दल सर्व लोक त्यांचे फार फार आभार मानतील. आणखी द्रव्यसाहाय्य, लेखक, छापखाने, ह्यांच्या संबंधानें उभयपक्षीं कांहीं उणीव नाहीं. ह्या विनंतीस कृपा करून त्यांनीं मान द्यावा.

---

शेवटचे बाजीराव पेशवे ब्रह्मावर्तास गेल्यानंतर तेथें त्यांस इंग्रज सरकारानें छावणीसाठीं भागीरथीच्या किनाऱ्यावर सुमारें सहा मैल परिघाची जागा नेमून देऊन तिच्या चोहों बाजूंस हद्दीच्या खुणांसाठीं सोळा दगडी खांब रोंविले होते. बाजीराव साहेबांचें लष्कर, स्वार, शिबंदी, हत्ती, घोडे, नोकरचाकर, बाजारबुणगें वगैरे सर्व मिळून एक मोठें गांवच बसलें होतें. त्यामुळें त्यास राजधानीचें स्वरूप येऊन, बाजीराव साहेब मरतपर्यंत म्हणजे इ० स० १८१८ ते १८५१ पर्यंत तेथें राजकीय ऐश्वर्य नांदत होतें. बाजीराव साहेबांस **"महाराज"** किंवा **"श्रीमंत"** असें म्हणत असत, व सरकारी कागदपत्रांतही **"हिज हायनेस महाराज"** असें लिहीत असत.

---

मुंबईस कापसाचा आणि धान्याचा व्यापार कुलाब्यास आणि मांडवींत चालतो, तो सगळा मुंबईबेटाच्या उत्तरेस नेण्यासाठीं मुंबई पोर्टट्रस्टनें शिवडी येथील किनाऱ्यावर पुष्कळ भरणी घालून ५९६ एकर जमीन नवसाध्य केली आहे. हें काम करण्यासाठीं 'काळू' आणि 'जिंगा' नांवाचीं समुद्राच्या तळचा गाळ काढणारीं दोन प्रचंड यंत्रें लाविलीं होतीं. तीं तो गाळ वर शोषून घेऊन तो चारहजार फूट लांबीच्या मोठाल्या नळांमधून शिवडीच्या कांठावर मुरुमाचे बांध घातले होते त्यांत सोडीत. ह्याप्रमाणें हीं यंत्रें दर तासास सुमारें ५४०० टन गाळाची भरणी घालीत! ह्या नवसाध्य केलेल्या जमिनीवर तेलाच्या धान्याच्या आणि कापसाच्या प्रचंड वखारी बांधण्याचें काम सुरू आहे, आणि त्याच्या संबंधानें एक नवीन रेलवे बांधीत आहेत. ह्या सगळ्या कामाकरितां पोर्ट ट्रस्टनें सुमारें सवातीन कोटी रुपये खर्च केले आहेत! हें सगळें सुरू झालें म्हणजे आजमितीस मुंबई शहरांत जे हजारों बैलांचे खटारे काम करीत आहेत ते बहुतेक सर्व बेकार पडतील. ह्या योजनेस जोडूनच पोर्टट्रस्टनें 'अलेक्झांड्रा' नांवाची एक नवी गोदी सुमारें साडेपांच कोटि रुपये खर्चून बांधिली आहे. ती खुली करण्याचा समारंभ ह्या महिन्यांत व्हाइसराय साहेबांच्या हातून व्हावयाचा आहे.